**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

**पृ.शी.**: सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक

**L.C. BILL NO. II OF 2013**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE.

( विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाले.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहात आवश्यक ती गणसंख्या नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, आपण सभागृहाचे कामकाज 10 मिनिटे स्थगित करावे. सर्वच गोंधळ निर्माण होत आहे. सभागृहाची प्रथा, परंपरा मोडण्यास मी तयार नाही. माझी विनंती आहे की, आपण सभागृहाची बैठक 10 मिनिटे स्थगित करावी. हे रेकॉर्डवर आले पाहिजे. यावर कोठे तरी नियंत्रण आले पाहिजे. संसदीय कामकाज मंत्री हे इतके आळशी झाले आहेत की त्यांना काहीच वाटत नाही.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : मला वाटते सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब, आपण आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काल मी लेखा परीक्षणाच्या बाबतीत बोलत होतो. लेखा परीक्षण कोणासाठी आणि कशासाठी करायचे ? या विधेयकावर बोलताना मी विधेयकातील तरतुदींच्या पुढे जाऊन परत मागे येण्याचे ठरविले आहे.

महोदय, या विधेयकातील पृष्ठ क्रमांक-33 वरील खंड 69 (क) मध्ये नमूद केले आहे की, ""जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक ही पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल, जसे" या मजकुराऐवजी "जिल्हा सहकारी कृषि व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकेत पुढील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्यक्तींचा अंतर्भाव असेल,-" हा मजकूर दाखल करण्यात येईल.;" महोदय, हा कायदा अस्तित्वात

..2..



श्री.दिवाकर रावते....

आल्यानंतर मुळात या बँका अस्तित्वात पाहिजेत ना ? त्यामुळे बँका खरोखरच अस्तित्वात आहेत काय हे पाहिले पाहिजे. मी मंत्री असताना जुलै-ऑगस्टच्या सुमारास भूविकास बँकेचे पुनरुज्जीवन करण्याबाबतचा विषय आला होता. 750 कोटी रुपये भरले तर भूविकास बँक पुन्हा एकदा पुनरुज्जीवन होईल अशा प्रकारचा तो प्रस्ताव होता. मी ग्रामीण भागात काम केलेले असल्यामुळे भूविकास बँकेचे महत्त्व मला माहीत होते. सरकारची नक्की कार्यपध्दती, आर्थिक क्षमता, इ. बाबींचा मला मोठा अभ्यास होता असे नाही. कारण मंत्री म्हणून मी खूप उशिरा आलो होतो. मला मंत्री म्हणून 15 महिन्यांचा कार्यकाळ मिळाला होता. त्या 15 महिन्यांत मी जुना असल्यासारखे काम करणे हा वेगळा भाग होता. परंतु एक गोष्ट खरी की, मला त्या काळात मिळालेले सर्व सचिव कार्यक्षम आणि त्यांचा अभिमान बाळगावा असे होते. श्री.हुसेन, श्री.सरंगी या सारखे सचिव मला मिळाले होते. मंत्री म्हणून माझे अज्ञान असले तरी, मी मंत्री आणि ते अधिकारी आहेत म्हणून त्यांनी कधीही 'Yes sir, Yes sir' केले नाही. त्यांनी मला चांगल्याप्रकारे समजून सांगितले.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

मला चांगले सचिव मिळाले.

ती बँक पुनरुज्जीवित होईल का याचा विचार करुन मी सांगितले की, ती बँक पुनरुज्जीवित करावी लागेल. त्यासाठी 750 कोटी रुपये लागणार होते. आता आपल्याला 750 कोटी रुपये, एक हजार कोटी रुपये काहीच वाटत नाहीत. त्या वेळेला शिवशाही सरकारने 18-19 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढले म्हणून त्या वेळच्या विरोधी पक्षातील सदस्यांनी कर्जाच्या बाबतीत खूप ओरड केली होती. माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख आणि श्री. हर्षवर्धन पाटील हे त्या काळात आमच्या सरकारमध्ये होते. त्यावेळी विरोधी पक्षातील सदस्य कर्जबाजारीपणाबद्दल खूप ओरड करीत होते. त्यामुळे माझा तो प्रस्ताव त्यावेळी पुढे रेटला गेला नाही. त्यानंतर दोन तीन महिन्यात आमचे काय व्हायचे ते झाले आणि आम्ही मार्गाला लागलो. माझी जी सुप्त इच्छा होती ती पूर्ण झाली नाही. 1999 मध्ये श्री. हर्षवर्धन पाटील यांच्याकडे तातडीने सहकार खाते आले नव्हते. नंतर श्री. शरद पवार साहेबांनी आणि तत्कालीन मंत्रिमंडळाने यापुढे भूविकास बँकेला पुनरुज्जीवित करण्याचा कोणताही प्रस्ताव पुढे न्यावयाचा नाही आणि आर्थिक क्षमता निर्माण करावयाची नाही असा निर्णय घेतला.

सभापती महोदय, भूविकास बँकेचा जन्म झाला तेव्हा तुमचा आमचा जन्म तर सोडाच पण स्वातंत्र्याचाही जन्म झाला नव्हता. आता विविध बँकांचे जे मोठे जाळे पसरले आहे त्याही अस्तित्वात नव्हत्या आणि त्यांचा मागमूसही नव्हता, विचारही नव्हता. तेव्हा सावकारी पाशामध्ये अडकलेल्या शेतकऱ्यांकरिता या बँकेची स्थापना झाली. आपण जे सावकारी बिल मंजूर केले त्याचा अजून पत्ता नाही. त्या बिलाच्या बाबतीत आम्हाला झुलवत ठेवले आहे. त्या बाबतीत अजूनही थापा मारत आहेत. त्या वेळच्या दुष्काळी परिस्थितीचा अभ्यास करणारे शेतीतज्ज्ञ त्यावेळी होते. मी 1879 बाबत बोलत आहे. त्यावेळच्या ब्रिटीश सरकारने 1859 साली डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलिफ ॲक्ट नावाचा कायदा संमत केला.

सभापती महोदय, आमचा सावकारी कायदा माननीय राष्ट्रपती चार वेळा परत पाठवितात. तो कायदा वारंवार परत येतो. त्याबाबत ना खंत ना खेद अशी परिस्थिती आहे. यामध्ये विधी खात्याचा संबंध असल्यामुळे जपून शब्द वापरतो नाही तर लाज लज्जा असे म्हणू शकलो असतो.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. दिवाकर रावते ....

पण आपल्या विधी खात्याला ना खंत ना खेद म्हणून हे विधयेक वारंवार परत येते आणि सरकारच्या विश्वासार्हतेला तडा जावा अशी परिस्थिती निर्माण होते आणि सरकारच्या कोणत्या तरी संबंधित सावकाराला वाचविण्याकरिता दंड भरल्यानंतर सुध्दा हे बिल मुद्दाम पुढे ढकलले जाते की काय अशी उगाच शंकेची पाल मनात चुकचुकते.

सभापती महोदय, मी हे का सांगत आहे ? आज सभागृहासमोर असलेली परिस्थिती, त्यावेळच्या इंग्रजाच्या काळातील तज्ज्ञांनी शेतकऱ्यांचा केलेला विचार आणि त्या वेळच्या सरकारने त्या विचारांचा केलेला सन्मान म्हणून डेक्कन अग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्ट नावाचा कायदा त्यांनी केला. त्यानंतर शेतकऱ्यांचे कर्ज फेडण्याकरिता ब्रिटीश अधिकाऱ्यांनी एक बँक स्थापन केली. त्याकरिता योजना आखली. पण त्या बँकेला त्या वेळच्या इंग्रज सरकारने मान्यता दिली नाही. म्हणून 1884 साली शेतकऱ्यांना कर्जातून सोडविण्याचा कायदा संमत करण्याकरिता ते सतत प्रयत्नशील राहिले. त्या सरकारमध्ये असा विचार करणारी मंडळी सुध्दा होती. या शेतकऱ्यांची सोडवणूक कशी करावी, त्यांना अर्थसहाय्य कसे करावे, त्यांना सावकारांच्या पाशातून कसे मोकळे करावे या विचार करुन 1904 मध्ये सरकारने सहकाराला पोषक होईल असा सहकारी कायदा संमत केला. आपला स्वातंत्र्यानंतरचा कायदा 1960 सालचा आहे.

1912 मध्ये नवीन सुधारणा करुन शेतकऱ्यांना फायदेशीर ठरत नसल्याचे लक्षात आल्यानंतर

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

1930 साली इंग्रजांनी गोलमेज परिषद घेतली. त्या परिषदेच्या ठरावानुसार ब्रिटिश सरकारने रॉयल कमिटी व पंजाब कमिटीची स्थापन करुन शेतकऱ्यांनी दीर्घ मुदतीचे कर्ज देण्यासाठी सबंध देशभर भूविकास बँकेची स्थापना केली. त्या बँकेची मूळ पीठिका ही आहे. दिनांक 28.6.1935 साली या बँकेला मान्यता मिळाली आहे. म्हणजे किती गंमतीदार भाग आहे ? 1930 साली स्थापन झालेल्या बँकेला 5 वर्षानंतर मान्यता मिळाली आहे. ज्या बँकेच्या जीवावर संपूर्ण महाराष्ट्र राज्याला हे सरकार लुबाडते,जे हवे ते मिळविता, त्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला रिझर्व्ह बँकेची मान्यता आहे की नाही हे मला माहीत नाही. ही बँक बेकायदेशीरपणे चालविली जात आहे. त्याचे सरदार माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार हे आहेत. त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या ताब्यात ही बँक आहे. काही दिवसांपूर्वी रिझर्व्ह बँकेने त्या बँकेवर कारवाई केली होती. नंतर लोकांच्या असे लक्षात आले की, आपण या बँकेबरोबर इतके वर्षे संबंध ठेवले आहेत, करोडो रुपयांच्या ठेवी ठेवलेल्या आहेत त्या बँकेला मान्यताच नाही.

इंग्रजांच्या काळात 1930 साली स्थापन केलेल्या या भूविकास बँकेला ती बँक योग्य असल्याचे सांगितल्यानंतरही त्यावेळच्या सरकारची 1935 साली मान्यता मिळाली आहे. ती मान्यताप्राप्त भू-विकास बँक राज्यात आलेली आहे. राज्य सहकारी बँकेला रिझर्व्ह बँकेची अद्याप मान्यता मिळाली आहे की नाही हे मला माहीत नाही. परंतु त्या बँकेला सरकारने 100-200 कोटी रुपये दिलेले आहेत. सरकारने बेकायदेशीरपणे चालविलेली ही बँक आहे. हा सरकारचा सन्मान आहे काय ? सावकारांच्या पाशातून शेतकऱ्यांना मुक्त करण्याकरिता व शेतकऱ्यांच्या पायाभूत सुविधां करिता कर्जाची उपलब्धता करणे हा एक महत्वाचा भाग ठरला आहे. त्या काळात ती बँक सुध्दा अडकली होती. जसे राज्य सहकारी बँकेचे झाले होते तसे त्या बँकेचेही झाले होते.

हे करीत असताना देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर महाराष्ट्र, गुजरात मिळून मुंबई राज्य निर्माण झाल्यावर प्रथम बँक ऑफ कराड या बँकेची स्थापना झाली. माननीय मुख्यमंत्री त्या भागातील आहेत. म्हणजे यशवंतराव चव्हाण यांच्या कराडमध्ये ही बँक स्थापन झाली. या बँकेचे पहिल्या वर्षी एकूण 848 सभासद होते. त्या काळात या बँकेकडे 28 हजार शेअर्स जमा झाले

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.दिवाकर रावते....

होते. या बँकेच्या संचालक मंडळाने बैठकांना येण्याजाण्याचा 4 वर्षे खर्च घेतला नाही. आता संचालक मंडळाची भत्त्यासाठी धावपळ चालू असते. त्यावेळच्या संचालकांनी भत्ता घेण्याचे नाकारुन बँक चालविण्याचे ठरविले होते. त्या बँकेमध्ये आदरणीय यशवंतराव चव्हाण यांचे वडील बंधू गणपतराव चव्हाण हे कारकून म्हणून काम होते. त्यावेळी कारकून म्हणून काम करणाऱ्याला फार महत्व होते. त्यावेळी व्हर्नाक्यूलर फायनल झालेल्या व 7 वी पर्यंत शिकलेल्या तलाठ्यांच्या कार्यालयातील कारकुनांमध्ये जी क्षमता होती, ती क्षमता आज जे उच्च शिक्षित आहेत त्यांच्यात 10-15 वर्षे काम केल्यानंतरही निर्माण होत नाही. त्यांचे संपूर्ण कामकाज मोडी लिपीतून चालत असे. आज ती क्षमता सापडत नाही.

आम्ही सावकारी कायद्याचा आग्रह का धरत आहोत ते सांगतो. तो कायदा आला तर सावकारांच्या ताब्यात असलेल्या आमच्या शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांना परत मिळतील. शेतकऱ्यांच्या गहाण पडलेल्या जमिनी सोडविण्यासाठी व तगाईसाठी म्हणजे बंडिंगसाठी ती बँक कर्ज देत होती. शेतकऱ्यांच्या गरजांमुळे बँकेच्या कामाचे स्वरुप वाढत गेले. सरकारही बँकेला हमी गेले. त्यावेळी अर्थसंकल्पामध्ये त्याची तरतूद होत होती. या हमीपोटी शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जातून बँकेला जो नफा होईल त्या नफ्यातून सरकारला काही निधी मिळत होता. ऊस उत्पादकांकडून 4 हजार कोटी रुपये सरकारला मिळतात असे सांगितले जाते. या बँकेला शेतकऱ्यांकडून जमा केलेल्या पैशातून बँकेला नफा झाला तर सरकारला 1 टक्का हमी शुल्क मिळत होते. आता ते बुडविण्यासाठी व्यवस्थितपणे व्यवस्थापन केले जाते. त्यामुळे 1 टक्का तर सोडा. सरकारला हमी शुल्क मिळण्याचा प्रश्नच नाही.

यानंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ ST/ D/खंदारेनंतर 10:15

श्री.दिवाकर रावते.......

सभापती महोदय, 1998 साली मी सहकार मंत्री असताना मागणी करण्यात आली होती, ती मी पूर्ण करु शकलो नाही याची मनामध्ये खंत आहे. शेतक-यांच्या या बँकेला 750 कोटी रुपयांची मदत केली असती तर ही बँक जोमाने काम करु शकली असती. 750 कोटी रुपयांत पूर्ण क्षमतेने पुनर्जीवित झाली असती. ते करता आले नाही.

सभापती महोदय, एकदा वस्त्र फाटायला सुरुवात झाली की ते इतके फाटते की वस्त्रच शिल्लक रहात नाही. अशी आज या भूविकास बँकेची स्थिती झाली आहे. या बँकेची स्थापना झ ाली तेव्हा दीर्घ मुदतीची कर्जे मिळण्याचा प्रश्न होता. जिल्हानिहाय बँकेच्या शाखा स्थापन करण्यामागे शेतकरी आणि शेतीसाठी पायाभूत सुविधाकरिता कर्ज उपलब्ध होणे हा हेतू होता. आज परिस्थिती अशी आहे की, भूविकास बँकेच्या राज्यातील ग्रामीण भागात 329 शाखा आहेत. 2345 कोटी रुपये दिलेले कर्ज येणे बाकी आहे. आज बँका अवसायानात निघालेल्या आहेत. कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे 3640 कोटी रुपये थकलेले आहेत. त्यांना शासनाने सांगितले की, तुम्ही कर्जाची वसुली करा आणि पगार घ्या. त्यानुसार कर्मचारी वसुली करण्यासाठी जातात आणि जी काही वसुली होईल त्यातून पगार करुन घेतात. या भूविकास बँकेतील लोकनियुक्त संचालक मंडळ बरखास्त करुन बँक अवसायानात काढलेली आहे. बुलढाणा, अकोला येथील भूविकास बँक अवसायानात काढली आहे. परंतु सहकारी संस्था अधिनियम, 1960 च्या कलमानुसार संभाजीनगर (औरंगाबाद), जालना, बीड, नगर, धुळे, धाराशीव, परभणी या बँकांचे अवसायानाचे आदेश शासनाने जारी केले आहेत. या निर्णयाविरुध्द या सर्व बँका न्यायालयात गेल्या आहेत. दिनांक 10 एप्रिल, 2013 रोजी या प्रकरणाबाबत सरकारला न्यायालयात म्हणणे मांडायचे आहे. भूविकास बँका अवसायानात काढल्याच आहेत. परंतु शिखर बँकेचे साम्राज्य लयाला गेले आहे. जवळजवळ सर्वच बँका अवसायानात निघाल्यामुळे तेथे प्रशासक नेमलेले आहेत.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये 1969 मध्ये स्थापन केलेल्या जिल्हा सहकारी भूविकास व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक म्हणजे भूविकास बँक या संदर्भात नवीन मजकूर टाकण्यासंबंधी तरतूद केलेली आहे. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर किंबहुना 15 फेब्रुवारी, 2013 रोजी अध्यादेश काढलेला असल्यामुळे तो अंमलात आलेला आहे, त्यामुळे सहा महिन्यापासून जास्तीत जास्त एक वर्षानंतर शासनाला कोणत्याही संस्थेमध्ये प्रशासक ठेवता येणार नाही. मंत्रीमहोदयांनी याबाबत

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

उत्तरामध्ये खुलासा केला पाहिजे. सभापती महोदय, आज पश्चिम महाराष्ट्रातील भूविकास बँका थोड्या तग धरुन आहेत. तेथील शेतकऱ्यांना याची जाणीव आहे, ते संस्था जगवतात. मराठवाडा, विदर्भ, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर या ठिकाणच्या भूविकास बँका अवसायानात निघाल्या असल्यामुळे त्यांचे अस्तित्व क्षीण झालेले आहे. त्या बँकांवर शासनाने संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासकाची नियुक्ती केलेली आहे.

सभापती महोदय, हे विधेयक मंजूर झाल्यानंतर एक वर्षाच्या पुढे तेथे प्रशासक ठेवता येणार नाही. निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. आज या बँकांकडे एकही पैसा शिल्लक नाही. कर्मचाऱ्यांचे पगार द्यायला पैसा नाही. मग या बँका निवडणुकांसाठी पैसा कुठून आणणार? हा विषय मी काल मांडला होता. निवडणुका घेण्यासाठी पैसा नसेल तर विधेयकात अशी तरतूद आहे की, निवडणूक आयोगामार्फत सरकारी पैशाने निवडणुका घेतल्या जातील, नंतर संस्थेची मालमत्ता महसुली कायद्याप्रमाणे विकून निवडणुकीसाठी झालेला खर्च वसूल केला जाईल. या बँकांचे काय होणार हा विषय ऐरणीचा ठरणार आहे.

नंतर इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विनाअनुदानित धाळेत केलेली सेवा वरीष व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबत"

श्री. विक्रम काळे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. सतीश चव्हाण, श्री. अमरसिंह पंडित, डॉ. सुधीर तांबे, विधान परिषद सदस्य.

तारांकत प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आपल्याकडे ज्या काही भूविकास बँका आहेत त्या पुनरुज्जीवन करण्यासाठी जवळपासू 2 हजार कोटी रुपये लागण्याच्या शक्यता आहे. आतापर्यंत 4 बँका अवसायानात गेल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात या बँकाची प्रॉपर्टी जवळपास 3 हजार कोटी रुपयांची आहे. त्यामुळे त्यांची प्रॉपर्टी आपण घेणार आहात काय ? ही प्रॉपर्टी विलीन करुन कोणाच्या ताब्यात देणार आहात काय ? मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, हा क्रांतिकारी विषय आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांना यासंदर्भात पटले तर ते निर्णय घेऊ शकतात. ज्यावेळेला राष्ट्रीय बँका कर्ज देण्यास थकतात, 8-10 जिल्हा बँका डबघाईस आलेल्या आहेत. या डबघाईस बँकांना पैसे देऊन जगवण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे याच प्रकारे भूविकास बँकांना जगवले तर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळू शकेल. भूविकास बँक ही शेतकऱ्यांना सावकारांपासून दूर ठेवणारी बँक आहे. त्यामुळे भूविकास बँकेचे पुनरुज्जीवन केले तर या कायद्याचा खूप चांगला उपयोग होऊ शकेल. या कायद्यामध्ये चांगल्या प्रकारचे व्यवस्थित निर्बंध आणलेले असल्यामुळे उद्या कोणाचीही या बँका फूंकून टाकण्याची हिंमत होणार नाही असे मला वाटते. या भूविकास बँकांचे पुनरुज्जीवन होणार असेल तरच या कायद्यामध्ये काही अर्थ राहील अन्यथा या बँका अवसायानात जाणार असतील तर ते योग्य होणार नाही. भूविकास बँका 1930 पासून स्थापन झाल्या असून या बँकेला 1935 मध्ये मान्यता मिळाली आहे. असे असतांना या भूविकास बँकाना कायमचीच तिलांजली देण्याचा निर्णय आपण घेतला आहे काय ? याबाबत आपल्याकडून माहिती उपलब्ध झाली तर फार बरे होईल.

सभापती महोदय, या बँकांचे लेखापरीक्षण कोण करणार, कशासाठी करणार ? कारण या बँकाचे लेखापरीक्षण करण्याची वेळच येणार नाही.

सभापती महोदय,विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 39 वरील 81. मुख्य अधिनियमाच्या कलम 165 मधील पोट-कलम (2) मध्ये असे म्हटले आहे की, "(पाच-क 1) प्रशिक्षणाचा व शिक्षणाचा कालावधी आणि असे प्रशिक्षण ज्या कालांतराने देण्यात येईल तो कालांतर, आणि अधिनियमाच्या कलम 24अ अन्वये प्रशिक्षण व शिक्षण निधीमध्ये विविध संस्था ज्या विविध दरांनी अंशदान करतील ते दर विहित करणे". असा उल्लेख आहे. काल या विधेयकाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी या विधेयकाचा प्रशिक्षण हा मूळ आत्मा राहणार आहे. सहकाराच्या संदर्भात प्रत्येकाला मुलभूत प्रशिक्षण देऊ असे सांगितले. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी बळकाऊ जमिनीचा मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळेस माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, आम्ही कोणत्याही परिस्थितीत जागा देऊ देणार नाही. सगळी जागा न्यायालयातून घेऊच.त्यावेळेला तेथे असे प्रशिक्षण केंद्र उभे करु की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देशभरातील लोक सहकाराचे प्रशिक्षण घेण्यासाठी तेथे येतील असा आदर्श उभा करु. राज्य सहकारी संघ बुलढाण्यामध्ये प्रशिक्षणाचे काम करीत आहे. परंतु त्या राज्य सहकारी संघाची परिस्थिती काय आहे ? असे असतांना तुमच्याकडे सहकाराचे प्रशिक्षण घेण्यासाठी देश भरातील लोक तुमच्याकडे कशासाठी येतील ? तुमच्याकडे काय शिकण्यासाठी येतील ?

यानंतर श्री. मंगेश.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

राज्य सहकारी बँकेच्या कलम 83 च्या चौकशीचे आदेश जानेवारी महिन्यात या राज्य सहकारी संघाकरिता देण्यात आले. तेथे फार मोठ्या प्रकारचा घोटाळा झाला. विरोधक हा वेगळा विषय आहे. परंतु, राज्यामध्ये असे झाले आहे की, सरकारमध्येच एकमेकांचे एवढे विरोधक झाले आहेत की, विरोधकांनी काय करायचे असा आम्हाला नेहमी प्रश्न पडत आहे. पूर्वी म.वि.प. नियम 260 अन्वयेचा सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव गुरूवारी असायचा आणि विरोधी पक्षाचा प्रस्ताव मंगळवारी असायचा. आता सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव मंगळवारी असतो. शासनाला असे वाटत आहे की, विरोधकांना नामोहरम करून ही भूमिका आम्हालाच बजाविली पाहिजे. विरोधकांची हवाच काढून टाकली की अधिवेशन कसे मस्त जाईल. मी काल तो विषय मांडला.

सभापती महोदय, पहिला प्रस्ताव दुष्काळाचा आला, जो आम्ही मांडला पाहिजे होता. दुष्काळ शासनामुळे निर्माण झाला आणि आता हेच सांगत आहेत की, दुष्काळाच्या प्रस्तावावर आम्ही चर्चा करणार आहोत. आनंद आहे. महिलांच्या विषयावर या सदनात शंभर टक्के चर्चा होणार. त्यामुळे या संदर्भातही शासनानेच प्रस्ताव आणला. त्यामुळे आमच्या माननीय मंत्री प्रा. वर्षा गायकवाड ताईंची मोठी पंचाईत झाली. शासनाने तो प्रस्ताव हुशारीने आणला. तो कोणी मांडला ? सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेब, आम्ही आपल्याला विरोधी पक्षाचे प्रतिनिधीत्व करणारे सदस्य समजतो. आमचे सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी साहेब या सभागृहाचे आधार होते. आता या जागेवर आपण बसता. आपण तेवढ्याच जबाबदारीने ती जागा सांभाळत आहात, याचा आम्हाला अभिमान वाटतो. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले हे आजपर्यंत कधीही वेगळे काही बोलले नाहीत. फक्त दादांचे नाव काढले की, ते पटकन उभे राहतात. त्या संदर्भात त्यांना काही जमलेले नाही.

सभापती महोदय, मी महिलांच्या प्रस्तावाच्या संबंधी बोलत आहे. मुद्दा प्रवृत्तीचा आहे. प्रस्तावामध्ये महिला आरक्षण, महिला अमुकतमुक होते, मात्र महिलांवरील अत्याचार बाजूला ठेवला होता. सभागृहात महिलांच्या अत्याचारावर चर्चाच होऊ नये, अशा प्रकारची क्लुप्ती राजकीय व्यवस्थेत वापरली होती. प्रस्तावामध्ये महिला अत्याचाराविषयी उल्लेखच नव्हता. तो काल परवाचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

प्रस्ताव आहे. तुम्ही आम्हाला नामोहरम करण्यासाठी असे करीत असाल तर ते ठीक नाही. तुमच्या लक्षात कसे आले नाही की, सरकार एवढे निकम्मे आहे ? कामांच्या बाबतीत अशी परिस्थिती निर्माण करून ठेवली आहे की, सत्तारूढ पक्षात बसून त्यांना वस्त्रहरण करावे लागत आहे. आम्हाला काही करायला शिल्लकच ठेवत नाही. एका समाजाचे साधू कसे मोकळे असतात, तसे तुम्ही मोकळे करून देता. आम्ही फक्त वंदन करतो.

सभापती महोदय, बँकेचे भांडण झाले, आरबीआयने तंबी दिली. बाबा जिंकले. बाबा कसे जिंकले, दादा कसे नामोहरम झाले, याचेच गोड कौतुक 4 दिवस चालले होते. राज्य सहकारी संघ हे प्रशिक्षण देणारे केंद्र आहे. राज्य सहकारी संघ म्हणजे प्रशिक्षण केंद्र हे संपूर्णतः राष्ट्रवादीच्या ताब्यात होते. अतिशय हुशारीने त्यातील भ्रष्टाचार चिमटीमध्ये सापडला. आमचे माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील इतके हुशार आहेत की, ते कळत नकळत काही करीत असतात. बोंब मात्र माननीय मुख्यमंत्र्यांच्या नावाने होत असते. माननीय हर्षवर्धन पाटील हे सर्व मंत्री म्हणून करतात. सगळे श्रेय मिळते तर का घ्यायचे नाही ? दिल्लीमध्ये वट वाढते.

राज्य सहकारी बँकेच्या कलम 83 च्या चौकशीचे आदेश जानेवारीत देण्यात आले. आयुक्तांना हे सर्व माहीत आहे, त्यांना नव्याने सांगण्याची गरज नाही. मी त्यांचे आदेश वाचणार आहे. सहकार आयुक्तालयाने महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या कायद्यातील 88 कलमान्वये .... सदर प्रशिक्षण केंद्रामध्ये 1069 कोटी रूपयांचा घोटाळा झाला आहे. हे प्रशिक्षण केंद्र आहे. बँक नाही किंवा इतर देवाणघेवाण नाही. आता शासन म्हणत आहे की, राष्ट्रीय कीर्तिचे प्रशिक्षण केंद्र काढायचे आहे. पहिल्या प्रशिक्षण केंद्रामध्ये 1069 कोटी रूपयांचा घोटाळा होत असेल या आंतरराष्ट्रीय कीर्तिच्या प्रशिक्षण केंद्रात किती कोटी रूपयांचा घोटाळा होणार आहे ? आता घोटाळा करोडोमध्येच मोजला जातो.

( नंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ ST/ 10:30

श्री.दिवाकर रावते....

मला हे सगळे जाणवले. 1069 कोटी रूपया संबंधी वैयक्तिक जबाबदारी निश्चित करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आता प्रत्येक संचालकाला जबाबदार धरण्यात येणार आहे.

सभापती महोदय, नजिकचे नातेवाईक म्हणजे कोण याची व्याख्या येथे दिलेली नाही. पत्नी देखील नजिकच्या नातेवाईकांमध्ये येईल काय ? पत्नी नातेवाईकात असल्यामुळे घटस्फोट झाला असे रेकॉर्डवर दाखवून माझा काही संबंध नाही असे भासवतात. हल्ली प्रवृत्ती, विचार, कृती सगळे काही मॉर्डनाईज्ड झालेले आहे. त्याकरिता आता सर्व कार्यवाही सुरू आहे. राज्य सहकारी संघावर झालेल्या आरोपावर नियम 83 अन्वये चौकशी पूर्ण झाल्यानंतर घोटाळा समोर आला आहे. तो कसला घोटाळा आहे ? बीओटी तत्त्वावर प्रकल्प उभे केले आहेत. रूपये 1057 कोटी 83 लक्ष 76 हजार 895 संबंधात सर्व चौकशी झाली. अनामत रक्कम रूपये 5 कोटी 2 लक्ष 98 हजार 889 आहे. वापरात नसलेल्या जागा रूपये 3 कोटी 53 लक्ष 32 हजार 339 आहे. भाडेकरार केलेली रक्कम 1 कोटी 7 लक्ष 43 हजार 696 आहे. सेवक भविष्य निर्वाह निधी रूपये 78 लक्ष 10 हजार 515 एवढा आहे. प्रवास व बैठकीवरील खर्च रूपये 20 लाख 39 हजार 44 आहे.

मागे सभागृहात पणनचे एक विधेयक आले होते. त्या विधेयकाच्या चर्चेतून मी एक भ्रष्टाचार मांडला होता. तेव्हा मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सर्व सदस्यांकडून त्यांनी खर्च केलेले लाखो रूपये सभागृहात विषय मांडल्यानंतर शासनाने वसूल केले आहेत. आमच्यावर हे सर्व मांडण्याची वेळ का येत आहे. या व्यतिरिक्त आम्हाला काहीच सांगायची संधी मिळत नाही. ते काही पटलावर येतच नाही. हे विषय 10 ते 5 मिनिटात होत नाहीत. हे विधेयक प्रशिक्षणासंबंधी देखील सांगत आहे. त्याचे तीन तेरा कसे वाजले आहेत हा देखील महत्त्वाचा विषय आहे. पणनच्या विधेयकाच्या चर्चेनंतर पैसे वसूल झाले आहेत.

सभापती महोदय, प्रवास आणि बैठकीचा एकूण खर्च रूपये 20 लाख 39044 इतका आहे. मोबाईल खरेदी आणि दुरूस्ती रूपये 8 लक्ष 47182 आहे. वाहनांच्या इंधरावरील खर्च रूपये 17 लक्ष 97214 आहे. जेवण आणि लॉजिंगवरील खर्च रूपये 8 लक्ष 30998 आहे. विभागीय मंडळावर खर्च रूपये 45 लक्ष 34 हजार आहे. न्यायालयीन केसेसवर रूपये 20 लक्ष 38198 इतका आहे. कॅन्टीन करारानुसार रूपये 19 लक्ष 71 हजार 608 असा मिळून 1069 लक्ष घोटाळ्याचा पर्दाफाश

BGO/ D/ ST/ 10:30

श्री.दिवाकर रावते...

झाला. त्याची चौकशी झाली व तो घोटाळा सिद्ध झाला. आता वैयक्तिक जबाबदारी निश्चित करण्याचे काम सुरू आहे. सरकारला असे काम केल्याबद्दल समाधान वाटले असेल. एवढा मोठा घोटाळा केल्यामुळे हे संचालकांना बुडविणार. हे असे जमते काय ? नियम 88 अन्वये चौकशी सुरू झाल्यानंतर वैयक्तिक जबाबदारी निश्चित करण्याकरिता आमच्या डॉक्टर केदारे जाधव यांना चौकशी अधिकारी म्हणून सहकार आयुक्तांनी नेमले. मग सूत्र हलली.

मध्ये अशी बातमी आली होती की, माननीय राज्यमंत्र्यांना काहीच काम नाही. त्यांना कोणतेच अधिकार नाहीत. यासंबंधी फार ओरड झाल्यानंतर माननीय राज्यमंत्र्यांना अधिकार न देता सन्मान देऊ असा निर्णय घेतला. त्यामुळे त्यांना मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये उपस्थित राहण्यास परवानगी देण्यात आली. त्यामुळे सगळे खुश आहेत. निदान तेथील भजीपाव तरी खायला मिळतो. आता मंत्रिमंडळ बैठक कक्षामध्ये सर्वजण दाटीवाटीने बसतात. पूर्वी मोकळे बसून मोकळेपणाने भांडत होते. राष्ट्रवादी विरूद्ध काँग्रेस असा सामना व्हायचा. सन्माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख हे शांत असून ते कशात नसतात. ते इकडे ना तिकडे. मंत्रिमंडळामध्ये माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून जोरात भांडण असते. काम नसलेल्या, अधिकार नसलेल्या, फक्त लाल दिवा घेऊन मिरविणाऱ्या माननीय राज्यमंत्र्यांना मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये बसण्यास अनुमती दिल्यामुळे ते खुश आहेत.

यानतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ ST/ D/ पूर्वी श्री.अ.शिगम . . . 10:35

श्री.दिवाकर रावते . . ..

सभापती महोदय, मी विधेयकाच्या बाबतीतच बोलत आहे. बेडकी लगेच फुगते. बेडकीला असे वाटते की, आपण फुगत चाललो आहोत आणि बैलाला टक्कर देऊ. मग मी राज्यमंत्री आहे हे ते विसरतात. सहकार विभागाचे बीड मधील आमचे आदरणीय राज्यमंत्री श्री.प्रकाशभाऊ सोळंके साहेब यांनी कारवाईच्या बाबतीत सबुरीचा सल्ला दिला. श्री.सोळंकेसाहेब यांनी सांगितले की, जरा थांबा हो, घाई करु नका, मी मंत्री म्हणून तुम्हाला सांगत आहे. माननीय श्री.प्रकाशभाऊ सोळंके मंत्र्यांचा भ्रष्टाचारामध्ये हस्तक्षेप, ताबडतोब.

सभापती महोदय, बीड येथील जिल्हा बँकेच्या संदर्भात सांगू काय? तुम्हाला माहिती आहे. फक्त ती जिल्हा बँक राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्षाला मिळू शकली नाही कारण आदरणीय श्री.गोपीनाथ मुंडे यांचे त्यावर वर्चस्व आहे म्हणून. पण कायद्याचा वापर करुन, मंत्री पदाचा वापर करुन त्या बँकेला साफ सपाट करण्याचे काम माननीय श्री.सोळंके यांनी केले. पण कायद्याचा वापर करुन, मंत्री पदाचा वापर करुन त्यांनी चूक केली असे मी म्हणत नाही. त्यांनी पाप केले असेल तर ते त्यांनी भरावे, तो माझा विषय नाही. पण तुम्ही बीडमध्ये जी ताकद दाखविली ती महाराष्ट्रा-मध्ये इतर ठिकाणी दाखविली काय असा जर प्रश्न उपस्थित केला तर मी आज दिवसभर खाली बसू शकणार नाही एवढी माझ्याकडे प्रकरणे आहेत. केवळ माननीय श्री.गोपीनाथ मुंडे यांच्यावर आकस आणि भारतीय जनता पक्षाच्या व माननीय श्री.गोपीनाथ मुंडे प्रणित माणसांकडे असलेला बँकेचा ताबा पाहून माननीय मंत्री श्री.प्रकाशभाऊ सोळंके यांनी मंत्री पदाचा वापर करुन बीडमध्ये मंत्री पदाची क्षमता काय असते ती दाखविली.

सभापती महोदय, मी मुद्दाम याचा उल्लेख करतो. त्याच आमच्या माननीय मंत्री श्री.प्रकाश भाऊ सोळंके यांनी आमच्या संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले आणि जरा सबुरीचा सल्ला दिला. मग आयुक्तालयाला सांगितले की, जरा थांबून घ्या, थांबून घ्या. ते एवढे कोटी रुपये कुठून आणणार? याबाबत विचार करावा लागेल. काही करु नका, पुढे जाऊ नका.मग कॅबिनेट मंत्र्यांचे पद काँग्रेस कडे आणि राज्यमंत्री पद राष्ट्रवादी पक्षाकडे दिले. आता सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडीत हे भविष्यामध्ये बीडमधील खासदारकीचे उमेदवार आहेत आणि त्या पध्दतीने सदनामध्ये काम करावयाचे. मी सदनाला सांगू इच्छितो की, यापुढे सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित उभे राहिल्यावर असे सांगावयाचे की हे खासदासरकीचे उमेदवार आहेत.

. . . .एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ ST/ D/ 10:35

श्री.दिवाकर रावते . .

सभापती महोदय, मध्यंतरी या सरकारने तांबीचा प्रचार केला होता. महत्वाचा मुद्दा असा आहे की, या संपूर्ण राज्य सहकारी संघाच्या चौकशीच्या संदर्भात आदरणीय राज्य मंत्री यांनी सबुरीचा सल्ला दिला असे मी अधिकृत बोलत आहे. मग मंत्रीपद काँग्रेसकडे आणि राज्यमंत्री पद राष्ट्रवादी कडे गेले.याठिकाणी माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत.उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्या दालनामध्ये दिनांक 6 फेब्रुवारी रोजी या संदर्भात बैठक झाली. खरे म्हणजे सहकारी संघाच्या समस्यांबाबत ही बैठक बोलविलेली असताना माननीय मंत्री महोदय श्री.हर्षवर्धन पाटील हे देखील या बैठकीला हजर होते. सन्माननीय मंत्री श्री.प्रकाशभाऊ सोळंके हे देखील उपस्थित होतेच, कारण त्यांनीच ती बैठक आयोजित करण्याबाबत घाट घातला होता. त्यावेळी आमचे सन्माननीय सचिव श्री.राजगोपाल देवरा साहेब उपस्थित होते. तसेच आमचे आयुक्त श्री.चौधरी साहेब देखील बैठकीसाठी उपस्थित होते आणि इतर बाकीचे अधिकारी देखील असणारच.

सभापती महोदय, त्याठिकाणी संघाच्या पदाधिकाऱ्यांना देखील बोलाविले होते. ज्यांनी बँक बुडविली आहे आणि त्यांच्यावर आता जबाबदारी निश्चित करावयाची आहे. तुम्ही किती भ्रष्टाचार केला आहे आणि तुमच्याकडून कायद्याप्रमाणे किती वसूल करावयाचे आहेत वगैरे. ते सगळेही त्यावेळी उपस्थित होते. मग त्यांनी सदरहू बैठकीमध्ये असे सांगितले की, आता खर्च वाढला असून उत्पन्न घटत आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे अशाप्रकारची चर्चा झाली. या संदर्भात माननीय मंत्रिमहोदय काय करणार आहेत ते त्यांच्या उत्तरामध्ये माहिती देतील. त्या चर्चेमध्ये सांगण्यात आले की, संचालकांवर कारवाई करण्यापेक्षा संघाचे कामकाज शासनाने ताब्यात घ्यावे आणि हे प्रकरण संपवावे. सहकार संघामध्ये 1 हजार 169 कोटी रुपयांचा झालेला घोटाळा मान्य झाला, तो स्वीकृत झाला ....

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. तसेच ते शिवेसना पक्षाचे गट नेते आहेत. त्यांनी सहकार मंत्री म्हणून देखील काम केलेले आहे. या विधेयकावर बोलण्याचा त्यांचा आजचा तिसरा दिवस आहे. विधेयकावर बोलण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे, त्यांनी विधेकावर बोलावे, काही सूचना कराव्यात. परंतु त्यांनी आपल्या भाषणामध्ये 1 हजार 169 कोटी रुपयांचा घोटाळा असे चार वेळा म्हटले. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे ज्येष्ठ सदस्य आहेत. या संदर्भातील रिपोर्ट त्यांच्याकडे असेल. मी त्यांना सांगू इच्छितो की, आम्ही ती जागा दिलेली नाही. हा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून देखील उपस्थित करण्यात आला होता. त्या संदर्भात मी उत्तर दिलेले आहे आणि ते रेकॉर्डवर आहे. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की 1 हजार 69 हजार रुपयांचा घोटाळा झाला. मी त्यांना सांगू इच्छितो की, तसे काही झालेले नाही. त्यांनी या संदर्भातील वस्तुस्थिती सांगावी असे मला वाटते. मी माझ्या उत्तराच्या वेळी मी सर्व माहिती देईन. परंतु वारंवार तोच तोच मुद्दा आला तर ते योग्य नाही. ती पुण्यामधील जागा आहे.आपण देखील पुण्यामधील आहात. तेव्हा या संदर्भात वेगळा मेसेज जाऊ नये. संचालक मंडळावर कारवाई केली. ती जागा दिलेली नाही, देणार नाही, तेथे स्पेशल काऊन्सिलर नेमणार आहोत हे सर्व माझ्या उत्तरामध्ये मी सांगितले होते. तेव्हा तोच मुद्दा पुन्हा पुन्हा मांडणे योग्य नाही असे मला वाटते्. तेव्हा त्यांनी त्यामध्ये दुरुस्ती करावी. सन्माननीय सदस्यांनी काय बोलावे हा त्यांचा अधिकार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना माझी विनंती आहे की, हे विधेयक खूप मोठे आहे. गेल्या तीन दिवसांपासून ते या विध्‌येकावर बोलत आहेत. मी त्यांचे भाषण ऐकत आहे आणि आमच्या विभागाचे अधिकारी देखील त्याची नोंद घेत आहेत. सन्माननीय सदस्य

श्री.हर्षवर्धन पाटील...

श्री.दिवाकर रावते हे घडलेल्या घटनांवर बोलत आहेत. भू विकास बँकेवर 15 मिनिटे, राज्य सहकारी बॅकेवर 15 मिनिटे, कोल्हापूरच्या कर्जमाफीमध्ये काय घडले असेल त्यावर 15-20 मिनिटे बोलत आहेत. सन्माननीय सदस्यांचा सहकार क्षेत्रातील गाढा अभ्यास आहे हे आम्हाला माहीत आहे. मी त्यांच्या सोबत काम केलेले आहे. ते सहकार मंत्री असताना मी राज्यमंत्री होतो. आमची सरकारकडून अशी अपेक्षा आहे असे ते वारंवार सांगतात त्याप्रमाणे माझी त्यांच्याकडून माफक अपेक्षा आहे की, हा कायदा करताना आमच्याकडून काही चूक झाली असेल, या कायद्यामध्ये काही दोष राहिले असतील ते त्यांनी सांगावेत. अमूक अशी सुधारणा मला मान्य नाही त्यामध्ये अशी अशी सुधारणा करणे आवश्यक आहे असे सांगितल्यास ते अधिक संयुक्तिक होईल. कारण हे विधेयक खूप मोठे आहे. या विधेयकावर दोन्ही बाजूच्या अनेक सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे.

सभापती महोदय, विधेयकावर बोलताना सन्माननीय सदस्यांवर आपण बंधन घालू शकत नाही. परंतु आपल्यावर देखील काही बंधने असतात आणि ती आपणास पाळावी लागतात. आमची विनंती त्यांनी मान्य केली तर ठीक आहे. त्यांच्या स्वभावाप्रमाणे ते मान्य करतील असे मला वाटते्. कारण मी त्यांच्या सोबत अनेक वर्षे काम केलेले असल्यामुळे मला त्यांच्या स्वाभावाची माहिती आहे. योग्य असेल आणि त्यांच्या बुध्दीला पटले तर ते लगेच मान्य करतात. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचा देखील असाच स्वभाव आहे.

सभापती महोदय, या विधयेकावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे हे मी अगोदर सांगितले आहे. आपण किती वेळ बोललो यापेक्षा किती महत्वाच्या सूचना केल्या याला महत्व आहे. सन्माननीय सदस्यांचा या विषयातील गाढा अभ्यास आहे. मी तर त्यांचे नेहमी मार्गदर्शन घेईन. त्यांनी मला सांगावे बीड जिल्ह्यामध्ये काय करायचे आहे, राज्य सहकारी बँकेत काय करायचे आहे ते आपण सांगावे, आम्ही ते जरुर मान्य करु. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी काय घडले यापेक्षा आपण हा कायदा आणणलेला आहे, घटनात्मक दुरुस्ती आणलेली आहे, त्या बद्दल मार्गदर्शन केले तर सरक त्यांचे येथेही स्वागत करेल आणि बाहेरही जाहीर सभेत स्वागत करेल.

यानंतर श्री.बोर्डे..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकाची व्याप्ती लक्षात घेऊन या विधेयकावर नेमकी कधी चर्चा घ्यावयाची या बाबत माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी गटनेते किंवा संबंधित नेते मंडळींशी चर्चा केली असती तर त्यांना अशा प्रकारचे निवेदन करावे लागले नसते असे मला वाटते. हे विधेयक संमत करण्यासाठी रात्रीचे दोन-तीन वाजले असते तरी आम्ही बसलो असतो. परंतु माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी ठरविले की, सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.00 वाजता सुरु करुन दोन-तीन दिवसात हे विधेयक संमत करु या.

महोदय, आपण आतापर्यंतचे माननीय राज्यपालांचे अभिभाषण काढून पहावे. या वर्षीचे माननीय राज्यपालांचे पहिलेच अभिभाषण असे आहे की, ज्या मध्ये त्यांनी सहकारी संस्था (सुधारणा) विधेयकावर सखोल चर्चा करण्याबाबत विधिमंडळाला निदेश दिले आहेत. माननीय मंत्री महोदय, आपण माझे कौतुक केल्याने मला फारसा फरक पडणार नाही. मी आजपर्यंत कोणत्याही विधेयकावर बोलताना वेळ काढायचा म्हणून बोललो नाही. आपण सांगितले की, मी या विधेयकावर बोलताना मागे घडलेल्या घटना सांगत आहे. मी सांगितले की, या मध्ये 1069 कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. हा घोटाळा 1069 कोटी रुपयांचा नव्हे तर 50 कोटी रुपयांचा, 25 कोटी रुपयांचा आहे असे माननीय मंत्र्यांनी सांगितले असते तर मी माझी चूक समजू शकलो असतो. आपण असे सांगितले नाही की, अशा प्रकारचा भ्रष्टाचार झालाच नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हा डिबेटचा विषय नाही माझी अपेक्षा आहे की, सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावर चांगल्या सूचना कराव्यात. मी या विधेयकाची प्रस्तावना करताना सांगितले की, हे खूप विस्तृत विधेयक आहे. मी स्वत: माननीय सभापतींना पत्र लिहिले होते की, दिवसभराच्या रेग्युलर कामकाजामुळे या विधेयकावर चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. नेहमीप्रमाणे कामकाजाच्या शेवटी विधेयके दाखविली जातात. शेवटी शेवटी सदस्यांकडून सांगितले जाते की, आम्ही वेठबिगार आहोत काय, अजून किती वेळ सभागृहात बसायचे इ. त्यामुळेच मी या विधेयकावर सविस्तर चर्चा घडवून आणण्यासाठी विशेष बैठकांची मागणी केली होती. आज या विधेयकावरील विशेष बैठकीचा तिसरा दिवस आहे. हे विधेयक एका वाक्याचे नाही. हे विधेयक विस्तृत असून, त्याची व्याप्ती सुध्दा मोठी आहे. या विधेयकात सर्वंकष विचार करुन, आपण काही दुरुस्ती करु शकलो तर ते राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचेच होणार आहे. माझा दुसरे काही म्हणण्याचा उद्देश नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते 1069 कोटी रुपयांच्या घोटाळ्याबाबत सांगत आहेत. तो इमारतीपुरता मर्यादित नसावा असे वाटते. राज्य सहकारी संघाने गेल्या 20-25 वर्षात गोळा केलेला निधी आणि त्याचा केलेला गैरवापर याच्या चौकशीची ते मागणी करीत आहेत. या बाबत आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचले आहे. माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील सांगत आहेत की, या बाबत चौकशी करु. राज्य सहकारी संघामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी गोळा झाला आणि त्याचा विनियोग प्रशिक्षणासाठी न करता, सहली, भत्ते, हॉटेली देयके इत्यादींवर तो खर्च झाला असे माननीय श्री.रावते साहेबांना अभिप्रेत असावे असे मला वाटते.

महोदय, विधेयकांवर विस्तृत चर्चा करता येत नसेल तर अधिवेशनाचा कालावधी वाढवावा. विधिमंडळ हे कायदेमंडळ आहे. कायदा करण्याचे, कायद्यात बदल करण्याचे हे व्यासपीठ आहे. परंतु हल्ली सभागृहात विधेयकांवर चर्चाच होत नाही. गोंधळात किंवा आवाजी मतदानाने विधेयके मंजूर केली जातात. या ठिकाणी संसदीय कामकाज मंत्री उपस्थित आहेत. अधिवेशनाचा कालावधी वाढला तर निश्चितपणे सर्व विधेयकांवर सविस्तर चर्चा करता येईल. 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. त्यावेळी जे कामकाज होते, जी लोकसंख्या होती, ज्या समस्या होत्या, ते प्रमाण आता वाढले आहे. पूर्वी प्रमाणे तीन आठवडे अधिवेशन न घेता 6-8 आठवडे अधिवेशन घ्यावयास पाहिजे. आमची बसण्याची तयारी आहे. परंतु सभागृह सायंकाळी 6.00 वाजेपर्यंतच चालवावे.

**तालिका सभापती** : माननीय श्री.रावते साहेब विशेष बैठक संपण्यासाठी आता केवळ 11 मिनिटे शिल्लक राहिलेली आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकाची मला जाणीव आहे. एक-दीड महिन्यापासून हे विधेयक आमच्या हातात आहे. घटना दुरुस्ती झाल्यानंतर संपूर्ण देशात हा चर्चेचा विषय होता. सहकार आयुक्त बैठकांवर बैठका घेऊन विचारणा करीत होते. या संदर्भात महाराष्ट्राची काय मानसिकता आहे, काय स्थिती आहे हे ते जाणून घेत होते.

नंतर श्री.बरवड.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

त्याप्रमाणे आपण केंद्र शासनाशी चर्चा करीत होतो. याचे गांभीर्य आपल्या लक्षात आल्यानंतर आपण कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये हे बिल दोन तीन दिवस प्रत्येक सभागृहात चालणार आहे असे म्हणाला होता. आपण सकाळी 2-2 तास चर्चा करु असे म्हणाला तेव्हा मला धक्का बसला. आपले किती तास फुकट जातात हे आपल्याला माहीत आहे. मी बोलत असताना आपण असे म्हणाला की, साहेब, आपण किती वेळ बोलणार, मुद्यावर बोला, एवढे सदस्य बोलणार आहेत म्हणजे आपण असे वातावरण निर्माण करीत आहात की, मी इतर सदस्यांचा हक्क मारतो. असे जे वातावरण आपण निर्माण करीत आहात ते अत्यंत खेदजनक आहे. या सदनामध्ये प्रत्येकाला बोलण्याचा पूर्ण अधिकार आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये काल एवढीच विनंती केली होती की, कृपाकरुन एखादा मुद्दा जर कोणी मांडला असेल तर इतर सदस्यांनी त्याची पुनरावृत्ती करु नये. अशा प्रकारचे मार्गदर्शन आपण मंत्री म्हणून काल केले होते. मी आपल्या माहितीकरिता सांगू इच्छितो की, मी वेळ खाण्याकरिता उभाच राहात नाही. मी आणखी सात आठ तास बोलणार नाही. कारण ते मांडून उपयोग होणार नाही म्हणून मी थोडक्यात बोलणार आहे. मी काय आहे ते आपल्यालाही माहीत आहे. मी त्या प्रवृत्तीचा माणूस नाही. लोकप्रतिनिधी म्हणून माझी ती प्रवृत्तीच नाही. मी सभागृहामध्ये माझे मत व्यक्त करीत असताना इतरांचा हक्क डावलला जातो असे जे आपण प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला ते योग्य नाही. आरोप करता येत नाही पण आपण जे म्हणाला त्यातून तो अर्थ ध्वनित झाला. त्यामुळे इतर सदस्यांना सांगतो की, आपण शासनाला सांगू या की, महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्राची ऐसी की तैसी करुन भविष्यामध्ये आणखी भयानक परिस्थिती निर्माण करणारे हे विधेयक आहे. हा गंमतीचा भाग नाही. या विधेयकावर योग्य चर्चा झाली पाहिजे. वाटल्यास रात्री उशिरापर्यंत बसावे. एखाद्या विधेयकावर बोलायला लागल्यावर पहाटेपर्यंत भाषण चालते. ज्याची ताकद आहे, सामर्थ्य आहे आणि ज्याला त्यातील योग्य बाबी बोलावयाच्या आहेत ते अशा प्रकारे बोलू शकतात. अशा प्रकारे जे विधेयक तयार होते त्याचा सन्मान होतो की, या विधेयकावर सदनामध्ये एवढी चर्चा झाली.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांची सूचना आम्हाला मान्य आहे. आपण त्याबाबत ठरवावे. आज ते शक्य नाही पण पुढच्या आठवड्यात संध्याकाळी जर उशिरापर्यंत कामकाज करण्याचे ठरविले, जर थोडी क्रमवारी बदलली आणि दुपारनंतर जर आपण हे बिल दाखविले तर रात्री 11.00, 12.00, 2.00 वाजेपर्यंत जेवढ्या सदस्यांना बोलता येईल तशी चर्चा आपण चालू ठेवावी. तशी आमची तयारी आहे आणि त्यांचीही तयारी आहे. त्यामुळे जास्त वेळ मिळेल आणि विस्ताराने चर्चा सुध्दा होईल. आता असे होते की, आपण सकाळी 10.00 वाजता चर्चा सुरु करतो. आता 11.00 वाजता ही चर्चा थांबणार आहे. त्यानंतर पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी चर्चा होईल. अशा प्रकारे एक-एक तास चर्चा करुन काही होणार नाही. मला असे वाटते की, आपण जी सूचना केलेली आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी. एकदा आपण चर्चेला बसल्यानंतर 2 वाजतील, 3 वाजतील. पहाटे 4-4 वाजेपर्यंत चर्चा केल्याचे दाखले आपल्याकडे आहेत.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : सोमवारी ते शक्य आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : आपल्याला तसे करता येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण या संदर्भात माननीय सभापतींकडे चर्चा करु. मला एकच विनंती करावयाची आहे. मी किती वेळ बोलतो हा विषय नाही. आपल्या कारकिर्दीमध्ये घटना दुरुस्तीतून निर्माण झालेला हा वेगळा विषय आहे. महाराष्ट्राच्या पूर्ण सहकार क्षेत्रावर याचा फार मोठ्या प्रमाणावर परिणाम होणार आहे. या सदनातील अनेक सन्माननीय सदस्यांना त्यांच्या अनुभवातून बोलावयाचे आहे. त्यांना जे काही जाणवले ते बोलावयाचे आहे. ते योग्य आहे की अयोग्य आहे त्याबाबत आपण आपल्या भाषणामध्ये दुरुस्त करु शकाल. माझी अशी इच्छा आहे की, या विधेयकावर विधान परिषदेत एक दिवस, दोन दिवस, तीन दिवस पूर्ण चर्चा झाल्यानंतर, सर्व सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडल्यानंतर हे विधेयक विधानसभेत जाणार आहे. आपली अडचण मी समजू शकतो. आम्ही वेळ काढण्याकरिता बोलतो असा जर आपण अर्थ काढत असाल तर ती बाब दुर्दैवी आहे. मी या ठिकाणी अयोग्य असे काहीही मांडलेले नाही. आपण जर सांगितले की, श्री. अजितदादा पवार यांच्या दालनात त्या दिवशी बैठक झालीच नाही तर मी

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. दिवाकर रावते ....

काही बोलणार नाही. आपण प्रशिक्षणाच्या संदर्भात सांगितले. या विधयकामध्ये प्रशिक्षणाच्या बाबतीत अत्यंत महत्वाची तरतूद आहे आणि प्रशिक्षणाच्या संदर्भात जे घडले ते नोंदवावेच लागेल. मागचा मास्तर योग्य नसतो म्हणून पुढचा मास्तर चांगला असला तरच मुले घडतात. अशा प्रकारची ही शिक्षण प्रणाली आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हे सहकाराचे अत्यंत महत्वाचे बिल आहे. यामध्ये ज्याचा त्याचा अभ्यास असतो. कोणी किती वेळ बोलावे या बाबतीत बंधन नाही. बिलावर बोलण्याच्या बाबतीत बंधन नाहीच.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ ST/ D/ पूर्वी श्री.बरवड 10:55

श्री.विक्रम काळे.....

मागचा शिक्षक चांगला नसतो म्हणून पुढचा शिक्षक चांगला असतो असे वक्तव्य सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी केलेले आहे. ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे. शिक्षक आणि सहकारी संस्थांच्या विधेयकाचा काही संबंध नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, शिक्षक आणि या विधेयकाचा संबंध आहे. कारण शिक्षकांच्याही पगार सहकारी पतसंस्था आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रशिक्षण देण्याची तरतूद या विधेयकात नमूद केलेला आहे. त्यावर मी मघाशी बोलत होतो. ही तरतूद यापूर्वीच होती. सहकारी राज्य संघामार्फत आतापर्यंत प्रशिक्षण देत होते की नाही याबद्दल शंका आहे काय ? मी या विषयापासून दूर गेलेलो नाही. मी त्या विषयावरच बोलत होतो. परंतु पुढचे पाठ मागचे सपाट अशा कर्तृत्वामुळे विद्यार्थी आयुष्यात कधी यशस्वी होत नाही. पुढचे पाठ, मागचे सपाट असे कर्तृत्व व्यवसायामध्ये कधी यशस्वी होत नाही, पुढे पाठ, मागचे सपाट असे नेतृत्वही कधी यशस्वी होत नाही. मागचे सपाट करुन पुढे जाता येत असेल तर ते अत्यंत चुकीचे होईल.

महाराष्ट्र राज्य हे संपूर्ण देशाला सहकाराच्या बाबतीत मार्गदर्शन करणारे असे समर्थ हे राज्य आहे. लोकांनी सहकाराचे आपल्याकडून धडे घ्यावेत अशा प्रकारचे राज्यात सहकार महर्षी निर्माण झाले. सतत व सातत्याने काही न करता यशस्वीपणे त्याच खात्यावर आपण पकड ठेवली. मी मंत्री महोदयांना एकदा असे विचारले होते की, आपण नेहमी आनंदी असता. तुमच्या खात्यातील कोणतेही अधिकारी आजपर्यंत घरी गेलेले नाहीत. सर्व आबादी आबाद आहे काय ? तसे काही नाही असे बोलण्याची संधी मला कधी तरी मिळाली पाहिजे ना ?

मी मघाशी भू-विकास बँकेचा विषय मांडला आहे. मी विषय सोडून कधीच बोलत नाही. मी मघाशी असेच म्हणालो होतो की, या बँका अवसायनात गेल्या आहेत. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर त्यावेळी त्या बँकांवर जे प्रशासक नेमले होते त्यांच्याबाबीत शासन काय करणार आहे असा प्रश्न निर्माण झालेला आहे ? 6 महिन्यापेक्षा त्यांना तेथे ठेवता येत नाही. जास्तीत जास्त 1 वर्ष ठेवता येते, हा विषय मी मांडलेला आहे.

मंत्री महोदयांनी प्रशिक्षणाचा उल्लेख केला होता. त्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून आर्थिक

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ ST/ D/

श्री.दिवाकर रावते.........

घोटाळा झाला की नाही याबाबतचे आमचे अज्ञान आपण दूर कराल असे मला वाटले होते. 1069 कोटी रुपयांचा घोटाळा झालेला नाही. त्यापेक्षा कमी झालेला आहे, या घोटाळ्याचा एवढा मोठा आकडा बाहेर जाऊ नये ही मंत्री महोदयांना भीती आहे. घोटाळा झालेला आहे हे चौकशीत सिध्द झालेले असल्यामुळे मंत्री महोदयांना ते मान्यच करावे लागेल. सर्व संचालकांवर कारवाई करण्यापेक्षा सहकारी संघाचे कामकाज शासनाच्या ताब्यात घेण्यात यावे. त्या सर्वांना सोडून द्यावे अशा प्रकारची चर्चा करुन सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी भरीस घालून त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. मंत्री महोदय तसे करणार की नाही हे मला माहीत नाही, परंतु आपण तसे करण्याच्या मनस्थितीत नाही असे आपल्या बोलण्यावरुन लक्षात आलेले आहे. परंतु या संदर्भात श्री.मधुकरराव चौधरी, सहकार आयुक्त यांनी ठाम भूमिका घेतलेली आहे. त्यांचे मला कौतुक करावे लागेल. मंत्री म्हणून आपण काहीही निर्णय घ्यावा, परंतु एक वर्षाच्या आत या संदर्भातील चौकशी पूर्ण करुन यासंबंधीची योग्य ती कारवाई झालीच पाहिजे. सरकारची आर्थिक स्थिती डबघाईला आली असल्यामुळे तिला बळकटी आणण्यासाठी भविष्यात चांगली माणसे असली पाहिजेत. अशा प्रकारची ठोस भूमिका आयुक्तांनी घेतलेली आहे. बुडणारा हा सहकारी संघ आहे तो बुडण्याऐवजी मंत्री महोदयांना जागतिक दर्जाचा संघ करावयाचा आहे त्याप्रमाणे ते करतील अशी मला आशा आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी वैकुंठलाल मेहता अशा अनेक प्रशिक्षण संस्था असताना पुन्हा आणखी प्रशिक्षण संस्था कशासाठी पाहिजे ? त्यांनी मंत्री महोदयांना प्रश्न विचारलेला आहे त्याला त्यांनी उत्तर द्यावे.

सभापती महोदय, यानंतर मी लेखा परीक्षणावर बोलणार आहे. मी काल हा मुद्दा मांडलला होता.

यानंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.15 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.00 ते 11.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचने संबंधी**

**सभापती** : माझ्याकडे नियम 289 चा एक प्रस्ताव आला असून त्या प्रस्तावामध्ये मुंब्रा (जि.ठाणे )येथील शिळफाटा परिसरातील सात मजली इमारत कोसळून 27 जण ठार व 100 पेक्षा अधिक जखमी होणे यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, चंद्रकांत पाटील,जयंत पाटील,डॉ. नीलम गोऱ्हे,ॲड.आशिष शेलार, डॉ. दीपक सावंत सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, ॲड. अनिल परब, डॉ. रणजित पाटील, सवश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, नागो गाणार यांनी दिला आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, निरंजन डावखरे व सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. ही इमारत कोसळण्याची व त्यात अनेक निरपराधांचा बळी जाण्याची जी घटना घडली आहे ती दुर्देवी व चिंताजनक आहे. या विषयावर चर्चा घेण्याची सभागृहाची तसेच माजीही मानसिकता आहे. प्रश्नोत्तराचा तास कायम घेतला जात असतो. त्यामुळे यासंदर्भात सभागृहाने सल्ला देणे गरजेचे आहे. आज जरी कामकाज पत्रिकेमध्ये हा विषय नसला तरी हा विषय अत्यंत महत्वाचा व तातडीचा असल्याने आजच या विषयावर नियम 97 अन्वये चर्चा घेण्याचे मी घेषित करतो. या विषयाच्या संदर्भात सुरुवातीला सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भावना व्यक्त कराव्यात अशी विनंती करतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, काल जि.ठाणे, शिळफाटा नजीक मुंब्रा येथील डायघर, लकी कंपाऊंड येथील सात मजली इमारत कोसळली आहे. या राज्यात नागरीकरण वाढत असतांना काही ठराविक मंडळी अधिकाऱ्यांशी साटेलोटे करुन, काही राजकीय नेत्यांच्या पाठिंब्याच्या आधारे अशी गैरकृत्य करतात व निष्पाप लोक प्राणाला मुकतात, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे लकी कंपाऊंड मध्ये घडलेली घटना आहे. या घटनेमध्ये दर तासाने मृतांचा आकडा वाढतो आहे. या इमारतीमध्ये ट्यूशन क्लास सुरु होता व त्यामध्ये 50 विद्यार्थी होते अशी चर्चा आहे. ते विद्यार्थीही बहुधा ढिगाऱ्याखाली आहे अशी चर्चा आहे परंतु त्या ठिकाणी नसावे अशी अपेक्षा करतो. या ठिकाणी इतकी भयानक घटना घडली असतांना माझे प्रामाणिक असे मत आहे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

की, आज सभागृहासमोर महत्वाचे खूप विषय आहेत. विरोधी पक्षाने ऊर्जेची चर्चाही दिलेली आहे. या घटनेचे गांभीर्य व या घटनेमध्ये लोकांचे झालेले मृत्यू पाहता, विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना अशी मेजर घटना घडणे योग्य नाही. परवा कोकणात अपघात झाल्यानंतर त्या घटनेच्या संदर्भातील चर्चा या सभागृहात करण्यात आली होती. कोकणातील अपघातापेक्षा या ठिकाणच्या अपघाताची तीव्रता अधिक आहे. या पुढे अशा प्रकारच्या घटना होणार नाहीत याबाबत सन्माननीय सदस्य चांगल्या प्रकारे सूचना करु शकतील. गोविंद टॉवर कोसळल्यानंतर त्याची कमिटी बनली, त्या कमिटीचे रिपोर्ट आले, त्याचे पुढे काय झाले याची माहिती अद्याप मिळालेली नाही. त्यामुळे सभागृहापुढील आजचे सर्वकामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा करावी अशी विनंती आहे. परंतु प्रश्नोत्तराचा तास झालाच पाहिजे अशी आपली प्रथा असल्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासानंतर सर्व कामकाज बाजूला ठेवून लकी कंपाऊंड शिळफाटा, ठाणे जिल्हयातील घटनेच्या संदर्भात चर्चा सुरु करावी अशी विनंती आहे.

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय,सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काल मुंब्रा प्रभाग समिती कार्य क्षेत्रातील लकी कंपाऊंड, शिळफाटा, म्हापे रोड, जि. ठाणे या परिसरात 7 मजली इमारत पत्त्याचा बंगला ज्या पध्दतीने कोसळतो त्या पध्दतीने कोसळली आहे.

यानंतर श्री. मंगेश.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

ढिगारा उपसण्याचे काम, जखमींना बाहेर काढण्याचे काम अजूनही चालले आहे. सदर बाब सार्वजनिक हिताची, गंभीर, तातडीची, महत्त्वाची आहे. सदर बाबी संबंधी चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा करावी. शासन देखील त्याच मताचे आहे. शेवटी आपण त्या बद्दलचा निर्णय घ्यावा. सन्माननीय सदस्य 40-45 दिवस अगोदर प्रश्न पाठवित असतात. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तासही महत्त्वाचा आहे. परंतु, त्या पेक्षाही हा विषय महत्त्वाचा आहे. प्रश्नोत्तराचा तास तहकूब करून, सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयाच्या संदर्भातील चर्चा करायची असेल तर तसे करण्याची देखील शासनाची तयारी आहे. वस्तुस्थिती काय आहे, घटना कशी घडली, हे सांगितल्यानंतर या संदर्भात विरोधी पक्षाकडून सूचना आल्यानंतर त्या बाबत शासनाची भूमिका काय आहे, हे सभागृहाला व सभागृहाच्या मार्फत राज्यातील जनतेच्या समोर मांडण्याची आमची तयारी आहे.

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सदर विषयाच्या बाबतीत माझ्याकडे काही औचित्याचे मुद्दे देखील आले आहेत. म.वि.प. नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना वेगळी आहे. औचित्याचे मुद्दे सुध्दा तेवढेच महत्त्वाचे आहेत असे मी मानतो. मी आता 3 औचित्याचे मुद्दे मांडण्यास परवानगी देतो. आपण 1-1 वाक्यामध्ये ते मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करावा.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी देखील म.वि.प. नियम 289 संदर्भात प्रस्तावाची सूचना दिली आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ती अजून मी वाचलेली नाही.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते या विषयावर बोलले, त्या नंतर विधिमंडळाचा नेता या नात्याने मी बोललो. सन्माननीय सदस्यांना अगोदर बोलू देण्यास परवानगी दिली पाहिजे होती. सरकार या विषयाच्या संदर्भात चर्चा करण्यास तयार आहे. सन्माननीय सदस्य चर्चेच्या वेळी या संदर्भातील त्यांची भूमिका मांडू शकतात.

**सभापती** : दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांकडून या गंभीर प्रश्नावर चर्चा झाली पहिजे, ही भावना आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे व सभागृहाच्या माननीय नेत्यांचेही तेच मत आहे. सदर विषयावरील चर्चा प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर घ्यायची की कसे, हा प्रश्न आहे.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास झाल्यांतर चर्चेला सुरूवात करावी, असे आम्हाला वाटते.

**सभापती** : ठीक आहे. प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर ही चर्चा आपल्याला करायची आहे. औचित्याचे मुद्दे मांडण्यास मी परवानगी देणार आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना आज न घेता, पुढे ढकलण्यात येत आहेत. दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांनी चर्चेत गंभीरपणे भाग घ्यावा. कामकाज पत्रिकेवरील म.वि.प. नियम 260 अन्वयेची चर्चा आज न घेता सोमवारी घेण्याचे मी ठरविले आहे. आज अशासकीय ठराव देखील आहेत. वेळ मिळाला तर त्यावर विचार करण्यात येईल. आजची ही चर्चा म.वि.प. नियम 97 अन्वये घ्यावयाची आहे. औचित्याचे मुद्दे संपले की, लगेचच या चर्चेला आपण सुरूवात करू.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, तारांकित प्रश्न क्रमांक 36683 व आजच्या प्रश्न सूचीमधील 78 क्रमांकाचा माझा प्रश्न सारखा आहे आणि उत्तर देखील सारखेच दिले आहे. सदर प्रश्नाचे प्रारूप बदलले होते म्हणून तो प्रश्न राखून ठेवला होता. तो प्रश्न व माझा प्रश्न अनुक्रमांक 78 हे दोन्ही क्लब करावेत. दोन्ही प्रश्न व त्यांची उत्तरे सारखीच आहेत.

**सभापती** : ठीक आहे. आता दिनांक 22 मार्च, 2013 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र. 36683 घेण्यात येईल.

**राखून ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक 36683**

**"राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विनाअनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबत"**

**श्री. विक्रम काळे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. सतीश चव्हाण, श्री. अमरसिंह पंडित, डॉ. सुधीर तांबे, विधान परिषद सदस्य.**

तारांकित प्रश्न क्रमांक 33385 ला दिनांक 13 डिसेंबर, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

1) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विनाअनुदान काळातील सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरणेबाबतच्या प्रस्तावावर शासनाचा निर्णय घेण्याचा विचार पूर्ण झाला आहे काय,
2) उक्त प्रकरणी मुंबई व औरंगाबाद उच्च न्यायालयाने काही याचिकाकर्त्यांना वरिष्ठ व निवड श्रेणी ग्राह्य धरण्याबाबत निर्णय दिलेला आहे व या निर्णयाची अंमलबजावणी न केल्यास शासनाविरूध्द अवमान याचिका दाखल करण्याच्या दिलेल्या इशाऱ्यासंदर्भात शासन स्तरावरून काय कार्यवाही करण्यात आलेली आहे.
3) नसल्यास, उक्त प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री. राजेंद्र दर्डा, शालेय शिक्षण मंत्री यांच्याकरिता** :

(1) नाही.

(2) व (3) माननीय उच्च न्यायालयाने काही वैयक्तिक प्रकरणी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक तसेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी यांच्या बाबतीत असा धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**प्राथमिक, उच्च माध्यमिक शिक्षकांची व सर्व स्तरावरील शिक्षकेत्तरांची विनाअनुदानित सेवा वरिष्ठ/निवडश्रेणीसाठी व कालबध्द पदोन्नतीसाठी ग्राह्य धरण्याबाबत**

**(78) * 38037 श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो पुंडलिक गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक 33385 ला दिनांक 13 डिसेंबर, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील प्राथमिक, उच्च माध्यमिक शिक्षकांची व सर्व स्तरावरील शिक्षकेत्तरांची विनाअनुदानित सेवा वरिष्ठ/निवडश्रेणीसाठी व कालबद्व पदोन्नतीसाठी ग्राह्य धरण्याबाबत शासनाच्या विचाराधिन विषयाबाबत निर्णय झाला आहे काय,
(2) महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाच्या लोकप्रतिनिधींनी आतापर्यंत याच संदर्भात किती निवेदने दिली आहेत,
(3) निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली आहे,
(4) नसल्यास, विलंबाची व एकाच संस्थेतील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांमध्ये भेदभाव निर्माण करण्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (1), (2), (3) व (4) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या बाबतीत विनाअनुदानित शाळेत केलेली सेवा वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक तसेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचारी यांच्या बाबतीत असा निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, सभागृहात हा प्रश्न जवळपास 29 वेळा आलेला आहे. प्रत्येक वेळी माननीय राज्यमंत्री उत्तर देण्यासाठी असतात. योगायोगाने माननीय मंत्री सभागृहात उपस्थित झाले आहेत. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. उत्तरात असे म्हटले आहे की, माननीय उच्च न्यायालयाने काही वैयक्तिक प्रकरणी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने हा लाभ सुरू केला आहे.

( नंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36683 व 38037

श्री.विक्रम काळे...

न्यायालयात गेल्या शिवाय आम्हाला न्याय मिळणार नाही काय ? उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार राज्य शासन सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांची सेवा ग्राह्य धरणार आहे काय व त्यासंबंधीचा शासन निर्णय पुढील अधिवेशन येण्याच्या अगोदर निर्गमित करण्यात येणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा प्रश्न अनेक वेळा आलेला आहे. उच्च माध्यमिक शिक्षणाच्या परीक्षेवर बहिष्कार घालण्यात आला त्यावेळी शिक्षकांनी आमच्या समोर अनेक मागण्या ठेवल्या होत्या. त्याबाबत चर्चा झाली. त्यात असे ठरले की, सदर मागणीसह अन्य मागण्यांबाबत शासन तीन महिन्यांच्या आत अंतिम निर्णय घेईल. तशा प्रकारचे आश्वासन देखील त्यांना देण्यात आले आहे. तसे निवेदन देखील केले आहे. त्यामुळे या प्रश्नासंबंधी तीन महिन्याच्या आत निर्णय घेण्याचे शासनाने ठरविले आहे. उच्च माध्यमिक सोबत प्राथमिक शाळेच्या विषया संबंधात देखील निर्णय घेण्यात येणार आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, दिनांक 28 नाव्हेंबर 2006 रोजी शासनाने विनाअनुदानित सेवा ग्राह्य धरण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. पण आमच्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णय निर्गमित करताना माध्यमिक विभागालाच लागू केला. प्राथमिक व उच्च माध्यमिक विभाग त्यातून वगळण्यात आला. एवढेच नव्हे तर शिक्षकेतर कर्मचारी देखील वगळले. त्यामुळेच आम्हाला हा प्रश्न सभागृहापुढे वेगवेगळ्या आयुधांच्या माध्यमातून 29 वेळा आणावा लागला आहे. सन्माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांची सकारात्मक भूमिका दिसत असली तरी मला आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करायची आहे की, पुढच्या अधिवेशनामध्ये हा विषय कोणत्याही आयुधाचा वापर करून सभागृहापुढे मांडण्याची वेळ आमच्यावर येणार नाही अशा प्रकारचे ठोस आश्वासन माननीय मंत्री महोदय देतील काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, होय. सभापती महोदय, माझी देखील सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, सदर प्रश्न हा 29 वेळा उपस्थित करण्यात आला आहे. लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न, इत्यादी आयुधांच्या माध्यमातून तोच प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यावर देखील कुठे तरी मर्यादा असली पाहिजे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36683 व 38037...

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, हे सभागृह सर्वोच्च आहे. जनतेने आम्हाला निवडून दिलेले आहे. जनतेच्या हक्कासाठी लढणे आमचे काम आहे. त्यामुळेच लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून सरकारला जागे करण्याचा आमचा प्रयत्न राहतो. पण सरकार जागेच होत नसेल तर आम्ही काय करायचे ? सरकार जागे होत नसल्यामुळे लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेख इत्यादी विविध संसदीय आयुधांचा वापर करून आम्हाला आमचा प्रश्न मांडावा लागतो. त्यामुळे तीन महिन्यामध्ये शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल अशा प्रकारचे ठोस उत्तर माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांनी दिले पाहिजे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, दर शुक्रवारी आम्हाला तेच तेच प्रश्न उपस्थित करावे लागत आहेत आणि तीच तीच उत्तरे त्यास देण्यात येतात. माननीय शिक्षण मंत्री राजेंद्र दर्डा यांना सोडून द्यावे पण माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री प्रा.फौजिया खान ह्या शिक्षण क्षेत्रातीलच आहेत. निदान त्यांनी तरी शिक्षणाचा विषय संवेदनशील पद्धतीने घेतला पाहिजे. पण तसे घेताना त्या दिसत नाहीत. प्रस्ताव वित्त विभागाच्या सचिवांकडे पाठविला, उप सचिवांकडे पाठविला अशा प्रकारची उत्तरे त्या देतात. कधी तरी सिरीयस उत्तर देऊन हे प्रश्न संपतील असा प्रयत्न आपण केला पाहिजे. किमान शिक्षण क्षेत्रात असलेल्या माननीय मंत्र्यांनी काही तरी प्रयत्न केला पाहिजे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सदर प्रश्न 29 वेळा विचारण्यात आलेला आहे. त्यासंबंधी माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांचे एवढेच म्हणणे आहे की, वेगवेगळ्या आयुधांचा वापर करून सन्माननीय सदस्यांनी जनतेच्या भावना येथे मांडल्या आहेत. शेवटी आम्हाला देखील काही मर्यादा असतात. दोन महिन्याच्या आत म्हणजे पुढच्या अधिवेशनाच्या आत यासंबंधी 100 टक्के निर्णय घेऊन शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील माध्यमिक/उच्चमाध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध रद्द करून शाळा संहिते प्रमाणे कार्यवाही करणेबाबत**

**(1) * 37065 डॉ. अपूर्व हिरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे, श्री.एम.एम.शेख, श्री.सतीश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक 29996 ला दिनांक 17 जुलै, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील माध्यमिक / उच्चमाध्यमिक शाळांमधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा दिनांक 29 नोव्हेंबर,2005 चा सुधारित आकृतीबंध रद्द करुन शाळा संहिता प्रमाणे लागु करण्यासंबंधीचा प्रस्ताव उच्चस्तरीय समिती समोर सादर करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, समितीने दिलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(3) नसल्यास, उपरोक्त प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री. राजेंद्र दर्डा यांच्याकरित** : (1), (2), व (3) मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 21 मार्च, 2013 रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार आकृतीबंधाचा सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, मी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाबाबत प्रश्न विचारलेला आहे. हाच प्रश्न नागपूर अधिवेशनात सन्माननीय सदस्य प्रा.वसंतराव खोटरे यांनी विचारला असून त्याचा तारांकित प्रश्न क्रमांक 2996 असा होता. या प्रश्नाची परिस्थिती देखील तीच आहे. हा प्रश्न देखील वेगवेगळ्या संसदीय आयुधांचा वापर करून 29 वेळा विचारण्यात आला होता. नागपूर अधिवेशनात शासनाने 15 मार्च अशी तारीख दिली होती. आज येथे 21 मार्च अशी तारीख लेखी उत्तरामध्ये नमूद केलेली आहे. उच्चस्तरीय समितीकडे पाठविले आहे, कारवाई सुरू आहे अशाच प्रकारचे उत्तर देण्यात आलेले आहे. याला आता तीन महिने उलटून गेले आहेत.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37065 . . . .

डॉ.अपूर्व हिरे . . . .

तरी देखील ती कार्यवाही झाली नाही काय आणि आपण हे सगळे लवकरात लवकर किती दिवसामध्ये करणार आहात ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आकृती बंधाच्या बाबतीत सांगावयाचे तर 1963-1964 मध्ये आकृती बंध हा एस.एस.कोड प्रमाणे करण्यात आला होता. त्यानंतर 1985 मध्ये चिपळूणकर समितीचा आकृतीबंध झाला आणि त्याच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली. याबाबतीत अनेक टप्पे झाले, याबाबतीत विरोधही झाला. यानंतर नवीन आकृती बंधांचा जो जी.आर.काढण्यात आला होता, तो विड्रॉ करण्यात आला. त्यानंतर पुन्हा लागू करण्यात आला. आज सद्य:स्थितीत चिपळूणकर समितीच्या अनुषंगाने आकृतीबंध लागू आहे आणि शासनाने ही बाब उच्चस्तरीय समिती कडे दिलेली आहे. उच्चस्तरीय समितीचे काम सुरु असून ते कुठेही लिंगरींग नाही. याबाबत दि.21-3-2013 ला उच्चस्तरीय समितीची एक मॅरेथॉन बैठक झाली. त्यावेळी जवळजवळ तीन ते चार तास बैठक झाली आणि त्यांनी काही स्टेटीस्टीक मागविलेल्या आहेत. हा विषय उच्चस्तरीय समितीकडे आहे आणि तेच याबाबत निर्णय घेणार आहेत. तसेच याबाबतीत ते जी माहिती मागवितात ती ताबडतोब विभागाकडून देण्यात येते.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, हा प्रश्न खूप वर्षापासून प्रलंबित आहे. तसेच आपण जवळजवळ 2004 पासून शिक्षकेतर कर्मचारी भरण्यावर बंदी आणलेली आहे. आज काही शाळांमधील व्यवस्थापन अक्षरश: कोलमडलेले आहे. आपण एकीकडे गुणवत्तेविषयी बोलतो. आकृती बंध चिपळूणकर समितीचा घ्यावयाचा की एस.एस.कोड प्रमाणे घ्यावयाचा आहे याचा निर्णय घ्यावयाचा आहे. पण भरती वरील बंदी तरी उठविली पाहिजे. म्हणून मला माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, एकतर आपण याबाबतीत त्वरित निर्णय घ्यावा आणि जर हा निर्णय घेण्यास विलंब होत असेल तर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी परवानगी देणार आहात काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा विषय हाय पॉवर कमिटीकडे असल्यामुळे जोपर्यंत याबाबतीत अहवाल प्राप्त होत नाही, त्यांचा निर्णय प्राप्त होत नाही तोपर्यंत चिपळूणकर समितीचा जो निकष आहे,तोच निकष आजही अस्तित्वात आहे.तसेच भरतीच्या बाबतीत सांगावयाचे तर अजून काही निर्णय घेण्यात आलेला नाही.कारण यासाठी हाय पॉवर कमिटीचा निर्णय होणे आवश्यक आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी ज्या हाय पॉवर समितीचा उल्लेख केला आहे, त्याबाबत सांगावयाचे तर राज्याच्या माननीय मुख्य सचिवांकडे 300 कमिट्या आहेत. त्यांनी रोज एक बैठक घ्यावयाची असे ठरविले तरी वर्ष पुरणार नाही. त्यामुळे बैठकाच होत नाहीत हा खरा प्रश्न आहे. माझी आपल्याला विनंती आहे. कारण अनेक वेळा हा प्रश्न उपस्थित होतो. केवळ हाच विषय नाही तर हाय पॉवर समितीकडे अनेक विषय येत असतात. अशा वेळी किमान शिक्षणाच्या संबंधातील प्रश्न तरी बाजूला काढावेत. माननीय सभागृहाच्या नेत्यांशी बोलून, मुख्य सचिवांच्या बरोबर बोलून हा विषय बाजूला काढला पाहिजे. कारण सदरहू प्रश्न दीड-दोन वर्षे विचारला जात आहे. ती शाळा चालू शकत नाही कारण त्याठिकाणी शिपाई नाही, क्लार्क नाही आणि तेथे जे कोणी तुटपुंजे लोक आहेत ते निवडणुकीच्या कामामध्ये व्यस्त आहेत. या बाबतीत मी दोन वर्षे सातत्याने प्रश्न उपस्थित करीत आहे. शाळा चालू शकत नाही. तेथे शिपाई नाही, क्लार्क नाही आणि आर.टी.ए.नुसार प्रायमरी शाळेमध्ये या अत्यंत आवश्यक अशा गोष्टी आहेत. त्यामुळे किमान आर.टी.ए.नुसार, चिपळूणकर समितीनुसार जी एकाही पदे आहेत, ती ताबडतोब भरणार आहात काय? तसेच माननीय सभापती महोदय, मी मघाशी आपल्याला विनंती केली की, माननीय मुख्य सचिवांच्या सोबत एक बैठक घ्यावी आणि त्यामध्ये या विषयांच्या बाबतीत निचरा करावा अन्यथा हे असेच सुरु राहील.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या सभागृहामध्ये हा प्रश्न 29 वेळा आलेला आहे. दि.19-4-2000 रोजी तत्कालीन माननीय मुख्यमंत्री यांच्या दालनामध्ये डॉ.देवीसिंग शेखावत यांच्या अध्यक्षतेखाली . . . .

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आपण सांगितले तर उत्तर देते . . .

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, . . ..

**सभापती** : जर आवश्यकता भासली तर मी पुन्हा आपल्याला संधी देण्याचा प्रयत्न करीन.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये डॉ.देवीसिंग शेखावत यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षकेतर कर्मचारी संघटनेची बैठक झाली. त्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी असा निर्णय दिला की, एस.एस.कोड प्रमाणे हा आकृती बंध ठेवावा व त्याच प्रमाणे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे . . . .

विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच शासनातर्फे असे सांगण्यात आले आहे की, एका महिन्याच्यामध्ये हा प्रस्ताव कॅबिनेटमध्ये पाठवून त्याबाबत योग्य निर्णय घेण्यात येईल.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37065....

श्री.वसंतराव खोटरे...

या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी निर्णय दिल्यानंतर पुन्हा कारकुनाकडे जाण्याचे कारण काय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे कारवाई का करण्यात आली नाही, ज्या अधिकाऱ्यांनी ही कार्यवाही केली नाही त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हा प्रश्न अनेक वेळा सभागृहात चर्चेला आलेला आहे. त्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे. सन 2001 मध्ये शासनाने सर्वच विभागांतील पदांचा आढावा घेण्यात यावा असा कॉन्शस डिसीजन घेतला. काटकसरीचा उपाय म्हणून सर्वच विभागांतील पदे कमी करण्यात यावीत. त्या पध्दतीने सर्व विभागांनी आपापल्या विभागांतील पदे कमी केली. त्या संदर्भातील आढावा झाला. परंतु शिक्षण विभाग असा एकमेव विभाग आहे की त्या विभागाचा आढावा झालेला नाही. एक सकारात्मक विचार ठेवून..

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या मनामध्ये असलेले उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे अशी त्यांची अपेक्षा असेल तर ते शक्य नाही. आपण मंत्री महोदयांचे पूर्ण उत्तर ऐकून घेतले पाहिजे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आज सुध्दा शिक्षण विभागातील पदांचा आढावा घेऊन पदे कमी करण्याचा निर्णय घेतलेला नाही. या संदर्भात शासनाचा सकारात्मक विचार आहे. यामध्ये अनेक गोष्टी आहेत. नवीन आकृतीबंध करताना असा विचार करण्यात आला होता की, वर्ग-4 मधील शिपायांची पदे कमी करणे, तसेच विद्यार्थ्यांवर ज्यांचा जास्त प्रभाव असतो अशी लायब्ररीयन, लॅब टेक्निशिअनची पदे वाढविणे. या संदर्भात हाय पॉवर कमिटी अभ्यास करीत आहे. या कमिटीचा रिपोर्ट आल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37065....

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, किती विद्यार्थी संख्येमागे किती शिपायांची आवश्यकता लागते असा साधा प्रश्न असताना त्यासाठी तेरा वर्ष लागत आहेत. माझा प्रश्न आहे की,मागासवर्गीयाची पदे न भरल्यामुळे त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. तेव्हा मागासवर्गीयांची पदे भरण्यात येतील काय ? मागील दोन-तीन वर्षात शिक्षण क्षेत्रातीन प्रश्न अनुत्तरीत राहिले आहेत ते पाहता शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी दोन-तीन दिवसांचे वेगळे अधिवेशन बोलाविण्यात येईल काय ?

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की,या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांना त्यांच्या दालनात आपल्यासोबत एक बैठक घेण्यास सांगण्यात येईल.

----------

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हापरिषदेच्या शाळांमधील गुणवत्तेचा दर्जा खालावत असल्याबाबत**

**(2) * 38284 श्री.एम.एम.शेख, श्री.सतीश चव्हाण, श्री.वसंतराव खोटरे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री. विजय गिरकर, श्री.सुभाष चव्हाण, श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.मोहन जोशी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.संजय दत्त, श्री.एम.एम.शेख** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हापरिषदेच्या शाळेच्या मुलांचा शैक्षणिक दर्जा खालावत असून पाचवीत असलेल्या 41.7 टक्के मुलांना दुसरीत असलेले शब्द वाचता येत नसून तिसरीतील 76 टक्के मुलांना लिहिता, वाचता व गणित सोडविता आले नसल्याची बाब 'असर' या स्वयंसेवी संस्थेने दिनांक 17 जानेवारी, 2013 रोजी वा त्या सुमारास प्रकाशित केलेल्या अहवालात निर्दशनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अनेक जिल्हा परिषदेचे शिक्षक शाळेच्या ठिकाणी न राहता जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणावरुन ये-जा करुन मुलांना शिक्षण देतात तसेच साईड बिझनेस म्हणून मार्केटिंग काम करतात, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर अहवालात महाराष्ट्र हा बिहार व हिमाचल प्रदेश इत्यादी राज्याच्या तुलनेने शैक्षणिक बाबतीत खूप मागे असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(4) याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व तद्नुषंगाने शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री. राजेंद्र दर्डा यांच्या करिता** : (1) इ.2 री च्या क्षमतेचा मजकूर न वाचता येणाऱ्या इ. 5 वी तील विद्यार्थ्यांचे प्रमाण 41.7% असल्याचे, "असर" अहवालात नमूद करण्यात आले आहे. तसेच इ.2 री तील गणिते न सोडविता येणाऱ्या इ. 3 री च्या मुलांचे प्रमाण 76% असल्याचे "असर" अहवालात नमूद केले आहे. मात्र वाचन व लिहिण्याच्याबाबत हे खरे नाही.

(2) हे खरे नाही.

(3) हे खरे नाही.

महाराष्ट्र शैक्षणिक दृष्ट्या मागे नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38284.....

प्रा.फौजिया खान...

(4) शालेय पोषण आहार, उपस्थिती भत्ता, गणवेश व लेखन साहित्य, सर्व शिक्षाअभियान या बरोबरच 1 ली पासून इंग्रजी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षकांना प्रशिक्षण, सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन, माझी समृध्द शाळा या उपक्रमांतर्गत शाळांचा दर्जा निश्चित करणे व प्रतवारी करणे यासारख्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, असर संस्थेने प्रकाशित केलेल्या अहवालाशी शासन सहमत नाही असे उत्तरावरुन दिसते. जिल्हापरिषदेतील शाळांमधील विद्यार्थ्यांची जी सुमार प्रगती आहे त्या संदर्भात शासनाचे काय निष्कर्ष आहेत ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, असर संस्थेने केंद्र शासनाला रिपोर्ट दिलेला आहे. प्रश्नांचे उत्तर देण्यापूर्वी मी या ठिकाणी सन्माननीय सदस्यांचे अभिनंदन करते कारण त्यांनी विद्यार्थ्यांचा विचार करणारा एक अतिशय चांगला प्रश्न येथे उपस्थित केलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.38284....

प्रा.फौजिया खान....

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने विचार करणारा हा प्रश्न आहे. अनेक वर्षानंतर या सभागृहात गुणवत्तेच्या बाबतीत प्रश्न उपस्थित झालेला आहे. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, गुणवत्ता आणि दर्जावर शासनाचा प्राईम फोकस आहे. 'असर' या स्वयंसेवी संस्थेने जो अहवाल सादर केला आहे तो डिफेन्ड करण्याबाबत ठरविले नाही. देशाच्या पातळीवर जी संख्या आहे त्या तुलनेत महाराष्ट्राच्या पातळीवरील संख्या जास्त चांगली आहे. परंतु आम्ही त्यांना बॅकींग देणार नाही. कारण त्यांचे सॅम्पल साईझ खूप छोटे होते, त्यांनी कमी विद्यार्थ्यांची तपासणी केली आहे. हे सर्व विसंगत मुद्दे आहेत. ते मुद्दे या ठिकाणी सांगण्याची गरज नाही. महोदय, गुणवत्ता आणि दर्जाच्या बाबतीत हे खरे आहे की, आपल्याला या बाबत विशेष फोकस करणे गरजेचे आहे.

महोदय, वाचन क्षमता, गणित आणि इंग्रजी यामध्ये सुधारणा करण्यासाठी शासनाने अनेक उपाययोजना करण्याचे ठरविले आहे. यासाठी शासनाने अभ्यास गट तयार केलेला आहे. यशदामध्ये त्या अभ्यास गटाची बैठक घेऊन राज्यात वाचन क्षमता, गणित आणि इंग्रजी यामध्ये कशी सुधारणा करु शकतो या अनुषंगाने डेलिब्रेशन्स सुरु आहे. शिवाय या बाबतीत अनेक प्रकारचे निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. या राज्यात ज्या शाळा आहेत त्यांचा दर्जा कसा आहे, विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी आहे, शिक्षक कसे शिकवितात या बाबतचे ग्रेडेशन व ॲक्रीडिएशन करण्यासाठी शासनामार्फत विशेष ऑथॉरिटी स्थापन करण्याचा विचार शासनाने केलेला आहे. प्रत्येक शाळेचे अ, ब, क, ड असे ग्रेडेशन करता येईल. त्यामुळे त्या शाळांमध्ये नेमकी काय सुधारणा करण्याची गरज आहे.

इन्फ्रास्ट्रक्चरसोबत लर्निंग आऊटकम किंवा विद्यार्थ्यांना काय येते या बाबत विचार करण्यासाठी वेगळी विशेष ऑथॉरिटी स्थापन करुन गुणवत्तेच्या बाबतीत रेग्युलर पध्दतीचे असेसमेंट करण्याचा विचार शासनाने केला आहे. या शिवाय मूलभूत विचार करण्याची गरज आहे. या बाबत शासन स्तरावर विचार सुरु आहे. उदा. शिक्षकांचे एनसीटीईने क्वालिफिकेशन ठरविले आहे. ते क्वॅलिफिकेशन अप्लाय करण्याचा सर्वांना अधिकार आहे. या शिवाय अधिक प्रशिक्षित शिक्षक असेल तर त्यांना प्राधान्य देऊन त्यांना नियुक्त करण्याचा निर्णय शासनामार्फत घेण्यात येत आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38284....

प्रा.फौजिया खान....

तसेच गुणवत्तेच्या वाढीसाठी डी.एड.चा सर्व सिलॅबस रिवाईव्ह करणे, शिक्षकांचे ट्रेनिंग, कॉम्प्रेंहेसिव्ह आणि कंटीन्यूअस इव्हॅल्यूएशनचे ट्रेनिंग, एमसीएस ट्रेनिंगचा विचार करुन त्यामध्ये मूलभूत बदल करण्याची आवश्यकता आहे. शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून या राज्यात प्रशिक्षण धोरण ठरविले आहे. त्याच प्रमाणे प्रशिक्षण धोरणावर सुध्दा शासन विचार करेल आणि शिक्षकांचे प्रशिक्षण जास्त प्रभावी कसे होईल यावर लक्ष केंद्रीत करण्यात येईल.

तसेच आरटीईनुसार विद्यार्थी व शिक्षकांचे प्रमाण 30:1 किंवा 35:1 असणे गरजेचे आहे. यावर सुध्दा शासन लक्ष देणार आहे. राज्यात काही ठिकाणी 25:1 हे प्रमाण आहे. काही शाळांमध्ये हे प्रमाण जास्त आणि काही शाळांमध्ये कमी आहे. शिक्षकांचे रि-डिस्ट्रीब्युशन करुन प्रत्येक शाळेमध्ये हे प्रमाण 25:1 करण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. महोदय, मला सांगताना आनंद होतो की, या बाबत शासनाकडून मूलभूत विचार सुरु आहे. ओव्हरऑल मॉनिटरींगसाठी स्टुडंट सेंट्रींक ॲडमिनिस्ट्रेटीव्ह स्ट्रक्चर करण्याचा शासन विचार करीत आहे. त्यामुळे राज्यात गुणवत्तेच्या बाबतीत जे प्रश्न दिसतात त्या सर्व प्रश्नांना हाताळण्यासाठी माननीय शालेय शिक्षण मंत्री आणि आम्ही सर्व जण या विषयावर अत्यंत बारकाईने फोकस करुन निर्णय घेण्याचा प्रयत्न करीत आहोत.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणूनच मी या सभागृहाचे खास अभिनंदन करते आणि अशी अपेक्षा व्यक्त करते की, गुणवत्तेवर आणि विद्यार्थ्यांवर जास्तीत जास्त प्रश्न आमच्याकडे यावेत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी चांगले उत्तर दिले आहे पण हा अहवाल शासनाला मान्य आहे का आणि हे शासनाचे अपयश आहे असे वाटत नाही का ? मी शाळेत होतो तेव्हा 50 विद्यार्थ्यांची एक तुकडी होती. सभापती महोदय, आपल्या वेळेस तर त्यापेक्षा जास्त विद्यार्थी असतील. माझ्या तालुक्यात, माझ्या गावामध्ये परवा शाळेचा रौप्य महोत्सव साजरा झाला म्हणून मी गेलो होतो. त्या ठिकाणी विद्यार्थी 25 होते आणि शिक्षक 10 होते. सभापती महोदय, दर्जाच्या बाबतीत महत्वाचा प्रश्न आहे. या सभागृहामध्ये शिक्षक मागण्या करतात पण त्यामध्ये दर्जाच्या बाबतीत चर्चा करण्याची खरी गरज आहे. माझ्या तालुक्यातील प्रायमरी शाळेतील विद्यार्थी दर्जा चांगला नाही म्हणून खाजगी शाळेकडे जात आहेत. दर्जाच्या बाबतीत परिस्थिती चांगली नाही. शासनाकडे जी यंत्रणा आहे त्यामध्ये विस्तार अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, उप शिक्षण अधिकारी, शिक्षण अधिकारी आहेत. जे गट शिक्षण अधिकारी आणि विस्तार अधिकारी आहेत ते कामच करीत नाहीत. त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ? विद्यार्थ्यांची जी गळती होत आहे ती थांबविण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ? ज्या ठिकाणी दर्जा चांगला नाही त्या शिक्षकांचे इन्क्रिमेंट थांबविण्याचा धोरणात्मक निर्णय शासन घेणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले ते आमच्या लक्षात सुध्दा आलेले आहेत. त्यामुळे यावर उपाययोजना करण्याचे नियोजन शासनाकडून चालू केलेले आहे. हे प्रश्न आजचे नसून अनेक वर्षापासूनचे आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे की, आपले जे अधिकारी आहेत त्यांना सुध्दा प्रशिक्षणाची गरज आहे. त्यांना सुध्दा मोटिव्हेट करण्याची गरज आहे. फक्त कारवाई करुन प्रश्न सुटत नाहीत. त्यांच्या रिक्रुटमेंट रुल्समध्ये कसा बदल करता येईल, शिक्षण अधिकाऱ्याला अधिक सक्षम कसे करता येईल यासर्व बाबतीत आमचा विचार चालू आहे. प्रशिक्षण धोरणामध्ये सर्वांना कसे अकाऊंटेबल करता येईल ही बाब सुध्दा अंतर्भूत करण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**रात्र शाळेमध्ये काम करणाऱ्या शिक्षकेतरांच्या समस्यांबाबत**

**(३) * ३८०४१ श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो पुंडलिक गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ३४२०३ ला दिनांक २० डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**

सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रात्र शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेतरांच्या समस्यांबाबत शासनाने गठीत केलेल्या समितीच्या अहवालानुसार कार्यवाही करण्याबाबतच्या विचाराधीन विषयाबाबत शासनाने काय निर्णय घेतला आहे,

(२) केवळ रात्र शाळांमध्येच काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेतरांची संख्या किती आहे,

(३) उपरोक्त समितीने केलेल्या शिफारशीनुसार निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१), (२) व (३) रात्र शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेत्तरांच्या समस्यांबाबत शासन गठीत समितीच्या शिफारशींमध्ये धोरणात्मक व वित्तीय बाबी असल्यामुळे निर्णय घेण्यास काही कालावधी लागेल. राज्यातील केवळ रात्र शाळांमध्येच काम करणारे ३५३ शिक्षक २४२ शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत आहेत.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या रात्रशाळांच्या विषयाच्या संदर्भामध्ये शासनाने एक समिती गठीत केली होती. या समितीचा अहवालही शासनाला 2008 मध्ये प्राप्त झालेला आहे. या ठिकाणी कितीही चर्चा झाली तरी त्या गठीत केलेल्या समितीने शासनाला जो अहवाल दिलेला आहे त्या अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही होणे अपेक्षित आहे. या समितीने पाच वर्षापूर्वी शासनाला जो अहवाल दिलेला आहे त्या अहवालावर शासनाने अद्याप कार्यवाही केलेली नाही. या संदर्भामध्ये किती दिवसात कार्यवाही होणार आहे ? त्या अहवालामध्ये आणि आताच्या प्रश्नामध्ये माझी जी प्रमुख मागणी आहे त्या बाबत अशी परिस्थिती आहे की, या रात्र शाळांमध्ये दोन प्रकारचे शिक्षक काम करतात. काही शिक्षक दिवसाच्या शाळेमध्ये पूर्ण वेळ काम करतात आणि नंतर रात्र शाळांमध्ये अर्धवेळ काम करतात आणि दीड पगार घेतात आणि दुसरे असे शिक्षक आहेत की, ते फक्त रात्र शाळेमध्ये काम करतात. त्यांना कोणत्याही प्रकारचा भत्ता मिळत नाही. त्यांना अर्धे वेतन मिळते, अर्धा महागाई भत्ता मिळतो. त्यांना अन्य भत्ते मिळत नाहीत. त्यांना पेन्शनही मिळत नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38041..... श्री.रामनाथ मोते........

निवृत्त झाल्यानंतर रोजगार हमी योजनेच्या कामावर जाण्याशिवाय त्यांच्यासमोर पर्याय नसतो. या रात्र शाळांमध्ये व अन्य ठिकाणी नोकरी करणा-या 353 शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व अन्य लाभ देण्यासंबंधी शासन सहानुभूतिपूर्वक विचार करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. खरोखरच रात्र शाळांच्या बाबतीत विचार होणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने एक समिती स्थापन केली होती. त्या समितीने शासनाला अहवाल सादर केलेला आहे. या अहवालामध्ये अनेक धोरणात्मक बाबी समाविष्ट आहेत. त्यामुळे त्या बाबींसंबंधी शासनाला धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. रात्र शाळांमध्ये अर्धवेळ काम करणाऱ्या शिक्षकांची संख्या 353 व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या 242 इतकी आहे. या शिक्षकांना पूर्ण वेळ करण्याचा विषय या समितीच्या अहवालामध्ये समाविष्ट आहे. परंतु त्याअनुषंगाने वर्कलोडचाही विषय येतो. त्यामुळे एकंदरीत याबाबत विचार करणे गरजेचे आहे. या रात्र शाळांमध्ये सुधारणा होण्यासाठी त्या समितीने काही शिफारशी केलेल्या आहेत. यामध्ये त्या शिक्षकांचे वय 45 निश्चित करावे, गुणात्मक विकास होण्यासाठी बाह्य संस्थांकडून तपासणी करावी, रात्र शाळांना वेतनेतर अनुदान द्यावे, विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार द्यावा, प्रयोगशाळा उपलबध करुन द्यावी, इमारतीचे भाडे कमी घ्यावे, शाळा लोडशेडिंग मुक्त असाव्यात या शिफारशींचा समावेश आहे. त्यामुळे प्राधान्याने या रात्र शाळांच्या बाबतीत विभागीय स्तरावर विचार करण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझ्या मतदार संघात मुंबईत 150 रात्र शाळा आहेत. राज्यात 10-20 रात्र शाळा आहेत. दिवसा जे शिक्षक काम करतात त्या अनुभवी शिक्षकांनाच या रात्र शाळांमध्ये नेमले पाहिजे असा स्पष्ट नियम असताना.....

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सभागृहात चुकीचे रेकॉर्डवर येत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांना मी सांगू इच्छितो की, मी आपल्यालाही प्रश्न विचारण्याची संधी देणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.......

NTK/ D/ KTG/

ता.प्र.क्र.38041....

श्री.कपिल पाटील : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांना माझा अधिकार डावलता येणार नाही. कारण मी रात्र शाळेच्या चळवळीतून आलो आहे. अनेक रात्र शाळांच्या संघटना बांधून मी येथपर्यंत आलो आहे. त्यामुळे त्यांच्या वेदना मला अधिक माहीत आहेत. या रात्र शाळांकडे शासनाकडून दुजा भावनेतून पाहिले जाते. अनुभवी शिक्षकांना या रात्र शाळांमध्ये नेमावे असा नियम असताना ते न करता नवीन शिक्षकांना तेथे नेमले जाते त्यामुळे हे सर्व अंगावर येते. अर्धवेळ काम करणाऱ्या शिक्षकांना अर्धवेळचा पगार मिळाला पाहिजे. परंतु पुढील काळामध्ये अनुभवी शिक्षकांचीच नेमणूक करण्याबाबत शासन दक्षता घेईल काय आणि या रात्र शाळांच्या प्रश्नांबाबत मंत्री महोदयांनी उल्लेख केलेला आहे. मुंबई शहरात व उपनगरामध्ये अनेक कष्टकरी मुले या रात्र शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. त्यांच्यासाठी शासनाला महापालिकेशी बोलावे लागेल. कारण त्यांनी आता रात्र शाळांना जागा देण्याचे बंद केलेले आहे. आता रात्र शाळा भरविता येत नाहीत. या भागातही 3 रात्र शाळा आहेत. माथाडी कामगारांची मुले या शाळेत शिकत होती. परंतु त्या शाळा बंद पडल्यामुळे ती शिक्षणापासून वंचित झालेली आहेत. त्या मुलांची शासन सोय कशी करणार आहे ? रात्र शाळांना जोडून ज्युनिअर नाईट कॉलेज सुरु करण्यात येईल काय ?

प्रा.फौजिया खान : विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांच्या हिताचे जे निर्णय आहेत ते घेण्यात येतील. अनुभवी शिक्षकांना त्या शाळांमध्ये नेमले पाहिजे हे मान्य आहे. उर्वरित दोन प्रश्न धोरणात्मक आहेत. त्याबाबत मंत्री महोदयांकडे बैठक घेऊन चर्चा करता येईल.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, या रात्र शाळांबाबत सभागृहात खूप वर्षांपासून चर्चा सुरु आहे, परंतु त्याबाबत निर्णय होत नाहीत. ही मुले शिक्षणापासून वंचित राहिलेली असतात, गरीब घरातील असतात. त्यामुळे त्यांना तातडीने शालेय पोषण आहार, शालेय पुस्तके या गोष्टी देण्यामध्ये शासन त्वरित निर्णय घेणार आहे काय ?

यानंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38041.....

प्रा.फौजिया खान : मी यापूर्वीच बैठकीचा उल्लेख केला आहे. या बैठकीमध्ये या सर्व गोष्टींबाबत चर्चा केली जाईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, रात्रशाळा आणि डे स्कूलमध्ये ज्या शिक्षकांच्या नियुक्त्या केल्या जातात, त्यांच्या संदर्भात नियमावलीमध्ये कोणताही फरक नाही. माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जे वक्तव्य केले त्यातून मला उपप्रश्न विचारावा लागला आहे. मी या संदर्भात माहिती घेतली आहे. मंत्री महोदयांनी मला उत्तर दिले आहे, हे जर चुकीचे असेल तर मी या सभागृहात पाऊल ठेवणार नाही. मला शासनाकडून उत्तर आले आहे की, अशा प्रकारचा कोणताही नियम नाही, अनुभवी शिक्षक नेमले पाहिजेत अशी नियमामध्ये तरतूद नाही किंवा अशा प्रकारचा जी.आर.शासनाने काढलेला नाही. अशा प्रकारचे उत्तर मला शासनाने दिलेले आहे.

अनुभवी शिक्षक नेमले पाहिजेत या मताशी मी सहमत आहे. अशी नियमावलीमध्ये तरतूद नाही. म्हणून शासनाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. रात्रशाळांमध्ये अनुभवी शिक्षक नेमण्याचा शासनाने निर्णय घेतला तर त्याला आमची हरकत नाही. जे रात्रशाळांमध्ये काम करतात त्यांच्या विषयी पोटतिडकीने आम्ही प्रश्न मांडतो, त्यांच्या प्रश्नाबाबत विचार करण्याची शासनाला विनंती करतो.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या सभागृहातील दोन सन्माननीय सदस्यांमध्ये या प्रश्नाबाबत मतभेद दिसून येतात. मी सभागृहाला सांगू इच्छिते की, माननीय उद्योगमंत्री श्री.नारायण राणे यांनी देखील रात्रशाळेमध्ये शिकून मंत्री पदापर्यंत मजल मारली आहे. मी ज्या बैठकीचा उल्लेख केला आहे, त्या बैठकीला माननीय उद्योगमंत्र्यांना सुध्दा निमंत्रित करु.

--------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांना ६ व्या वेतन आयोगाची थकबाकी देण्याबाबत**

**(४) * ३६६९३ श्री.विक्रम काळे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.सतीश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.नागो पुंडलिक गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक २५५८४ ला दिनांक १६ एप्रिल, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांना केंद्राने वाढविलेल्या दराप्रमाणे महागाई भत्ता देण्याबाबत वित्त विभागाच्या आदेशाप्रमाणे महागाई भत्ता अदा केला जातो परंतु वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना मात्र तो त्या आदेशान्वये न मिळता त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या स्वतंत्र आदेशानुसार दरवेळेस तो फार विलंबाने मिळतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांना सध्या वाढलेला ७ टक्के महागाई भत्ता व यापूर्वीचा ६ व ७ टक्के महागाई भत्याची थकबाकी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(३) उक्त प्रकरणी यांसबंधी शासन स्तरावरुन काय कार्यवाही करण्यात आलेली आहे वा येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्री.डी.पी.सावंत, श्री.राजेश टोपे यांच्याकरिता :** (१) अंशत: खरे आहे.
(२) १) वित्त विभाग शासन निर्णय दिनांक २६/०४/२०११ अन्वये दिनांक ०१/०५/२०११ पासून ६ टक्के महागाई भत्ता लागू केला असून तो देण्यात आलेला आहे.
२) वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०४/१०/२०११ अन्वये दिनांक ०१/१०/२०११ पासून ७ टक्के महागाई भत्ता लागू केला असून तो देण्यात आलेला आहे.
३) वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०९/०४/२०१२ व दिनांक १०/७/२०१२ अन्वये दिनांक ०१/०१/२०१२ पासून लागू करण्यात आलेला ७ टक्के महागाई भत्ता दिनांक ०१/०८/२०१२ पासून देण्यात आलेला आहे.
४) वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ०८/११/२०१२ अन्वये दिनांक ०१/०७/२०१२ पासून ७ टक्के महागाई भत्ता लागू केला असून तो अद्याप देण्यात आलेला नाही.
(३) वित्त विभागाने महागाई भत्याचे आदेश निर्गमित केल्यानंतर त्यानुसार महागाई भत्ता अदा करण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना संचालक, उच्च शिक्षण यांना देण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. जवळपास ६० दिवसांपासून राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक संपावर आहेत. या संपामुळे परीक्षा घेण्याची नामुष्की सरकारवर ओढवली, आता पेपर तपासण्याची नामुष्की ओढवण्याच्या आत हा संप मिटण्याबाबत तातडीने निर्णय घेणार आहात काय?

..३..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.......... ता.प्र.क्र.३६६९३....

सभापती महोदय, केंद्रीय कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू केल्यानंतर त्याचा लाभ राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना दिला जातो. मध्यंतरी केंद्र सरकारने एकदा ६ टक्के आणि दुसऱ्यांदा ७ टक्के महागाई भत्ता वाढविला होता. या वाढीचा लाभ राज्यातील सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना देण्यात आला. राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना या वाढीचा लाभ केव्हा मिळणार आहे? राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना ज्या दिवशी वाढीव महागाई भत्ता लागू केला जातो त्याच दिवसापासून या प्राध्यापकांना वाढीव महागाई भत्ता लागू करण्याबाबतचे परिपत्रक शासनाकडून हे अधिवेशन संपण्यापूर्वी निर्गमित केले जाईल काय?

माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी तातडीने दिल्ली येथे बैठक घेऊन या प्राध्यापकांना थकबाकीची ८० टक्के रक्कम अदा करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्या सूचनेचे काय झाले? प्राध्यापकांचा संप मिटण्याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे?

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना देय असलेल्या महागाई भत्त्याच्या थकबाकीसंबंधी प्रश्न विचारला आहे. मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, शासन निर्णय दिनांक ९.४.२०१२ आणि दिनांक ८.११.२०१२ अन्वये ५८ कोटी आणि ६८ कोटी रुपयांची थकबाकी देण्यासाठी ३१ मार्च रोजी तरतूद केली आहे आणि ती रक्कम वितरित झाली असून ३० एप्रिल पर्यंत संबंधितांच्या खात्यामध्ये जमा होईल.

नंतर डब्ल्यू.१..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :36693** ......

श्री. डी.पी.सावंत ....

सभापती महोदय, सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. राजेश टोपे यांनी यासंदर्भात घोषणा केली आहे की, प्राध्यापकांची 80 टक्क्याची जी थकबाकी आहे ती युजीसी कडून आली किंवा नाही आली तरी सुध्दा ती थकबाकी मे महिन्याच्या एंड पर्यंत प्राध्यापकांच्या खात्यात 3 हप्त्यात जमा केली जाणार आहे. परीक्षेच्या संदर्भात मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, परीक्षेच्या संदर्भात गोंधळ झालेला नसून मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा अतिशय चांगल्या प्रकारे सुरु आहेत तसेच एसएनडीटीच्या परीक्षाही चांगल्या प्रकारे सुरु आहेत. काही विद्यापीठांनी परीक्षा पुढे ढकलल्या असल्या तरी त्या सुध्दा वेळेवर होतील व विद्यार्थ्यांची चांगल्या प्रकारे काळजी घेतली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, प्राध्यापकाच्या संदर्भात आरपार भूमिका घेण्याची आवश्यकता आहे. प्राध्यापक संघटनेच्या नेत्यांना बोलावून त्यांना "हे आम्ही करणार आहोत व हे आम्ही करणार नाही" असे स्पष्ट शब्दात सांगितले जाणार आहे काय ?

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला नसला तरीही मी सांगू इच्छितो की, प्राध्यापकांच्या संघटनेच्या नेत्यांबरोबर आपण वेळोवेळी बैठका घेतलेल्या आहेत. प्राध्यापकांच्या संदर्भात शासनाने एक निर्णय घेतला असून तो निर्गमितही करण्यात आलेला आहे. नेटसेटच्या बाबतीत शासन स्तरावर वेगळा विचार सुरु आहे व त्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेऊन कळविण्यात येईल.

----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील शिक्षण सेवकांच्या विविध मागण्यांबाबत**

**(५) * ३६८१७ श्री.चंद्रकांत पाटील, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने १३ वर्षांपूर्वी शिक्षण सेवक हे पद निर्माण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यावेळी शिक्षण सेवकांचा ३ वर्षाचा सेवा कालावधी विविध लाभांसाठी ग्राह्य धरण्यात येईल असे आदेश नमूद करण्यात आले होते, परंतु सेवा कालावधी ग्राह्य धरण्याबाबत अधिकारी संभ्रमावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शिक्षण सेवकांच्या विविध मागण्यांसाठी अखिल महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण सेवक संघटनेने दिनांक १० जानेवारी, २०१३ रोजी शासनास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनानुसार शासनाने शिक्षण सेवकांच्या मागण्यांवर कोणता निर्णय घेतला आहे,

(५) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(६) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्या करिता :** (१) होय.

(२) शिक्षक सेवक म्हणून केलेली सेवा सेवानिवृत्ती वेतन व सेवानिवृत्तीचे इतर फायदे या बाबींसाठी ग्राह्य धरण्याबाबत शासन निर्णय दिनांक २७/२/२००३ मध्ये तरतुद आहे. तथापि, शिक्षण सेवकाचा तीन वर्षाचा सेवा कालावधी वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, शिक्षण सेवकांच्या संदर्भात शासनाने महत्वाचे असे दोन निर्णय घेतल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो. दि.१९ मार्च २०१२ च्या शालेय शिक्षण विभागाच्या शासन आदेशानुसार टप्पा अनुदानावरील खाजगी शाळांमधील शिक्षण सेवक योजना रद्द करुन त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने मागील १० वर्षांचा फरक व शिक्षण सेवक कालावधीच्या ३ वेतन वाढी देण्यात आलेल्या आहे हे खरे आहे काय ?

प्रा.फौजिया खान : नाही सभापती महोदय.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय,१३ वर्षापूर्वी शिक्षण सेवक योजना सुरु करण्यात आली होती. त्यावेळच्या आर्थिक अडचणीमुळे यासंदर्भात मधली प्रोव्हीजन करण्यात आली असेल. परंतु विविध क्षेत्रात प्रशिक्षणार्थी (ॲप्रेंटीसशिप) असते. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील शिक्षण सेवक कल्पना रद्द केली जाणार आहे काय ?

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : ३६८१७** ......

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, असा कोणताही विचार शासनाने केलेला नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, उत्तरामध्येच विसंगती आहे. मंत्रालय आणि क्षेत्रीय अधिकारी यांच्यामध्ये खऱ्या अर्थाने समन्वये असण्याची आवश्यकता आहे. उत्तरात असे म्हटले आहे की, "शिक्षण सेवकांचा ३ वर्षाचा कालावधी वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राहय धरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे". राज्याच्या शिक्षण संचालकांचे पत्र माझ्याकडे आहे. शिक्षण संचालकांनी ३५ जिल्हयातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पत्र पाठवून कळवले आहे की, "शिक्षण सेवकांचा कालावधी वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी ग्राहय धरण्यात यावा." परंतु या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, "ही बाब विचाराधीन आहे." त्यामुळे येथे दिलेली माहिती खरी की, संचालकांनी दिलेली माहिती खरी ? संचालकांनी चुकीची माहिती दिली असेल तर आपण त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? यामध्ये आम्ही नेमके खरे काय समजायचे ?

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला एका वाक्यात हा प्रश्न विचारता आला असता. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये किमान १० ते ११ प्रश्नांवर चर्चा झाली पाहिजे अशी आपली अपेक्षा आहे. आपल्या प्रश्नावर चर्चा व्हावी, योग्य उत्तर मिळावे असे प्रत्येक सन्माननीय सदस्याची इच्छा असते. प्रश्नोत्तरे सुरु होऊन जवळपास ४५ मिनीटे झालेली असतांना आपण केवळ पाचव्या प्रश्नावरच येऊन थांबलो आहोत. मी उद्या पासून अशी प्रथा पाडायची ठरवली आहे की, कोणत्याही प्रश्नावर ७ मिनीटे चर्चा झाली की, पुढचा प्रश्न घ्यावयाचा. असे जर केले तर किमान १०-११ प्रश्न प्रश्नोत्तराच्या तासात होऊ शकतील. केवळ शिक्षण विभागातील प्रश्नाच्या संदर्भात दोन्ही बाजू कडून १४-१५ मिनीटे चर्चा होऊन सुध्दा प्रश्न संपत नाही आणि ग्रामीण भागातील प्रश्नांवर केवळ ३-३ मिनीटे चर्चा करायची हे काही योग्य नाही. एका एका प्रश्नावर एवढा वेळ जात असल्यामुळे यासंदर्भात मी समाधानी नाही.

यानंतर श्री. मंगेश.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 36817 ....**

**सभापती** ....

मघाशी एका वाक्याचा प्रश्न होता. पण सन्माननीय सदस्य आपण तो प्रश्न किमान 9 मिनिटे डेव्हलप करीत आणला. अजून सुध्दा त्या प्रश्नावर आपण आलेलाच नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, शिक्षण संचालकांनी काढलेले पत्रक खरे आहे की आपण सांगता हे खरे आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शिक्षण संचालकांनी काढलेले पत्रक माध्यमिक शाळांच्या बाबतीतील आहे. विषय तोच आहे. शिक्षण सेवक कालावधी वरिष्ठ श्रेणीसाठी ठेवण्याच्या बाबतीत माध्यमिकसाठी निर्णय झालेला आहे. प्राथमिकसाठी अजून निर्णय झालेला नाही. तो घेणे आवश्यक आहे. पुढील शैक्षणिक वर्ष येण्यापूर्वी हा निर्णय घेण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मला आक्षेप नोंदवावयाचा आहे. आपण 'शिक्षण सेवक' शब्द वापरला आहे. आपण सहायक शिक्षक (परिविक्षाधीन) असे लिहिण्याच्या बाबतचा कायदा केला आहे. सभागृहात अशा प्रकारे अपमानास्पद शब्दप्रयोग होऊ नये. आपण हा उल्लेख मागे घ्यावा आणि दुरूस्त करावी.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मान्य आहे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे मला पूर्ण मान्य आहे. यापुढे 'शिक्षण सेवक' शब्द वापरणार नाही. परंतु, मला असे सांगावायाचे आहे की, आपण प्रश्नामध्ये 'शिक्षण सेवक' असे शब्द वापरता. त्यामुळे उत्तरात सुध्दा तसे द्यावे लागते.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वाशी (ता.पेठा) तसेच कोकणातील विशेषत: रायगड जिल्ह्यातील पिकती जमीन उद्योगपतींना देण्याच्या निर्णयाविरोधात आंदोलन करण्याचा दिलेला इशारा**

**(6) * 38220 श्री. विजय गिरकर, श्री.दिवाकर रावते, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.विनायक राऊत** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र शासनाने सेझसाठी संपादित केलेल्या जमिनीवर नवीन औद्योगिक धोरणाच्या निषेधार्थ वाशी (ता.पेठा) तसेच कोकणातील विशेषत: रायगड जिल्ह्यातील पिकती जमीन उद्योगपतींना देण्याच्या निर्णयाविरोधात सेझ विरोधी 24 गावसंघर्ष समितीने या उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, उद्योग सचिव व संचालक यांना माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्या दरम्यान दिला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सेझ साठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींना 40 लाख रुपये एकरी भाव दिला असल्याचे सांगण्यात आले असून प्रत्यक्षात मात्र 10 लाख रुपये एकरीच असा भाव देण्यात आला असल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, रायगड जिल्ह्यात रिलायन्स कंपनीमार्फत उभारण्यात येणारा सेझ प्रकल्प रद्द करण्याच्या निर्णय घेऊन सेझसाठी संपादित केलेल्या जमिनीवर आय.आय.ए. (इंटिग्रेटेड इंडस्ट्रीयल एरिया) विकसित करण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे जमीन परत देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(5) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार शेतकऱ्यांच्या जमिनीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(6) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.नारायण राणे** : (1) माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्या दरम्यान नवीन औद्योगिक धोरणाच्या विरोधात उग्र आंदोलन छेडण्याचा लेखी इशारा शासनास प्राप्त झालेला नाही. तथापि, रविवार दिनांक 06/01/2013 चे दैनिक सामना वृत्तपत्रामध्ये तशा आशयाचे वृत्त प्रसिध्द झालेले आहे.

(2) हे खरे नाही.

(3), (4), (5) व (6) रायगड जिल्ह्यातील 45 गावातील 8134-97-91 हे. आर जमीन महामुंबई सेझ करिता संपादन करण्याचे प्रस्तावित होते. त्यापैकी 1505-47-90 हे.आर संमती निवाडे जाहीर होवून सदर क्षेत्राचा ताबा महामुंबई सेझ यांच्याकडे देण्यात आला आहे. उर्वरीत क्षेत्रासाठी सुरु असणारी संपादनाची प्रक्रिया व्यपगत झाल्याने सदर जमिनीच्या 7/12 सदरी असणारे भूसंपादनाचे शेरे कमी करण्याबाबत शासनाच्या दिनांक 18/02/2011 रोजीच्या आदेशवजा पत्रान्वये जिल्हाधिकारी, रायगड यांना कळविण्यात आला होता. त्यानुसार संमती निवाडे जाहीर झालेले क्षेत्र वगळता महामुंबई सेझ करिता संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या 7/12 सदरी असणारे भूसंपादनाचे शेरे कमी करण्यात आले आहेत.

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 38220 ....**

श्री. विजय गिरकर : सभापती महोदय, शासनाने एखाद्या विशिष्ट प्रकल्पासाठी संपादित केलेली जमीन दुसऱ्या प्रकल्पासाठी वापरणे गैर आहे, असा माननीय सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असताना सुध्दा आपणाकडून जमीन दुसऱ्या प्रकल्पासाठी कशी वापरण्यात आली ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सेझसाठी रायगडमध्ये संपादित झालेल्या किंवा वाटाघाटीने घेतलेल्या जमिनीच्या संबंधीचा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. ही जमीन वाटाघाटीने घेण्यात आली होती. सन 1894 च्या कायद्यानुसार जमीन संपादित झाली नव्हती. सुरूवात केली होती. पण शेवटी वाटाघाटी करून 1505 हेक्टर जमीन त्यांच्या ताब्यात देण्यात आली. एकूण 8134 हेक्टर जागा हवी होती. ही जागा कोणत्याही दुसऱ्या उपक्रमाला किंवा इंडस्ट्रीसाठी वापरली जात नाही. शासनाने नवीन औद्योगिक धोरण आणले आहे. त्यामध्ये इंटिग्रेटेड इंडस्ट्रियल एरिया म्हणून नवीन योजना जाहीर केली आहे. त्या योजनेमध्ये ती खाजगी राहिलेली जमीन वापरली जावी, अशा प्रकारे कायद्यात तरतूद केली आहे.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, उत्तरात सांगितले आहे की, 8134 हेक्टर जमीन महामुंबई सेझकरिता संपादित केली. त्यापैकी 1505 हेक्टर जमीन संमती निवाडे जाहीर करून परत दिली. उर्वरित 6729 हेक्टर जमीन परत करण्याचे आदेश, 7-12 वरील शेरे कमी करण्याचे आदेश आपण दिले आहेत. त्यापैकी किती जमिनीवरील शेरे आतापर्यंत कमी झाले, त्याचा फायदा किती शेतकऱ्यांना झाला, आरआर रेटप्रमाणे त्याची आजची किंमत काय आहे ?

सभापती महोदय, पहिल्या उत्तरात असे म्हटले आहे की, लेखी इशारा शासनाला देण्यात आलेला नाही. पण दैनिक सामना या वृत्तपत्रामध्ये तशा आशयाचे वृत्त आले आहे. सामन्याची बातमी खरी आहे का ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन 1894 च्या कायद्यानुसार 8134 हेक्टर जमीन संपादित करायची ठरले. पण प्रत्यक्षात केंद्र सरकारने सेझसंबंधी नियम केला. पुढील आदेश होईपर्यंत ती जमीन वाटाघाटीने घ्यावी असा आदेश आल्यामुळे, 1505 हेक्टर जमीन वाटाघाटीने घेण्यात आली. सेक्शन 4 व 6 वेळेत न झाल्यामुळे उर्वरित काही जमीन व्यपगत झाली आणि काही जमीन दिनांक 18.02.2011 रोजी वगळण्यात आली. 1505 हेक्टर जमीन सोडून बाकी सर्व

..4



MSK/ D/ ST/ पूर्वी श्री. जुन्नरे 12:05

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 38220 ....**

श्री. नारायण राणे ....

जमिनीच्या 7/12 वर त्या मालकाचे नाव आहे. फक्त 1505 हेक्टर जमिनीवर रिलायन्स कंपनीचे नाव आहे. कोणत्याही वृत्तपत्राच्या बातमीची दखल येथे घ्यायला नको होती. पण घेतली आहे. त्यांचे कोणतेही निवेदन आले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

( नंतर श्री. भारवि ....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.कं.38220....

श्री.नारायण राणे....

दैनिक सामन्यामध्ये बातमी आली ही बाब देखील खरी आहे.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, शासनाने स्थानिक लोकांच्या जमिनी संपादित केल्या असल्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळणार आहे काय ? एखादा कारखाना किंवा इंडस्ट्रियल झोन निर्माण झाल्यानंतर परप्रांतीय लोक रोजगारासाठी येतात. त्यामुळे स्थानिक लोक वंचित राहतात. सन 2009 मध्ये एसइझेड जाहीर झाल्यामुळे काही कामगार कायदे वगळण्याची बातमी आली होती. माथाडी कामगार एसइझेड मधून वगळण्यात येईल अशा प्रकारचे स्टेटमेंट देण्यात आले होते. माझ्या माहिती प्रमाणे जी.आर.काढला होता. तेव्हा माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, शासनाने काढलेला जी.आर.मंत्रिमहोदय बदलणार आहेत काय ? कारण एखाद्या इंडस्ट्रीमध्ये, कारखान्यामध्ये कामगार कायदाच लागू होत नसेल तर मग त्या कामगारांना संरक्षण कसे काय मिळणार आहे, मजुरी कशी काय मिळणार आहे ? तसेच, त्या इंडस्ट्रीमध्ये, कारखान्यामध्ये कामगार खात्याचे नियंत्रण राहणार आहे की, एसइझेड विकसित करणाऱ्यांचे राहणार आहे ? असे माझे तीन प्रश्न आहेत.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, हा प्रश्न कामगार नेत्यांनी विचारलेल आहे. मला त्यांना सांगायचे आहे की, हा शेतकऱ्यांचा प्रश्न आहे. एसइझेड रद्द झाल्यामुळे I.I.A.अंतर्गत या जमिनीवंर आरक्षण लागू करण्यात आले आहे. यातील 60 टक्के जागेवर इंडस्ट्री होणार आहे. त्यात स्थानिक लोकांना रोजगार मिळणार आहे. आयटीआय पासून सर्व प्रशिक्षण स्थानिक मुलांना दिले जाईल. जेणे करून स्थानिक लोकांना तेथे रोजगार प्राप्त व्हावा. त्यामुळे तेथील स्थानिक लोकांना रोजगार मिळणार ही गोष्ट निर्विवाद आहे. कायद्यामध्ये सुधारणा होईल काय, असा देखील प्रश्न विचारण्यात आला आहे. येथील एसइझेड रद्द झाल्यामुळे इंडस्ट्रीयल ॲक्टच लागू होणार आहे. एसइझेड रद्द झाल्यामुळे I.I.A. ही नवीन कन्सेप्ट आली आहे. पूर्वी एसइझेडसाठी ज्या कंडिशन्स घातल्या होत्या त्या येथे लागू नाहीत. त्यामुळे येथे इंडस्ट्रीयल ॲक्टच लागू होणार आहे, एवढेच मला सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, एसइझेडच्या निमित्ताने येथे निवासी वसाहती स्थापन करण्याचे शासनाचे धोरण आहे असे आमचे सुरूवातीपासूनच म्हणणे होते. 60 टक्के ठिकाणी इंडस्ट्री राहणार असून 40 टक्के ठिकाणी एसइझेड राहणार आहे. म्हणजे हळूहळू ही सगळी जमीन बिल्डरांच्या घशात घालण्याचे शासनाचे धोरण आहे काय ? 60 टक्के जमिनीचा वापर इंडस्ट्रीसाठी करण्यात येणार आहे या धोरणावर शासन ठाम राहणार आहे काय ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांची जशी इच्छा असेल त्याप्रमाणे शासनातर्फे निर्णय घेण्यात येईल. म्हणजे आम्ही आमच्या 60 टक्के निर्णयावर ठाम राहणार आहोत. 100 टक्के जमीन ही त्या मालकांची आहे. 60 टक्के जमिनीवर इंडस्ट्री होणार आहे. 10 टक्के जमीन वाणिज्यिक वापरासाठी म्हणजे शाळा, रूग्णालय इत्यादीसाठी असेल. 30 टक्के जमीन निवासासाठी राखीव असेल. ही 100 टक्के जमीन खाजगी मालकांची असून वाटाघाटी करून विकत घेण्यात आलेली आहे. ही जमीन शासनाने संपादित केलेली नाही. ही बाब सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी समजून घ्यावी. कारण त्यांच्याच लोकांनी ह्या जमिनी त्या कंपनीला देण्याचे काम केले आहे. उलट सरकारने खाजगी मालकांच्या 60 टक्के जमिनीवर आरक्षण लागू करून त्या जमिनीचा वापर इंडस्ट्रीसाठी करावा असा निर्णय घेतला आहे व त्याद्वारे रोजगार निर्मितीचा उद्देश सफल करण्याचे ठरविले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी कधीही कुठलीही जमीन विकण्याचा व्यवहार करीत नाही. त्यामुळे माननीय मंत्र्यांनी आता केलेला उल्लेख रेकॉर्डवरून काढून टाकावा. मी कधीही जमीन दिलेली नाही आणि लँड डिलिंगचा व्यवहार केलेला नाही आणि करणारही नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जे अनावश्यक असेल त्यासंबंधी विचार करण्यात येईल.

......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील असंघटित क्षेत्रातील सर्व बांधकाम कामगारांना सुरक्षा व अन्य कल्याणकारी योजनांचा फायदा मिळण्याबाबत**

**(7) * 37473 श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.भगवान साळुंखे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, श्री.अनिल भोसले, श्री.विनायक राऊत, डॉ.निलम गोऱ्हे, श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.सुभाष चव्हाण, श्री. विजय गिरकर, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतीश चव्हाण, श्री.नितीन गडकरी, श्री.नागो पुंडलिक गाणार, श्री. शरद रणपिसे, श्री.मोहन जोशी** : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांना सुरक्षा व अन्य कल्याणकारी योजनांसाठी स्थापन झालेल्या बांधकाम कामगार मंडळाकडे विकासकांकडून वसूल झालेले सुमारे एक हजार कोटी आणि त्यावरील 90 कोटी रुपयांचे व्याज असा मोठा निधी लाभार्थ्यांच्या नोंदणी अभावी पडूनच असून त्यातील बांधकाम कामगारांसाठी केवळ 6 लाख, 90 हजार रुपये खर्च झाल्याचे माहे जानेवारी, 2013 मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) तसेच पुणे कामगार विभागाकडे 140 कोटी जमूनही बांधकाम कामगारांना सदर योजनेचा लाभ मिळत नसल्याचे माहे डिसेंबर, 2012 मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त असंघटीत बांधकाम कामगारामध्ये गवंडी, लोहार, सुतार आणि पेंटर, मजूर यांचा सामावेश असून दगडफोडी, रेती कामगार, वीटभट्टी, रस्ते व अन्य प्रकल्पावरील मजुरांना त्यातून वगळले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, अद्याप नोंदणी केलेल्या मजुरांची संख्या किती आहे,

(5) असल्यास, प्रश्न 1 व 2 विचारात घेता असंघटीत क्षेत्रातील सर्व बांधकाम कामगारांना सुरक्षा व अन्य कल्याणकारी योजनांचा फायदा मिळण्याकरिता शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ** : (1) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे उपकरापोटी आतापर्यंत रु. 1098 कोटी इतकी रक्कम जमा आहे. त्यापैकी बांधकाम कामगारांसाठी जनश्री विमा योजनेसह इतर कल्याणकारी योजनांवर रुपये 49,63,064/- इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे.

(2) हे खरे नाही.

(3) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती) अधिनियम, 1996 नुसार 'इमारत व इतर बांधकामे' च्या व्याख्येत अंतर्भुत होणाऱ्या सर्व कामावर काम करणारे आणि 'बांधकाम कामगार' या व्याख्येत समाविष्ट असलेल्या नोंदित बांधकाम कामगारांना कल्याणकारी योजनांचे लाभ देय आहेत.

(4) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात आतापर्यंत 1,02,994 इतके बांधकाम कामगार नोंदित आहेत.

(5) सदर मंडळामार्फत इमारत व इतर बांधकाम कामगारांना मंडळामार्फत प्रसूती साहाय्य, शैक्षणिक सहाय्य, गंभीर आजारासाठी आर्थिक मदत, अपघात सहाय्य, घर बांधणी व घर दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य, अंत्यविधी सहाय्य इत्यादी योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

ता.प्र.क्र. 37473...
श्री.हसन मुश्रीफ....

बांधकाम कामगारांना मंडळाच्या योजनांची माहिती होण्यासाठी वर्तमानपत्रातील जाहिराती व्यतिरिक्त एस.टी. महामंडळाच्या बसेसवर जाहिराती देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच जास्तीत जास्त पात्र बांधकाम कामगारांची नोंदणी करुन त्यांना लाभ देण्यासाठी मंडळामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. तसेच सदर कायद्याच्या अंमलबजावणीबाबत शासनास सल्ला देण्यासाठी शासन निर्णय दिनांक 29.06.2012 अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार सल्लागार समिती देखिल गठीत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अधिनियमाची अंमलबजावणी करतेवेळी अंमलबजावणी यंत्रणेला येणाऱ्या विविध अडचणींचा अभ्यास करुन नियमात सुधारणा सुचविण्यासाठी दि.4.3.2013 च्या शासन निर्णयान्वये तज्ञ समिती गठीत करण्यात आली आहे.
(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवा शर्ती) अधिनियम 1996 नुसार बांधकाम कामगार या व्याख्येत कोणते कामगार अंतर्भूत आहेत, असा माझा पहिला प्रश्न आहे. गवंडी, लोहार, सुतार, पेंटर, तसेच दगडफोडी, रेती कामगार, वीटभट्टी कामगार, रस्त्यावर काम करणारे कामगार यांचा या अधिनियमामध्ये अंतर्भाव होतो काय ? सदर कामगारांचा बांधकाम कामगार अधिनियमामध्ये समावेश नसेल तर शासन या अधिनियमामध्ये सुधारणा करून या कामगारांचा समावेश करणार आहे काय ? असा माझा तिसरा प्रश्न आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37473....

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, मी शासनाचे आभार मानतो आणि माननीय मंत्री महोदयांना देखील धन्यवाद देतो. उत्तरामध्ये नमूद करण्यात आले की, बांधकाम कामगारांसाठी जनश्री विमा योजनेसह इतर कल्याणकारी योजनांवर रुपये 49 लाख 63 हजार 064 इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे. या मंडळाकडे चांगला निधी जमा आहे परंतु, माथाडी मंडळ व कामगार मंडळ या मंडळांकडे निधीचा तुटवडा भासत आहे. या मंडळाकडे एक हजार कोटी रुपये जमा झालेले आहेत आणि जवळपास एक लाख कामगारांच्या नोंदी झालेल्या आहेत. नोंदी झालेले कामगार कोठले आहेत ? कारण बांधकाम व्यवसायामध्ये परप्रांतीय कामगार मोठ्या प्रमाणावर आहेत. परप्रांतीय कामगारांच्या नोंदी कशाप्रकारे ठेवण्यात आलेल्या आहेत, त्यांना कशाप्रकारे सोयी सवलती दिल्या जातात ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या योजनेमध्ये नरेगामध्ये काम करणाऱ्या कामगारांचा देखील समावेश केलेला आहे. आपणाास सर्वच परप्रांतीय आहेत असे आपणास म्हणता येणार नाही. राज्यातील सर्वच भागातील कामगार यामध्ये आहेत. लोहार, गंवडी, पेन्टर असे कामगार देखील त्यामध्ये आहेत. मुंबई-पुणे शहरामध्ये थोडेफार परप्रांतीय काम करीत असतील. 90 दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र असलेला कामगार नोंदणीसाठी पात्र आहे आणि त्याला या योजनेचा लाभ देण्यात येतो. .

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, इमारतींचे बांधकाम सुरु असते त्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांची लहान मुले छोटे छोट दगड उचलण्याचे काम करीत असतात. या मंडळाकडे प्रचंड निधी उपलब्ध आहे. बांधकाम क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या मुलांसाठी किती खर्च करण्यात आलेला आहे ? या ठिकाणी सांगण्यात आले की, महिलांना प्रसूती रजेसाठी 20 हजार रुपये दिलेले आहेत. माझा प्रश्न आहे की, आतापर्यंत किती महिलांना त्याचा फायदा झालेला आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, एकूण 64 हजार कामगारांना लाभ झालेला आहे. मी अगोदर देखील सांगितलेले आहे की, सर्व लाभार्थ्यांची माहिती माझ्याकडे नाही ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल. बांधकाम कामगार एकसारखे् स्थलांतरीत होत असतात. इमारतींचे काम पूर्ण झाले की ते दुसऱ्या ठिकाणी जातात. तेव्हा अशा कामगारांच्या मुलांसाठी शाळेची योजना आखलेली नाही.

..2..

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, या मंडळाकडे 1 कोटी रुपयांचा निधी जमा असून त्यापैकी 49 लाख 63 हजार इतका खर्च झाला आहे आणि 64 हजार कामगारांना त्याचा लाभ दिलेला आहे असे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. दिनांक 4 मार्च 2013 रोजी समिती स्थापन करण्यात आली आहे. याचा अर्थ प्रश्न विचारल्यानंतर ही समिती स्थापन करण्यात आलेली आहे. माझा प्रश्न आहे की, ही तज्ज्ञ समिती आपला रिपोर्ट केव्हा देणार आहे आणि त्याची अंमलबजावणी केव्हा करण्यात येईल ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन 2010 मध्येच बोर्ड नेमण्यात आलेले आहे. केंद्र सरकारच्या कायद्यामध्ये कोणकोणत्या तरतुदी आहेत याची माहिती जाणून घेण्यासाठी बोर्डाला एका एक्स्पर्ट समितीची आवश्यकता होती म्हणून ती समिती नेमण्यात आलेली आहे. प्रश्नाचा आणि त्या समितीचा काही संबंध नाही. या समितीने सजेशन्स सुध्दा दिलेल्या आहेत. त्या संदर्भाल रुल्स तयार करण्यासाठी ते विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आलेले आहे. महिन्याभराच्या आत निर्णय होईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेले आहे की, सदर मंडळामार्फत इमारत व इतर बांधकाम कामगारांना मंडळामार्फत प्रसुती सहाय्य, शैक्षणिक सहाय्य, गंभीर आजारासाठी आर्थिक मदत, अपघातसाह्य घर बांधणी व घरे दुरुस्तीसाठी अर्थसाह्य, अत्यंविधीसाठी अर्थसाह्य इत्यादी योजनांचा लाभ देण्यात येत आहे. पुढे असे म्हटले आहे की, बांधक्ाम कामगारांना मंडळाच्या योजनांची माहिती होण्यासाठी वर्तमानपत्रातील जाहिराती व्यतिरिक्त एस.टी.महामंडळाच्या बसेसवर जाहिराती देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. माझा प्रश्न आहे की, बांधकाम कामगारांना त्यांच्यासाठी असलेल्या सवलतींची माहिती देण्याचे बंधन विकासकांवर टाकणे आवश्यक आहे. तसेच कामगारांची नोंदणी देखील तेथेच झाली पाहिजे. तेव्हा माझ्या सूचनेचा शासन विचार करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय,बांधकाम कामगारांसाठी असलेल्या योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही किंवा त्याबाबतचा प्रचार आणि प्रसार झालेला नाही हे खरे आहे. बांधकाम व्यवसायामध्ये काम करणारे ठेकेदार, बिल्डर्स किंवा महानगरपालिका, नगरपालिका,



अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37473....

श्री.हसन मुश्रीफ.....

सिडको, एमआयडीसी इत्यादी ठिक्‍ाणच्या ठेकेदारांना ज्या कामगारांनी 90 दिवसांपेक्षा जास्त दिवस काम केलेले आहे त्यांची नोंदणी केल्याशिवाय त्याचीं देयके दिली जाणार नाहीत. **सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

---------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, "विदर्भातील सहा आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात पंतप्रधान पॅकेज अंतर्गत सामूहिक विवाहासाठी जाहीर केलेल्या खर्चाच्या आकडेवारीत विसंगती असल्याबाबत" या विषयावरील श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. व श्री.जगदीश गुप्ता, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 42273 ला दिनांक 22 जुलै, 2008 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानपरिषदेच्या सन 2012 च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात सभागृहात दिनांक 10 डिसेंबर ते 21 डिसेंबर, 2012 या कालावधीत माननीय मंत्री/माननीय राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 312 आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : आश्वासनांची यादी सभागृहासमोरठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावी.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:आश्वासनावरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवणे

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 1988 च्या पहिल्या अधिवेशनापासून सन 2012 च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनापर्यंत देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी एकूण 975 आश्वासनांवरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : विवरणपत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली विवरणपत्रांची यादी जोडावी.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.गुलाबराव देवकर (कृषी व जलसंधारण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने, वर्ष 2013-14 च्या वार्षिक योजनेच्या आखणीचे नियोजन आणि वर्ष 2012-13 मधील वितरित तरतूद व जानेवारी, 2013 अखेर खर्चाचा जिल्हानिहाय तपशील" सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : खर्चाचा जिल्हानिहाय तपशील सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

--------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, मी खालील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा सभागृहात उपस्थित करीत आहे. आपण परवानगी दिल्याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार व्यक्त करतो.

महोदय, दिनांक 4 एप्रिल, 2013 रोजी रात्रीच्या सुमारास ठाणे-शिळफाटा नजिक मुंब्रा येथील डायघर लकी कंपाऊंडमधील एक 7 मजली इमारत पत्यासारखी कोसळण्याची घटना काल संध्याकाळी 5.30 वाजता घडली. या दुर्घटनेत 31 जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला व 50 पेक्षा अधिक लोक इमारतीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. या 7 मजल्याच्या 25 फ्लॅटमध्ये रहिवासी व मजूर राहत होते. निकृष्ट बांधकाम साहित्य आणि कमकुवत पायामुळे इमारत कोसळल्याची शक्यता आहे. त्या इमारतीचे बिल्डर जमिल कुरेशी, सलिल शेख आणि त्यांच्या भागीदारांवर गुन्हा दाखल केला आहे. परंतु अजूनही ते फरार आहेत. सर्व नियम आणि महापालिकेच्या परवानग्या धाब्यावर बसवून अनधिकृत इमारतीस परवानगी देणाऱ्या संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

महोदय, बेकायदा बांधकाम सुरु झाल्यानंतर त्याची छायाचित्रांसह लेखी तक्रार मंगल पाटील व शरद पाटील यांनी पालिकेकडे करुनही पालिका प्रशासनाने त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. तसेच शिळफाटा भागात मोठ्या प्रमाणात बेकायदा इमारतींचे बांधकाम अजूनही सूरु असल्याने त्याकडे पालिका प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. ही इमारत कोसळण्याची दुर्घटना घडण्यापूर्वी या इमारतीत ट्युशन क्लास सुरु होते. या ट्युशन क्लासमधील काही विद्यार्थी या दुर्घटनेत दगावले असण्याची शक्यता आहे. बेकायदा अनधिकृत इमारतींना आळा बसण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कारवाई करण्याची आवश्यकता आहे. तसेच या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या वारसांना तसेच जखमींना शासनाने तातडीने आर्थिक सहाय्य करण्याची आवश्यकता आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, या विषयावर सभागृहात चर्चा घडवून आणली तर बरे होईल.

**सभापती** : या विषयावर मी चर्चा मान्य केलेली आहे.

---------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, पाण्यामध्ये रासायनिक पदार्थ मिसळून हे पांढरे विषारी पाणी दुधात मिसळून दूध म्हणून विक्री करण्याचे प्रकार मुंबई शहर, ठाणे व राज्यातील इतर भागात अनेक ठिकाणी सुरु आहेत. विशेषकरुन हे प्रकार मोठ्या प्रमाणात झोपडपट्टीत केले जातात. दर अधिवेशनात दूध भेसळीबाबत प्रश्न किंवा लक्षवेधी सूचना उपस्थित केली जाते. माननीय मंत्री महोदयांकडून दूध भेसळ प्रकरणास आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात येईल असे आश्वासन दिले जाते. परंतु तरीही सर्रासपणे दूध भेसळीचे प्रकार अद्यापही मोठ्या प्रमाणात सुरु आहेत. भेसळयुक्त दूध अत्यंत गंभीर व धोकादायक असून सर्व नागरिक व लहान मुलांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्याने दूध भेसळीला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे. दूध भेसळ करणारे आरोपी पकडले जाण्याचे प्रमाण कमी आहे व जे पकडले गेले त्यांच्या बाबतीत शिक्षा होण्याचे प्रमाण कमी आहे. म्हणून शासनाने या बाबतीत ठोस पावले उचलून अशा प्रकरणात विशेष लक्ष देऊन आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा देण्याच्या बाबतीत नियोजन करावे जेणेकरुन याबाबत भीतीचा संदेश अशा प्रकारचा गुन्हा करणाऱ्यांमध्ये जाईल. या प्रकरणांना आळा बसविण्यासाठी गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी व हा कायदा अधिक कठोर व्हावा यासाठी कायद्यात दुरुस्ती करावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

सभापती महोदय, आपण मला हा महत्वाचा विषय उपस्थित करण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. मी आपल्यामार्फत त्यांना विनंती करणार आहे की, त्यांनी या बाबतीत दोन शब्दात निवेदन करावे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या संदर्भामध्ये अन्न व औषध प्रशासन विभाग आणि दूग्धविकास विभागामार्फत योग्य ती कारवाई केली जाईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मुंबईत लोकल रेल्वे अपघाताचे वाढत असलेले प्रमाण, दरवर्षी 5 हजाराहून अधिक व्यक्ती रेल्वे अपघातात मरण पावणे, रेल्वे अपघात झालेल्या व्यक्तींना तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध न होणे, प्रत्येक रेल्वे स्थानकावर रुग्णवाहिका नसणे, अपघातग्रस्त व्यक्तींना वेळीच वैद्यकीय मदत मिळाल्यास त्यांचे प्राण वाचू शकणे, मुंबई शहर व उपनगरात भयानक वेगाने लोकसंख्या वाढत असणे, त्या तुलनेत लोकल गाड्यांची संख्या कमी असणे, नागरिकांना नाईलाजाने रेल्वेत लोंबकळत प्रवास करावा लागणे, रेल्वेला सर्वात जास्त महसूल मुंबईतून प्राप्त होणे, परंतु प्रवाशांच्या सुरक्षेकडे प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, मुंबईत सुरळीत वाहतुकीसाठी भुयारी रेल्वे उभारण्याची नितांत आवश्यकता, एलिव्हेटेड रेल्वे उभारण्याचा खर्च व कालावधी जास्त असणे, भुयारी रेल्वे केल्यास लोकल रेल्वेचा प्रश्न सुटण्याची शक्यता, तसेच प्रकल्प मार्गी लागल्यास लोकलवरील भार कमी होऊन अपघाताला आळा बसण्याची शक्यता असल्याने भुयारी रेल्वेचा व तत्सम बाबी अंतर्गत असलेला प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवावा असे या औचित्याच्या मुद्याव्दारे मी निदर्शनास आणून देत आहे.

सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. सभागृहामध्ये या संदर्भात एक तासाची चर्चा करणे आवश्यक आहे. हा विषय फक्त केंद्र शासनाचा नाही. यामध्ये आपले लोक मरत आहेत. या विषयावरील चर्चेसाठी आपण वेळ द्यावा अशी मी मागणी करते.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी महत्वाचा औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. मुंबईमध्ये 65 लाख लोक रेल्वेने प्रवास करतात. रेल्वेच्या बाबतीत बाकीचे अधिकार जरी केंद्र शासनाकडे असले तरी प्रवासी आपल्या राज्यातील आहेत. त्यामुळे या गोष्टी गांभीर्याने घेतल्या पाहिजेत. अनेक वेळा असे होते की, रेल्वेचा अधिकारी आपल्या मुख्य सचिवांचे किंवा कोणाचेही ऐकत नाहीत. या बाबतीत काय मोडस ऑपरेंडी राहणार आहे या संदर्भात आपण अर्धा-पाऊण तास चर्चा करावी.

**सभापती** : मी या संदर्भात नोंद घेतलेली आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, यावर आपण चर्चा द्यावी एवढीच माझी विनंती आहे.

----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"मुंबईतील दारिद्र्य रेषेखालील ज्येष्ठ नागरिकांवर पालिका रुग्णालयांमध्ये विनामूल्य शस्त्रक्रिया होणार असून अशा नवीन सुधारणेसह विशेष धोरण महापालिकेच्या विधी समितीच्या बैठकीत मंजूर होणे, त्याचबरोबर करमणुकीसाठी विरंगुळा केंद्र, आरोग्य सेवेकरिता विशेष हेल्पलाईनही आजी-आजोबांच्या सेवेत लवकरच दाखल होणार असणे, मुंबईमध्ये 12 लाख ज्येष्ठ नागरिक असून त्यांचे आरोग्य, सुरक्षा, हक्क असे अनेक प्रश्न दुर्लक्षितच राहात असल्याने ज्येष्ठ नागरिकांची जबाबदारी पालिकेनेच उचलावी अशी मागणी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या शिष्टमंडळाने करणे, त्या मागणीस विविध समितीने मंजुरी देणे, यामध्ये महापौरांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष समिती स्थापन करण्यात येणार असून या समितीच्या माध्यमातून वृद्धांच्या समस्या सोडविण्यात येणार असणे, सदरहू मुंबई महापालिकेने घेतलेल्या निर्णयाच्या स्तरावर संपूर्ण राज्यभरातील महानगरपालिकेत या धोरणाची अंमलबजावणी करावी, अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

----

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्याच्या कुटुंब कल्याण आयुक्तालयामार्फत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानासाठी वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माता व परिचारिका पदांसाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये थेट मुलाखतींद्वारे नुकतीच 3000 पेक्षा जास्त कंत्राटी भरती प्रक्रिया करण्यात येणे, सर्वसाधारणपणे सरकारी उपक्रमांतर्गत कोणत्याही प्रकारची नोकरभरती करताना शैक्षणिकदृष्ट्या मागास जाती, जमातींना आरक्षण दिले जाणे, जिल्हा स्तरावरही कंत्राटी पध्दतीने भरती करताना आरक्षण दिले जात असणे, परंतु कुटुंब कल्याण आयुक्तालयामार्फतच्या राज्य स्तरावरील 3 हजार पेक्षा जास्त पदांची नोकर भरती करताना इतर प्रवर्गांना आरक्षणच न देणे, या भरतीसाठी केवळ 80 टक्क्यांपेक्षा जास्त गुण असणाऱ्या उमेदवारांची निवड होणे, परिणामी शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील उमेदवारांवर आरक्षण नसल्याने शिक्षण घेऊनही बेरोजगार राहण्याची वेळ येणे, शासनाने कंत्राटी नोकर भरतीच्या नावाखाली नोकरीतील आरक्षणच रद्द करण्याची प्रक्रिया सुरु केल्याची भावना मागास प्रवर्गातील लाखो उमेदवारांमध्ये निर्माण होणे, परिणामी त्यांच्यात शासनाविषयी पसरलेला तीव्र असंतोष व चीड, कंत्राटी भरती प्रक्रियेतही शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाला आरक्षण देण्याची आवश्यकता व ही भरती प्रक्रिया रद्द करुन नव्याने आरक्षणाची तरतूद करुन भरती प्रक्रिया राबविण्याची गरज, याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही, याकरिता मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

-------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सन 1999 मध्ये कारगिल येथे लढल्या गेलेल्या युध्दात भारतातील अनेक सुपूत्रांना वीरमरण पत्करावे लागले. त्यामध्ये दिनांक 6.6.1999 रोजी शहीद सुरेश विष्णू सोनवणे, राहणार काकीसांगवी, ता.चांदवड व एकनाथ चैत्रराम खैरनार, रा.देवगड, ता.मालेगांव नाशिक जिल्ह्यातील या दोन पुत्रांना वीर मरण आले होते. दोन्ही कुटुंबाची आर्थिक स्थिती जेमतेम होती. लष्करी सेवेत असताना वीर मरण आल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांचे हाल होऊ नयेत यासाठी शासनाकडून त्यांना जमीन दिली जाते. परंतु या दोघांच्या कुटुंबीयांना जमीन देण्याबाबत शासनाकडून टाळाटाळ करण्यात येत आहे. या शहीद वीर जवानांच्या माता-पित्यांना वाऱ्यावर सोडल्याची त्यांच्या कुटुंबीयांमध्ये भावना निर्माण झाली आहे. तरी शहिदांच्या कुटुंबीयांची उपेक्षा थांबविण्यासाठी नियमानुसार देय असलेली जमीन त्यांच्या माता-पित्यांना देण्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

--------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाकडून जिल्हा परिषदांना सापेक्ष व प्रोत्साहन अनुदान दिले जाते व त्यातून जिल्ह्यातील सर्वसामान्य व ग्रामीण जनतेसाठी विकासाची कामे हाती घेतली जातात. दुर्दैवाने गेल्या 5 वर्षांपासून ठाणे जिल्हा परिषदेचे सापेक्ष व प्रोत्साहन अनुदानाचे सुमारे 40 कोटी रुपये शासनाने थकीत ठेवले आहे. शासनाकडून अपेक्षित असलेला निधी वेळेवर न मिळाल्याने जिल्हा प्रशासनाने अनेक योजनांची घोषणा व अर्थसंकल्पात तरतूद करुनही कामे होत नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 च्या कलम 186 नुसार विकास विषयक कामांची प्रगती लक्षात घेऊन सापेक्ष व प्रोत्साहन अनुदान दिले जाते.

ठाणे जिल्हा परिषद राज्यातील नंबर एकची जिल्हा परिषद असूनही शासनाने देय अनुदान थकीत ठेवले आहे. विनंती आहे की, ठाणे जिल्ह्याचे थकीत सापेक्ष व प्रोत्साहन अनुदान सुमारे 40 कोटी रुपये तातडीने देण्याबाबत कार्यवाही करावी.

----

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्यातील महिला प्रधान व अल्पबचत प्रतिनिधींचे सन 2004 पासून बंद केलेले अनुदान पूर्ववत चालू करणे, राज्यातील जिल्हानिहाय अल्पबचत कार्यालये पूर्ववत सुरु करणे, 15 वर्षांहून अधिक काम केलेल्या अल्पबचत महिला प्रधान प्रतिनिधींना पेन्शन सुरु करणे अशा विविध मागण्यांसाठी शुक्रवार, दि.8 मार्च, 2013 रोजी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अल्पबचत महिला प्रधान प्रतिनिधींनी धरणे आंदोलन करणे, केंद्र व राज्य शासन एकीकडे महिला सबलीकरणाचा नारा देत आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थात महिलांना 50 टक्के आरक्षण देणे, अशा परिस्थितीत राज्यातील जिल्हानिहाय अल्पबचत कार्यालय बंद करण्याचे धोरण अवलंबिणे, त्यामुळे महिला प्रधान प्रतिनिधी व अल्पबचत प्रतिनिधींमध्ये असंतोष निर्माण होणे, यासंबंधी राज्यातील महिला प्रधान व अल्पबचत प्रतिनिधींना न्याय देण्यात यावा अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

-------

यानंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रात बाबूपेठ या विभागामध्ये गणेश एजन्सी प्लॉट, किरमे प्लॉट भागात डिसेंबर, 2012 व मार्च, 2013 या महिन्यामध्ये 7 ते 8 तलवारधारी फिरत होते. त्यामुळे जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले हाते. ज्या दिवशी धुळवड होती त्या दिवशी सुध्दा तलवारधारी गटाने दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विकास नगर, बाबा नगर या क्षेत्रात दहशत निर्माण करण्याचे प्रकार तलवारधाऱ्यांनी केल्यामुळे ताबडतोब बंदोबस्त करण्यासाठी शासनाने आजपर्यंत कोणतीही कारवाई न करणे, शासनाने या संदर्भात करावयाची कार्यवाही याबाबत मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने राज्यात गुटखा बंदी लागू केली आहे. शासनाच्या नगरविकास विभागाने राज्यात एलबीटी लागू केला आहे. त्या संदर्भातील अधिसूचना दिनांक 28 मार्च, 2013 रोजी काढण्यात आली असून त्यात पुणे महानगपालिका क्षेत्रात गुटखा व पान मसाल्यावर एलबीटी लावण्याबाबत नमूद केले आहे. पुण्यामध्ये पान मसाला व गुटखा विक्री करण्यास परवानगी आहे का? कदाचित सभागृह नेत्यांचे गाव तेथे असल्यामुळे तशी परवानगी असावी. गुटखा बंदी लागू करुनही नगरविकास विभागाच्या अधिसूचनेमुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. संपूर्ण राज्याला वेगळा न्याय आणि पुणे जिल्हयाला वेगळा न्याय दिला जात आहे का? राज्यात गुटखा बंदी लागू असताना छुप्या मार्गाने गुटख्याची वाहतूक होत असल्याची बाब मी वेळोवेळी शासनाच्या निदर्शनास आणली आहे. मूळ गुटखा उत्पादक कंपनीवर कारवाई करावी असे मी वारंवार सांगूनही कारवाई केली जात नाही. नगरविकास विभागाच्या या अधिसूचनेमध्ये गुटख्याबाबत उल्लेख केल्यामुळे देखील पळवाट मिळते. जनतेच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी अधिसूचना काढणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करणार आहात आणि सुधारित अधिसूचना लवकर काढण्यात येईल काय? या संदर्भात मी हा औचित्याचा मुद्दा मांडला आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील 250 विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात आहे. प्रवेश नियंत्रण समितीने हे प्रवेश बाद ठरविले आहेत. सदर प्रवेश 7-8 महिन्यानंतर बाद ठरविले गेल्यामुळे विद्यार्थी हवालदिल झाले आहेत. विद्यार्थ्यांनी फी भरली असून डोनेशन देखील भरले आहे. वास्तविक पाहता वेबसाईटवर जाहीर केले होते की, वैद्यकीय महाविद्यालयातील जागा शिल्लक असल्यास सीईटी किंवा असोसिएट कॉलेजच्या मेरिट लिस्टप्रमाणे जागा भरु शकता. तरी देखील हे प्रवेश अमान्य ठरविले आहेत. प्रवेश नियंत्रण समिती आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामध्ये एकवाक्यता नसल्यामुळे एमबीबीएस आणि बीडीएस शाखेसाठी दिलेले प्रवेश रद्द ठरविण्यात आले आहेत. सध्या हे प्रकरण कोर्टात प्रलंबित असले तरी मंत्री महोदयांना विनंती करतो की, या मुद्याबाबत तोडगा काढणे आवश्यक आहे. 250 विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा वैद्यकीय महाविद्यालयात सामावून घेणे गरजेचे आहे असा औचित्याचा मुद्दा मी उपस्थित करु इच्छितो.

----------------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, माननीय सामाजिक कार्यमंत्री श्री.शिवाजीराव मोघे सभागृहात उपस्थित आहेत. लातूर विभागातील लातूर, उस्मानाबाद आणि नांदेड या तीन जिल्हयातील एस.सी., एस.टी., ओ.बी.सी. आणि एन.टी.च्या ज्या आश्रमशाळा आहेत त्या सर्व आश्रमशाळांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांना नवीन सेवार्थ प्रणाली अद्याप कार्यान्वित झालेली नसल्यामुळे चार महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. या प्रकरणात काही तांत्रिक दोष आहेत. शिक्षक कर्मचाऱ्यांचा त्यात काही दोष नाही. शिक्षकांना तातडीने वेतन अदा करण्याबाबत संबंधित मंत्री महोदयांनी आपल्या विभागाला सूचना द्याव्यात अशी आपल्यामार्फत या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करतो.

नंतर 2एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ....

या कर्मचाऱ्यांचे गेल्या चार महिन्यापासून वेतन झालेले नाही. या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदय उपस्थित असून त्यांना यासंदर्भात आपण सांगावे अशी विनंती आहे.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी यांसदर्भात नोंद घ्यावी.

श्री. शिवाजीराव मोधे : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

घाटकोपर ते विक्रोळी येथील हायवेला लागून असलेल्या स्टेशन रोडला लागून मुंबई शहरामध्ये येणाऱ्या विद्युत वाहिन्यांखाली मोठया प्रमाणात अनाधिकृत मोटार गॅरेज, गोडाऊन तसेच विविध व्यवसाय सुरु असल्यामुळे अनेकवेळा वेगवेगळया प्रकारचे अपघात होऊन मोठया प्रमाणात जीवीत व वित्तीय हानी होत असते. या परिसरात दिवसेंदिवस वाढत असलेल्या व्यवसायावर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही. व्यवसायासाठी कोणाचीही परवानगी घेण्यात येत नाही, किंवा त्यांना कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. या अनाधिकृत सुरु असलेल्या व्यवसायामुळे भविष्यात धोका निर्माण होण्याचा संभव आहे, त्यामुळे धोका टाळण्यासाठी सुरु असलेले अनधिकृत व्यवसाय त्वरीत बंद करण्याची कारवाई करावी अशी मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून विनंती आहे.

-------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"मुंबई येथे उन्हाळी अधिवेशन सुरु आहे. मुंबई येथील चार आमदार निवास आणि सहयाद्री अतिथी गृह येथे आमदार व मंत्री महोदयांना सेवा पुरविण्याकरिता सन 1995-96 पासून 508 कर्मचारी अस्थायी म्हणून काम करीत आहेत. याबाबत सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी 15.9.2011 व 3.8.2012 या दिवशी बैठक झाली होती. या बैठकीमध्ये विना विलंब रूपांतरित अस्थायी आस्थापनेवर घेण्याबाबत निर्णय झाला होता व यासंदर्भातील निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी दिले होते. परंतु यासंदर्भातील निर्णय वित्त विभागाकडून होत असल्यामुळे विलंब होत असल्याचे सांगण्यात येते. मनोरा आमदार निवासातील कर्मचारी अनेक वर्षापासून काम करीत आहेत. आपण जगाला न्याय देण्यासाठी येथे बोलत असतो. परंतु आपल्या सेवेमध्ये असणारे कर्मचारी गेल्या पाच वर्षापासून रोजंदारीवर आहेत. त्यामुळे मी या विषयाकडे औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधत आहे.

------------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे: सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

मला आताच माहिती मिळाल्यामुळे मी ऐनवेळी औचित्याचा मुद्दा मांडतो आहे. कोरिया येथे होत असलेल्या नेमबाजीच्या जागतीक स्पधेमध्ये आज राही सरनोबत या महाराष्ट्रातील एकमेव महिला खेळाडूने सुवर्णपदक पटकावले आहे. या आधी एशियन चॅम्पियन,कॉमन वेल्थ गेम तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर तिने 50 सुवर्ण पदके मिळवली आहेत. त्यामुळे राही सरनोबतच्या यशाबद्दल आपण सर्वांनी मनापासून अभिनंदन करण्याची आवश्यकता आहे. या राही सरनोबतला आपण शासकीय नोकरी अजूनपर्यंत दिलेली नाही. त्यांनी एवढा पुरस्कार मिळवला असतांना सुध्दा आपण त्यांना शासकीय नोकरी देऊ शकलो नाही. या महिला खेळाडूने संपादन केलेल्या यशामुळे तिला पुरस्कार व शासकीय सेवेत घेतले जाई याबाबत माननीय मंत्री महोदयांनी घोषणा करावी अशी विनंती आहे.

श्री. पद्‌माकर वळवी : सभापती महोदय, यासंदर्भात नोंद घेण्यात आली आहे. राही सरनोबत यांना शासकीय सेवेत घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे आलेला असून त्यासंदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

-------------

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

काल बुधवार दिनांक 4 एप्रिल, 2013 रोजी महाराष्ट्राच्या छत्तीसगड सीमेवर गडचिरोली जिल्हयाच्या जंगलामध्ये संघर्ष सप्ताहाच्या निमित्ताने 100 सशस्त्र नक्षलवाद्यांच्या गुप्त बैठकीच्या वेळी झालेल्या चकमकीत 7 नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात नक्षलविरोधी पथकाला यश मिळाले आहे. या पार्श्वभूमीवर पुणे शहरात नक्षलवाद्यांनी लावलेल्या पोस्टर बाबत मी औचित्याचा मुद्दा दिलेला आहे.

यानंतर श्री. मंगेश.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ....

भारतीय कम्युनिस्ट पार्टी (माओवादी) नक्षलवादी कारवायांसाठी कुप्रसिध्द असलेल्या व बंदी घालण्यात आलेल्या संघटनेने शहीद दिना निमित्त संपूर्ण पुणे शहरात विविध ठिकाणी पोस्टर लावले आहेत. पत्रकार भवन येथील सीसीटीव्ही चित्रिकरणामध्ये रात्री 11.00 वाजता मोटार सायकलवर येऊन तीन जणांनी पत्रके लावली असल्याचे स्पष्ट झाले आहे. या घटनेवरून पुणे शहरात पुन्हा नक्षलवाद्यांचे स्लीपर सेल कार्यरत झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पुणे शहरातील महत्त्वाच्या व गजबजलेल्या ठिकाणी या बंदी घातलेल्या नक्षलवादी संघटनेने पत्रके लावली आहेत. या शहीद दिनाच्या निमित्ताने संघर्ष सप्ताह पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सर्व क्रांतिकारकांना राजनैतिक बंदी असा दर्जा देण्यात यावा, बंद्यांना भेटताना गुप्तपणे भेटण्याचे अधिकार देण्यात यावे, क्रांतिकारकांना दिल्या जाणाऱ्या साहित्यावरील प्रतिबंध हटवावेत अशा प्रकारच्या मागण्या या पत्रकातून करण्यात आल्या आहेत. मागील वर्षी देखील अशाच प्रकारे नक्षलवाद्यांनी पोस्टरबाजी केली होती. सदर घटनेच्या पूर्वी देखील राज्याच्या एटीएसने पुणे व ठाणे येथून काही नक्षललवाद्यांना अटक केली होती. पुणे पोलिसांकडे नक्षलवाद विरोधी स्वतंत्र सेल असूनही शहरात पुन्हा नक्षलवादी सक्रीय झाल्याचे दिसून येत आहे. कला मंच इत्यादी माध्यमातून तरूणांना नक्षल चळवळीकडे आकर्षित करीत आहेत.

पुणे शहर हे विद्येचे माहेरघर असून त्या ठिकाणी अनेक विद्यापीठे आहेत. तेथे देशातील अनेक राज्यातून विद्यार्थी येत असतात. अशा गंभीर धटनेमुळे अतिरेक्यांच्या हिट लिस्ट वरील पुण्यामध्ये नक्षलवादी कारवाया वाढल्या तर पुणे शहरात कायदा व सुव्यवस्थेचा धोका निर्माण होणार आहे. त्यामुळे या संदर्भात त्वरित दखल घेऊन 3 सीसीटीव्हींमध्ये ज्या नक्षलवाद्यांची छायाचित्रे आली आहेत, त्यांना अटक करावी आणि त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. शासनाने या संदर्भात गांभीर्याने व तत्काळ कार्यवाही करून या समस्येवर उपाययोजना करावी, अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याच्या सूचनेद्वारे शासनास करीत आहे.

----

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यात सन 2013-2014 या शैक्षणिक वर्षासाठी दहावीचा अभ्यास बदलण्याचा निर्णय शासनामार्फत घेण्यात येणे, मात्र शिक्षण मंडळाकडून बदल करावयाच्या पुस्तकांचा मसुदा अद्याप तयार करून छपाईसाठी माहे 2013 अखेर पुरविण्यात न येणे, परिणामी, सुट्टीतील सत्रात विद्यार्थ्यांना पुस्तकाशिवाय शिकण्याची आलेली वेळ, याबाबत दहावीची पुस्तके तातडीने विद्यार्थ्यांना मिळणे बाबत, सदर मसुद्यास मान्यता देण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, मी या औचित्याच्या मुद्याद्वारे सदर पुस्तके तातडीने छापण्यात यावीत, असे निदर्शनास आणून देत आहे. या संदर्भात तातडीने कार्यवाही करावी.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**नियम 93 अन्वये सूचना**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "मुंबईच्या समुद्रात भराव टाकून विस्तार करण्याच्या संकल्पनेस महाराष्ट्रासह गोव्यातील प्रमुख मच्छिमार संघटनांनी दर्शविलेला विरोध" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "कामोठे मानसरोवर व खांदेश्वर प्रभागात कार्यरत शैक्षणिक संस्थांना अद्यापही भूखंडांचे वाटप न झ ााल्याने भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यास निर्माण होत असलेल्या अडचणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. किशनचंद तनवाणी यांनी "औरंगाबाद जिल्ह्यात काही शाळांमध्ये शिक्षक मिळत नसल्याने अतिरिक्त शिक्षकांचा आकडा वाढत असून अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनानंतर पदोन्नती धोरणाला शिक्षकांनी विरोध दर्शविल्याने शाळा बंद पडत असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "अरबी समुद्रातून मुंबई बंदराकडे येणारे एमएसव्ही युसूफी हे संशयास्पद व्यापारी जहाज तटरक्षक दलाच्या जवानांनी दिनांक 4 एप्रिल, 2013 रोजी मध्यरात्रीच्या सुमारास पकडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी "मुंबई शहरातील वांद्रे (पूर्व) येथील सरकारी वसाहतीच्या पुर्नविकासासंबंधी बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ....

असताना, अद्यापपर्यंत कोणताच निर्णय न घेता दुरूस्तीचे काम सुरू करणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे, ॲड. आशिष शेलार, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री. चंद्रकांत पाटील यांनी "आयडीएल एज्युकेशन सोसायटी, उमरेड, जिल्हा नागपूर संचालित नूतन आदर्श कला, वाणिज्य आणि श्रीमती मणिबेल हरिलाल बेगड विज्ञान महाविद्यालयात अनेक गैरप्रकार व भ्रष्टाचार सुरू असल्याचे एप्रिल, 2013 च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----

( नंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आपल्याला 2.00 वाजता अल्पकालीन चर्चा सुरू करावयाची आहे. तो पर्यंत आपण मध्यंतरासाठी सुट्टी घ्यायची काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण चर्चेला सुरूवात का करीत नाही ?

**उप सभापती** : मी चर्चेला सुरूवात करणार नाही असे म्हटलेले नाही. सदर कामकाज एवढ्या लवकर पूर्ण होईल असे वाटले नव्हते. आज दुपारी 2.00 वाजता चर्चेला सुरूवात करायची आहे असे ठरले आहे. या चर्चेसाठी आता संबंधित विभागाचे माननीय मंत्री देखील सभागृहात उपस्थित नाही. त्यामुळे मला असे वाटते की, आपण दुपारी 2.00 वाजे पर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित केलेले बरे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या चर्चेसाठी सभागृहात माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री घटनास्थळी गेलेले आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, काल रात्री दुर्घटना घडली आहे. सभागृहात विषय काढल्यानतर घटनास्थळी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री आता जातात. या घटनेमध्ये 50 लोक मृत्युमुखी पडले आहेत असे सन्माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी देखील सांगितले आहे. त्यांनी कालच घटनास्थळी जायला नको होते काय ? सभापती महोदय, आपण स्वत: काल घटनास्थळी गेला आहात. असा जबाबदार लोकप्रतिनिधी पाहिजे. आपण जसे काल जाऊन आलात तसे माननीय मुख्यमंत्री कालच का जाऊन आले नाहीत ? हा विषय महत्त्वाचा असल्यामुळे आम्ही आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवले. सरकारने एवढे असंवेदनशील असू नये.

**उप सभापती** : मी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, सदर दुर्घटना ही अत्यंत दुर्दैवी आहे. घटनास्थळी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री गेलेले आहेत. आताच का गेले, काल का गेले नाही हा मुद्दा गैरलागू आहे. काल घटनास्थळी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ....

मदतकार्य जोरात सुरू होते. त्यामुळे चारही बाजूचे रस्ते पॅक झाले होते. पोलिसांनी तेथे कोणीही येऊ नये असे सांगितले आहे. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी सभागृहामध्ये शांतता राखावी. या घटनेबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांना देखील काळजी आहे. त्यांनी स्वत: या घटनेची चौकशी केलेली आहे. सदर घटनेबाबत राज्य शासन उदासीन नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला यात राजकारण करावयाचे नाही. मी राजकीय दृष्ट्या देखील बोलत नाही. माननीय मुख्यमंत्री आता घटनास्थळी गेले आहेत त्याचे आम्हाला कौतुक आहे. सदर घटना ही काल घडली आहे. आपण काल घटनास्थळी जाऊन आला आहात. काल आपली गाडी तेथे पोहोचली होती. जर खरेच अडचण असेल तर सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित करावी.

**उप सभापती** : आपणा सर्वांच्या अनुमतीने सभागृहाची बैठक मी दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.58 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी - माननीय उप सभापती**

**उप सभापती** : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजता 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

-----

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ ST/ पूर्वी श्रीमती रणदिवे.. 14:10

**(स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: मुंब्रा येथील शिळफाटा भागातील लकी कंपाऊन्ड मधील सात मजली इमारत कोसळून 27 जण ठार तर शंभर पेक्षा अधिकजण जखमी होणे

**मु.शी.**: मुंब्रा येथील शिळफाटा भागातील लकी कंपाऊन्ड मधील सात मजली इमारत कोसळून 27 जण ठार तर शंभर पेक्षा अधिकजण जखमी होणे या विषयावर सर्वश्री.विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर,रामदास कदम, चंद्रकांत पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.आशिष शेलार, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, ॲड.अनिल परब, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उप सभापती** : या अल्कालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी तीन तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण या चर्चेसाठी तीन तास वेळ दिलेला आहे. ही गंभीर घटना आहे.

**उप सभापती** : आपण चर्चेस सुरुवात करु या. आवश्यकता वाटल्यास वेळ वाढविण्यात येईल.

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

ज्याअर्थी, ठाणे, मुंब्रा येथील शिळफाटा परिसरातील सात मजली इमारत कोसळून 27 जण ठार व 100 पेक्षा अधिक नागरिक जखमी होणे, आणि

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

ज्याअर्थी, सदरहू इमारतीचे बांधकाम अनधिकृतपणे चालू असून त्याकडे स्थानिक प्रशासनाने दुर्लक्ष करणे, आणि,

ज्याअर्थी, सदर इमारतीचे बांधकाम करताना अस्तित्वातील नाला बुजवून बांधकाम करण्यात येणे, आणि,

ज्याअर्थी, सदर इमारतीचा बिल्डर फरार असणे, आणि,

ज्याअर्थी, या दुर्घटनेत मृत आणि जखमी झालेल्या व्यक्तींना तत्काळ मदत देणे, सदर अनधिकृत इमारतीच्या बांधकामास जबाबदार विकासक व स्थानिक प्रशासनातील अधिकारी यांच्यावर कारवाई करणे,

सभापती महोदय, या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयावर चर्चा करण्यासाठी सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेवून अतिशय जिव्हाळ्यांच्या व ज्वलंत विषयावर नियम 289 अन्वये चर्चा करण्यात यावी अशी मी विनंती केली होती. परंतु आपण नियम 97 अन्वये चर्चा करण्यास परवानगी दिली.

सभापती महोदय, काल सभागृहाची बैठक संपल्यानंतर आपण सर्वजण आपापल्या घरी, कार्यालयात गेल्यानंतर चॅनेल्सवर मुंब्रा (ठाणे) येथील शिळफाटा महापे रस्त्यावरील लकी कंपाऊंड मधील इमारत कोसळल्याची बातमी पाहिली. खरे म्हणजे लकी कंपाऊडमधील इमारत ही बिल्डर्स, शासकीय अधिकारी आणि काही राजकीय नेत्यांच्या संगनमतामुळे त्या इमारतीमधील सामान्य माणसांच्या आयुष्यासाठी अनलकी ठरली आहे.

सभापती महोदय, लकी कंपाऊन्डमधील ही इमारत सहा महिन्यात उभी राहिली होती. हा एक गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड आहे. ठाणे जिल्ह्यातील अधिकाऱ्यांचे व बिल्डरचे नाव गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये आले पाहिजे. कारण इमारतीची सी.सी. व इतर परवानगी सहा सहा महिने मिळत नाही. असे असताना ही इमारत सहा महिन्यात उभी राहिली. काहीजण सांगत आहेत की, 54 दिवसांमध्ये उभी राहिली. म्हणजे गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जाण्या इतके कर्तृत्व महाराष्ट्रामध्ये आहे आणि आपण त्याची दखल घेत नाही असे म्हणावे लागेल.

..3..



AJIT/ D/ ST/ पूर्वी श्रीमती रणदिवे.. 14:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, त्या इमारतीमध्ये 28 कुटुंबे राहत होती. ्श्री.जमील कुरेशी आणि श्री.नफीस कुरेशी हे बिल्डर्स कालपासून फरार आहेत. ते आपल्या कोण आमदारांच्या घरी लपले तर नाहीत ना हे पहावे ?

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 14:15

श्री.विनोद तावडे.....

तेथील स्थानिक कार्यकर्त्यांनी दि.14 मार्च, 2013 रोजी या अनधिकृत बांधकामा विषयी स्थानिक आयुक्तांना....

श्री.राजेंद्र दर्डा : महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी, ....ती मंडळी आपल्यापैकी कोणत्या आमदारांकडे तर लपली नाही ना," असे वक्तव्य केले आहे. माझी विनंती आहे की, हे वाक्य कामकाजातून काढून टाकावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ती मंडळी आमदारांकडे नाही असे पोलीस तपासात निष्पन्न झाले तर आमदारांचा त्यामध्ये सहभाग नाही हे तुम्हाला सिध्द करता येईल. दि.14 मार्च, 2013 रोजी स्थानिक राजकीय नेतृत्वाने या अनधिकृत बांधकामाविषयी तक्रार केली होती. या अनधिकृत इमारतीचे बांधकाम सुरु झाल्यानंतर मंगल पाटील या व्यक्तीने ठाणे महापालिकेतील तीन-चार अधिकाऱ्यांना दररोज एसएमएस पाठवून या बाबत निदर्शनास आणून दिले होते. या घटनेचे बळी कोणाचे आई-वडील, भाऊ-बहीण, मुलगा-मुलगी ठरले आहेत. आजही त्या ढिगाऱ्याखालून आक्रोश ऐकू येत आहे. काही जण ढिगाऱ्याखालून बाहेर फोन लावून वाचविण्यासाठी मदत मागत आहेत. परंतु आपण त्यांना वाचवू शकत नाही अशी अवस्था आहे.

महोदय, जी माणसे या घटनेत सापडली त्यांचा दोष काय होता ? ती माणसे गरीब होती, आसपासच्या झोपडपट्टीत राहणारे मजूर होते. त्यांना हे माहीत होते की, आपल्याला राहण्यासाठी घर मिळणार नाही. त्यामुळे तुम्ही दोन महिने या इमारतीत राहा असे त्या गरीब मजुरांना सांगण्यात आले. महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी ही इमारत पाडण्यास आले तर त्या ठिकाणी लोक राहतात, मुले-बाळे राहतात असे चित्र दाखविण्यासाठीच हा सर्व प्रकार केला. या गरीब मजुरांना पैसे देऊन त्यांच्या गरिबीचा फायदा घेणारे बिल्डर, महापालिकेचे अधिकारी किंवा तेथील राजकीय नेतृत्व या सर्वांनी मिळून या लोकांची हत्या केली आहे, असे मला म्हणावयाचे आहे. ही अनधिकृत इमारत उभी राहत असताना महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाचे उपायुक्त श्री.चव्हाण, डायघर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.नाईक यांनी अनधिकृत बांधकाम प्रकरणी संबंधितांना नोटीस देण्याव्यतिरिक्त काहीच कारवाई केली नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

त्यांनी या बांधकामाची कोणतीही गुणवत्ता तपासली नाही. वास्तविक पाहता या इमारतीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होते. इमारत बांधकामात निकृष्ट साहित्याचा वापर केला होता. या बाबतीत त्यांना सर्व काही सांगूनही त्यांनी या विषयात लक्ष घातले नाही.

महोदय, आज अनधिकृत बांधकामाचा मुद्दा गाजत आहे. या बांधकामाकडे लक्ष देण्याची जबाबदारी स्थानिक आयुक्त, उपायुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांवर असावयास पाहिजे. हिवाळी अधिवेशनात या भागातील अनधिकृत बांधकामाबाबत विधानसभा सभागृहात चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले होते. त्यावेळी आमदारांवर वेगवेगळे हेत्वारोप झाले. त्या वेळी मी स्थानिक महानगरपालिका हद्दीत सुरु असलेल्या आरसीसी बांधकामाबाबत माहितीच्या अधिकारात माहिती मागविली. ती माहिती मला मिळाली. त्यामध्ये.....

श्री.दिवाकर रावते : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. एका अत्यंत महत्त्वाच्या विषयावर या सभागृहात भावना व्यक्त केल्या जात आहेत. आजचे दिवसाचे सर्व कामकाज थांबवून ही चर्चा सुरु करण्यात आलेली आहे. माननीय मुख्यमंत्री घटना स्थळी गेल्याचे मला मान्य आहे. सभागृहाचे नेते माननीय श्री.अजित पवार यांनी सांगितले की, सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

माननीय मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री हे सर्व येथे नसताना शासनाला उत्तर द्यावयाचे आहे पण त्या खात्याचा एकही अधिकारी गॅलरीत उपस्थित नाही. अधिकाऱ्यांची एवढी मोठी फौज आहे. कक्ष अधिकारी, उप सचिव, अमुक, तमुक सर्व अधिकारी असतात. या सभागृहाचा एवढा अवमान होत असेल तर ही चर्चा थांबवावी. हे सरकार आहे का ? हे काय चालले आहे ? एवढी अप्रतिष्ठा करुन या ठिकाणी बसण्यापेक्षा आम्हाला न बसणे परवडेल. अधिकाऱ्यांना निरोप गेले पाहिजेत की, या ठिकाणी जी चर्चा चालू आहे त्याची नोंद घ्यावी. माननीय मंत्री महोदय कसली नोंद घेतात ते मला माहीत आहे. मी मंत्र्यांना दोष देत नाही. ही काय पध्दत आहे ? एवढे अवमानीत होऊन आम्हाला सभागृहात बसता येणार नाही. आपण सभागृहाची बैठक ताबडतोब तहकूब करावी. माननीय मुख्यमंत्र्यांची चातकासारखी वाट बघत बसण्याचा काय प्रश्न आहे ? मी माननीय मंत्री महोदयांची गैरसोय समजू शकतो परंतु हे डिपार्टमेंट एवढे मस्तवाल झाले आहे का ? उद्यापासून अधिकारी गॅलरीमध्ये एकही अधिकारी उपस्थित असता कामा नये. एवढ्या अवमानाच्या परिस्थितीमध्ये आम्ही काम करु शकत नाही. ज्यांना काम करावयाचे असेल त्यांनी करावे. माननीय मुख्यमंत्र्यांशी संबंधित खात्याचे पाच पाच सचिव आहेत. आम्ही हौस भागविण्यासाठी चर्चा करीत नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या गंभीर विषयावर चर्चा चालू असताना आपणा सर्वांना माहीत होते की, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री त्या ठिकाणी गेलेले आहेत. ही गोष्ट जरी मान्य केली तरी ज्यावेळी सर्व सन्माननीय सदस्य आपले विचार या ठिकाणी मांडतात तेव्हा त्याचे व्यवस्थित टिपण होण्याची अत्यंत आवश्यकता आहे आणि तेवढ्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी या वेळी उपस्थित असणे हेही तितकेच आवश्यक आहे. विरोधी पक्षातील सदस्यांचे आणि सत्ताधारी पक्षातील सदस्यांचे जे मुद्दे आहेत त्यातील महत्वाच्या मुद्यांना स्पर्श करुन माननीय मंत्र्यांसमोर ते सर्व मुद्दे ठेवल्यावर त्याचे समर्पक उत्तर येणार आहे. असे उत्तर या चर्चेतून अपेक्षित असताना जर असा निष्काळजीपणा दाखविला गेला तर ते सभागृहाच्या दृष्टीने योग्य होणार नाही. त्यामुळे असे संबंधित अधिकारी निश्चितपणे उपस्थित राहिले पाहिजेत या दृष्टीने आपण निदेश द्यावेत अशी मी विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या ठिकाणी अत्यंत महत्वाची चर्चा सुरु आहे आणि अधिकाऱ्यांनी सुध्दा येथे उपस्थित असले पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्यांचा जो मुद्दा आहे तो एकदम बरोबर आहे. आम्ही निरोप पाठविलेला आहे. तोपर्यंत मी स्वत: टिपण घेत आहे. कृपया आपण सभागृहाचे कामकाज चालू ठेवावे. उत्तर देण्याची जबाबदारी मंत्र्यांवरच येणार आहे.

**उप सभापती** : नगरविकास खात्याचे सर्व संबंधित अधिकारी या ठिकाणी येईपर्यंत, दुपारी 2.45 पर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात येत आहे. गृह खात्याचे अधिकारी सुध्दा त्या वेळी उपस्थित असले पहिजेत.

( सभागृहाची बैठक दु. 2.23 ते 2.45 पर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, खालच्या स्तरावर जे जे हप्ते गोळा करतात त्या सर्व विभागांकडून सभागृहात आम्हाला उत्तर मिळाले पाहिजे. या लकी कम्पाऊंडचा प्लॉट 4 हजार चौ.फुटाचा आहे. त्यावर 40 हजार चौ.फूट बांधकाम करण्यात आले आहे. म्हणजे 10 एफएसआय वापरलेला आहे. मुंब्रा म्हणजे सिंगापूर आहे काय ? या इमारतीच्या प्रत्येक चौरस फुटाच्या बांधकामासाठी 4.5 किलो स्टील वापरणे आवश्यक असताना फक्त 2 किलो स्टील वापरण्यात आल्याची माहिती बाहेर आलेली आहे. या घटनेसाठी बिल्डरवर, डेव्हलपरवर गुन्हे दाखल केलेले आहेत. परंतु त्या इमारतीचा आर्किटेक्ट कोण होता, आर.सी.सी.कन्सलटण्ट कोण होता, कंत्राटदार कोण होता, संबंधित अधिकारी कोण होते, पोलीस स्टेशनचे अधिकारी कोण होते ?

कालपासून सरकारच्या विविध खात्यातील अधिकाऱ्यांचे हे बांधकाम आमच्या खात्याच्या जमिनीवर केले नव्हते हे सांगण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत. कालपासून वेगवेगळी वक्तव्ये सुरु झाली आहेत. वन विभागाच्या जमिनीवर बांधकाम केले होते, शासकीय जमिनीवर बांधकाम केले होते महानगरपालिकेच्या जमिनीवर ते नव्हते असे काहींचे म्हणणे आहे. . महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, वन विभागाच्या जमिनीवर हे बांधकाम केले होते. त्यामुळे आमचे हे काम नाही. त्यामुळे मी 7/12 चा उतारा काढला आहे. भोगवटादार रवींद्र धाकल्या वातास वर्ग 98/1 यांच्या नावावर असलेल्या प्लॉटवर हे बांधकाम झालेले होते. त्याच्या बाजूची इमारत रिकामी केली आहे तो प्लॉट अब्दुल सलिम अझिझ सिध्दीकी आणि जमील अहमद जमालुद्दीन शेख 98/1(अ) यांच्या नावावर आहे. बाजूला 71(1) मध्ये फॉरेस्ट आहे. वन जमिनीच्या कोपऱ्यावर हे बांधकाम होते. परंतु कालपासून एकमेकावर ढकलण्याचा प्रयत्न चालला आहे की ते बांधकाम तिकडे आहे.

मी इकडे येण्यापूर्वी वन खात्याच्या सचिवांकडून माहिती घेतली असता ते म्हणाले की, आमच्या खात्याचा अधिकारी तेथे जाऊन आला आहे. त्यांनी पाहिल्यानंतर मुख्यमंत्री कार्यालयाला लिहून दिले आहे की, ते बांधकाम वन विभागाच्या जमिनीवर झालेले नाही. काल पासून टी.व्ही.वर





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

अधिकारी सांगत आहेत की, हे बांधकाम आमच्या खात्याच्या जमिनीवर केलेले नाही, वन विभागाच्या जमिनीवर आहे. वन विभागाला आम्ही फक्त कळवू शकतो, आम्ही कारवाई करु शकत नाही. या घटनेबाबत अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल का झाला नाही ? अधिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न होत असल्यामुळे त्यांची हिंमत वाढते.

यानंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.........

ठाणे महापालिकेने माहितीच्या अधिकाराखाली मला जी माहिती दिली त्यानुसार ठाणे महापालिकेच्या हद्दीत सुरु असलेल्या अनधिकृत आरसीसी बांधकामाची संख्या शिवसेनेचे माननीय विधानसभा सदस्य श्री.राजन विचारे यांच्या मतदारसंघात 4, माननीय विधानसभा सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांच्या मतदारसंघात 10, माननीय विधानसभा सदस्य श्री.एकनाथ शिंदे यांच्या मतदारसंघात 16 आणि माननीय विधानसभा सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांच्या मतदारसंघात 218 असल्याची माहिती ठाणे महापालिकेच्या उपआयुक्तांनी दिली आहे. मी हा आरोप करीत नाही, परंतु सभागृहाला माहिती देत आहे. याच विधानसभा क्षेत्राच्या बाजूला 184 आरसीसी बांधकामाच्या अनधिकृत इमारती आहेत.

सभापती महोदय, हे ठाणे शहरात घडत आहे. आपण त्याच भागात राहणारे आहात. उल्हासनगर येथे प्रती चौरस फूट 20 रुपये मोजा तरच तुम्ही बांधकाम करु शकता. त्या भागात कोणी कलानी होता, मी नाव घेऊ इच्छित नाही. तेथे काही हजार इमारती अनधिकृतपणे उभ्या राहिल्या आहेत. या बांधकामांना राजकीय संरक्षण होते की नाही? भिवंडीला कोणीतरी सूर्यराव होते. त्यांनी असेच काम केले. हे दोघेही 1990, 1992, 1995 पासून कोणाबरोबर होते हे तुम्हाला माहिती आहे. या ठिकाणी अनधिकृत बांधकामाचा रेट लावलेला आहे. इमारत कोसळली तेथील नागरिक सांगतात की, जर दोन रुमचे काम करावयाचे असेल तर पोलिसांना 50 हजार रुपये, महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडे 1 लाख रुपये दिले की काम होऊन जाते. जे स्पष्टपणे डोळयासमोर दिसते की, एक स्लॅब चार दिवसात पूर्ण होतो. नियमानुसार एक स्लॅब 26 दिवसानंतर पूर्ण होतो. परंतु तसे न होता धडाधड स्लॅब टाकण्यात आले. याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना कळविली जाते तरी सुध्दा कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही.

सभापती महोदय, ज्या परिसरात एक, दोन नव्हे तर 218 अनधिकृत इमारती उभ्या राहतात, त्या इमारतींना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध होतात. या सुविधा कशा मिळतात, कोणाच्या आशीर्वादाने मिळतात, यांच्या पाठीशी कोण उभे राहतात? कॉन्ट्रॅक्टर, अधिकारी की कोणी राजकीय नेतृत्व असेल ते आपण शोधून काढले पाहिजे.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे........

सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, काल जी इमारत पडली त्याला जबाबदार असणारा आरोपी सिद्दिकी याचे मागील दोन-तीन महिन्यातील मोबाईलवरचे आऊट गोईंग कॉल चेक करावेत, त्याला कोणत्या राजकीय नेत्यांचे किंवा अधिकाऱ्यांचे फोन कॉल आले असतील तर ते चेक करावेत. जे काही सत्य असेल ते बाहेर येऊ द्या. गैरकृत्य करणाऱ्यांना सर्व प्रकारचा छुपा पाठिंबा दिला जातो, हा माझा जाहीर आरोप आहे. बअ

सभापती महोदय, मुंब्रा, कौसा आणि शिळफाटा या भागात अनधिकृत इमारती उभ्या आहेत. त्या परिसरातील अनधिकृत आणि निकृष्ट दर्जाच्या इमारतींमध्ये जवळजवळ 15 हजार नागरिक रहात आहेत. या नागरिकांचा जीव टांगणीला लागलेला आहे.

नंतर 2ओ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ......

अनाधिकृत वापर होत असलेल्या मिळकतींवर तसेच सदरच्या मिळकतीवर अस्तित्वात असलेल्या इमारतींची तपासणी करण्यासाठी पथक असते. परंतु या पथकाच्या माध्यमातून तपासणी होत नाही ही वस्तुस्थिती आहे. एखाद्या रिकाम्या जमिनीवर टपरी जरी आली तरी तलाठयाने त्यासंदर्भात रिपोर्ट केला पाहिजे असा नियम आहे. खरे म्हणजे ही सरकारची जबाबदारी आहे. परंतु ही जबाबदारी शासनाकडून पार पाडली जात नाही. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका व महसूल विभागाने विविध पथके स्थापन करुन अवैध व अनाधिकृत इमारतींची धडक शोध मोहीम राबवून अशा अनाधिकृत इमारती जमीनदोस्त करण्याची कारवाई करावी अशी सामान्य माणसांची अपेक्षा असते. अनाधिकृत बीनशेती तपासणी पथक सद्या निद्रावस्थेत असून त्याला उर्जित अवस्थेत आणण्याची आवश्यकता आहे. ठाण्यामध्ये अनाधिकृत बांधकामाची एक कार्य पध्दती आहे. गेल्या काही वर्षामध्ये अधिकाऱ्यांनी कागदावर सुरक्षित राहून अनाधिकृत बांधकाम कसे उभे करायची याची एक फंटास्टीक पध्दत सुरु केली आहे. कालच्या घटनेमध्ये अधिकारी स्वत:ची कातडी बचाऊ शकतील अशा प्रकारचा कागदोपत्री पुरावा ते सादर करतीलही. अनाधिकृत बांधकामाची तक्रार करण्यात आली की, महापालिकेतर्फे रीतसर नोटीस देण्यात येते. या नोटिशीच्या संदर्भात विकासकाला उत्तर देण्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिला जातो. विकासकाने उत्तर दिले की, या उत्तराची खातरजमा करण्यासाठी सहाय्यक आयुक्त, महानगरपालिका हे सदर उत्तराची प्रत शहर विकास विभागाकडे पाठवितात. या प्रक्रियेमध्ये 3-4 महिन्यांचा कालावधी निघून जातो. खरे म्हणजे यामध्ये जाणीवपूर्वक वेळ वाया घालवला जातो व 4 महिन्यामध्ये ही इमारत उभी केली जाते. इमारत उभी करीत असतांना गुणवत्तेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. इमारत उभी राहिल्यानंतर ज्या दिवशी इमारतीत लोक राहण्यासाठी जातात त्याच्या दुसऱ्या दिवशी अनाधिकृतचे पथक तेथे पोहचते. अनाधिकृतचे पथक आल्यानंतर रहिवासी खाली येतात, ठरलेले लोक गाडया घेऊन येतात, लोक सांगतात परीक्षेचे दिवसत आहेत आम्ही कोठे जायचे, पावसाळा आहे आम्ही कोठे जायचे ? आपल्यालाही फोन लावले जातात व हे पथक परत हात हलवत जाते. आम्ही गेलो होतो परंतु असे असे झाले त्यामुळे पथक परत आले याची सर्व माहिती ते रेकॉर्ड करुन ठेवतात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ......

दुसऱ्या वेळेस पोलीस संरक्षण मिळत नाही म्हणून अनाधिकृत बांधकामाचे पथक पुन्हा हात हलवत परत येते. एकदा रहिवासी, एकदा पोलीस, मग स्थानिक नेता, एकदा त्या पार्टीचा, एकदा या पार्टीचा नेता असे करत करत 5-6 वेळेस पथक जाऊन येते. मग हे प्रकरण कोर्टात जाते. प्रकरण कोर्टात गेले की, वर्षा मागून वर्षे जातात. नंतर त्यांनाही माणुसकीच्या दृष्टिकोनातून संरक्षण द्यावे लागते. अशी या अनाधिकृत बांधकामाची शिस्तबध्द कार्यपध्दती आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे अशा इमारतीमधील नागरिक दोन्ही बाजूने फसवला जातो. नागरिकांना परवडण्याजोगी घरे शासन देत नाही. नागरिकांना परवडतील अशी घरे दिली जातील अशा घोषणा माननीय विलासराव देशमुख असतांना पासून आपण ऐकत आहोत. म्हाडांची घरे सुध्दा आता सामान्य लोकांना परवडू शकत नाहीत अशी परिस्थिती आहे. हे मायबाप सरकार सामान्य माणसाला निवारा देऊ शकत नाही . अर्थसंकल्पाच्या वेळेस आम्ही बोललो होतो की, 35 टक्के शेती सिंचित आहे, बाकी सर्व जमीन कोरडवाहू असून 47 टक्के नागरीकरण होत असून या नागरीकरणाची पहिली समस्या अनाधिकृत बांधकामाची आहे. परंतु आम्ही जे बोललो होतो त्यावर एक चकार शब्द शासनाकडून आला नाही, उलट बहिणाबाईची कविता वाचत बसले. अशा पध्दतीने राजकीय टोलेबाजी करायची असते काय ? 47 टक्के नागरीकरणाची मोठी समस्या आपल्या राज्यात असतांना शासन लक्ष घालणार नसेल तर ते योग्य नाही. सामान्य माणसांना परवडण्याजोगे घर शासन देऊ शकत नाही त्यामुळे हा सामान्य माणूस अनाधिकृत घरांच्या जाळयामध्ये अडकतो. स्वस्तात घर मिळण्यासाठी हे बांधकाम अनाधिकृत आहे हे माहिती असतांना सुध्दा तो माझ्या खिशाला एवढेच परवडते म्हणून तो त्या घरात आपला जीव धोक्यात घालून राहतो. घर खरेदी करीत असतांना तो हे घर काही स्वस्तात घेत नाही. त्याने आयुष्यभर जे काही कमावलेले असते ती कमाई त्या घरात घालतो व घर घेतो. शासकीय अधिकारी असतील, अनाधिकृतपणे बांधकाम करणारे विकासक असतील,

यानंतर श्री. मंगेश.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

त्यांना संरक्षण देणारे राजकीय पुढारी असतील. त्यांची एक टोळी झाली आहे. या टोळीच्या कट कारस्थानाला घराची नितांत गरज असणारा सर्वसामान्य माणून बळी पडतो. अनधिकृत बांधकामांना महानगरपालिका, महावितरण यांच्याकडून परवानग्या कशा मिळतात, याचे मला आश्चर्य वाटते. अधिकृत घरात राहणाऱ्या जेन्युईन माणसाला मात्र 10-20 वेळा जाऊन देखील परवानग्या मिळत नाहीत. अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना बांधकाम करण्यासाठी 2 महिन्यांच्या कालावधीत सर्व परवानग्या कशा मिळतात, हेच समजत नाही.

अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांच्या षडयंत्रामध्ये इतर सुविधा देणारे विभाग म्हणजे पाणी पुरवठा विभाग, विद्युत पुरवठा विभाग हे देखील सहभागी आहेत. अनधिकृत बांधकामांना सुविधा, परवानग्या कशा मिळतात त्याची आणि त्या देणाऱ्या सर्वांची चौकशी झाली पाहिजे. अशा अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही, तोपर्यंत अनधिकृत बांधकामांना आळा बसेल, असे वाटत नाही. मागे मुंबईत एक घटना घडली होती. अभ्युदय नगरसारखी वसाहत एका बिल्डरला डेव्हलप करायला पाहिजे होती म्हणून ती मिळविण्यासाठी दुसऱ्या कॉम्पिटंट बिल्डरला खोट्या केसमध्ये अडकविण्याचे काम पोलिसांनी केले. त्यात डीसीपी लेव्हलच्या अधिकाऱ्याला निलंबित केले. पोलीस व बिल्डर यांचा नेक्सेस मुंबई, ठाणे, पुणे या परिसरात मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

सभापती महोदय, अनधिकृत बांधकाम होत असताना महानगरपालिका त्या संदर्भातील नोटीसची एक प्रत स्थानिक पोलीस स्टेशनकडे पाठविते. परंतु, ती प्रत पोलीस स्टेशन घेत नाही. महानगरपालिकेला विशेष प्रयत्न करून पोलीस स्टेशनला सदर प्रत द्यावी लागते. महानगरपालिकेचे अधिकारी खूप कार्यक्षम व पोलीस किती अकार्यक्षम आहेत, असे मी म्हणत नाही. पण दोघे मिळून त्यांचे हे काम सुरू आहे. अनधिकृत बांधकामे उभी राहत असतील तर त्या संबंधी वरिष्ठ पोलीस अधिकारी व वॉर्ड ऑफिसर हे जबाबदार राहतील, अशा सूचना राज्य शासनाने निर्गमित केल्या आहेत. परंतु, असे केल्यानंतरही प्रत्यक्षात हजारो अनधिकृत बांधकामे मनपाच्या हद्दीत झाली आहेत व होत आहेत. मग आपण अशा किती पोलीस अधिकारी, वॉर्ड ऑफिसर यांच्यावर कारवाई केली ? सभापती महोदय, सर्वच अधिकारी असे करीत नाहीत. काही अधिकारी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

चांगले देखील आहेत. ठाणे महानगरपालिकेतील श्री. अशोक मारपल्ले, सहायक आयुक्त हे अवैध बांधकाम पाडण्यास गेल्यानंतर तेथील लोकांनी त्यांच्यावर हल्ला केला, त्यांना मारहाण झाली. श्री. पवार नावाच्या उपायुक्तांना देखील मारहाण झाली. राजकीय पाठिंबा असल्याशिवाय लोक अधिकाऱ्यांना मारण्याची हिंमत करीत नाहीत. त्यांना कोणाचा तरी पाठिंबा हा असतोच. मी सभागृहात सातत्याने अनधिकृत बांधकामांच्या विषयी बोलून सुध्दा या संदर्भात निर्णय घेतला जात नाही, हे योग्य नाही. सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, मी भिवंडी येथील अनधिकृत गोदामांविषयी सभागृहात किती तरी वेळा बोललो आहे. तेथे सुध्दा एकदा आग लागेल. आगीचे बंब आत जाऊ शकणार नाहीत. काही लोक मरतील. पुन्हा हेलिकॉप्टरने जाऊन पाहून यावे लागेल. आता माननीय मुख्यमंत्री सभागृहात नाहीत, अधिकारी सभागृहात उपस्थित नाहीत, म्हणून पुन्हा सभागृह स्थगित करावे लागेल. मी सभागृहात भिवंडीच्या अनधिकृत गोदामांचा विषय सातत्याने काढल्यानंतरही एमएमआरडीए म्हणत आहे की, हे काम महसूल विभागाचे आहे, महसूल विभाग म्हणत आहे की, ते काम महानगरपालिकेचे आहे. टोलवाटोलवी चालली आहे. कोणीही जबाबदारी घेण्यास तयार नाही. आपण अनधिकृत बांधकाम होऊन सुध्दा पाडत नसाल तर आपला त्याला पाठिंबा आहे आणि त्यामुळेच कारवाई होत नाही.

शासन महसूल मिळविण्यासाठी झटत आहे. परंतु, फुकटात कोणाच्या तरी खिशात पैसे जात आहेत, ते आपण काढून घेऊ शकत नाही, हे योग्य नाही. असे शब्द योग्य नाहीत पण अधिकारी माजतात, हे त्याचेच एक कारण आहे.

( नंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, या राज्यामध्ये आणि मुंबई-ठाणे परिसरामध्ये इमारती कोसळण्याच्या घटना कमी झालेल्या नाहीत. आता पर्यंत किती इमारती कोसळल्या आहेत व त्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली यासंबंधातील माहिती ग्रंथालयातून जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी भिवंडी येथील गोदामाचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबत मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, सदर गोदामे आमच्या ताब्यात द्यावीत असा ठराव भिवंडी महानगरपालिकेने केला आहे. मात्र, तो ठराव शासनाने अंमलात आणलेला नाही. ही सर्व गोदामे नदीकिनारी आहेत. त्यामुळे भविष्यात याचे दुष्परिणाम या भागातील नागरिकांना भोगावे लागणार आहेत. 26 जुलै रोजी प्रचंड पूर आला होता तसा प्रकार येथे घडू शकतो. त्यामुळे याचा प्रकर्षाने विचार करावा लागेल. सदर गोदामे भिवंडी महानगरपालिकेला मिळाली तर त्यांना उत्पन्न देखील मिळेल, अशा प्रकारची उपयुक्त सूचना शासनाकडे करून सुद्धा शासन तो ठराव का अंमलात आणत नाही हेच कळत नाही. सदर गोदामे भिवंडी महागनरपालिकेकडे देण्यासंबंधीचा ठराव शासनाकडे पाठविलेला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा विषय आम्ही अनेकदा मांडून काहीच झालेले नाही. आता आपण निदेश दिल्यानंतर देखील शासन किती जबाबदारीने काम करेल याबद्दल मला शंका आहे. सरकारने किमान त्या खुर्चीचा मान ठेवावा अशी आमची विनंती आहे. सरकारी तिजारी भरण्यापेक्षा काही जणांना आपलीच तिजोरी भरण्यात जास्त इंटरेस्ट असल्यामुळे अनधिकृत बांधकामे सुरू असतात. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी ती गोदामे पाहिली देखील नसतील. पाहणारे सर्वजण माझ्या समोर बसलेले आहेत. यात सर्व भाई लोकांचा संबंध आहे. सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे हे सर्वांना पुरून उरलेले आहेत हे मला माहीत आहे.

सभापती महोदय, मी ग्रंथालयातून माहिती घेतली आहे. गोविंद टॉवर, लक्ष्मीछाया, या इमारती कोसळल्या होत्या तेव्हा तीच उत्तरे देण्यात आली होती. त्यावेळी शासनाने श्रीवास्तव समिती, मिराणी समिती, अग्रवाल समिती गठित केली होती. अग्रवाल समिती संबंधी आपण स्वत: निदेश

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे......

दिले होते. 26/11 चा हल्ला झाला म्हणून राम प्रधान समिती नेमली होती. या सर्व समित्यांनी अहवाल दिलेले आहेत. या अहवालात अभ्यासपूर्ण अशा शिफारशी केल्या आहेत. मास मेमरी शॉट असल्यामुळे सर्व घटना लोक विसरून जातात. परवा मुंबई-गोवा महामार्गावर अपघात झाला तेव्हा आपण सर्वजण गेलो होतो. लोक आता तो अपघात विसरून शीळ फाट्याची घटना लक्षात ठेवतील. त्या पुलावर सिमेंटचा कठडा कोण करेल असे मला वाटत नाही. तेथे पुन्हा बस कोसळली की तुम्ही आम्ही घटनास्थळाची पाहणी करण्यासाठी जाणार. अशा प्रश्नांसंबंधी कायम स्वरूपी उत्तर काढण्यासाठी आपण काय करणार आहात, आपली पण गेंड्याची कातडी झाली आहे काय, सुक्या बरोबर ओले देखील जळते. आता सगळे भगवान भरोसे आहे, अशी अवस्था आहे काय ?

गेल्या पाच वर्षात इमारती कोसळून मुंबईतील 250 जणांचे प्राण गेले आहेत. गोविंद टॉवर, कमला मिल मधील व्हिक्टोरिया हाऊस, गौतम कंपाऊंड, नवीन वस्ती भिवंडी येथील इमारती कोसळल्या आहेत. खार येथे इमारत कोसळून 12 लोकांचा मृत्यू झाला होता. नागपाडा येथे इमारत कोसळून 5 जणांचा मृत्यू झाला होता. अशा प्रकारे घटना घडत आहेत. या घटना घडल्यानंतर माननीय मंत्र्याची उत्तरे आहे तशीच आहेत. काल घटना घडल्यानंतर यापूर्वी घडलेल्या घटनांसंबंधी पुढे काय झाले याबाबतची माहिती मी तपासून पहात होतो. तेव्हा माझ्या लक्षात आले की, शासनाने कुठल्याही अधिकाऱ्यावर फौजदारी कारवाई केलेली नाही. त्यांना कोणतीच शिक्षा झाली नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

सभापती महोदय, याठिकाणी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत आणि होत आहेत. यामध्ये दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल केला जातो काय? हा प्रश्न आहे. कारण त्यापूर्वीच गुन्हेगार पळून जातो. मग जरी चार,पाच किंवा आठ दिवसांनी पुरावे मिळाले तरी तोपर्यंत ते पुरावे तकलादू होतात आणि संबंधित गुन्हेगार सुटतो.परंतु जोपर्यंत अशा प्रकारच्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणार नाही तो पर्यंत मृत्यूचे सापळे उभे रहाण्याचे काम असेच होत रहाणार आहे. मुंबई येथील गणपत पाटील ही इमारत पाडली. पण ती पुन्हा उभी राहिली. याबाबतीत कायदा असा आहे की, जर इमारत पहिल्यांदा पडली तरी तेच आणि पुन्हा पडली तरी तेच. पण महानगरपालिका ॲक्ट मधील तरतुदीनुसार याबाबतीत संबंधितांवर केस करून, बीएमसी ॲक्टच्या कलम 475 अंतर्गत संबंधितांना तीन महिन्याची शिक्षा नमूद केलेली आहे.ही शिक्षा भोगल्यानंतर जर त्याने पुन्हा इमारत बांधली म्हणजे एका ठिकाणी केलेले अनधिकृत बांधकाम पाडल्यावर जर परत दुसरे अनधिकृत बांधकाम होणार असेल तर संबंधित व्यक्तीला अधिक कडक स्वरुपाची म्हणजे तडीपार करणे किंवा सक्त मजुरी यासारख्या शिक्षा असतील. अशा प्रकारे आपण याबाबतीत कडक कायदा करण्याची गरज आहे. याबाबतीत अभ्यास करण्याची गरज आहे. टर्म्स् ऑफ रेफरन्स्साठी दोन महिने लागतील. माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी म्हणतात त्याप्रमाणे Where there is a will there is a way. If there is no way then, there is survey, committee and sub-committee पण याबाबतीत सर्व्हे कमिटी, सब कमिटी वगैरे करु नका.

सभापती महोदय, काल मुंब्रा येथे जी घटना घडली, त्यामध्ये तेथील बऱ्याच लोकांचा मृत्यू झाला आहे. जर हे सरकार, विधीमंडळ प्रामाणिक असेल तर या घटनेच्या निमित्ताने शासनाने आपल्या निर्णयाच्या माध्यमातून हे ठरविले पाहिजे की, महाराष्ट्रामध्ये 47 टक्के नागरिकीकरण होत असताना घरांचा विषय अतिशय महत्वाचा आहे आणि यासाठी कायद्यामध्ये काही बदल करुन त्यामध्ये काही गोष्टींचा अंतर्भाव केला पाहिजे. पहिली बाब म्हणजे बिल्डरधार्जिणे धोरण आणता कामा नये. तसेच अनधिकृत बांधकाम करणारे त्याचप्रमाणे एमएमआरडीए मधील अधिकारी देखील माजले आहेत. ते याबाबतीत कोणतीही कार्यवाही करीत नाहीत. त्यामुळे त्याठिकाणी पुन्हा इमारती उभ्या रहातात, यासाठी सीआरझेडचा वापर कसा केला जातो? हा वापर भारतीय जनता पक्ष, काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस करते काय ते शोधले पाहिजे. जर आपल्याला राज्यातील निष्पाप

. . . .2 आर-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

बळींची संख्या थांबवावयाची असेल तर यासाठी खाजगीकरणाचे धोरण अवलंबिले पाहिजे. काही जण आपला मतदार संघ वाचविण्यासाठी असे करीत असतील तर ती वृत्ती ठेचली पाहिजे.

सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की, याठिकाणी 248 इमारती कशा उभ्या राहू शकतात. हे करीत असताना त्यांच्या पाठिमागे राजकीय इच्छाशक्ती असली पाहिजे.याबाबतीत राज्य शासनाने ठोस दिशा जाहीर करावी की, यापुढे महाराष्ट्रात अनधिकृत किंवा निकृष्ट दर्जाचे एकही बांधकाम उभे रहाणार नाही.जर कोणी अशा प्रकारचे काम केले आणि त्यांना कोणी पाठिशी घालत असतील मग ते कोणत्याही पक्षाचे असोत,त्यांच्यावर कारवाई झाल्याचे दिसून येईल.जर एखाद्या पक्षाचे आमदार करीत असतील तर त्यांनी ती बाब उघड केली पाहिजे. याबाबतीत मतदार संघनिहाय त्या-त्या पक्षाच्या नेतृत्वांनी काही गोष्टींबाबत स्पष्टता आणण्याची गरज आहे एवढेच मला सांगावयाचे आहे.मुंब्रा येथील दुर्घटनेमध्ये जे मृत झाले आहेत,त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, ज्यावेळी अशा पध्दतीचे अपघात होतात त्यावेळी सदनामध्ये,सदनाच्या बाहेर, प्रेस कॉन्फरन्समध्ये सामाजिक संस्थामार्फत आवाज उठविले जातील. त्यांना मदतीचा हात पुढे केला जाईल. त्यानंतर या लोकांना आम्ही मदत केली हे सर्वजण सांगायला मोकळे होतील.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले विचार मांडताना संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली. मुंबईत शहरात जमिनींचे वाढलेले भाव, घर मिळविण्यासाठी सामान्यांची असलेली धडपड या सर्व गोष्टींचा एक विचार करुन या व्यवसायातून कमी वेळेत जास्तीत जास्त पैसे कसे मिळविता येतील यासाठी ही धडपड आहे.

सभापती महोदय, सर्वांत महत्वाचा मुद्दा म्हणजे कोणत्याही जमिनीवर परवानगी घेतल्याशिवाय घर, झोपडी,इमारत बांधता येत नाही. हा एकमेव व्यवसाय असा आहे की ज्यावर शासनाचे आणि प्रशासनाचे नियंत्रण आहे.

सभापती महोदय, शासकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर एखादा सामान्य माणूस काम घेऊन गेला तर त्याचे काम लवकर होईल असे सांगता येत नाही. आढेवेढे घेऊन ते काम कसे होणार नाही हे अधिकारी सांगतील. भ्रष्टाचाराची सुरुवात जमीन रिकामी असल्यापासून होते असे माझे म्हणणे आहे. कोणाचे वारस नसतील तर वारस म्हणून दुसऱ्यांची नावे लिहिली जातात. मृत झालेल्या व्यक्तीच्या वारसाचे नाव लावण्याऐवजी दुसऱ्याच व्यक्तीचे नाव लावल्याच्या अनेक केसेस आपणास न्यायालयात पहावयास मिळतील.

सभापती महोदय, पूर्वी सात-बाराचा उतारा हाताने लिहून दिला जात होता. त्यावेळी तो मोडीलिपीत लिहिला जात होता. नंतर तो देवनागरीमध्ये लिहिला जात होता. त्यानंतर आपण टाईपरायटरवर त्याची नोंद करीत होतो आणि आता आपण संगणकावर त्याची नोंद करतो. आपण आता संगणकावर नोंदी घेत असलो तरी सात-बाराच्या उताऱ्यावर बाजूला पेन्सिलने रिमार्क मारण्यात येतात. आपण पेन्सिलने रिमार्क मारण्याची पध्दत कधी तरी बंद करणार आहोत की नाही ? कारण ज्या अधिकाऱ्याकडे फाईल येते त्याच्याशी संगनमत झाले नाही तर तो अधिकारी पेन्सिलने रिमार्क मारतो आणि ज्याची जमीन असते त्याला सांगतो की, तुम्हाला आता कोर्टात जावे लागेल. एकदा कोर्टात केस गेल्यानंतर त्या केसचा निकाल लागेपर्यंत एक पिढी संपून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर .......

जाते. वडिलांचा मृत्यू झाल्यानंतर मुलगा त्या जागेसाठी लढत असतो आणि मुलगा जाईपर्यंत त्याला ती प्रॉपर्टी मिळत नाही. एका अधिकाऱ्याने पेन्सिलने मारलेला रिमार्क काढण्यासाठी 40-50 वर्षे खर्ची घालावे लागतात. आपण ही प्रथा बंद करणार आहोत की नाही, त्यासाठी कायद्यामध्ये तरतूद करणार आहोत की नाही ?

सभापती महोदय, आपण महसूल वाढविण्यासाठी संगणकावर आलो. आता कोणी किती जमीन घेतली, किती महसूल जमा झाला याची माहिती संगणकाद्वारे मिळते. तेव्हा आता तरी पेन्सिलचे फॅड काढून टाकावे. पेन्सिलने मारलेले रिमार्क चालणार नाहीत असा कायदा करावा.

सभापती महोदय, एस.आर.ए. योजना आली त्यामध्ये देखील बोगस नावांचा सुळसुळाट आहे. या संदर्भात कितीतरी वेळा अनेक आयुधांच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करण्यात आले. पण त्याचा काही उपयोग झालेला नाही. मी एका सोसायटीमध्ये बोगस लाभार्थी आहेत असे मी सांगूनही त्यावर काही कारवाई झालेली नाही. त्या संदर्भात मी उपजिल्हाधिकाऱ्यांना देखील जाऊन भेटलो होतो. मी चार वर्षापूर्वी सांगितलेली बोगस नावे आजही तशीच आहेत. त्याबाबत काहीही कारवाई झालेली नाही. त्यांना मतदारसंघातील नावाची यादी दिली. रेशनकार्डाचे डिटेल्स दिले. एकेका नावावर चार चार घरे दिली त्याचे देखील पुरावे दिले, परंतु काहीही कारवाई झालेली नाही. अशा मस्तवाल अधिकाऱ्यांना काय म्हणून पोसायचे ? कोणत्या तरी बिल्डरने भ्रष्टाचार करुन अनधिकृत बिल्डींग बांधायची आणि ती जबाबदारी मात्र शासनाची सांगायची.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

आजही मुंबई महापालिकेच्या हद्दीतील एखाद्या चाळीमध्ये कोणाच्या घरी दुरुस्तीसाठी सिमेंट, विटा आल्या तर नगरसेवकाचा माणूस किंवा अधिकाऱ्यांचा माणूस तेथे येतो व विचारतो की, तुम्ही बांधकाम सुरु करण्यापूर्वी अमुक व्यक्तीशी बोलला आहात काय ? त्या व्यक्तीशी बोलल्याशिवाय काम सुरु करु नका असे सांगितले जाते. एवढेच नव्हे तर त्याला पोलीस स्टेशनमध्ये बोलावले जाते. या लोकांचा असाच धंदा सुरु असेल तर ज्या ठिकाणी ही इमारत उभी राहिली होती त्या ठिकाणी ही मंडळी का गेली नाही ? तेथील सर्व अधिकारी धृतराष्ट्र होते काय ?

सभापती महोदय, मी आपल्याला एका-एका अधिकाऱ्याची कुंडली सांगितली तर तुम्हाला आश्चर्य वाटेल. मुंब्रा येथील विभाग अधिकारी शाम थोरबोले याला दोन महिन्यापूर्वी 1 लाख रुपयांची लाच घेताना पकडले. आता त्या ठिकाणी आंधळे नावाचे विभाग अधिकारी आले आहेत. त्यांचे आडनाव 'आंधळे' आहे की, ते खरोखरच आंधळे आहेत हे कळत नाही. यांच्या कार्यकाळात म्हणजेच 60 दिवसांत ही इमारत बांधून पूर्ण झाली. महोदय, शाम थोरबोले यांच्याकडे 50 लाख रुपये मिळाले आहेत. त्यांनी सांगितले की, 2003 ते 2007 या कालावधीत त्यांना 5 लॉटरीची बक्षिसे लागली. प्रत्येक वर्षी एक या प्रमाणे त्यांना पाच वर्षात पाच लॉटरीची बक्षिसे लागली. महोदय, दरवर्षी जसा गणपती बसविला जातो तशी यांना दरवर्षी लॉटरीची बक्षिसे लागली. केरळच्या सी.बी.आय.ने लॉटरी तिकिटाचे रॅकेट उघड केले आहे. आपल्या राज्यातील काही अधिकारी ज्यांना ही लॉटरीची बक्षिसे लागतात त्यांच्याकडून तिकिटे विकत घेत आहेत. लॉटरीच्या माध्यमातून आपल्याला 34 लाख रुपये मिळाल्याचे थोरबोले प्रत्येक वर्षी दाखवित आहेत. अशा अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार की नाही ?

महोदय, चर्चेच्या सुरुवातीस गॅलरीमध्ये अधिकारी नसल्याचा मुद्दा या ठिकाणी मांडण्यात आला. मी तर म्हणेन की, या ठिकाणी अधिकाऱ्यांची गरजच नाही. अशा प्रकारच्या इमारतीचे रि-डेव्हलपमेंट करताना माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, मंत्री कधीही धाडस करणार नाहीत. अनधिकृत बांधकाम झालेली इमारत माझ्या कारकिर्दीत पडावी असे कोणालाही वाटणार नाही. थोरबोले 5 तिकिटे मणीपूर राज्याच्या लॉटरीची आणि इतर ठिकाणची लागल्याचे सांगत आहे. 2003-2006 या वर्षात अनेक अधिकाऱ्यांनी अशी तिकिटे घेतली आहेत. महाराष्ट्रातील किती अधिकाऱ्यांनी अशा प्रकारची तिकिटे विकत घेतली आहेत याची माहिती केरळच्या सी.बी.आय. कडे

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

उपलब्ध आहे. या निमित्ताने मी मागणी करु इच्छितो की, ती नावे मागवून ती सभागृहाच्या पटलावर ठेवावीत. आपल्याला माहीत आहे की, बिल्डर्सनी म्हाडाच्या अधिकाऱ्यांना विमानाने तिरुपतीला नेले होते, काही बिल्डर्सनी अधिकाऱ्यांना विमानाने शिर्डी येथे नेले होते.

महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील उप अभियंता, सचिन जोशी या अधिकाऱ्याविषयी या सभागृहात मुद्दा उपस्थित झाला होता. आम्ही त्यावर बोललो होतो. या अधिकाऱ्याकडे 250 कोटी रुपयांची मालमत्ता सापडली आहे. सचिन जोशी हा डीग्री होल्डर नव्हे तर डिप्लोमा होल्डर आहे. उप अभियंता असलेल्या सचिन जोशी याला लाच लुचपत विभागाने तीन वेळा पकडले. त्याच्याकडे मोठ्या प्रमाणावर संपत्ती आहे. शिवाय बंगले, गाड्या मोठ्या प्रमाणावर आहेत. इतकेच नव्हे तर त्याच्याकडे 50 परदेशी गाड्या सापडल्या. परंतु दुर्दैवाची बाब अशी की, याच सचिन जोशीच्या बाबतीत कल्याण-डोंबिवली महापालिका त्याला सेवेत घ्या म्हणून ठराव मांडते. महोदय, हा राजकारणाचा भाग नाही.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, कालच्या दुर्घटनेमध्ये जी माणसे मृत्युमुखी पडली ती इमारत दगडा-विटांनी बांधली नव्हती तर ती प्रेतांचा खच पाडून बांधली होती असे मला वाटते. यास आपण सर्व जबाबदार आहोत. कल्याण-डोंबिवली महापालिकेत कोणाची सत्ता आहे ? त्यांना डिप्लोमा होल्डर जोशी कशाला पाहिजे ? महोदय, ज्या व्यक्तीला लाच घेताना तीन वेळा पकडले ती व्यक्तीच त्यांना का लागते याची चौकशी होणे गरजेचे आहे. त्याची मिळकत किती आहे हे बघून चालणार नाही. तर त्याने 250 कोटी मिळकत मिळविण्यासाठी किती अनधिकृत बांधकामांना परवानगी दिली आहे याचे ऑडिट होणे गरजेचे आहे. ते ऑडिट केले नाही तर लाच लुचपत विभागाने त्याचे 250 कोटी रुपये आपल्याकडे जमा करावे. अशा प्रकारे ज्या अनधिकृत इमारतींना त्यांनी परवानगी दिलेली आहे त्या इमारतींच्या बाबतीत आज ना उद्या याच दुघटनेप्रमाणे येथे शोक प्रस्ताव मांडावा लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.बरवड....

श्री. किरण पावसकर ....

त्यावर पुन्हा चर्चा करावी लागेल. कारण जो चांगले काम करतो, ज्याला सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत ते जोशींना आणि थोरबोलेंना पैसे देणार नाहीत. हे पैसे दिले जातात याचाच अर्थ ते काम अनधिकृत आहे. त्यांच्या काळामध्ये किती अनधिकृत बांधकामे झालेली आहे, किती परवानग्या देण्यात आलेल्या आहेत, याचे ऑडीट करुन सभागृहासमोर ठेवावे. त्या दिवशी खऱ्या अर्थाने सांगता येईल की, सचिन जोशीचे 250 कोटी रुपये झाले पण त्याने आतापर्यंत 5 हजार कोटी रुपयांची कामे करुन दिलेली आहेत. आज शाम थोरबोलेविषयी एवढेच बोलून चालणार नाही. शाम थोरबोले यांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये मुंब्रा येथील वॉर्डमध्ये असलेल्या किती बांधकामाच्या बाबतीत सह्या केलेल्या आहेत त्याचे डिटेल्स या सभागृहासमोर ठेवावेत. ज्या दिवशी त्याची माहिती मिळेल तेव्हा थोरबोले यांनी किती परवानग्या दिलेल्या आहेत आणि या निकृष्ट दर्जाच्या इमारती सुध्दा आज ना उद्या पडतील हे सांगता येईल.

सभापती महोदय, काल कोठेही भूकंप झाला नसताना ती पडलेली आहे. देव न करो, उद्या थोडा जास्त पाऊस पडला किंवा धरणीकंप झाला तर हे थोरबोले जेलमध्ये सुरक्षित राहतील पण बाकीचे लोक मरतील. या घटनेमध्ये 40 व्यक्ती मृत्युमुखी पडल्या अशी माहिती आहे. काही सन्माननीय सदस्य मृतांची संख्या 70 वर गेल्याचे सांगत आहेत. ही संख्या वाढत जाणार आहे कारण त्या ठिकाणी खाली क्लास चालू होता. याच्या मुळाशी जावयाचे असेल तर थोरबोलंच्या कारकिर्दीमध्ये या इमारतीला जशी परवानगी दिली तशी आणखी किती इमारतींना परवानगी दिलेली आहे, त्यांना कोणकोणती लॉटरीची तिकिटे लागली आहेत, केरलाची लॉटरी लागली, हिमाचलची लॉटरी लागली की, सिक्कीमची लॉटरी लागली हे सुध्दा शोधून काढावे.

सभापती महोदय, त्यानंतर आपल्याकडे दुसरे नाव उप जिल्हाधिकारी श्री. नितेश ठाकूर यांचे येते. त्यांनी गृहनिर्माण, नगरविकास विभागामध्ये, एसआरए इत्यादी विभागांमध्ये काम केले आहे. शापुरजी-पालनजी सारखी कंपनी त्यांना 260 कोटी रुपयांचा चेक देते. ते प्रकरण हायकोर्टामध्ये आहे. एका उप जिल्हाधिकाऱ्याच्या कंपनीला एक नामांकित कंपनी 260 कोटी रुपयांचा चेक देते याची शासन कधीही चौकशी करणार नाही का ? एक उप जिल्हाधिकारी

...2...

RDB/ D/ KTG/

श्री. किरण पावसकर .....

कोणती परवानगी देऊ शकतो, कोणती परवानगी दिल्यामुळे त्यांना एवढे पैसे मिळाले, त्यांनी किती इमारतींना परवानगी दिली ? आपण फक्त विरोधी पक्ष विरुध्द सरकार असे बोलत असतो. आपण सांगणार की, अमुक मंत्र्यांनी असे केले, अमुक मंत्र्यांनी कारवाई केली नाही. परंतु नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग, एसआरए मधील बांधकामाशी संबंधित असणारे सर्व प्रकार शोधून काढले तर त्यात कदाचित या महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प तयार होईल एवढी त्यामध्ये किंमत येऊ शकेल.

म्हाडाचे किती अधिकारी निलंबित करावे लागले हे आपल्याला माहीत आहे. आपण स्वत: इंजिनिअर असताना ज्याने स्वत:च्या पत्नीच्या नावाने कंपन्या काढलेल्या आहेत ते पुनर्विकासाची कामे घ्यावयास लागले आहेत. आपण 8 लोकांना निलंबित केले आहे. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, असे 80 लोक आहेत. ते 80 नव्हे तर 800 निघतील. ते कोर्टात जाऊन पुन्हा कामावर आलेले आहेत. त्याची आम्ही कधी विचारणा करणार आहोत ?

सभापती महोदय, नितेश ठाकूर यांनी 260 कोटी रुपये मिळविण्यासाठी किती फाईल्स क्लिअर केल्या हे शोधून काढणार का, शाम थोरबोले यांनी आतापर्यंत किती परवानग्या दिल्या हे बाहेर काढणार का, सचिन जोशी यांनी किती परवानग्या दिल्या हे बाहेर काढणार का ? यामधून रुस्तुमजी सारख्या नवीन कंपन्या उदयाला येतात. रुस्तुमजीचे ठाण्यामध्ये काय चालले आहे ? त्यांचे ठाण्याला खाडीच्या बाजूला 100 एकरवर टाऊनशीपचे काम चालू आहे. केंद्रामध्ये श्रीधरन सारख्या व्यक्तीचा सन्मान केला जातो. त्यांनी कोकण रेल्वे चांगल्या पध्दतीने बांधली. त्यांनी मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे चांगले काम केले. परंतु ठाण्याला मेट्रोच्या कार शेडचे प्लानिंग ज्या ठिकाणी करण्यात आले आहे तेथील कार शेडचे रिझर्वेशन सुध्दा बाजूला करण्यात आले आहे. असे झाले आहे की नाही हे शासनाने शोधून काढावे. रुस्तुमजी, शापुरजी पालनजी आले की त्यांना आपण सोडून देतो आणि फक्त त्यांच्या हाताखाली त्याचे दलाल म्हणून काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन त्यांना निलंबित करतो, त्यांना आत टाकतो. तीन चार वर्षानंतर ते पुन्हा कामावर येतात. आपण फक्त मृतांची संख्या वाचत राहतो, अशी परिस्थिती आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

सभापती महोदय, मघाशी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काही नावे दिली. प्रत्येक वेळी एखादी इमारत कोसळली की, आपण त्या इमारतीपुरते बोलतो पण इमारतीच्या आजूबाजूच्या बाबतीत काही बोलत नाही. यामध्ये इमारतींवरील टॉवरसारखी परिस्थिती झालेली आहे. ज्या इमारतीवर टॉवर लावले असतील त्याबाबत आपण बोलतो पण त्याचे रेडिएशन बाजूच्या इमारतीमध्ये जाऊन तेथील लोकांना कॅन्सर होतो. तशा पध्दतीने हा जो कॅन्सर वाढत आहे त्याला कोठे तरी बंधन घालणार आहात का ? यावर कठोर कारवाई केली पाहिजे. रुस्तुमजीच्या प्रकल्पासाठी सीआरझेडची परवानगी मिळालेली नाही. तरी सुध्दा कारशेड बाजूला केली जाते. त्या ठिकाणी बाजूच्या 100 एकर जागेमध्ये टाऊनशीप होत आहे. त्या खाडीच्या बाजूला असलेल्या जागेमधून हायवे जातो आणि हायवेच्या दोन्ही साईडला त्यांची जागा गेलेली आहे तरीही त्याला टाऊनशीपची परवानगी दिली जाते. ठाण्यामध्ये या परवानग्या कशा दिल्या जातात ? एखादे मोठे नाव असेल, एखाद्याचे टायटल लागले, तीन चार लोकांना हाताखाली घेतले की कामे चालू होतात.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

अशा प्रकारे चालू होणाऱ्या कामांबाबत आपण काहीही बोलणार नाही ? या इमारतीचे ऑडिट करुन ती निकृष्ट दर्जाची होती काय, पडण्यासारखी होती काय, बांधकामाचा दर्जा कसा होता, केवळ हे बघून चालणार नाही. ज्या ज्या अधिकाऱ्यांनी पहिल्या दिवसापासून या बांधकामांना परवानगी दिली त्या सर्व अधिकाऱ्यांची कुंडली काढावी. ते सर्व अधिकारी अशा पध्दतीने काम करीत आल्याचे दिसून येईल. 6 दिवसात इमारत बांधून पूर्ण होत असेल तर त्यांना चायनाचा रेकॉर्ड मोडावयाचा होता काय ? चायनामध्ये 36 तासामध्ये 150 मजले मटेरियल पॅनलिंग करुन बांधले जातात. तसा प्रकार येथे केला होता काय ? रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेण्टचा हा प्रकार होता का ? मला जर विचारले तर मी असे म्हणेन की, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी परवानगी देऊन स्वत:च एक प्रयोग केलेला आहे. हा प्रयोग केवळ एका बिल्डिंगपुरता मर्यादित नाही. मी जी नावे घेतली आहेत त्यापेक्षा आणखी किती तरी नावे सांगता येतील. अशा प्रकारची इतर ठिकाणीही कामे झालेली आहेत, परंतु आपण अधिका-यांच्या मुळाशी पोहोचत नाही. लाचलुचपत विभागाला विचारले तर ते असे म्हणतात की, आम्ही काय करणार, आम्हाला त्यांच्याकडून लॉटरीची तिकिटे मिळाली आहेत. तो तिकिटांचा पैसा असल्यामुळे आम्ही तो जमा करु शकत नाही. एका माणसाला 6-6 तिकिटे कशी काय लागली ? नितेश ठाकूरला विचारण्यात आल्यावर तो म्हणतो की, ते पैसे माझे नाहीत, माझ्या पत्नीच्या नावावर कंपनी आहे तिला ते 260 कोटी रुपये दिलेले आहेत. आम्हाला अजून कोणी एवढे पैसे दिलेले नाहीत. 260 कोटी रुपये कशाला म्हणतात ? इतका पैसा मिळविण्यासाठी कशावर सह्या करीत होता, कशा प्रकारचे काम करीत होता ? कोणती अनधिकृत कामे करीत होता की, करोडोमध्ये त्याची किंमत तुम्हाला मिळाली आहे ?

सभापती महोदय, यापूर्वी मुंबईमध्ये बेकायदेशीरपणे झोपड्या बांधण्याची लाट होती. म्हणजे अनधिकृत झोपड्या बांधावयाच्या आणि नंतर एसआरए योजना तयार करावयाची, पुनर्विकासाची योजना तयार करावयाची असा सिझन सुरु होता. परंतु काही दिवसांपूर्वी एका पाठोपाठ वेगवेगळ्या ठिकाणी सातत्याने आगी लागत होत्या. हा विषय मुंब्रा, कळवा, उल्हासनगर, धारावी एवढ्या पुरता मर्यादित नाही. डेव्हलपमेंट करीत असताना इतर ठिकाणी अशा प्रकारे आगी लागत होत्या. पोलीस स्टेशनमध्ये त्या आगीची नोंद केल्यानंतर पुन्हा त्याच जागेवर चांगल्या प्रकारची घरे बांधली जात होती.

2.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

मुंबईमध्ये 10 वर्षापूर्वी गिरण्यांना आगी लागण्याचे सत्र सुरु झाले होते हे अनेक सन्माननीय सदस्यांना आठवत असेल. गिरण्यांच्या जागा अगदी कोहिनूर मिलची जागा विकण्यापूर्वी सगळीकडे हेच सत्र सुरु होते. मी हे सत्य सांगत आहे. आता गिरण्यांच्या जागेवर स्मारके बांधण्याचे सुरु झाले आहे. परंतु काही कालावधीपूर्वी आतापर्यंत 26 गिरण्यांना आगी लागल्याची नोंद आहे. त्या आगीच्या प्रकरणात कोणाला पकडण्यात आले ? दादर येथील गुलमोहर मिलमध्ये केमिकल टाकताना कामगारांना पकडण्यात आले. पण ज्यांनी ते टाकावयास सांगितले ते अजूनपर्यंत सापडलेले नाहीत. दादर पोलीस स्टेशनमध्ये चौकशी केली असता चौकशी चालू असल्याचे सांगितले जाते. गिरण्याच्या जागेवर एफएसआय वाढवून देण्याचे व कामगारांना किती घरे द्यावयाची हे ठरल्याबरोबर आगी बंद झाल्या. म्हणजे आगींचे रुपांतर फायरब्रिगेडच्या गाड्यांमध्ये झाले.

सभापती महोदय, भिवंडीमध्ये तर अनधिकृत बांधकामांचे सत्रच सुरु झालेले आहे. बेकायदेशीर बांधकामांची एक हद्द असू शकते. तिकडे गेल्यावर ते लोक असे सांगतात की, ही बांधकामे ऑस्ट्रेलिया स्टाईलची आहेत. म्हणजे हाफ राऊंड बांधकाम करावयाचे आणि त्यावर फिरण्यासाठी व्हेंटिलेशनची सोय केली जाते. याबाबत अधिक माहिती विचारली असता त्या जागा एन.ए.ही झालेल्या नाहीत असे समजले आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी महसुलाचा उल्लेख केला होता. भिवंडी महानगरपालिकेला त्या बांधकामातून पैसा आला पाहिजे. परंतु हा विषय केवळ पैशापुरता मर्यादित नाही. मी या निमित्ताने असा इशारा देत आहे की, एखाद्या दिवशी तेथील एखाद्या गोदामाला जर लाग लागली तर ती आग आटोक्यात आणणे सुध्दा मुश्कील होईल. इतका भयानक माल त्या गोदामात ठेवलेला आहे. पण त्या ठिकाणी कोणीही अधिकारी बघत नाहीत, पोलीस स्टेशनचे अधिकारी बघत नाहीत. जिल्हाधिकाऱ्यांना त्याची माहिती नाही, आयुक्तांना त्याची कल्पना नाही.

सभापती महोदय, बेकायदेशीर झोपड्यांबद्दल तर बोलावयास नको, कारण या झोपड्यांच्या आड एफएसआय दडलेला आहे. अनेक ठिकाणी झोपड्यांचा एफएसआय वापरुन अशा प्रकारे अनधिकृत बांधकाम केले जाते. परंतु इमारतींचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे करणे, गिरण्यांना आगी

3....

श्री.किरण पावसकर.....

लावणे, झोपड्यांना आगी लावणे किंवा भिवंडीतील गोदाम स्टाईलचे बांधकाम करणे या सर्वांचा विचार करता कमी वेळेमध्ये अधिक पैसा मिळविण्याचा प्रकार सुरु झालेला आहे. त्याची चौकशी महसूल विभागामार्फतच नाही तर पोलीस विभागाकडून होणार आहे की नाही ? तेथे कोणताही राजकीय पक्ष असो, कोणत्याही राजकीय पक्षाचे आमदार, खासदार किंवा मंत्र्यांना असे वाटणार नाही की, माझ्या कारकिर्दीमध्ये बेकायदेशीर काम भरपूर व्हावे. उद्या एखादा अपघात झाला तर त्यामध्ये माझे नाव यावे असे कोणालाही वाटणार नाही. प्रत्येक पदाधिकारी, सदस्य आपल्या आयुष्यातील 25-30 वर्षे घालवून लोकांमधून निवडून येऊन काम करीत असतात. त्यांना असे कधीही वाटणार नाही.

मी आरोप प्रत्यारोप करणार नाही. पण अधिकाऱ्यांचे हे प्रकार पाहिल्यानंतर मी एक बाब सभागृहात अभिमानाने सांगू इच्छितो.

यानंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ KTG/पूर्वी श्री.खंदारे.... 15:35

श्री.किरण पावसकर........

खऱ्या अर्थाने अभिनंदन करावयाचे झाले तर मी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे करणार आहे. पिंपरी-चिचवड महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामावर हातोडा चालविण्याचा निर्णय घेण्यात आला. पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये मोठया प्रमाणात नगरसेवक, महापौर आणि त्या भागातील आमदार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे असताना देखील त्या परिसरातील अनधिकृत बांधकामांवर हातोडा चालविताना त्यांनी कधी मतदारांचा विचार केला नाही. उद्याच्या काळात अपघात होऊन मुलेबाळे दगावण्यापेक्षा अशी अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त केलेली बरी म्हणून त्यांनी धारिष्ट्य दाखविले. जी तातडी त्यांनी दाखविली तशी इतर पक्षाचे नेते दाखविणार आहेत का? मुंबई महापालिका, ठाणे महापालिका, कल्याण-डोंबिवली महापालिका तशी भूमिका स्वीकारणार आहे का? आज अनधिकृत बांधकामे निष्कासित केल्याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेचे उदाहरण द्यावे लागेल.

सभापती महोदय, ठाणे महापालिकेमध्ये ज्या पक्षाची सत्ता आहे त्या पक्षाचे लोकप्रतिनिधी आपल्या पक्षाची बांधकामे वाचविण्यासाठी धडपडताना दिसत असल्याचे 'महाराष्ट्र टाईम्स' या वृत्तपत्रात लिहिले गेले आहे. या ठिकाणी भाषण करीत असताना मुख्यमंत्री गेले कुठे? उप मुख्यमंत्री गेले कुठे? असे प्रश्न उपस्थित केले गेले. दुसरीकडे आपल्याच पक्षाची बेकायदेशीर बांधकामे तोडण्यासाठी का पुढे गेला नाहीत? आमच्या पक्षाची बांधकामे तोडली तरी चालतील, परंतु सर्व अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करा, ही भूमिका स्वीकारली पाहिजे होती.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी पिंपरी-चिंचवडसाठी जे पॅटर्न वापरले, तेथील महापालिकेमध्ये सत्ता आमच्या पक्षाची आहे, नगरसेवक, महापौर आमच्या पक्षाचे असताना त्यांनी जो उपक्रम राबविला, त्याला मी अजितदादा पॅटर्न म्हणेन. अनधिकृत बांधकामावर हातोडा चालविणारा पॅटर्न त्यांनी सुरु केला. इतर पक्षाचे पदाधिकारी हा पॅटर्न वापरणार का?

सभापती महोदय, केवळ इमारतीच्या दुर्घटनेमध्ये जे मृत झाले त्यांच्या कुटुंबीयांना मदत करुन, जखमींना मदत करुन चालणार नाही. या अनधिकृत बांधकामाला मदत केली ते शाम थोरबोले आणि आंधळे यांनी मुंब्रा भागात परवानगी दिलेल्या किती अनधिकृत इमारती आहेत, त्या संदर्भात त्यांच्यावर काय कारवाई केली हे सभागृहाला सांगितले तरच या चर्चेला काही अर्थ राहील. थोरबोले आणि आंधळे यांच्याविरुध्द मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणार आहात का? सलमान खान,संजय दत्त यांच्याविरुध्द कारवाई केली जात असेल तर थोरबोले आणि आंधळे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर........

यांच्या हलगर्जीपणामुळे निष्पाप लोकांना आपले प्राण गमवावे लागले. त्यांनी या इमारतीला परवानगी दिली नसती तर हे निष्पाप प्राण वाचले असते. या दोघांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला जावा, जेणेकरुन भविष्यात अशा प्रकारच्या इमारतींसाठी परवानगी देण्याचे धाडस कोणताही अधिकारी करणार नाही. पुढील पिढीला अनधिकृत इमारतीच्या ढिगाऱ्याखाली चिरडून टाकावयाचे नसेल, अनधिकृत बांधकामाखाली दडपून टाकायचे नसेल तर दोषी व्यक्तींविरुध्द मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा एवढे बोलून मी थांबतो.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मुंब्रा-शिळफाटा परिसरात सात मजली इमारत कोसळून जे लोक मृत्युमुखी पडले त्या सर्व निष्पाप जिवांना आदरांजली अर्पण करतो. भविष्यात मृतांची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सभापती महोदय, हा विषय मर्यादित आहे. बांधलेल्या इमारतीबाबत दुर्घटना घडली. यापूर्वी या सदनामध्ये अशा प्रकारच्या दुर्घटनेसंबंधी चर्चा झालेली आहे. त्यातून सरकारला काही शहाणपण सुचले का हा विषय आहे. हाच विषय डोक्यात घोळत असताना माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांचे संपूर्ण भाषण मी ऐकले. एकदा सर्व गोष्टींचा संताप अनावर झाल्यानंतर मनात साचलेला द्वेष बाहेर पडतो. त्या दृष्टीने त्यांनी संपूर्ण विषयाची मांडणी केली आहे. ते जे सांगत होते ते कोणाला माहित नाही असा भाग नाही. परंतु त्यांच्या सांगण्याचा हेतू हा की, पण कोण लक्षात घेतो? 'पण लक्षात कोण घेतो' या नावाचे नाटक आले आहे. तसे आमच्या या सभागृहात चालले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

अशा प्रकारची राजकीय नीतिमत्ता झाल्यामुळे अशा घटना घडत असतात.

बेकायदेशीर इमारत कोसळल्याचे दृश्य संपूर्ण मुंबई आणि महाराष्ट्राने पाहिलेले आहे. या सदनामध्ये काल कोणी तरी विषय काढला होता व सांगितले होते की, कोणी तरी गेल्यामुळे कोणाच्या तरी कर्तुत्वाला सोनेरी किनार लागते. आज मुंब्रा येथील इमारत पडल्यामुळे माननीय अजित दादांच्या, पिंपरी चिंचवडच्या कर्तृत्वाला सोनेरी किनार लाभेलही. सोनेरी किनार लावत असतांना सोने सुध्दा सुशोभित करण्यासाठी भेसळ करावे लागते व तेव्हाच ते सुशोभित होत असते. परंतु हा मुद्दा त्यावेळेस माझ्या लक्षात आला नाही.

सभापती महोदय, काल सन्माननीय उप मुख्यमंत्री अभिमानाने म्हणाले होते की, आमच्या कडील 40 आमदार तुमच्याकडे आल्यामुळे म्हणून चुकून तुम्ही एकदा सत्तेवर आला होता. होय आम्ही चुकूनच सत्तेवर आलो होतो. गेल्या 60 वर्षात आम्ही चुकून एकदाच सत्तेवर होतो. परंतु याचा अर्थ गेल्या 60 वर्षातील "पापाचे धनी" तुम्ही होता हे तुम्ही मान्य केल्यामुळे मी तुम्हाला मनापासून धन्यवाद देतो. "बघा आम्ही 3 टर्म निवडून आलो आणि पुढच्याही वेळेस आम्हीच येणार." (अडथळा) त्यांनी माननीय श्री. अजित पवारांचे कौतुक केले होते तेव्हा घटना गंभीर नव्हती काय ? त्यावेळेस कोहिनूर मिलचा काय संबंध होता, कोहिनूर मिलमध्ये आग लागली होती, इमारत कोसळली होती, त्यावेळची घडलेली घटना गंभीर नव्हती काय ? प्रत्येक वेळेला आम्ही टीका करतो असे समजू नका. आमच्या महानगरपालिकेत असा प्रकार घडला असेल तर त्याची जबाबदारी त्या महानगरपालिकेची असतेच असते.

सभापती महोदय, ज्यावेळेस आम्हाला समोरुन सांगितले जाते की, "आमची सत्ता आहे आणि आमचीच सत्ता येणार आहे". त्यावेळेस हे तुमचे कर्तृत्व आहे काय ? असा प्रश्न निर्माण होतो. याची जबाबदारी कोणाची हा प्रश्न निर्माण होतो. माननीय श्री.किरण पावसकरजी म्हणाले ते खरे आहे. ते सांगत होते तेव्हा मी अस्वस्थ होतो. प्रामाणिपणे काम करणाऱ्या माणसाला अधिकारी मोजत नाहीत. कोणाचेही चांगले काम घेऊन जा परंतु अधिकारी त्यावेळेला मुद्दे खोडून काढतात. परंतु टेबलाखालून देणाऱ्याचे काम आनंदाने होते त्याला काहीही अडचण येत नाही. अशा पळवाटातून निर्माण झालेली सत्ता, संपत्ती व त्यामुळे अशा प्रकारची विदारक परिस्थिती निर्माण होते. मुंब्रयातील इमारत कोसळली ही बाब गंभीर जरी असली तरी सुध्दा इमारत कोसळण्यामागची जी परिस्थिती आहे त्या परिस्थितीवर या ठिकाणी चर्चा होण्याची आवश्यकता आहे. ..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ठाण्याच्या परिसरात उभ्या राहिलेल्या बेकायदेशीर इमारती आता मोडकळीस आलेल्या आहेत, त्या इमारती केव्हाही पडतील अशी परिस्थिती आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी करिता चटईक्षेत्र वाढवून दिले तर त्या ठिकाणच्या इमारती उभ्या तरी राहतील. रि-डेव्हलपमेंटची चर्चा दोन्ही सदनात अनेक वेळेला झालेली आहे. परंतु त्यावर आजपावेतो काहीही निर्णय घेतला गेला नाही. या संदर्भात कोणतीही वाच्यता आजपर्यंत झालेली नाही. त्यामुळे यासंदर्भात मला ज्ञात केले तर आनंद होईल.

यानंतर श्री. मंगेश ......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आता जे कोणी पाप केले असेल ते केले असेल. परंतु, येथे राहणाऱ्या मंडळींचा काय दोष आहे. ही सर्व मध्यमवर्गीय मंडळी आहेत. ती गरीब वर्गातील, रोजंदारी करणारी मंडळी आहेत. आता त्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. आम्ही तुम्हाला चटईक्षेत्र वाढवून द्या, असे वारंवार सांगत आहोत. मुंबईमध्ये धडाधड चटई क्षेत्र वाढत आहे. म्हाडाकरिता चटई क्षेत्र दिले आहे. चटई क्षेत्र दिले ही गोष्ट चांगली आहे. आमची काही तक्रार नाही. घरे निर्माण व्हावीत, सर्व व्यवस्था व्हाव्यात, हे मान्य आहे. काल सरकारी कर्मचाऱ्यांचा मोर्चा आला होता. तो विषय या विषयाशी संबंधित नाही. आपण फक्त 0.1 चटई क्षेत्र वाढवून द्या, त्यामध्ये संपूर्ण सरकारी कर्मचारी बसतील. पण आपण देत नाही. शासन ते देण्यास तयार नाही. सदर बाबतीत दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी 4-5 वर्षांपासून आग्रह धरला असताना यावर अजून पर्यंत धोरण ठरविलेले नाही.

सभापती महोदय, म्हाडाने इमारती भाड्याने दिल्या होत्या. त्या मालकी हक्काने दिल्यानंतर त्यांच्या पुनर्बांधणीकरिता त्यांना चटई क्षेत्र देऊन टाकायचे की त्यावर घराचा कोटा घ्यायचा की प्रिमियम घ्यायचा, यावरील निर्णय तीन महिन्यात घेतला. निर्णय योग्य की अयोग्य हा माझा विषय नाही. हा प्रत्येकाचा जे राहतात त्यांचा विषय आहे. कोणाला वाटते की, हा निर्णय अयोग्य आहे. कोणाला वाटते की, हा निर्णय बरोबर आहे. आम्हाला वाटते की, हा निर्णय बरोबर नाही. सहकारी पक्षातील सदस्यांना देखील वाटते की, हा निर्णय बरोबर नाही. असा निर्णय ठाण्याच्या बाबतीत घेतला न घेतल्यामुळे निर्माण झालेली ही परिस्थिती आहे का, हाही प्रश्न निर्माण होतो. इमारत कोसळली, माणसे मरण पावली, कोवळी मुले गेली, ते आठवल्यानंतर भावना वेदनामय होत आहेत, बोलण्याच्या पलीकडे जात आहेत. फेब्रुवारी महिन्यात या संदर्भात बातमी आली आहे.

भिवंडीचा विषय निघतो. त्या संदर्भात सदनात चर्चा झाली होती. तत्संदर्भात दोन तास चर्चा होऊन आपण निदेश दिले होते. त्यावेळी किती गोंधळ झाला होता, हे आपल्याला माहीत आहे. त्यावेळी आपण देखील भावना व्यक्त केल्या होत्या. आपल्याला त्या संदर्भात 2 वर्षे प्रयत्न

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

करावा लागला. मग या संदर्भात सरकारचे काय धोरण आहे ? आग लागली, पाणी भरले, माणसे मरण पावली तर काय करायचे ? आपण सभापती स्थानावरून दिलेल्या निदेशाचीही मोजदाद घेतली जात नाही आणि त्यामुळे अशा घटना घडतात. मग या संदर्भातील जबाबदारी कोणाची आहे. अल्प काळ असलेले आम्ही आणि कायम असलेले तुम्ही यांची ही जबाबदारी नाही का ?

सभापती महोदय, मुंब्रा येथील अनधिकृत बांधकाम केलेली इमारत काल पडली. म्हणून ही माहिती पुढे आली का ? तसे आजिबात झालेले नाही. सदर विषयाच्या बाबतीत सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी स्पष्टपणे मत मांडले आहे. विधानसभेत 2 आमदारांमध्ये चकमक घडली, ती सुध्दा आम्ही वर्तमानपत्रात वाचली. तू किती बांधले, मी किती बांधले, या संदर्भात सभागृहात चर्चा झाली. आपण बघा, सभागृहाची काय शान आहे ? विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री. प्रताप सरनाईक यांनी त्यांच्या हॉटेलमध्ये सरकारचे पवित्र काम केले. आपल्याला माहीत असेल की, आपल्याकडे उजेड पाहिजे असेल तर ट्रान्सफॉर्मर आणावे लागतात. सन्माननीय सदस्य श्री. प्रताप सरनाईक यांनी त्यांच्या विहंग कॉम्प्लेक्स की हॉटेल आहे, हे मला माहीत नाही, पण तेथे मोठा जनरेटर आणला आणि त्या करिता वरून पत्र्याची शेड बनविली. सदर पत्रा शेडला नोटीस पाठवून त्यांनी किती बेदरकारपणे काम केले आहे, असे सांगून राज्यात एका आमदाराची बदनामी केली गेली. मी विचारतो की, जनरेटर कोणामुळे आणावे लागले. तुम्ही वीज निर्मिती करीत नाही. तुमच्यामुळे राज्यात भारनियमन आहे. राज्यातील काही शहरे सोडली तर अनेक ठिकाणी वीज नसल्यामुळे लाखो रूपयांचे जनरेटर्स आणावे लागतात.

( नंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्यासंबंधी आपण माननीय आयुक्तांना कधी प्रश्न विचारणार आहात काय ?

माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमान्वये मिळालेली माहिती येथे मांडली. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे म्हणाले की, खालच्या सभागृहातील सन्माननीय सदस्यांची नावे येथे कशी काय घेतली जात आहेत ? ती नावे माहितीच्या अधिकारात प्राप्त झाली होती. कोणत्या भागातील आमदाराच्या भागात किती अनधिकृत बांधकामे आहेत हे त्यांनी सांगितले आहे. मुंब्रा या भागात 450 बांधकामे बेकायदेशीर झालेली आहेत. ती काय एका रात्रीत झालेली नाहीत. कर्तव्यदक्ष आणि कार्यक्षम असे श्री.राजीव सारखे आयुक्त ठाणे महानगरपालिकेला दिलेले आहेत. जनरेटवर पत्र्याची शेड बांधल्यानंतर आमदाराला नोटीस देण्यात येते. आमदार कसे बेकायदेशीर काम करतो हे दाखविण्याचा प्रयत्न करणाऱ्या श्री.राजीव महाशयांना 428 अनधिकृत बांधकामे दिसत नाही काय ? असा माझा प्रश्न आहे. एवढ्या कडक शिस्तीच्या आयुक्ताला मुंब्रा येथील अनधिकृत बांधकामे दिसली नसतील तर त्यास कोणाला जबाबदार धरायचे ? आज प्रशासकीय प्रमुखाची जबाबदारी काय आहे ?

आज मुंबई महानगरपालिकेमध्ये एकाही इमारतीचे बांधकाम आयुक्तांच्या सही शिवाय होत नाही. तीच पद्धत ठाणे महानगरपालिकेमध्ये लागू असणार. नव्हे तशा प्रकारची पद्धतच आहे. त्यांच्या मंजुरीने ती उभी राहिली आहेत. त्यासंबंधी विधान मंडळाच्या सभागृहामध्ये माहितीचा अधिकारामध्ये माहिती आल्या नंतर चर्चा होते. आपण माहिती आयुक्त कार्यालयाच्या आसपास आहोत. 448 अनधिकृत बांधकामाची माहिती ही माहिती अधिकारामध्ये मिळालेली आहे. त्याबाबत मी कोणते धोरण स्वीकारले यासंबंधात त्या आयुक्तांची कोणतीच भूमिका नाही. एकट्या मुंब्रा शहरात किती अनधिकृत बांधकामे आहेत हे त्यांनी वाचून दाखविले आहे.

मुंब्रा येथे बेकायदेशीर बांधकामे उभी राहिल्यामुळे जनतेची देखील सोय झालेली आहे. तेथील लोकसंख्या आता वाढली आहे. आपल्या पक्षाकडे तो मतदार संघ असल्यामुळेच या सरकारने कालच्या अर्थसंकल्पामध्ये मुंब्रासाठी 120.74 कोटी रूपयांची तरतूद केलेली आहे. किती प्रेम आहे ते पहावे. त्या भागाचा विकास केला असेल तर त्याबद्दल माझे दुमत नाही. आपण विकास केला असेल तर मला आनंदच आहे. टप्प्याटप्प्याने असा विकास करत गेला तर आपल्या राज्याच विकास होईल.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, मी खूप मोठे भाषण करावे अशी देखील परिस्थिती नाही. सन्माननीय सदस्य यांनी मांडलेला मुद्दा फार महत्त्वाचा होता. ठाण्याच्या बाजूला प्रती ठाणे वसवले जात आहे. त्याची सीडी मी स्वत: पाहिलेली आहे. नवीन ठाण्याची संकल्पना श्री.राजीव साहेबांचीच आहे. मला आता त्यांच्या बोलण्यावरून समजले की, हे प्रकल्प पूर्वीच मार्गी लावले आहेत. मी नवीन ठाण्याचा हिशोब कशासाठी घेतला होता ? त्याचा अभ्यास का करत होतो ? त्यासंबंधातील प्रात्याक्षिक मी का पाहिले ? 100 कि.मी.च्या परिसरात नवीन ठाणे वसत असेल तर गिरणी कामगारांकरिता तेथे वसविण्यासाठी चांगल्या घरांची सोय दुसरी असू शकत नाही. त्या शंभर कि.मी.च्या परिसरामध्ये एक-दीड लाख गिरणी कामगार वसतील म्हणजे ते मुंबईच्या जवळपास राहतील यादृष्टीने मी त्याकडे पहात होतो.

यानंतर श्रीमती रणदिवे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

तेव्हा मला कळले. ज्यावेळी त्यांनी नवीन ठाण्याचा मुद्दा काढला तेव्हा माझ्या लक्षात आले. माझा मुद्दा असा आहे की, हे सर्व जन्माला का आले? ही पध्दत का निर्माण झाली? हजारो, करोडो, इमारती बेकायदेशीरपणे बांधण्याची हिंमत का आली? मी सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांना सांगू इच्छितो की, याला तुमचा विभाग जबाबदार आहे.यामध्ये तुम्ही सहानुभूती पाहिली आणि त्यातून ही परिस्थिती निर्माण झाली आहे असे माझे मत आहे. याबाबतीत निर्णय चुकला असे मी म्हणणार नाही. आपल्याला माहिती असेल की, या सदनामध्ये मोठी चर्चा झाली. त्यावेळी सन्माननीय मंत्री श्री.राजेश टोपे होते की आपण होता हे माझ्या लक्षात नाही. पण बहुतेक माननीय मंत्री श्री.राजेश टोपे असतील. त्यावेळी आमच्या सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोतेसरांच्या उल्हासनगरचा विषय सुरु होता. उल्हासनगर मध्ये हजारो बेकायदेशीर इमारती उभ्या राहिल्या आहेत,त्या कायदेशीर करा अशी सूचना केली जात होती.अल्पसंख्यांक म्हटल्यानंतर राज्यकर्त्यांची जशी दुखरी नस तयार होते, तसे या महाराष्ट्रामध्ये उल्हासनगर आणि विरार म्हटले की दुखरी नस तयार होते. मग अशा वेळी त्या भागाकरता सरकार झुकते, वाकते किंवा दुर्लक्ष तरी करते. त्यामुळे आयुष्यामध्ये आमदार होण्यापेक्षा भाई होता येते काय हा मुद्दा आहे आणि त्यातून निर्माण झालेली ही कामे आहेत. याठिकाणी सगळे ग्रामीण भाई निर्माण झाले आहेत.

सभापती महोदय, आमदाराने थप्पड मारली तर आमच्या महाराष्ट्रभर, देशभर कोण आहेत ते आमदार? अमुक आहे, तमुक आहे असे बोलले जाते. या विधीमंडळामध्ये कोणी तरी पाप केले, त्याची आम्हाला लाज वाटते, शरम वाटते आणि आम्ही त्याचा निषेध केला. पण यांच्यापुढे किती मऊ? भाई लोकांपुढे कॅप काढून ठेवणारे पोलीस आम्ही पाहिले आहेत. अशा वेळी जेव्हा सरकारची अब्रू भाईंच्या पायाशी बसते तेव्हा लाज वाटते. पण त्याबाबतीत सरकारला काही वाटत नाही आणि मग त्यातून ही पापे निर्माण होतात. पण त्यांच्या विरोधात बोलावयाचे तर आम्हाला प्रश्न पडतो की, आमचे काय होईल अशी तुमच्या सत्तेमध्ये महाराष्ट्रातील परिस्थिती आहे.

सभापती महोदय, उल्हासनगर मधील अनधिकृत कामांबाबत पाहिले असेल की, रस्त्यावरचे खांब हे त्यांच्या घरातून बाहेर आले आहेत,इतके अनधिकृत. तेथे जो रस्ता आहे तेथील दिव्याचे जे खांब आहेत ते खांब सुध्दा त्यांच्या इमारतीच्या गॅलरीतून बाहेर आले आहेत. इतकी तेथे बेकायदेशीर इन्क्रोचमेंट झाली आहे. तेथे टॉवर आहेत. उल्हासनगर वाचविण्यासाठी या सदनामध्ये कायदा आणल्याचे मी पहिल्यांदा पाहिले. बेकायदेशीर कामे नियमित करणारा कायदा फक्त ......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

उल्हासनगरच्या नावाने या सदनामध्ये मांडला गेला. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त खूष झाले. ते नेहमी याबाबत सदनामध्ये मुद्दा मांडत असत आणि मग या सदनामध्ये कायदा झाला. मग उल्हासनगर मधील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचा महाराष्ट्र विधान परिषदेमध्ये कायदा आला आणि तो विधान सभेमध्ये पाठविल्यानंतर तेथेही तो मंजूर झाला. पण ती माणसे एवढी बेरड की शासनाने त्यांचा सन्मान केला. ते याठिकाणी वर्षानुवर्षे रहात आहेत. त्यामुळे याबाबतीत दंड भरा, त्यासंदर्भात रक्कम भरा आणि ते रेग्युलराईज करा. पण ते अजून केलेले नाही. तेव्हा तुम्ही एवढे करुनही याचा परिणाम असा झाला की, या राज्यामध्ये पाहिजे तेवढी बेकायदेशीरपणे कामे करा पण राज्यकर्त्यांना स्वत:बरोबर ठेवा. अशा वेळी उल्हासनगरच्या धर्तीवर उद्या मुंब्यासाठी सुध्दा कायदा होऊ शकतो अशा प्रकारची जणू खात्री आणि हमी या शासनाने दिली आहे आाि त्यामुळेच एवढी कामे उभी राहिली असा माझा आक्षेप आहे. शासनाने अशा प्रकारची एक पध्दत निर्माण करुन दिली. याबाबतीत विधी मंडळामध्ये हजारो कामे मंजूर करण्याचा कायदा झाला. मग ही बाब फक्त मुंब्रा येथेच का झाली, तर मी उद्या तेथे काही बांधकाम केले तरी कायद्याची खात्री आहे.

सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी सांगितले ते बरोबर आहे. या गोष्टी ठाण्यामध्ये का होतात? मी आपल्या माहितीसाठी एक गोष्ट सांगतो आणि ती मी माझ्या काळापासून रेटलेली आहे म्हणून मला त्याचा अभिमान आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

कोणत्याही बेकायदेशीर बांधकामाच्या संरक्षणाकरिता लोकप्रतिनिधी उभा राहिला तर त्याचे लोकप्रतिनिधीत्व तातडीने सायंकाळपर्यंत रद्द करण्याचा कायदा आहे. असा कायदा असताना बेकायदेशीर बांधकामे तोडण्याकरिता प्रशासनाला कोणी अडविले आहे ? महानगरपालिकेने ठराव केला तरी तो ठराव स्वीकारावयाचा किंवा नाही याची जबाबदारी कायद्याने प्रशासनाला दिलेली आहे. महानगरपालिकेने कोणताही प्रस्ताव केला आणि तो नियमात बसत नसेल तर त्या ठिकाणी असलेला आय.ए.एस. अधिकारी प्रस्ताव नाकारुन त्या संबंधीचा अहवाल मंत्रालयात पाठवू शकतो. सत्तेत बसणाऱ्यांच्या सामुदायिक सामर्थ्याला नमविण्याचे सामर्थ्य महानगरपालिका कायद्यामध्ये आहे.

सभापती महोदय, उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यात आली त्याप्रमाणे आपण देखील अनधिकृत बांधकामे करुन ती अधिकृत करुन घेऊ असा विचार करणारे देखील लोक असतात. मतदारसंघात बेकायदेशीर बांधकाम करण्याचा हेतू असला तरी लोक मरतील असे बांधकाम करा असे कोणी सांगितले नसेल. हा त्यातील भाग वेगळा आहे. या विषयावर फार काही बोलावे असा प्रसंग नाही. झोपडपट्टी रहावयास नको येथे वर्षभर फुकट रहावयास मिळत होते म्हणून ते लोक खूष झाले होते. त्या इमारतीमध्ये असलेल्या क्लासमधील कोवळ्या मुलांचा दुर्दैवी मृत्यू झालेला आहे. मनाला वेदना देणारी ही घटना आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव उपस्थित आहेत. माझी आपल्यामार्फत त्यांना विनंती आहे की, उल्हासनगर येथील अनधिकृत इमारती अधिकृत करण्यासंबधीचा आलेला प्रस्ताव शेवटचा असला पाहिजे. यापुढे असा प्रस्ताव येता कामा नये.

सभापती महोदय, लकी कंपाऊंडमधील इमारत कोसळून 27 जणांचा मृत्यू झालेला आहे, तसेच त्यामध्ये कोवळ्या मुलांचा मृत्यू झालेला आहे. त्यांच्या घरात आकांत उडालेला आहे. तेव्हा या प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाचे प्रमुख म्हणून श्री.आर.ए.राजीव यांच्यावर कारवाई केली पाहिजे. किमान त्यांची तातडीने आज सायंकाळपर्यंत बदली केली पाहिजे अशी माझी ठोस मागणी आहे. अशी कारवाई झाली तर शासन या प्रकरणी गंभीर आहे असे आम्ही समजू. अन्यथा चर्चा झ ाली. आम्हाला थातूरमातूर उत्तरे मिळाली. जाणारे गेले, बिल्डर पळाले, काय कारवाई व्हायची ती होईल असे होता कामा नये.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे आपण फक्त ही इमारत पडल्यानंतर, ती इमारती पडल्यानंतर चर्चा करायची, परंतु कोणावरही काहीही कारवाई करायची नाही अशी परिस्थिती असता कामा नये एवढीच माझी विनंती आहे. या दु:खद प्रसंगी आणखी जास्त काही बोलावे असा हा विषय नाही. तेव्हा माझ्या भावना व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पूर्वी मुंब्रा शहर हे हजार वस्तीचे शहर होते. परंतु आज मुंब्रा शहरामध्ये लाखोची वस्ती वसलेली आहे. आपण आपल्या प्रयत्नाने मुंब्रा येथे बायपास काढला. त्या बायपासच्या बाजूला देखील इतकी वस्ती वाढत आहे की, आता मुंब्रा येथे दुसरा बाय-पास काढायला जागा शिल्लक राहिलेली नाही.

सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी या घटनेवर भाष्य केलेले आहे. तेव्हा मी जास्त बोलणार नाही. मला या ठिकाणी एवढेच सांगायचे आहे की, या अनधिकृत बांधकामाबाबत लोकप्रतिनिधींनी, समाजसेवकांनी ज्या अधिकाऱ्यांकडे एस.एम.एस.द्वारे तक्रारी केल्या होत्या, माहितीच्या अधिकाराखाली माहिती घेऊन ती सादर केली होती असे असताना संबंधित अधिकाऱ्यानी त्याबाबत काहीही कारवाई केली नाही. त्या अधिकाऱ्या विरुध्द शासन काय कारवाई करणार हे येथे सांगावे

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी येथे एसएमएस दाखविले. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांवर प्रामुख्याने कारवाई झाली पाहिजे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

या इमारतीचे बांधकाम अनधिकृत होते येथपर्यंत ठीक आहे. परंतु त्या ठिकाणी वीज कनेक्शन, पाणी कनेक्शन किंवा इतर सोयी-सुविधा ज्या ज्या अधिकाऱ्यांनी उपलब्ध करुन दिल्या त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

महोदय, अनिस कुरेशी आणि त्याच्या भावाने सरकारी जमिनीवरील नाल्यावर अशा प्रकारे अनधिकृत इमारत बांधण्याची हिंमत कोणाचा तरी वरदहस्त असल्याशिवाय केली नाही. त्यांना कोणाचा वरदहस्त होता याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा. महोदय, या चर्चेच्या निमित्ताने माझी एकच मागणी आहे की, संबंधित बिल्डरची मालमत्ता जप्त करुन, त्या मालमत्तेतून या घटनेतील मृत व जखमींच्या कुटुंबीयांना तातडीने मदत केली पाहिजे. तसेच या संपूर्ण घटनेस जे जे जबाबदार आहेत त्यांच्यावर केवळ एखाद्या-दुसऱ्या कलमान्वये गुन्हा दाखल करुन भागणार नाही तर त्यांच्यावर मोक्का लावून कारवाई केली पाहिजे. अशा प्रकारची कारवाई केली तरच या पुढे अशी बेकायदेशीर बांधकामे होणार नाहीत. आपण जर त्यांच्यावर 302 कलमान्वये गुन्हा दाखल केला तर त्यांना तीन महिन्यांनी जामीन मिळेल आणि पुन्हा बेकायदेशीर इमारतींची बांधकामे करण्यास ते तयार होतील.

महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला आश्वासन हवे आहे की, केवळ बिल्डरवर नव्हे तर संबंधित अधिकाऱ्यांना मोक्का लावला पाहिजे. एवढी मोठी दुर्घटना घडल्यानंतर सुध्दा ही मंडळी राजरोसपणे फिरत आहेत. त्यांना वाटते की, आमचे कोणीही वाकडे करु शकत नाही. या निमित्ताने मी माननीय मंत्र्यांना विचारतो की, या लोकांना आपण मोक्का लावणार काय ? या प्रकरणात राज्य सरकारचा सहभाग नाही. परंतु आमदारांनी, लोकप्रतिनिधींनी तक्रार केल्यानंतर अधिकारी त्यांच्याकडे ज्या पध्दतीने बघतात त्या बाबत दखल घेऊन अधिकाऱ्यांना अद्दल घडविली पाहिजे. अनधिकृत बांधकाम प्रकरणी, त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याबाबत राज्य सरकार कठोर आहे असा संदेश या माध्यमातून गेला पाहिजे. नाही तर या विषयावर केवळ चर्चा होईल, माननीय मंत्री महोदय उत्तर देतील आणि दोन-चार दिवसांत हा विषय सर्व जण विसरुन जातील. त्यामुळे या घटनेस जे जे जबाबदार आहेत त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन मोक्का लावला पाहिजे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, मुंब्रा-कौसा हा भाग रायगड जिल्ह्याच्या बॉर्डरवर आहे. परंतु रायगडमध्ये अशी अनधिकृत किंवा कमकुवत बांधकामे नाहीत. रायगड जिल्ह्यातील कोणतीही मालमत्ता अशी दिसून येत नाही. रायगड जिल्ह्यात नाहूड, तळोजा हा भाग येतो. मुंब्रा-कौसा आणि रायगड हे जवळजवळ असताना या दोन भागातील फरक आपल्याला कळला पाहिजे. महोदय, माझ्याकडे बोलण्यासारखे खूप काही आहे. परंतु माननीय श्री.रावते साहेबांनी सांगितल्यानुसार मी या विषयी जास्त बोलणार नाही.

महोदय, बिल्डर मंडळी दादागिरी आणि गुंडगिरीच्या ताब्यात गेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या विषयी जो मुद्दा मांडला तो मुख्य असून, त्याची दखल घेतली पाहिजे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .......

सभापती महोदय, त्या ठिकाणी जे नवीन मुंब्रा वसत आहे तेथील सर्व इमारती अशाच कमकुवत आहेत. त्यांची पाहणी झाली पाहिजे. त्यांचा दर्जा कसा आहे हे तातडीने पाहिले पाहिजे. नाही तर या ठिकाणी परत मुंब्रा येथील इमारत पडल्याची चर्चा करावी लागेल. जे नवीन मुंब्रा तयार होत आहे त्या ठिकाणी हजारो अशा इमारती आहेत. ही सर्व कामे बेकायदेशीर होत आहेत.

सभापती महोदय, यामध्ये गावठाण विस्ताराचा एक महत्वाचा मुद्दा आहे. ग्रामीण भागातील गावे या महानगरपालिकेत आलेली आहेत त्यांचा आपण योग्य प्रकारे गावठाण विस्तार केलेला नाही. आमचे मित्र श्री. मुझफ्फर हुसेन म्हणाले की, गावठाणामध्ये वाटेल तशा इमारती बांधणार आणि नंतर 4 एफएसआय घेऊन टॉवर बांधण्याची प्रथा एमएमआरडीए एरियामध्ये वाढत आहे. ते थांबविण्याची क्षमता आज या शासनामध्ये आहे की नाही हे पाहिले पाहिजे. मी पुनरुच्चार करतो की, या सर्व अधिकाऱ्यांवर आणि संबंधित बिल्डरवर मोक्काखाली कारवाई करुन या राज्यातील बेकायदेशीर काम करणाऱ्या लोकांना वेगळा संदेश गेला पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

**उप सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे बोलतील.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या चर्चेसाठी आपण वेळ ठरवून दिलेला आहे. या ठिकाणी अत्यंत गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे आणि जसजशी चर्चा लांबेल तसतसे त्याचे गांभीर्य कमी होते. म्हणून माझी अशी विनंती आहे की, या चर्चेमध्ये मर्यादित सन्माननीय सदस्यांनी बोलावे. या चर्चेचे गांभीर्य कमी होऊ नये अशी माझी विनंती आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/

श्री. निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, काल संध्याकाळी साडेपाच वाजता ठाणे शिळफाटा नजीकच्या मुंब्रा येथील डायघर मधील लकी कंपाऊंडमध्ये सात मजली इमारत पत्त्यासारखी कोसळली. या अतिशय दुर्दैवी घटनेमध्ये 33 व्यक्ती मृत्युमुखी पडल्या आणि 40 व्यक्ती जखमी झालेल्या असून त्यापैकी 13 व्यक्ती अत्यंत गंभीररीत्या जखमी झालेल्या आहेत. मी या ठिकाणी आवर्जून सांगू इच्छितो की, ज्या ठिकाणी शव ठेवतो ती त्या ठिकाणची मॉच्यूरी फूल झालेली असल्यामुळे इकडच्या बॉडीज आम्ही जे.जे.हॉस्पिटलमध्ये शिफ्ट करु शकतो का अशी पोलीस प्रशासने मागणी केलेली आहे. अशी जी भयंकर घटना घडलेली आहे त्या सात मजली इमारतीमध्ये 25 फ्लॅट्स आहेत आणि त्यामध्ये राहणारे लोक मजूर व गरीब होते. या इमारतीचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले होते. दोनच महिन्यात ती सात मजली इमारत बांधण्याचे काम श्री जमील कुरेशी आणि श्री. सलीम शेख या बिल्डरांनी केले ते अजूनही फरारी आहेत. त्यांच्यावर आयपीसीचे कलम 304, 336, 337, 338 आणि 34 लागू केलेले आहेत. या ठिकाणी जर माननीय गृहमंत्री किंवा गृह राज्यमंत्री उपस्थित असते तर त्यांनी या संदर्भातील मुद्दे लिहून घेतले असते. पण माननीय मंत्री महोदय त्यांच्या उत्तरामध्ये योग्य ते उत्तर देऊ शकतील असा मला विश्वास आहे. त्यांच्यावर कलम 302 खाली सुध्दा योग्य कारवाई होऊ शकेल का हे पहावे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, ज्यावेळी अशी अनधिकृत इमारत बांधली जाते त्यावेळी तिकडचे वॉर्ड ऑफीसर काय करतात ? त्या ठिकाणी एकच नव्हे तर 3 इमारती श्री. जमील कुरेशी आणि श्री. सलीम शेख यांच्या आहेत. ते तीन इमारती बांधत होते त्यापैकी एक इमारत पडली. एका इमारतीतील लोकांना बाहेर काढले आणि दुसऱ्या इमारतीचे काम चालू आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी तिकडचे वॉर्ड ऑफीसर श्री. आंधळे यांचा उल्लेख केला. ते खरोखरच आंधळे आहेत का आणि त्यांना ही इमारत बांधताना दिसले नाही का ? श्री. थोरबोले तसेच अगोदरचे जे अधिकारी होते त्यांना या इमारती दिसल्या नाहीत का ? या इमारतीचे बांधकाम सुरु झाल्यावर त्याची छायाचित्रासह लेखी तक्रार श्री. मंगल पाटील आणि श्री. शरद पाटील यांनी महानगरपालिकेकडे करुनही महापालिका प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

श्री.निरंजन डावखरे.....

त्यामुळे श्री.जमील कुरेशी श्री.सलीम शेख यांच्या विरोधात गुन्हे दाखल केलेले आहेत. त्याचप्रमाणे या दोन वॉर्ड ऑफिसर्सविरुध्द गुन्हे दाखल केले जातील काय ? त्या भागात आजही अनधिकृत बांधकामे सुरु आहेत. त्या बांधकामांकडे या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे.

काल जी इमारत कोसळली आहे तिच्या तळ मजल्यावर क्लास सुरु होता. त्या क्लासमधील 3 लहान मुले सध्याही अडकलेली आहेत की नाही याची माहिती मिळत नाही. ती माहिती मंत्री महोदयांनी कृपया द्यावी. जुन्या अनधिकृत इमारतींमध्ये गरीब लोक राहत असल्यामुळे त्यांचे पुनर्वसन करावे अशी दोन्ही सदनातील सन्माननीय सदस्य मागणी करीत आहेत. त्याचा शासनाने विचार करावा अशी विनंती करतो. परंतु सध्या जी अनधिकृत बांधकामे सुरु आहेत त्याच्या विरोधात शासनाने कठोर कायदा करण्याची आजच्या काळाजी गरज आहे. ठाण्यामध्ये 1998 सालात "साईराज" नावाची इमारत पडली होती. त्या दुर्घटनेत 17 व्यक्ती मरण पावल्या होत्या. त्यानंतर 2007 साली बोरीवली येथे "लक्ष्मीछाया" इमारत पडल्यामुळे 26 व्यक्ती मृत्युमुखी पडल्या होत्या. कालच्या घटनेत 33 जण मरण पावले आहेत. आणखी किती लोकांचा बळी गेल्यावर शासनाला जाग येणार आहे ?

वि.प.वि.क्रमांक 7 या विधेयकामध्ये ज्या वॉर्डमध्ये अनधिकृत बांधकाम सुरु असेल त्या विभागातील वॉर्ड ऑफिसरवर जबाबदारी निश्चित करण्याची तरतूद केलेली आहे. ही तरतूद असतानाही तेथील वॉर्ड ऑफिसर कर्तव्यात कसूर करीत असतील किंवा कामामध्ये निष्काळजीपणा दाखवित असतील तर त्यांच्याविरुध्द सक्त कारवाई करावी अशी मी आपल्याला विनंती करतो. "Past is never a mistake, if you learn from it." जुन्या अनधिकृत इमारतींमध्ये राहणाऱ्या लोकांना योग्य तो निवारा मिळाला पाहिजे ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. परंतु त्याचा अर्थ असा नाही की, पूर्वीच्या अनधिकृत इमारतींना संरक्षण द्यावे आणि आता सुरु असलेल्या नवीन अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन द्यावे. असे होता कामा नये.

सभापती महोदय, कालच्या दुर्घटनेमध्ये काही गोष्टी समोर आलेल्या आहेत. एका केसमध्ये कुटुंबातील वडील जीवंत राहिले आहेत, पण त्यांचे संपूर्ण कुटुंब मृत्युमुखी पडले आहे. काही कुटुंबातील लहान मुली जीवंत राहिल्या आहेत. परंतु त्यांचे आई-वडील मरण पावले

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे........

आहेत. त्यामुळे त्या मुलींजवळ बसण्यासाठी घरातील कोणीही नाही. त्यांचे पालकत्व स्वीकारण्यास जवळचे कोणीही नाही. त्यामुळे या दुर्घटनेत मरण पावलेल्यांच्या वारसांना तसेच जखमींना शासनाने तातडीने आर्थिक सहाय्य करावे अशी मी विनंती करतो. तसेच पुन्हा एकदा प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

--------

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3....

श्री.मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहामध्ये मुंब्रा येथे जी दुर्घटना घडली आहे त्यासंबंधी सभागृहामध्ये अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मुंब्रा येथील दुर्घटनेमध्ये काहीजण जखमी झालेले आहेत. जे मरण पावले आहेत त्यांना मी श्रध्दांजली वाहतो. ठाणे जिल्ह्यामध्ये अनधिकृत बांधकामांच्या व्यवसायाला 1979 सालापासून सुरुवात झाली. या देशामध्ये अर्बन लॅण्ड सिलिंग कायदा लागू करण्यात आला. एमएमआरडीए रिजनमध्ये 8 कि.मी.पर्यंतची जागा युएलसी अंतर्गत संपादित होईल या भीतीपोटी त्या त्या ग्रामपंचायतींनी व त्या भागातील शेतकऱ्यांनी बिल्डिंग व्यवसायामध्ये नसतानाही बिल्डिंग बांधण्याच्या व्यवसायाला सुरुवात केली. भिवंडी, उल्हासनगर, ठाणे, मिरा-भाईंदर या सर्व ठिकाणी बांधण्यात आलेल्या इमारती धोकादायक झालेल्या आहेत. तसेच या सर्व इमारती ग्रामपंचायतींच्या काळात बांधण्यात आलेल्या आहेत. सध्या जी अनधिकृत बांधकामे सुरु आहेत हा विषय वेगळा आहे. पण ग्रामपंचायतींच्या काळात 3 एफएसआय, 4 एफएसआय किंवा 5 एफएसआय वापरुन किंवा वाटेल तसे बांधकाम करण्यात आले होते. त्यामुळे उल्हासनगर असेल किंवा अन्य ठिकाणी कोणतेही काम नियमानुसार झालेले नाही.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी एका बाल्कनीतून दुसऱ्या बाल्कनीमध्ये उडी मारता येईल इतके कमी अंतर दोन इमारतींमध्ये असते असे सांगितले होते. त्या बाल्कनीतून उडीच मारता येते असे नाही तर मीडियांनी त्या बाल्कनींना किसींग बाल्कनी असे नाव दिलेले आहे.

यानंतर श्री.भोगले.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ श्री.खंदारेनंतर 16:20

श्री.मुझफ्फर हुसेन......

इंफ्रास्ट्रक्चर नाही, ओपन स्पेस नाही अशा प्रकारची अनधिकृत बांधकामे त्या परिसरात उभी राहिली आहेत. या सर्व इमारती कोसळण्याच्या अवस्थेत आहेत. विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात अनेकदा या विषयाबाबत चर्चा होऊनही शासनाने ठोस निर्णय घेतलेला नाही. या इमारतींची पुनर्रचना करण्यासाठी 3 चा एफएसआय द्यायचा, 4 चा एफएसआय द्यायचा की 5 चा एफएसआय द्यायचा हे महत्वाचे नसून त्या ठिकाणच्या इमारतीमध्ये राहणाऱ्या लोकांचे प्राण कसे वाचवू शकतो याबाबत विचार करणे महत्वाचे ठरेल. त्या परिसरात पायाभूत सुविधांशिवाय अनधिकृतपणे इमारती उभ्या केलेल्या आहेत. चालण्यासाठी धड रस्ता देखील नाही.

सभापती महोदय, ठाणे शहरातील वर्तकनगर सारख्या भागात नव्याने अनधिकृत बांधकामे उभी रहात आहेत हे तुम्ही आम्ही निवडणूक प्रचाराच्या काळात एकत्रपणे फिरताना पाहिले आहे. ठाण्याची परिस्थिती काय आहे हे तुम्हा आम्हाला चांगले माहित आहे. ग्रामपंचायत काळात झालेली अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यापूर्वी क्लस्टर डेव्हलपमेंट प्लॅन तयार करावा लागेल. जेणेकरुन यातून योग्य तो मार्ग निघू शकतो. सभापती महोदय, जवळजवळ 70 ते80 हजार इमारती ठाणे जिल्हयात ग्रामपंचायतींच्या काळात बांधण्यात आलेल्या आहेत. या इमारतींमधून 4.5 ते 5 लाख लोक आपला जीव मुठीत घेऊन जगत आहेत. या इमारती कोसळण्याच्या मार्गावर असल्यामुळे शासनाने क्लस्टर डेव्हलपमेंट प्लॅन तयार करावा असे मी या चर्चेच्या माध्यमातून शासनाला सूचित करु इच्छितो.

सभापती महोदय, नगरपालिका आणि महापालिकांनी आपापल्या दृष्टीकोनातून शासनाकडे प्रस्ताव पाठविलेले आहेत, परंतु त्या प्रस्तावांबाबत गांभीर्याने विचार झालेला नाही. त्या काळात नागरी जमीन कमाल धारणा कायदा आल्याकारणाने अनधिकृत बांधकामे उभी राहिली. ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रुपांतर करण्याचा निर्णय घेण्यास शासनाने विलंब लावला. नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर करण्याचा निर्णय घेण्यास शासनाने विलंब लावला. महापालिका स्थापन झाली, नगरपालिका स्थापन झाली. परंतु त्या त्या शहराचा विकास आराखडा वेळेवर तयार झाला नाही. मध्यंतरीच्या काळात अनधिकृत बांधकामाला चालना मिळाली. भ्रष्टाचाराला उधाण आले. आज प्रशासन पूर्णपणे भ्रष्टाचारात बुडाले आहे. याचे कारण असे की, राज्य सरकारने उचित निर्णय घेण्यासाठी विलंब लावला आहे.

..2..

05-04-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3F.2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ श्री.खंदारेनंतर 16:20

श्री.मुझफ्फर हुसेन......

सभापती महोदय, तारापूर, चिंचणी, पालघर, अंबरनाथ, बदलापूर, शहापूर या भागामध्ये 1979 सालातील ग्रामपंचायतीच्या काळाची परिस्थिती निर्माण व्हावयास सुरुवात झालेली आहे. आजपासून 15-20 वर्षानंतर शहापूरमधील एखाद्या इमारतीच्या दुर्घटनेसंबंधी या सभागृहात चर्चा करण्याची वेळ आली तर त्या गोष्टीचे आश्चर्य वाटता कामा नये. म्हणून क्लस्टर डेव्हलपमेंट प्लॅनबाबत शासनाने निर्णय घेतला पाहिजे. ज्या ज्या परिसरात अनधिकृत बांधकामे उभी राहतात तेथील विकासकावर कारवाई होते. माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी योग्य मागणी केली आहे. ज्या कलमाखाली विकासकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तीच कलमे लावून महापालिकेच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला पाहिजे अशी मागणी करुन माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

-----------

नंतर 3जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 च्या अल्पकालीन चर्चेला समर्थन देत असतांना या घटनेमध्ये जे लोक मृत्युमुखी पडले त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो व या चर्चेवर माझे मत मांडण्यास सुरुवात करतो.

सभापती महोदय, शिळफाटया जवळील लकी कंपाऊंड मधील इमारत कोसळून आतापर्यंत 39 च्या वर लोक दगावले आहेत. कदाचित हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. काल ही इमारत कोसळल्यामुळे आपण त्या घटनेवर चर्चा करीत आहोत. या सदनामध्ये अशा प्रकारची चर्चा करतांना अपेक्षित काय आहे ? झालेली घटना, या घटनेमागील दोष, या घटनेमागील व्यक्ती, या घटनेमागची संस्था यांच्या संदर्भात दोषारोपण करीत असतांना मीमांसा करणे व अशा पध्दतीच्या घटना पुढे घडणार नाही याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या इमारतीच्या संदर्भातील माहिती एका वर्तमानपत्रातही आलेली आहे. ही इमारत पूर्णपणे अनाधिकृत होती. ही इमारत वन विभागाच्या जागेवर होती की, महानगर पालिकेच्या जागेवर होती याबद्दल वाद आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ही इमारत वन विभागाच्या हद्दीतील नाही असा खुलासा केलेला आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र दिले आहे. माझ्या माहिती प्रमाणे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी वन विभागाला पत्र लिहून सांगितले होते की, ही इमारत तुमच्या हद्दीमध्ये असल्यामुळे तुम्ही योग्य ती कारवाई करावी. महानगरपालिकेने वन विभागाला एकदा नाही तर दुसऱ्या वेळेस रिमाईंडर पाठविले होते. आयुक्तांनी नगरविकास विभागाला पत्र पाठविले परंतु त्यानंतरही या इमारतीच्या संदर्भात कारवाई झाली नाही. या इमारतीमध्ये दोन दिवसापूर्वी वरच्या मजल्यावर पाण्याची टाकी बांधण्याचे काम सुरु असतांना स्लॅब कोसळून खालच्या लोकांना त्रास झाला होता. त्यामुळे या इमातीमधील लोक पोलीस स्टेशनमध्ये गेले होते. पोलीस स्टेशनला तक्रार झाली नाही, कारवाई केली नाही. त्यांनी यासंदर्भात ठाणे महानगरपालिकेला सांगितले की, नाही हे मला माहिती नाही. परंतु ही इमारत पत्त्यासारखी कोसळल्यामुळे आपण त्यावर चर्चा करीत आहोत.

सभापती महोदय, कालची घडलेली घटना खूप गंभीर आहे. अशा प्रकारची घटना पहिल्यांदाच घडली असे काही नाही. परंतु गंभीर आणि दु:खद घटना एवढयासाठी वाटते की,

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार......

सातत्याने, तत्पर कार्यक्षम असलेल्या सरकारच्या काळात अशा घटना थांबत नाहीत. अशा घटना घडून गेल्यानंतरही त्यातून हे शासन काही शिकत नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे यांनी गोंविद टॉवर, लक्ष्मी छाया ते लकी कंपाऊंड पर्यंतची यादी दिलेली आहे. या ज्या घटना आहेत त्या घटना त्याच पध्दतीने होत आहेत, तशाच पध्दतीने होत आहेत. असे असतांना आपण नागरिकरणाच्या समस्येवर बोलतो. माझ्या माहिती प्रमाणे ठाणे जिल्हयातील प्रायव्हेट फॉरेस्ट आणि डेसिग्नेटेड फॉरेस्टमध्ये 13824 इमारती आहेत. आज एक इमारती पडली आहे. या 13824 इमारती पडतील अशी माझी इच्छा नाही. परंतु ज्यावेळेला अधिकृत आणि अनाधिकृतची चर्चा करु त्या वेळेला 13824 इमारतीच्या संदर्भात चर्चा होण्याची अपेक्षा आहे. परंतु अशा घटना घडतात त्यावेळेला या सदनात चर्चा होत असते. या घटनेला महापालिका जबाबदार आहे, फॉरेस्ट विभाग जबाबदार आहे की, महसूल खाते जबाबदार आहे याबाबत आम्हाला सरकारकडून माहिती मिळणे अपेक्षित आहे.

मुंब्रा परिसरामध्ये 2 हजार इमारती अनाधिकृत आहेत. यामध्ये मग चाळी असतील, दोन मजली इमारती असतील किंवा अजून काही असेल. या विषयाच्या संदर्भात आम्हाला विषमतेचे वातावरण निर्माण करावयाचे नाही. परंतु यासंदर्भात अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर असे दिसून येते की, मुंब्रा भागात अशा प्रकारची कारवाई करण्यासाठी शुक्रवारच्या अगोदर दोन दिवस व शुक्रवारच्या नंतर दोन दिवस अधिकाऱ्यांना जाताच येत नाही.

यानंतर श्री. मंगेश.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती डॉ. रणजित पाटील)**

ॲड. आशिष शेलार ....

मला विषमतावाद पसरावयाचा नाही. पण सत्य परिस्थिती सदनासमोर मांडली नाही तर आपण ही चर्चा करून काहीही होणार नाही. अपेक्षित बाबी उत्तरात येतील की नाही, हे माहीत नाही. त्यामुळे या संदर्भात सदनासमोर माहिती सांगण्याची आवश्यकता आहे. शुक्रवार पूर्वी दोन दिवस बुधवार झाला आणि नंतर दोन दिवस रविवार, सोमवार झाला. पोलिसांचे 1-2 दिवस प्रोटेक्शन मिळत नाही. आठवडे निघून गेले. आठवड्यांचे महिने झाले. महिन्यांचे वर्ष झाले. इमारत पडली. मग या संदर्भात संबंधितांवर कारवाई न करणाऱ्यांवर कारवाई करा, सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा, कलम 302 खाली गुन्हा दाखल करा. आपल्याला जे शक्य होत असेल ते करा, मोक्का लावा. पण ही कारवाई करणार कशी ? ही स्थिती केवळ मुंब्रा येथील नाही. चर्चगेट रेल्वे स्टेशनच्या ठिकाणी हॉकर्सला बंदी आहे. पण तेथून दीड कि.मी. अंतरावर महम्मद अली रोडच्या दिशेने गेलो की, रस्त्यावरून चालणाऱ्या माणसाला बंदी आहे. केवळ दुकान आणि हॉकर्सच असतात, अशी स्थिती आहे. त्यामुळे कारवाई होणार कशी, हा मूळ प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर आणि उत्तराचे दायित्व आणि त्या दायित्वातून अधिकार हे नगरविकास खाते घेणार आहे का, हा माझा प्रश्न आहे.

मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणापासून आतापर्यंत चर्चा ऐकत होतो. सन्माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले की, सगळे काही बाहेर आले पाहिजे. वन विभागाने नगरविकास विभागाला पत्र दिले. नगरविकास विभागाचे खालच्या स्तरावर नियंत्रण नाही. अनधिकृत बांधकाम शोध पथक हे महसूल खात्याचे पथक आहे, ते कार्यरत नाही. गुणवत्तेचे पालन कोण करणार आहे, माहीत नाही. कोणती इमारत कशी तयार झाली, किती दिवसांत तयार झाली, हे पाहिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर साहेब म्हणाले की, हा जादूचा खेळ नाही की कांडी फिरवली आणि इमारत उभी राहिली. फाऊंडेशनचे काय झाले, गुणवत्तेचे काय झाले, हे कोण पाहणार आहे ? या संदर्भातील पॅरामिटर्स काय आहेत, ते चेक करणारी यंत्रणा कुठे आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2

ॲड. आशिष शेलार ....

शेल्टर फॉर ऑल ॲण्ड ॲफॉर्डेबल हाऊसिंग या दोन्ही प्राथमिक जबाबदाऱ्या केंद्र सरकारने राज्य सरकारवर टाकल्या. त्यासाठी केंद्र शासनाची हाऊसिंग पॉलिसी झाली. राज्याने हाऊसिंग पॉलिसी केली. हाऊसिंग मिनिस्टर कोण आहे हे मी विचारणार नाही. हाऊसिंग पॉलिसीमधील आवश्यक तेवढे काढायचे असे चेरीपिकिंग सुरू आहे.

सभापती महोदय, शेल्टर फॉर ऑल ॲण्ड ॲफॉर्डेबल हाऊसिंग यांचे काय झाले, हे माहीत नाही. सदर बाबतीत नियम आहेत. नियम असा आहे की, नॅशनल बिल्डिंग कोड सर्व राज्यांनी पाळला पाहिजे. तो पाळला नाही तर एमआरटीपी अंतर्गत कोणता कायदा आपल्याला बंधनकारक ठरतो. आपण विकासक, आर्किटेक्ट व प्रमोटर अशा तिघांवरही कारवाई करू शकतो. प्रोव्हिजन्स नाहीत, खाते कोणाचे आहे, जबाबदारी कोणाची आहे, न्याय कोणी द्यायचा आहे, हे माहीत नाही. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर साहेबांनी अधिकाऱ्यांची नावे घेतली. ती मी रिपिट करणार नाही. कारण कारवाई होत नाही. कारवाई कोणी करायची ? कारवाई ज्यांनी केली नाही त्यांच्यावर कोण कारवाई करणार ? त्यापेक्षा वर कोण बसले आहे ? ठाण्यातील बाप कुठेतरी मंत्रालयाच्या विभागात बसला आहे. आपल्याला हे टाळून चालणार नाही.

सन्माननीय सदस्यांनी पुण्याचा उल्लेख केला. पुण्यामध्ये धडक कारवाई केली. मला राजकीय भाषण करायचे नाही. अनधिकृत बांधकामांच्या विरोधात कारवाई केली ते चांगले आहे. माझ्याकडे आताच चिठ्ठी आली की, घटना घडलेल्या भागाचे नगरसेवक हिरा पाटील असून ते राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे आहेत. माझे मत असे नाही की, ते त्यात असतील. पण पुरावा त्या दिशेने सरकत आहेत का, कारवाई त्या दिशेने होणार आहे का, हे मला माहीत नाही. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी धडक कारवाई होण्याच्या संदर्भातील मुद्दा मांडला. माननीय मंत्र्यांनी कदाचित त्याकडे लक्ष दिले नसेल. सन 2011 मध्ये ठाणे महानगरपालिकेचा क्लस्टर डेव्हलपमेंटचा प्रस्ताव आला आहे. तुम्ही त्या संदर्भात काय केले ? फाईलवर बसण्याचे काम करण्याचा अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंटचा नित्याचा क्रम झाला आहे. मी माननीय राज्यपालांच्या

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार ....

अभिभाषणाच्या चर्चेच्या वेळी देखील हे बोललो आहे. नगरविकास खात्यात फाईल आली की, त्यावर एक-एक जण बसतात. एकूण किती जण बसतात हे माहीत नाही. त्यामुळे माननीय मंत्री महोदय, फाईल तुमच्यापर्यंत येऊ शकत नाही.

( नंतर श्री. भारवि ....

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार . . . .

दुर्दैवाने लकी सिमेंट लिमिटेड, कराची, याचा मालक महम्मद अली तब्बा असून त्याचा डिस्ट्रीब्युटर जैतूर मंजिल, माहीम येथील आहे. फेक्टो सिमेंट ही कंपनी रावळपिंडीतील आहे. श्री.डी.जी.खान, सिमेंट कंपनी लाहोर येथील आहे. अशा प्रकारे एकंदर जवळजवळ 24 पाकिस्तानातील कंपन्या आणि 13 बांगलादेशी कंपन्या असून त्यांच्याकडून सिमेंट येत आहे. अशा प्रकारे अनधिकृत बांधकाम करुन लोकांना स्वस्त दरामध्ये घरे दिली जातात आणि मग या इमारती पडतात. हा सर्व घटना क्रम पाहिल्यानंतर नगरविकास विभागाला आपली जबाबदारी टाळता येणार नाही. तसेच महानगरपालिकेतील दोषी अधिकाऱ्यांवर देखील कारवाई केलीच पाहिजे. जर हे शासन सच्चे असेल तर या अनुषंगाने एस.आय.टी.ची चौकशी सुध्दा घोषित करील. कारण सध्या एस.आय.टी.चे पेव फुटले आहे. जर विधानसभे मध्ये एस.आय.टी.ची चौकशी मान्य केली असेल तर मग विधान परिषदेमध्ये का नाही असा मुद्दा आहे. कोणाला बिल्डरच्या गुणवत्तेबद्दल तर कोणाला कायद्याबद्दल शंका आहे आणि मला सिमेंटबद्दल शंका आहे. या शंका दोन्ही बाजूनी आहेत. त्यामुळे शासनाने नगरविकास विभागाच्या अधिकाऱ्यांवर एस.आय.टी.ची चौकशी लावावी आणि त्या साठी शासनाच्या प्रामाणिकतेची आवश्यकता आहे. धन्यवाद.

----

.. . . 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, अत्यंत दु:खद अशा स्वरुपाची घटना मुंब्रा येथील शिळफाटा येथे घडली आणि त्याचे पडसाद सहाजिकच या सदना मध्येही उमटले. आपण या घटनेकडे वेगळया पध्दतीने पहातो.सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले की, या राज्यात 47 टक्के इतके अर्बनायझेशन आहे. घटनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे अन्न, वस्त्र व निवारा याची उपलब्धता करुन दिली पाहिजे. त्यानुसार अन्नधान्याच्या बाबतीत निर्णय घेतले जातात, वस्त्राच्या बाबतीत काही प्रश्न उपस्थित होत नाहीत. पण निवाऱ्याच्या बाबतीत फार मोठी समस्या आहे. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, आज या राज्यामध्ये जर एखाद्या भागामध्ये एक छोटेसे घर घ्यावयाचे असेल तर 30 लाख, 40 लाख, 50 लाख किंवा 1 कोटी, 2 कोटी रुपये देऊन घर घेण्याची क्षमता असणारा या राज्यामध्ये, या भागामध्ये असा किती वर्ग आहे हा मुद्दा आहे. संसाराचा गाडा ओढत असताना घर घेण्याची, आपल्या मुलांच्या डोक्यावर छप्पर असावे अशी सर्वच पालकांची इच्छा असते. अशा वेळी जर अनधिकृतपणे इमारतींचे बांधकाम करणारे बिल्डर कमी पैशामध्ये घरे देत असतील तर सदरहू बांधकाम अनधिकृत आहे याची माहिती असूनही लोक त्यामध्ये पैसे गुंतवतात, घर घेतात आणि तेथे राहतात. पण त्या नंतर जे काही घडते ते आज आपल्या सर्वांसमोर आलेले आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

इमारती निष्कासित केल्या पाहिजेत हे खरे आहे. पण त्याला पर्याय काय? मग आपल्याला कुठेतरी ट्रान्झिट ॲकॉमोडेशनची व्यवस्था करावी लागेल. म्हणून आता एमएमआरडीए ची जी निम्मी घरे आहेत ती आम्ही ट्रान्झिट ॲकॉमोडेशनसाठी देण्याचा विचार करीत आहोत. मला असे वाटते की, याबाबतीत सगळा सारासार विचार करावा लागेल.

सभापती महोदय, याठिकाणी जवळजवळ 14 सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांच्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकरजी, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, जयंत प्र.पाटील, श्री.निरंजन डावखरे, श्री.मुझफ्फर हुसेन, ॲड.आशिष शेलार, सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकश बिनसाळे, राम पंडागळे,प्रविण पोटे, श्रीमती अलका देसाई, सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, माणिकरावजी ठाकरे, श्रीमती विद्याताई चव्हाण इत्यादींनी भाषण केले आहे. या सगळया सन्माननीय सदस्यांनी जे स्पेसिफीक मुद्दे उपस्थित केले आहेत, त्याला मी यथावकाश नक्कीच उत्तर देईन. कारण मी सगळया सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकलेली नाहीत. त्यामुळे आता माझ्याकडे यासंबंधीच उत्तरे नाहीत. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सिमेंटच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला आहे. त्याला मी उत्तर दिले आहे. मला असे वाटते की, राज्यातील वाढते नागरीकरण लक्षात घेता आपल्यला गृहनिर्माणासंबंधी एक धोरण ठरवावे लागेल. आताच आपण नागरीकरणामध्ये 50 टक्क्याच्या पुढे गेलो आहोत. पूर्वी आपले नागरीकरणाचे प्रमाण 46 टक्के होते. आजची लोकसंख्या पाहिली तर आपण बहुतेक 50 टक्क्याचा टप्पा पार केलेला आहे हे दिसून येते. आज लोकांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. गेल्या 8-10 वर्षामध्ये आर्थिक सुबत्ता वाढलेली आहे, दरडोई उत्पन्न वाढलेले आहे आणि लोकांमध्ये क्रयशक्ती निर्माण झालेली आहे, त्यांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत आणि त्यामुळे नागरीकरणाचा वेगही जोरात वाढलेला आहे.त्यासाठी आपल्याला एक व्यापक अशा प्रकारचे धोरण राज्याच्या नागरीकरणा करता, वाहतुकींच्या समस्यांकरता तसेच गृहनिर्माणा करता आखावे लागेल हे सांगण्याचा मी थोडा प्रयत्न केला आहे. याबाबतीत आपल्याला अधिक चर्चा करावी लागेल. यासंबंधातील जी धोरणे आहेत ती बऱ्याच दिवसापासून चर्चेमध्ये आहेत. याबाबतीत निर्णय घेण हे क्लिष्ट असून ते सोपे नाहीत. त्यामुळे याबाबतीत निर्णय घेण्यास जरी वेळ लागत असला तरी आता एकेक निर्णय या अधिवेशनाच्या कालखंडामध्ये घेण्याचा प्रयत्न केला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . .4 जे-2



श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

जाईल. जे अधिनियम किंवा डी.सी.रुल आहेत त्यासंबंधात सभागृहाला अवगत केले जाईल. राज्यातील नागरीकरणाच्या बाबतीत जी समस्या आहे ती आम्ही अतिशय गंभीरपणे, योग्य पध्दतीने हाताळली नाही तर कदाचित मुंब्रासारख्या घटना आणखी घडू शकतील. याबाबतीत शासन गंभीर आहे आणि आपण सर्वांनी मिळून याविषयी धोरण आखून राज्याच्या नागरीकरणाचा प्रश्न सोडविला पाहिजे अशी मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो. धन्यवाद.

**सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

----

. . . .4 जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :        विधेयक.

**L. C. BILL NO. III OF 2013**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA OWNERSHIP FLATS (REGULATION OF THE PROMOTION OF CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER) ACT, 1963.)

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, सन 2013 चे वि. प. वि. क्रमांक 3 मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

स**भापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि. प. वि. क्रमांक 3 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री.प्रकाश बिनसाळे...

सभापती महोदय, आपण ज्यावेळी दुसऱ्याकडे बोट दाखवितो त्यावेळी तीन बोटे आपल्याकडे असतात असे मी समजतो. राज्यातील प्रत्येक माणसाला घर देण्याची जबाबदारी असताना आपली हाऊसिंग पॉलिसी चुकते काय, आपल्या हाऊसिंग पॉलिसीमध्ये काही दोष आहे काय ? परवाच माननीय सर्वोच्च न्यायालयाने नोव्हर्टिस या कॅन्सरवरील औषधांसंबधी निर्णय दिला ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी केला होता. या औषधाच्या पेटंटसंबधी केस होती आणि त्या कंपनीचे अपील सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावले. या निर्णयामुळे जे औषध 1 लाख 20 हजार रुपयांना मिळत होते ते औषध आता जेनेरिक मेडिसीन म्हणून दहा-वीस हजार रुपयांना मिळणार आहे. त्याचा फायदा असंख्य गरीब रुग्णांना मिळणार आहे. आपण औषधांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवू शकतो, आपण प्रत्येक वस्तूंवर एमआरपी लावू शकतो तर मग घरांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा निर्माण केली पाहिजे. बिल्डर्स पाच-पाच हजार रुपये स्वेअर फुटामागे नफा मिळवीत आहेत. ब्रीच कॅन्डीसारख्या विभागात एक लाख रुपये स्वेअर फुटाचा भाव आहे. या किंमतीमध्ये कोण घर विकत घेऊ शकेल ? मागील तीन चार वर्षापूर्वी अंधेरी सारख्या भागात तीन-चार हजार रुपये स्वेअर फुटाचा भाव होता तो आता तेरा ते पंधरा हजार रुपये स्वेअर फूट झालेला आहे. घरांच्या किंमतीवर नियंत्रण ठेवणे ही शासनाची जबाबदारी नाही काय ? शासनाने घरांच्या किंमतीवर नियंत्रण आणले नाही तर आपण अशाप्रकारच्या घटना कदापि थांबवू शकणार नाही. मी येथे पुन्हा सांगतो की, प्रत्येकाला आपल्या मुलाच्या डोक्यावर घर पाहिजे. एक निवारा पाहिजे. मग तो निवारा कोणत्याही मार्गाने मिळविण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करीत असतात. हा आपला दोष आहे. आपण कुठेतरी कमी पडत आहोत.

सभापती महोदय, आज जागेच्या किंमती गगनाला भिडलेल्या आहेत. बिल्डर पाच-हजार पट नफा मिळविणार असेल तर जागेच्या किंमती निश्चितपणे वाढणार आहेत. मला कल्पना आहे की, मुंबई शहरात कमी जागा उपलब्ध आहे. आपण शहराची चारही बाजूने वाढ करु शकलो तर या शहरामध्ये हाऊसिंग स्टॉक वाढेल आणि लोकांना निवारा मिळू शकेल. त्यासाठी आपणास धोरणांमध्ये मूलभूत बदल करावा लागेल. आपण असे केले तरच यावर कुठेतरी नियंत्रण येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे...

सभापती महोदय, अनधिकृत बांधकामे होण्याचे आणखी एक कारण आहे. महानगरपालिकेमध्ये बांधक्‍ाम करण्यासाठी अर्ज केला तर त्यास किती दिवसांत-महिन्यात परवानगी मिळाली पाहिजे यासाठी काही तरी बंधन आहे की नाही ? माझ्या माहितीप्रमाणे त्यास वेळेचे बंधन असले पाहिजे. बांधक्‍ाम करण्यासाठी किती अर्ज आले आणि परवागनी देण्यासाठी किती वेळ लागला याची माहिती शासनाने घेतली पाहिजे. कोणालाही नाहक त्रास द्यायचा. त्यास मान्यता द्यायची नाही. मग असा सुळसुळाट होणार नाही काय ?

सभापती महोदय, आपण पायाभरणीसाठी प्रथम परवानगी देता. ज्याला आपण प्लीन्थ सी.सी.म्हणतो. ही प्लीन्थ सी.सी.देण्याचे कारण म्हणजे एकदा प्लीन्थ कास्ट केल्यानंतर पुढच्या सी.सी.साठी त्या साईटचे इन्स्पेक्शन करायचे असते. प्लीन्थचे काम क्वॉलिटीमध्ये केले किंवा कसे हे पहावयाचे असते. स्ट्रक्चरल इंजिनिअरने स्टॅबिलिटी प्रमाणपत्र दिल्यानंतर मग पुढची परवानगी देण्यात येते. महानगरपालिकेतील बिल्डींग विभागामध्ये काम करणारे किती अधिक्‍ारी प्रत्यक्षपणे साईटवर जाऊन पाहणी करतात हे मला माहीत नाही. ओ.सी.च्यावेळी पाहणी करतात हे मला माहीत आहे. परंतु बांधकाम सुरु असताना प्रत्यक्ष इन्स्पेक्शन होते किंवा नाही याची मला कल्पना नाही.

सभापती महोदय, आपण शहराचा विकास आराखडा केव्हा करणार आहोत ?

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे....

किती शहरांचा डीपी तयार केला आहे, किती शहरांचा डीपी अंतिम केला आहे, डीपी प्लॅन अंतिम करण्यासाठी इतका वेळ का लावला जातो ? महोदय, डीपी तातडीने अंतिम होणार नाही किंवा बांधकामास परवानगी मिळाली नाही तर अनधिकृत बांधकाम करण्याचे चक्र सातत्याने सुरुच राहते.

महोदय, या ठिकाणी लक्ष्मी-छाया इमारतीचा उल्लेख झाला. मंगल महेश बाग, कोरा केंद्राजवळ, एस.व्ही.रोड, बोरिवली या सोसायटीने महानगरपालिकेकडे तक्रार केली की, त्यांच्या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावर मोठ्या प्रमाणात स्ट्रक्चर चेंजेस केले जात आहेत. या विषयी तक्रार करुनही महापालिकेच्या वतीने त्यावर कोणतीही कारवाई केली जात नाही. वास्तविक पाहता एमआरटीपी ॲक्टमध्ये अशा प्रकरणी कारवाई करण्याची तरतूद आहे. एमआरटीपी ॲक्टच्या सेक्शन 52, 53, 54, 55 अन्वये कारवाई करता येते. तसेच महापालिकेच्या कायद्यातील कलम 253, 254 अन्वये सुध्दा कारवाई करता येते. या कलमांच्या आधारे आपण अशा बांधकामांवर कारवाई करणार आहात की नाही ?

महोदय, शापूरजी-पालनजी आणि ठाण्यातील दुसऱ्या एका बिल्डरचा या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. एम.पी.मिल कम्पाऊंड, ताडदेव येथे एसआरएच्या नावाखाली एक प्रकल्प करण्यात आला. त्या माध्यमातून मुंबई शहराला भूषणावह असतील अशा दोन उत्तुंग इमारती बांधण्यात आल्या. त्या इमारतीचे नाव इम्पेरीयल टॉवर आहे. शापूरजी आणि दीलीप ठक्कर यांनी हे बांधकाम केले आहे. या इमारतीच्या बांधकामास सुरुवात करताना किंवा फ्लॅटची विक्री करताना इमारतीतील सदस्यांना सांगण्यात आले होते की, इमारतीतील सदस्यांसाठी क्लब हाऊस करणार आहोत. परंतु आता सांगितले जात आहे की, बाहेरच्या लोकांना क्लब हाऊसचे सदस्य करणार आहोत. महोदय, रहिवासी इमारतीच्या कम्पाऊंड मध्ये कमर्शिलायझेशन करायचे आणि नंतर रहिवाशांकडून जबरदस्तीने करारपत्र करुन देकार पत्रावर सही घ्यायची की, या कामासाठी आम्ही परवानगी देत आहोत. या बाबी आपण कशा खपवून घेतो ? रहिवाशी इमारतीच्या आवारात कमर्शियलला परवानगी कशी दिली ? क्लब हाऊसच्या सदस्य फी पोटी बाहेरच्या लोकांकडून 25 लाख रुपये घेऊन त्यांना सदस्यत्व दिले जात आहे. एसआरएच्या प्रकल्पामध्ये अशा प्रकारे मेजर कमर्शिलायझेशन करणे कसे शक्य आहे ? ज्या अधिकाऱ्यांनी या परवानग्या दिल्या असतील त्या कोणत्या कायद्याच्या आधारे दिल्या याची चौकशी केली पाहिजे. धनाढ्य बिल्डर हे पैशाच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे....

ताकदीवर, बाहुबलाच्या ताकदीवर ज्या रहिवाशांनी त्या इमारतीत घर घेण्यासाठी पैसा टाकला त्यांना वेठीस धरणार काय ? त्यांचा कोणी वाली नाही काय ?

महोदय, अनेकदा अनधिकृत इमारती बांधल्या जातात. काल जी इमारत कोसळली ती केवळ 54 दिवसात बांधण्यात आली. सिव्हील इंजिनियरच्या हिशेबानुसार किमान 21 दिवस इमारत बांधकामाचे बिम बॉटम काढू शकत नाही. स्लॅबचे बॉटम काढू शकत नाही. कारण क्युरींग होऊन त्याला पाणी द्यावे लागते. याचाच अर्थ पाण्याचे प्रमाण योग्य असले पाहिजे. मी या ठिकाणी तांत्रिक बाबींमध्ये जाणार नाही. 54 दिवसांत 7 मजली इमारत उभी राहते. परंतु ती इमारत आमच्या अधिकाऱ्यांनी बघितलीच नाही हे वास्तव नाही. वन विभागाच्या जमिनीवर ही इमारत आहे. त्यामुळे वन विभागाने या प्रकरणी कारवाई करावी असे सांगितले जाते. एमआरटीपीमध्ये क्लिअर नमूद केले आहे की, "It is the duty of the Planning Authority to act against these illegal structures." या ठिकाणी प्लॅनिंग ऑथॉरिटी ठाणे महानगरपालिका आहे. त्यांच्याकडे तक्रारी करुनही कारवाई केली जात नसेल तर योग्य नाही. वन विभागाची चूक झाली असेल तर त्या विभागातील अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. एखाद्या गावात वन विभागाच्या हद्दीतून जाणारा रस्ता असेल तर त्याच्या डांबरीकरणासाठी परवानगी दिली जात नाही. त्या जमिनीवर झाड लावले तरी कारवाई होऊ शकते. परंतु या ठिकाणी वन विभागाच्या जमिनीवर पूर्ण इमारत उभी राहत असेल तर कुंपनच शेत खाते असे म्हणावे लागेल.

महोदय, शेवटी एवढेच सांगतो की, या ठिकाणी अनधिकृत इमारतींच्या रेग्युलराईजच्या बाबत उल्लेख झाला. अशा प्रकारे अनधिकृत इमारती सर्रासपणे रेग्युलराईज करणे कोठे तरी थांबविले पाहिजे.

नंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे .....

इमारती नियमित करते वेळी त्याचे स्ट्रक्चरल स्टेबिलिटी सर्टिफिकेट घेतले पाहिजे. काही इमारतींना त्यांचे प्लॅन पास झाले नाही म्हणून अनधिकृत म्हणतो परंतु त्या इमारती जर योग्य पॅरामिटरमध्ये बांधल्या असतील तर त्या निश्चितपणे नियमित कराव्यात. जी काही पेनल्टी असेल ती आकारावी परंतु या इमारतींचे स्ट्रक्चरल स्टेबिलिटी सर्टिफिकेट घेऊन आणि सार्वजनिक जागेवर, आरक्षित जागेवर इमारत नाही हे पाहूनच ती इमारत नियमित करावी. त्या माध्यमातून निश्चितपणे रेव्हेन्यू वाढेल. परंतु हे सर्व करीत असताना पुढील काळामध्ये आपण अनधिकृत इमारतींना प्रोत्साहन देतो की काय असा मेसेज त्यातून जाऊ नये अशी मनापासून इच्छा व्यक्त करतो. हे काम राज्य शासनाने अत्यंत गांभीर्याने करावे अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ ST/ KTG

श्री. राम पंडागळे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, आपण या सभागृहामध्ये अतिशय गंभीर विषयावर चर्चा करीत आहोत. अशा ज्या घटना विशेषत: मुंबई, ठाणे परिसरामध्ये घडत आहेत त्यामध्ये ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अतिशय चांगल्या प्रकारचे मुद्दे या ठिकाणी मांडले आणि या विषयावर सांगोपांग चर्चा केलेली आहे. ज्या अनधिकृत इमारती आहेत त्याची यादी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सभागृहामध्ये वाचून दाखविली. ठाणे परिसरामध्ये फार मोठ्या प्रमाणामध्ये अनधिकृत बांधकामे होत आहेत हे एकवेळ समजू शकतो परंतु सात सात मजल्याच्या अनधिकृत इमारती उभारल्या जातात ही दुर्दैवाची बाब आहे असे मी समजतो.

सभापती महोदय, अनधिकृत बांधकाम करणारी जी मंडळी आहेत ती मंडळी नसून त्या टोळ्या आहेत. ती जागा फॉरेस्टची आहे, महसूलची आहे की महानगरपालिकेची जागा आहे हे पाहात नाहीत. या टोळ्या बरोबर बारकाईने काम करतात. ज्या ज्या ठिकाणी त्यांना जागा मिळेल त्या त्या ठिकाणी बांधकाम उभे करण्याचे काम करतात. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना निश्चितपणे शेल्टर आहे. या टोळ्या रोज संध्याकाळी कोणाकडे जमतात, कोणाकडे बसतात याची इत्यंभूत माहिती सरकारकडेही असेल. या ठिकाण्ी माननीय नगरविकास मंत्री उपस्थित आहेत. आपण या अनधिकृत बांधकाम करणाऱ्या टोळ्या रोज संध्याकाळी कोठे बसतात, कोणाच्या बंगल्यावर जमा होतात याची इत्यंभूत माहिती काढावी अशी मी विनंती करतो. एक तर ते बंगल्यामध्ये जमतात किंवा ठाणे परिसरामध्ये जे ढाबे उभे राहिले आहेत त्या ढाब्यावर पहाटे 2-3 वाजेपर्यंत त्यांच्या पार्ट्या चाललेल्या असतात. म्हणून या टोळ्यांना शोधून काढण्याचे काम आपण करावे आणि त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी विषय काढला. त्यांनी दादांचा विषय यासाठी काढला की, अनधिकृत बांधकामाला दादांनी विरोध केला. पिंपरी चिंचवडमधील बांधकाम त्यांनी उभे राहून पाडले ही बाब आपल्याला भूषणावह आहे. बोले तैसा चाले त्यांची वंदावी पाऊले. जर त्यांनी अनधिकृत बांधकामाला विरोध केला असेल आणि बांधकाम पाडले असेल तर त्यांचा सन्मान केला पाहिजे. जर तो सन्मान सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी त्यांच्या शब्दामध्ये केला असेल तर आपण त्याचे समर्थन केले पाहिजे असे मला वाटते.

यानंतर श्री. खंदारे ...

श्री.राम पंडागळे.......

मी त्याचे समर्थ करतो आणि सभागृहाने सुध्दा ते केले पाहिजे असे मला वाटते. या टोळ्या नेस्तनाबूत केल्या पाहिजेत. एखादे कार्यालय पाडले म्हणून किंवा घर पाडले म्हणून ती कारवाई थांबविण्यासाठी महापौरांपासून आयुक्तांपर्यंत पर्यंत प्रयत्न केले जातात. पण जेथे जेथे अनधिकृत कार्यालय बांधले गेले असेल, घर बांधले असेल, इमारत बांधली गेली असेल तर त्याच्यावर बुलडोझ ार चालला पाहिजे. ती कारवाई थांबविण्यासाठी जो कोणी प्रयत्नशील असेल अशा लोकांची मंत्री महोदयांनी यादी केली पाहिजे आणि त्यांच्यावरही कारवाईचा बुलडोझर चालविला पाहिजे. त्यांना तुरुंगात टाकले पाहिजे अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेतील अनेक अधिकाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतलेली आहे. या अधिकाऱ्यांनी आता एसआरएची बांधकामे सुरु केलेली आहेत. म्हणजे हे लोक एकीकडे पकवायचे काम करीत आहेत आणि दुसरीकडे विकावयाचे काम करीत आहेत. गेली 8-10 वर्षे हेच चालले आहे. परंतु या झोपड्यांचे पुनर्वसनाचे काम 15-15, 20-20 वर्षे रखडलेले आहे. कारण हे लोक बिल्डर नाहीत. अशा लोकांना शोधून त्यांच्यावर कारवाई करावी. सीआरपीसीच्या कलम 105-के मध्ये ज्या अधिकाऱ्यांनी कामामध्ये हलगर्जीपणा केला असेल त्या अधिकाऱ्यांची मालमत्ता जप्त करण्याची तरतूद आहे. या अनधिकृत बांधकामांना महानगरपालिकेचे जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्या विरोधात या कलमानुसार कारवाई केली जाईल काय ? सरकारला धारेवर धरणे किंवा जबाबदार धरणे सोपे आहे. परंतु जर एखाद्या वेळेला पाण्याचे कनेक्शन तुटले असेल तर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी किंवा आरोग्य विभागाचे अधिकारीच त्यावर कारवाई करतात. या सर्व अनधिकृत बांधकामांना पाठिंबा देण्याचे काम महानगरपालिकेतील संबंधित अधिकारीच करतात. नगरसेवक करतात. या अधिकाऱ्यांना राजाश्रय मिळतो. संरक्षण मिळत असते. त्यांना मदत केली जाते.

अधिकृतपणे बांधलेल्या बांधकामांना पालिकेकडून लवकर पाण्याचे कनेक्शन मिळत नाही परंतु अनधिकृत बांधकामांसाठी सर्व सुखसोयी.........

2.......

श्री.राम पंडागळे.....

लवकर उपलब्ध होतात. त्यामुळे पालिकेच्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार की नाही ? अशा लोकांना किती दिवस उघड्या माथ्याने फिरु देणार आहे ? या अधिकाऱ्यांची काळी यादी तयार करावी आणि ती सबंध राज्यात प्रसिध्द करावी. ठाणे जिल्ह्यालाही ते कळले पाहिजे की, हे ब्लॅक लिस्टेड अधिकारी आहेत. हे अधिकारी पैसा जमा करतात, अनधिकृत बांधकाम करणाऱ्या टोळ्यांना मदत करतात.

कालच्या घटनेमुळे ठाणे जिल्ह्यात हाहा:कार माजला आहे. लोकांच्या मनामध्ये भीती निर्माण झालेली आहे. महापालिकेत राजरोसपणे हप्ता गोळा करण्याचे काम सर्रासपणे सुरु आहे. म्हणून मी आपल्यावतीने मंत्री महोदयांना विनंती करतो की, या अधिकाऱ्यांविरुध्द तातडीने कारवाई केली पाहिजे. ज्या अधिकाऱ्यांनी तेथे 100-200 अनधिकृत कामांना मदत केलेली आहे त्या सर्व अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. तसेच ज्या ज्या अधिकाऱ्यांनी मदत केलेली आहे, त्या सर्वांवर कारवाई करावी अशी मी विनंती करतो मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--------

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

यानंतर श्री.भोगले........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रवीण पोटे-पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेत भाग घेण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या अल्पकालीन चर्चेत सहभाग घेऊन माननीय विरोधी पक्षनेते, माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, निरंजन डावखरे, प्रकाश बिनसाळे, राम पंडागळे, ॲड.आशिष शेलार यांनी आपले विचार मांडले आहेत.

सभापती महोदय, अशा प्रकारच्या दुर्घटना मुंबई शहरात वारंवार घडतात. अशा घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी शासनाने कडक कारवाई केली पाहिजे एवढे म्हणून चालणार नाही. बडी बडी शहरो में छोटी छोटी दुर्घटनाऐ होती हैं. गरीब लोकांसाठी घरे देण्याची व्यवस्था सरकारने करावयाची आहे. इमारत कोसळली तर त्याबाबत संबंधित भागातील आमदार, नगरसेवक, महापालिकेचे अधिकारी यांनी लोकांच्या मदतीसाठी पुढे आले पाहिजे.

सभापती महोदय, आमदार श्री. रमेश पाटील यांनी महापालिका आयुक्तांकडे लेखी तक्रार केली असतानाही आयुक्तांनी त्याबाबत कोणतीही ठोस भूमिका न घेतल्यामुळे ही दुर्घटना घडली. पाण्याची टाकी वर उभारताना इमारतीचे छत पडत असेल तर त्या इमारतीच्या बांधकामाचा दर्जा काय असेल हे मी सांगण्याची आवश्यकता नाही. तेथील नागरिकांनी पोलिसांकडे, महापालिका आयुक्तांकडे तक्रार करुनही दखल घेतली गेली नाही. पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे पाडण्याबद्दल स्थानिकांचा व बिल्डर लॉबीचा विरोध असताना त्याची दखल न घेता अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याचा निर्णय माननीय उप मुख्यमंत्र्यांनी घेतला, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आमदार व नगरसेवक यांनी जबाबदारी झटकून चालणार नाही. ही इमारत नाला बुजवून त्या ठिकाणी भरणी घालून उभी करण्यात आली होती. या इमारतीत 28 कुटुंबे रहात होती. या दुर्घटनेत 40 ते 50 निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. 3-4 दिवसांपूर्वीच माननीय मुख्यमंत्र्यांनी अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे सूचित केले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाला 3 दिवस झाले असताना ही इमारत कोसळली. शासनाने कोणत्याही अनधिकृत बांधकामाला संरक्षण देता कामा नये. उलट अशा प्रकारचे अनधिकृत बांधकाम भविष्यात उभे राहणार नाही यादृष्टीने दक्षता बाळगली पाहिजे.

..2..

श्री.प्रवीण पोटे-पाटील........

सभापती महोदय, महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागातील अधिकारी चुकीच्या पध्दतीने काम करतात. त्यांच्या हलगर्जीपणामुळे झोपडपट्टया उभ्या राहतात. पहिल्यांदा झोपड्या उभ्या केल्या जातात आणि त्या झोपड्या न पाडण्यासाठी अधिकारी पैसे मागतात. अधिकृत इमारत बांधण्यासाठी वेळेवर परवानगी दिली जात नाही. मात्र अनधिकृत बांधकामे केली जातात त्यासाठी रातोरात परवानगी दिली जाते. असे घडू नये या दृष्टीने मी या प्रस्तावाला समर्थन देतो व जे निष्पाप मृत झाले आहेत त्यांना श्रध्दांजली वाहून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेत सहभाग घेण्यासाठी आणि त्या संदर्भात माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे. मुंबई शहर असो किंवा ठाणे जिल्हा असो, नोकरीच्या निमित्ताने लाखो माणसे या शहरामध्ये येत असतात.

नंतर 3पी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

सभापती महोदय, जी माणसे या मुंबई शहरात येतात त्यांना परवडतील अशा किंमतीत घर मिळत नाही. मुंबई शहरामध्ये जे मोठे बिल्डर आहेत त्या बिल्डरांच्या घरांचे भाव कोणालाही परवडणारे नसल्यामुळे हे नागरिक नाइलाजास्तव डोंबीवली, अंबरनाथ, ठाणे जिल्हयातील परिसर, कोपर, मुंब्रा, कळव्याच्या परिसरात घरे घेऊन राहतात. हे लोक कशा पध्दतीने राहतात याची आपल्याला कल्पना आहे. हे सर्व करीत असतांना आपण अनाधिकृतकडेच कल देणार आहोत काय ? एका बाजूला आम्ही सामान्यांना परवडतील अशी घरे देणार आहोत असे सांगायचे परंतु परंतु सामान्यांना परवडतील अशी घरे द्यावयाची नाहीत. सामान्यांना परवडतील अशी घरे दिली जात नाही. सामान्यांना परवडतील अशी घरे देण्यासाठी आपण काही प्रयत्न करीत आहोत काय ? ही सर्व परिस्थिती आपल्याला दिसत नाही, आपल्याला कळत नाही असेच मला नाइलाजाने आणि खेदाने म्हणावे लागत आहे. अशा घटना वारंवार घडत आहेत त्या आपल्याला दिसत नाही काय ?

कालच्या घटनेत निरपराध माणसांचा बळी गेलेला आहे. या इमारतीमधील तळ मजल्यावर विद्यार्थ्यांचा क्लास सुरु होता. क्लास सुरु असतांना ही इमारत कोसळली गेली. त्यामुळे त्या चिमुकल्यांचा किलबिलाट आपल्याला ऐकू येणार आहे काय ? ज्याने ही अनाधिकृत इमारत बांधली त्या विकासकावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा लावून कारवाई होण्याची आवश्यकता आहे. ज्या अधिकाऱ्यांनी या इमारतीचा प्लॅन पास केला त्या अधिकाऱ्यावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा लावून कारवाई करण्याची आवश्यकता आहे. हे अधिकारी केवळ अशा ठिकाणी जाऊन केवळ गाडी फिरवून आणीत असतात. त्यामुळे अशा सर्व अधिकाऱ्यांवर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी माझी मागणी आहे. दोन महिन्यात ही इमारत बांधून कशी काय पूर्ण झाली ? ठाणे जिल्हयामध्ये जे मोठ मोठे पुढारी राहतात त्यांनी याकडे लक्ष देण्याची आवश्यकता नव्हती काय ? ठाणे जिल्हयातील पुढाऱ्यांचे या घटनेकडे लक्ष असावयास पाहिजे होते असे मला वाटते.

सभापती महोदय, मी आजच एका वर्तमानपत्रात बातमी वाचली आहे की, सामान्यांना परवडतील अशी घरे काही बिल्डर बांधणार आहेत. खरे म्हणजे ही बातमी चांगली आहे. माननीय सभापती महोदयांनी आणि माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अशा बिल्डरांना बोलावून त्यांच्या बरोबर

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

बैठक लावण्याची आवश्यकता आहे. मुंबई आणि मुंबईच्या आसपास चांगल्या दर्जाची, सामान्य लोकांना परवडतील अशी घरे बांधण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा अशी माझी दुसरी मागणी आहे.

सभापती महोदय, आज महाराष्ट्रात देशातील कानाकोपऱ्यातून श्रीमंत माणसे येऊन जमिनी खरेदी करतात व त्या जमिनी त्यांच्या नावावर होतात. परंतु या राज्यातील एखाद्या भूमिपुत्राने एक एकर जरी जमीन घेतली तर ती जमीन नावावर होत नाही. तुझ्या किंवा तुझ्या वडिलांच्या नावावर जमीन नसल्यामुळे तुझ्या नावावर जमीन होणार नाही अशा प्रकारचे निवेदन केले जाते हे आपल्याला ठाऊक आहे काय ? हे आपल्याला माहिती नसेल तर अलका देसाई अशा अशा बोलल्या ते बरोबर आहे काय हे आपण रेव्हेन्यू डिपार्टमेंटला विचारुन घेऊ शकता. जर भूमिपुत्राला एक न्याय व देशातून आलेल्या श्रीमंताना दुसरा न्याय दिला जात असेल तर हे राज्य आपण कोठे घेऊन चाललो आहोत याचा देखील विचार होणे गरजेचे आहे.

यानंतर श्री. मंगेश.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

मी आपला फार वेळ घेणार नाही. मला माहीत आहे की, माझे बोलणे आपल्याला आवडत नाही.

**उप सभापती** : माझ्या आवडी-निवडीचा प्रश्न येतच नाही. मी भाषण ऐकण्यासाठीच बसलो आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, 2 महिन्यांत इमारत उभी होते. ठाणे मनपा किंवा मुंबई शहरातील इतर लोक असो त्याकडे लक्ष देणार नसतील तर ते काही योग्य नाही. कुठे काय चालले आहे, हे पाहण्याचे काम रेल्वे डिपार्टमेंट, नगरविकास विभाग यांचे देखील आहे. त्यांचे रिपोर्ट सुरू असतात. आता मोबाईल युग आले आहे. या युगात सर्व बातम्या, माहिती एका क्लिकवर मिळते तरी पण असे प्रकार होऊ लागले तर ते आपल्या प्रगत राज्याला भूषणावह आहे, असे मला वाटत नाही. आपल्याला हे थांबवायचे असेल, निरपराध लोकांचा मृत्यू होऊ नये, असे वाटत असेल तर आपण सर्वांनी त्यामध्ये जातीने लक्ष घातले पाहिजे. या संदर्भात सब कमिटी करावी, ही मलमपट्टी आहे. त्यामुळे काहीही होणार नाही. सदर इमारत ज्या मंडळींमुळे कोसळली आहे, त्यांच्यावर जोपर्यंत कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत ही संपूर्ण चर्चा निरर्थक असेल. आरोपींना पकडल्याचे उद्याच्या वृत्तपत्रात आले पाहिजे. आपण त्यांना शोधून काढा. राज्याची पोलीस यंत्रणा या संदर्भात सक्षम आहे. आपण संबंधित दोषींना शोधून काढून त्यांना कलम 302 लावून त्यांच्यावर कारवाई करावी तरच हे थांबेल. मी या संदर्भात आपणाकडे मागणी करते.

----

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात येईपर्यंत सभागृहाची बैठक 10 मिनिटे स्थगित करावी, अशी मी विनंती करतो. माननीय मुख्यमंत्री सभागृहात आल्यानंतर शेवटचे भाषण होऊ द्यावे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले, यांनी भाषणास सुरूवात करावी.

----

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. सदर घटनेत तासागणिक मृतांचा आकडा वाढत जात आहे. आपण सदर घटनेच्या विषयी सभागृहात चर्चा करीत आहोत. माझ्या बऱ्याचशा सहकाऱ्यांनी या विषयावर बोलताना सुरूवातीलाच या घटनेमध्ये मृत्युमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली, आदरांजली अर्पण केली. मी माझ्यापुरता विचार करीत होतो, त्यावेळी मला असे वाटले की, आपल्याला खरोखर या मृत व्यक्तींना श्रध्दांजली वाहण्याचा हक्क आहे का ? आपण कोरड्या शब्दांतील श्रध्दांजली वाहून काय साध्य करणार आहोत ? सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांची भाषणे मी ऐकली. मला मनापासून सांगितले पाहिजे की, सभागृहात चर्चेच्या वेळी अनेक सन्माननीय सदस्य अनेक वेगवेगळया विषयाचे पैलू सभागृहासमोर आणतात. त्यामुळे निश्चितच आपल्या ज्ञानात चांगली भर पडते. मी सभागृहातील चर्चेमध्ये गुंतलेलो असतो परंतु जेव्हा वेळ मिळेल तेव्हा मी वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके वाचत असतो. सध्या मी वाचत असलेल्या पुस्तकाचे नाव "डोंगरी ते दुबई" असे आहे. त्यामध्ये मुंबईतील गुन्हेगारी जगताचा 60 वर्षांचा इतिहास असून झैदी नावाच्या पत्रकारांचे ते पुस्तक आहे. मी पुस्तकाच्या दुसऱ्या टप्प्यावर आलो आहे. यामध्ये पूर्वापार चालत आलेले अतिरेक्यांचे जे सर्व धंदे आहेत, त्याहीपेक्षा अधिक सोपा सोयीस्कर असा उद्योग, ज्यामध्ये उजळ माथ्याने वावरता येईल, असा धंदा त्यांनी शोधला आहे, तो म्हणजे बिल्डर लाईनचा धंदा. यात यशस्वी व्हायचे असेल तर मुंबई, ठाणे आसपासच्या परिसरातील लोकांजवळ पैसा भरपूर प्रमाणात आहे.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

( नंतर श्री. भारवि ....

श्री.हेमंत टकले...

त्यांच्या जवळ मनी पॉवर अणि मसल पॉवर आहे. अनेक गोष्टी त्यांच्या जवळ आहेत. त्याच्या जोरावर ते आपली हुकूमत या सगळ्या धंद्यांवर ठेवून आहेत. आपल्या सभागृहाची बैठक हल्ली 10.00 वाजता सुरू होते. त्यामुळे सकाळची वर्तमानपत्रे खूप घाईगडबडीत बघावी लागतात. कुठलेही वर्तमानपत्र घेतले तर त्यातील पहिले पान हे आजच्या दिवसातील महत्वाच्या बातमी संबंधात असेल असे वाटते. पण पहिले संपूर्ण पान कोणा तरी बिल्डरला वाहिलेले असते. त्या पानावर आपल्याला बातमी दिसत नाही. त्या पानावर छानछान काढलेली चित्रे दिसतात. त्यात छानसे असे घर असते. त्यात स्वीमिंग पूल कसा असेल हे दाखविलेले असते. इतर सोयी सुविधा कशा आहेत याचे दर्शन घडविलेले असते. आपल्या स्वप्नातील सर्व सोयी सुविधा मुंबईत राहून सुद्धा देऊ शकतो हे दाखविण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला असतो. पहिल्या वेळी हे चित्र पाहिल्यावर थोडे बरे वाटते. नंतर पेपर उघडला की बिल्डींग जमीनदोस्त झालेल्या बातम्या वाचायला मिळतात.

मी लहान असताना राज कपूर यांचा श्री 420 हा सिनेमा आला होता. तो सिनेमा इतकी वर्षे झाली तरी अजूनही लोकांच्या मनामध्ये घट्ट बसला आहे. या सिनेमामध्ये काय स्वप्न दाखविले होते ? 100 रूपये भरा आम्ही तुम्हाला घर देऊ. त्या काळी ही योजना होती. आजही 50 ते 60 वर्षानंतर काही बिल्डर, चुकीचे लोक तशा प्रकारचे आमिष दाखवून लोकांना भुलवून स्वस्तात घर योजना या नावाखाली फसवत आहेत. सध्या मला माझी बिल्डींग वाचवायची आहे त्यामुळे तुम्ही झोपडीत राहू नका, माझ्या बिल्डींगमध्ये येऊन रहा असे सांगून त्यांना निवारा देण्याचे काम करत असल्याचे चित्र पहायला मिळते. यामध्ये दोष कोणाचा आहे. महापालिकेचा आहे, नगरविकास विभागाचा आहे, तेथील अधिकाऱ्यांचा आहे, या सगळयाला संरक्षण देणाऱ्या यंत्रणेचा आहे. या सर्व गोष्टी चर्चेमध्ये येतील. या चर्चेद्वारा आपल्याला काही तरी सूत्र देखील सापडू शकेल.

आपण सत्तेच्या विकेंद्रीकरणाची संकल्पना केली आहे. त्या अंतर्गत आपण अगदी खालच्या स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार दिलेले आहेत. आपले भले कशात आहे हे त्यांना कळले पाहिजे. आपल्या भागातील नागरी वस्तीतील जो काही भाग आहे त्याबाबत अतिशय काटेकोरपणे अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्था करतील अशी आमची अपेक्षा असते. सत्तेचे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

विकेंद्रीकरण केल्यामुळे महानगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यांनी आपल्याला मिळालेल्या अधिकारचा वापर लोकसेवेसाठी आहे, स्वत:च्या स्वार्थासाठी किंवा हितासाठी नाही अशा प्रकारचा विचार केला पाहिजे. तसा विचार केला नाही तर काय होऊ शकते याचे चित्र या निमित्ताने उभे राहते.

येथे सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील श्री.जोशी नावाच्या अधिकाऱ्याच्या उल्लेख करून आपल्या विषयाची मांडणी केली होती. त्या अधिकाऱ्याला परत कामावर घेण्यासंबंधीचा ठराव पास झाला. त्यावर सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, ठराव पास झाला तरी सुद्धा तो स्वीकारायचा किंवा नाही याचा अधिकार तेथे असलेल्या अधिकाऱ्यांना असतो. अशा प्रकारचा ठराव करण्याची मानसिकता असणे हे आपल्या लोकशाहीमध्ये अभिप्रेत नाही. अधिकाऱ्यांना हा ठराव नाकारण्याचा अधिकार होता. आपण असा ठराव कसा काय करू शकतो हा प्रश्न विचारण्याची वेळ आता येऊन ठेपलेली आहे.

येथे अनेक गोष्टींचा उहापोह करण्यात आलेला आहे. देश प्रगतीपथावर जात असताना मोठ्या प्रमाणावर नागरिकीकरण होत आहे. मोठ्या शहरांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी यंत्रणा निर्माण करीत असताना त्याच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्यासाठी पाश्चिमात्य देशांप्रमाणे आपल्या येथे यंत्रणा निर्माण केल्या पाहिजेत. तशा यंत्रणा निर्माण केल्या नाहीत तर ह्या सगळ्या योजना यशस्वी होऊ शकणार नाहीत.

आपण ड्रायव्हींगचे उदाहरण घेऊ या. वाहन चालकांनी अनेक गुन्हे केल्यानंतर त्याचे ड्रायव्हींग लायसेन्स रद्द करून पुन्हा लायसेन्स मिळणार नाही अशा प्रकारची तरतूद कायद्यामध्ये करण्यात आली आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले . . ..

अशा प्रकारे काम करणाऱ्या वास्तू विशारदांवर, अशा कॉन्ट्रॅक्टर्स्वर आयुष्यभरासाठी बंदी घालून त्यांना या कामातून बाजूला काढता येईल काय, त्यांच्यावर बंदी घालता येईल काय ? याचा जर शासनाने विचार केला तर एक चांगली जरब या निमित्ताने त्यांना बसेल व या यंत्रणेमध्ये घुसलेल्या अनिधिकृतरित्या व चुकीचे काम करणाऱ्या सर्व प्रवृतींना आळा घालण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकेल असे मला वाटते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलारसाहेब यांनी असे सांगितले की, आपल्या देशात पाकिस्तान, बांगला देश इ.ठिकाणाहून सिमेंट येते आणि ते सिमेंट स्वस्त मिळत असल्याने त्याचा वापर केला जातो. पण सिमेंटची गुणवत्ता न तपासता, ते स्वस्त मिळते म्हणून जर ते बिल्डरने, कॉन्ट्रॅक्टरने घेतले तर त्याचे काय होईल असा एक प्रश्न उपस्थित करण्यात आला आणि तो प्रश्न अतिशय महत्वाचा आहे असे मला वाटते. कारण बांधकाम साहित्याची गुणवत्ता याची वेगवेगळया टप्प्यावर तपासणी होणे आवश्यक आहे आणि एकदा तपासणी केलेले बांधकाम साहित्यच त्याठिकाणी वापरले जात आहे की नाही यावर देखरेख करणारी यंत्रणा देखील तेवढीच सजग असली पाहिजे, जागरुक असली पाहिजे अशी मागणी देखील या निमित्ताने करता येईल.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे तर वाढत्या शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणात शहरी लोकसंख्या 47 टक्क्यावर पोहोचत असताना या सगळया समस्यांवर जर आजच उपाययोजना केली नाही किंवा योग्य ते नियोजन केले नाही आणि यंत्रणेमध्ये असलेल्या सर्व दोषांवर निश्चितपणे उत्तर शोधले नाही तर भविष्य काळामध्ये अशा प्रकारच्या घटना वारंवार होत रहातील. कारण आपण पहातो की, मुंबईमधील जागा संपल्यावर लोक ठाण्यामध्ये गेले. आता ठाणे शहरातील जागाही कमी होत असल्याने लोक आणखी पुढे-पुढे जाऊ लागले आहेत. मग आपल्या समोर अशा प्रकारे एक आक्राळ-विक्राळ स्वरुप तयार होईल आणि ही गोष्ट टाळावयाची असेल तर आपली जी काही उद्दिष्टे आहेत ती गाठली पाहिजेत. कारण संकल्प आणि सिध्दी यामध्ये आपली इच्छा शक्ती किती आहे ही गोष्ट देखील महत्वाची असते आणि ती इच्छाशक्ती अशा प्रकारच्या निमित्ताने या शासनाला, शासकीय यंत्रणेला मिळावी अशा प्रकारची विनंती करतो आणि असे प्रसंग वारंवार येऊ नयेत. कारण सभागृहामध्ये अशा विषयांवर चर्चा करताना मनस्वी त्रास होतो, दुःख होते आणि वेदना होतात, त्या पासून संबंधित लोकांना आणि इतरांना तुम्ही मुक्ती द्याल अशा प्रकारची विनंती करुन मी माझे विचार संपवितो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी माझे नाव घेतल्यामुळे मला त्याबाबत खुलासा करणे भाग आहे. महानगरपालिकेच्या कामकाजामध्ये प्रशासकीय यंत्रणा ही नियंत्रण करण्यासाठी असते. मग जर माननीय मंत्री महोदयांनी "हे करा" असे लिहिले असले तरी ते का करता येत नाही ते पहिल्यांदा लिहितात. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना याची माहिती आहे आणि तरीही ते केले तर तुम्ही गोत्यात येता, नियोजनच अशा प्रकारचे तसे केलेले आहे. तुम्हाला राग का आला याची मला कल्पना आहे.पिंपरी-चिंचवड येथील बांधकाम माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी पाडले, त्याबद्दल प्रश्न नाही. आपण त्यांचे कौतुक केले. पण ते बांधकाम पाडताना आपण पाहिले असेल की, तेथे इमारतीचे सगळे सांगाडे उभे होते. तेथील इमारत पूर्ण व्हावयाच्या होत्या. मात्र ते पाडताना आम्ही टी.व्ही.वर पाहिले आहे. मग मला प्रश्न पडला की, हे कोणाची सत्ता असताना झाले? माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी एवढे सुंदर काम केले. एक प्रकारची चीड असते. सहा महिन्यापूर्वी आमची 2/3 मताने पूर्ण सत्ता आली आता आम्ही कोणाचेच ऐकणार नाही, ते पाडणारच. मग माझ्या लक्षात आले की, पूर्वी तेथे 2000 पर्यंत आमचे कै.रामकृष्ण मोरे होते, यांच्या अधिपत्याखाली काँग्रेस होती.

यानंतर श्री.बोर्डे . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्यानंतर माननीय श्री.अजितदादा यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची संपूर्ण सत्ता आली. त्या ठिकाणी पूर्वी जी बांधकामे उभी झाली होती ती पाडली गेली. महापालिकेने तिजोरीत पैसे न आल्यामुळे ती पाडली की, रागापोटी पाडली हे माहीत नाही. पण ती बांधकामे पाडली. परंतु निर्माण केलेले आपलेच पाप झाकायला जातो त्या वेळी असे होते. मी सन्माननीय सदस्यांचे नाव घेतले नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, पिंपरी-चिंचवड महापालिकेविषयी मी बोललो नव्हतो. मी माझ्या भाषणात असे सांगितले होते की, एका अधिकाऱ्याचे इतके उघडे-नागडे स्वरुप लोकांच्या समोर आल्यानंतर त्या अधिकाऱ्याला पुन्हा कामावर घ्या असा ठराव नगरसेवक का करु इच्छितात या मानसिकतेवर मी बोललो होतो. पिंपरी-चिंचवडच्या बाबतीत मी बोललो नव्हतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री या चर्चेला उत्तर देण्यासाठी सभागृहात वेळेवर येऊ शकत नाही. त्यामुळे ही चर्चा लांबवली जात आहे. मुळात हा विषय वेगळ्या स्वरुपाचा आहे. आता सायंकाळचे 5.30 वाजले आहेत. या चर्चेला माननीय मंत्री महोदय नेमके कधी उत्तर देणार आहेत, हे समजले पाहिजे.

**उप सभापती** : विधानसभेत सुध्दा याच विषयावर चर्चा सुरु आहे. त्या ठिकाणी आणखी दोन सन्माननीय सदस्य बोलायचे बाकी आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांचे विधानसभा सभागृहातील उत्तर झाल्यानंतर ते या सभागृहात येतील.

आता सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहातून निघून जातात.)



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, ठाणे जिल्ह्यात काल अत्यंत दुर्दैवी घटना घडली. या घटनेच्या संदर्भात केवळ राज्यातच नव्हे तर देशात विविध प्रतिक्रिया उमटल्या आहेत. महाराष्ट्राच्या विधिमंडळात सुध्दा तशा प्रकारची प्रतिक्रिया उमटणे साहजिक होते.

महोदय, म.वि.प. नियम 97 अन्वये ही चर्चा उपस्थित करण्यात आली. या चर्चेवर आपले विचार व्यक्त करीत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी एकंदरीत घडलेल्या घटनेचे चित्र आपल्यासमोर उभे केले. या घटनेच्या संदर्भात चर्चा करीत असताना ही घटना ज्यांच्यामुळे घडली त्यांच्यावर निश्चित कारवाई करण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत. ही घटना का घडली या संदर्भात बाहेर वेगवेगळ्या प्रकारची चर्चा होत आहे. भविष्यात अशा प्रकारची घटना घडणारच नाही, यासाठी पाऊले उचलणे गरजेचे आहे. किंबहुना त्या संदर्भात चर्चा होणे आवश्यक आहे असे मला वाटते.

महोदय, या संपूर्ण घटनेची पार्श्वभूमी लक्षात घेतली तर ही इमारत ज्या जमिनीवर उभी होती ती वन विभागाची होती. वन विभागाच्या जमिनीवर अनधिकृत बांधकाम झाले. 7 मजली इमारत केवळ 2 महिन्यात बांधून पूर्ण करण्यात आली. हे सर्व करीत असताना ज्यांची या संदर्भात जबाबदारी होती त्या महानगरपालिकेने नेमकी कोणती पाऊले उचलली या बाबत सुध्दा सभागृहात चर्चा होऊन संबंधितांवर कारवाई होणे सुध्दा तितकेच गरजेचे आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

त्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम करणारे जेवढे जबाबदार असतील तेवढेच त्या ठिकाणी बांधकाम करीत असताना त्यांना जी मदत झाली ती मदत करणारे हात कोणते होते, महानगरपालिकेमध्ये कोणते अधिकारी होते, कोणत्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना मदत केली या बाबी सुध्दा तपासामध्ये पुढे आल्या पाहिजेत.

सभापती महोदय, मुंबई शहराच्या बाजूबाजूच्या क्षेत्रामध्ये तसेच संपूर्ण राज्यामध्ये आज मोठ्या प्रमाणावर शहरीकरण होऊ लागले आहे. शहरीकरण 52 टक्क्यापर्यंत गेलेले आहे. शहरामध्ये येणारा प्रत्येक माणूस या ठिकाणी निवारा शोधत असतो. तो कोठे तरी झोपडपट्टीमध्ये राहून आपला उदरनिर्वाह चालविण्याचा प्रयत्न करतो. जेथे जागा मिळेल त्या ठिकाणी छत डोक्यावर असले पाहिजे म्हणून निवारा मिळविण्याचा प्रयत्न करतो. त्याचा फायदा घेऊन मोठ्या प्रमाणामध्ये नवीन बिल्डर्स निर्माण झाले. काही बिल्डर्स अधिकृतपणे चांगली कामे करीत आहेत. त्याबद्दल मी बोलणार नाही पण बिल्डरांचा सुळसुळाट या संपूर्ण परिसरात झाल्याचे आपल्याला दिसून येते. ज्या ठिकाणी जागा मिळेल त्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम केले जाते. काही वर्ग ती वन जमीन आहे किंवा कोणत्या विभागाची जमीन आहे हे न पाहता बांधकाम करण्याकरिता पूर्णपणे कार्यरत असल्याचे चित्र आपल्या नजरेसमोर येते.

हा जो बांधकाम व्यावसायिकांचा सुळसुळाट मोठ्या प्रमाणात झाला त्यामध्ये अनधिकृत बांधकाम करणे, कोणाला चिरीमिरी देऊन त्यांचे सहकार्य बांधकामाकरिता घेणे, आवश्यक असलेल्या कागदपत्रांची जुळवाजुळव करणे, असे प्रकार होतात. या संपूर्ण व्यवसायाच्या संदर्भामध्ये कोठे तरी व्यवस्थितपणे यंत्रणा राबविली गेली पाहिजे आणि जबाबदारी सुध्दा निश्चित करावयास पाहिजे. कोठेही बांधकाम करीत असताना, महानगरपालिकेची जबाबदारी असो, महसूल खात्याची जबाबदारी असो किंवा नगरविकास खात्याची जबाबदारी असो ज्यांची त्यांची जबाबदारी नीटपणे पाळली गेली पाहिजे. या व्यवसायातून प्रचंड पैसे मिळतात, बांधकाम करणाऱ्याकडून आपल्याला पैसे मिळतात म्हणून या संदर्भामध्ये जर आपण दुर्लक्ष केले तर एवढी मोठी घटना घडल्यानंतरही त्यामधून काही शिकू शकलो नाही होईल. आपली जी वेगवेगळी धोरणे आहेत त्यातून याला एकत्रितपणे अद्यापही पायबंद घालू शकलो नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG

श्री. माणिकराव ठाकरे ......

सभापती महोदय, आज जी घटना घडली त्यामध्ये 45 व्यक्ती मृत झाल्याचा आकडा समोर येत आहे. जखमींचा आकडा 50 च्या वर गेलेला आहे. हा आकडा सुध्दा आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्या ठिकाणी ढिगाऱ्याखाली आणखी मृतदेह आढळून येत आहेत. आजच एका मुलीला ढिगाऱ्याखालून काढण्यात आले. ती 18 तास ढिगाऱ्याखाली राहिली. ती दोन अडीच वर्षाची मुलगी त्या ठिकाणी जिवंत सापडली. तिला रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. त्या ठिकाणी खाली क्लास सुरु होता असे कळते. त्यामुळे त्या ठिकाणी आणखी किती मृतदेह आढळून येतील हे सांगता येत नाही. परंतु ही गंभीर घटना आहे. अशा प्रकारची घटना घडल्यानंतर त्यावरुन आपण काही शिकावयास पाहिजे, निर्णयामध्ये काही बदल करावयास पाहिजेत, आपण कठोर व्हावयास पाहिजे. तरच आजच्या चर्चेमधून काही निष्पन्न होईल आणि भविष्यामध्ये अशी घटना घडू नये म्हणून आपण या ठिकाणी बसून काही तरी पावले उचलत आहोत असे होईल.

सभापती महोदय, संपूर्ण राज्याचे लक्ष याकडे लागले आहे. सगळ्या वाहिन्या एकमेव या घटनेची दृश्ये दाखवित आहेत. त्या ठिकाणचे दृश्य विदारक आहे. त्या ठिकाणच्या जनतेच्या भावना लक्षात घेतल्यानंतर अशा प्रकारची घटना परत घडू नये या संदर्भामध्ये आपण पावले उचलणे गरजेचे आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.......

ज्यांच्यावर ही जबाबदारी होती त्यांच्यावर कारवाई करणे व भविष्यामध्ये अशा घटना घडू नये अशा प्रकारचा व्यापक दृष्टीकोन ठेवून कठोरपणे जबाबदार यंत्रणा उभी करण्याचे काम शासनाने हातात घ्यावे अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करतो. सन्माननीय केलेल्या सूचनांची कठोरपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे त्यांच्यावर कारवाई करावी. ठाणे जिल्ह्यामध्ये बांधकामाच्या व्यवसायामध्ये असलेल्या लोकांचा केवळ पैसा मिळविण्याचा दृष्टीकोन आहे. या लोकांबाबत ठाणे महानगरपालिकेची कोणती भूमिका आहे ते समजले पाहिजे. शासनाने कठोर भूमिका दाखविली पाहिजे. अशा घटनांबाबत शासन कठोर कारवाई करीत असल्याचे चित्र निर्माण केले पाहिजे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शासनाने पावले उचलावीत अशी या चर्चेच्या निमित्ताने अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहात एका गंभीर विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. त्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

दिनांक 4 एप्रिल, 2013 रोजी सायंकाळी 5.30 वाजता शिळफाटा नजिक मुंब्रा येथील डायघर लकी कम्पाऊंडमधील एक सात मजली इमारत कोसळून अनेकजण गाडले गेले आहेत. अनेकजण जखमी झालेले आहेत. ज्या लोकांचा या व्यवहाराशी काही संबंध नाही अशी अनेक निरपराध माणसे या घटनेमध्ये मरण पावली आहेत. त्याला जबाबदार कोण आहे ? आज वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले आहे की, श्री.मंगल पाटील व श्री.शरद पाटील यांनी या अनधिकृत इमारतीचे फोटो काढून लेखी तक्रार पालिकेच्या अधिकाऱ्यांकडे केली होती. पालिकेचे अधिकारी तेथे पाहणी करुन गेले होते. त्यांना एसएमएस केला होता. परंतु दुर्दैवाने त्यांच्या तक्रारीची व अनधिकृत बांधकामाची दखल घेतली नाही. या इमारतीचे 7 मजले 40-50 दिवसामध्ये उभे करण्यात आले. मला काही आकडेवारी द्यावयाची आहे. नौपाडा येथे 5,980, कळव्याला 15,834, कोपरीला 7,475, मुंब्रा-दिवा येथे 20,933, वागळे इस्टेट येथे 6,354, वर्तकनगर येथे 15,749, माजिवडे-मानपाडा येथे 21,000, उथळसर येथे 8,536 अशी मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे चालू असताना सुध्दा महानगरपालिकेचे अधिकारी कानाडोळा करीत आहेत. एवढे मोठे कारस्थान आहे, ते केवळ ठाणे व मुंब्रा येथेच चालू नाही. मुंबई व मुंबई उपनगरामध्ये अशा अनधिकृत बांधकामांची आकडेवारी यापेक्षाही अधिक असण्याची शक्यता आहे.

मी नगरसेविका असताना अशा अनधिकृत बांधकामांबाबत महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे तक्रारी केलेल्या आहेत. दु:खाची बाब अशी आहे की, त्या तक्रारीची कोणी दखलही घेत नाही. हे अधिकारी खूप निर्ढावलेले आहेत. अनधिकृत बांधकामे होऊ नयेत म्हणून कोणतीही उपाययोजना महानगरपालिकेकडून केली जात नाही. अनधिकृत बांधकामे असतील तर आम्हाला कळविण्यात यावे आणि ती तोडण्यासाठी पोलीस फोर्स पुरविला तर आम्ही ती हटवू असे सांगितले जाते. प्रत्येक वेळी महानगरपालिकेकडून पोलीस फोर्सची मागणी केली जाते. पोलीस दलाला काही उद्योग नाही का ? पोलीस फोर्स पुरविला तरच अनधिकृत बांधकामे तोडणार का ? आयुक्त व वॉर्ड ऑफिसरला अनधिकृत बांधकाम सुरु असलेली ठिकाणे माहीत असतात.

मी पार्ले येथे राहते. माझ्या इमारतीच्या टाकीच्या झाकणाला छोटसे छिद्र आहे.

यानंतर श्री.भोगले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण......

महापालिकेचा कर्मचारी आला आणि आम्हाला सांगितले की, तुम्ही 8 दिवसात झाकण बदलले नाही तर तुम्हाला 2500 रुपये दंड लावण्यात येईल. पाण्याच्या टाकीच्या झाकणासाठी दंड लावण्याबाबत एवढी कर्तव्य तत्परता दाखविणारे महापालिकेचे कर्मचारी अनधिकृत बांधकामे डोळयासमोर उभी रहात असताना त्याकडे डोळेझाक का करतात? महापालिकेचे ज्युनिअर इंजिनिअर यांचे हे काम असते. पोलीस स्टेशनने दखल घ्यायची असते. परंतु खेदाने सांगावेसे वाटते की, आपण सर्वजण याला जबाबदार आहोत. आपण काहीही केले, कितीही चर्चा सभागृहात केली, लक्षवेधी सूचना मांडली तरी कोणत्याही जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई केली जात नाही.

सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे शासनाचा जीआर आहे. अनधिकृत बांधकामे होतील त्या भागाच्या प्रभाग अधिकाऱ्याला जबाबदार धरले पाहिजे असे जीआरमध्ये म्हटले आहे. तो नोकरीतून बडतर्फ होऊ शकतो. परंतु या जीआरची अंमलबजावणी का होत नाही? अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी पोलीस फोर्स द्या, नंतर आम्ही ती बांधकामे पाडू असे महापालिकेचे अधिकारी म्हणतात. परंतु अनधिकृत बांधकामे का होऊ देतात? त्या संदर्भात वेळीच कारवाई का केली जात नाही?

सभापती महोदय, मुंबई महापालिकेमध्ये क्वॉलिटी कंट्रोल विभाग आहे. या विभागाचे काम असते की, इमारतीचा पाया पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक स्लॅबची क्वॉलिटी कशी आहे हे स्वत: थांबून तपासून घ्यायचे आणि त्यानंतर त्यांनी प्रमाणपत्र द्यायचे असते. एखाद्या रस्त्यावर खड्डे पडले तर त्या रस्त्याचे काम कसे झाले, कोणत्या प्रकारचे डांबर वापरले, कोणत्या प्रकारचे सिमेंट वापरले याची तपासणी करुन त्यांनी महापालिकेला अहवाल द्यायचा असतो. क्वॉलिटी कंट्रोल विभागाचे अधिकारी योग्य पध्दतीने काम न करता केवळ पाकिटे गोळा करण्यासाठी जातात. हे प्रकार खुलेआम चालत असताना शासकीय यंत्रणा कारवाई करीत नाही याचे मोठे दु:ख वाटते.

सभापती महोदय, गोरेगावच्या आरे कॉलनीमध्ये बंगल्याचे बांधकाम सुरु असताना स्लॅब कोसळून 7 ते 8 कामगार ढिगाऱ्याखाली गाडले गेले होते. त्या प्रकरणात आजपर्यंत कारवाई झ ालेली नाही. माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी थोरबोले, जोशी, ठाकूर या भ्रष्ट अधिकाऱ्यांचे उदाहरण दिले आहे. हे अधिकारी म्हणजे हिमनगाचे टोक आहे. आज मुंबई.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण......

महापालिका आणि एसआरए यंत्रणेतील अनेक अधिकाऱ्यांची नावे घेता येतील. श्री.गौतम चॅटर्जी वगळता एसआरए मुख्यालयातील सर्व अधिकाऱ्यांची चौकशी करावी, प्रत्येक अधिकारी भ्रष्ट असल्याचे मी पुराव्यानिशी सांगू शकते. मोठया प्रमाणात एसआरएच्या कार्यालयात भ्रष्टाचार चालतो. चौरस फुटावर भ्रष्ट मार्गाने पैसे घेतले जातात. गरीब लोकांना घरे दिली जात नाहीत. त्यांच्या झोपड्या हटवून त्या जागेवर टॉवर उभारले जातात.

सभापती महोदय, नॅशनल पार्कमधील झोपड्या हटविणार असल्याचे नगरविकास राज्यमंत्र्यांनी जाहीर केल्याची बातमी आजच्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे. नॅशनल पार्कच्या जागेवर बंगले आणि टॉवर उभारण्यात आले आहेत. ते प्रथम हटविले पाहिजेत. झोपड्या हटवायला काही कठीण नाही. बुलडोझर फिरवून झोपड्या हटविल्या जातात. परंतु अनधिकृत बांधकाम करणारे विकासक आणि महापालिकेचे प्रभाग अधिकारी यांच्यावर कारवाई केव्हा करणार आहात? महापालिका प्रशासनाला जबाबदार धरणार आहात की नाही?

सभापती महोदय, अन्न, वस्त्र व निवारा यापैकी निवाऱ्याची समस्या हा विषय आता ऐरणीवर आलेला आहे. सर्वसामान्य लोकांना निवारा पुरविण्याची जबाबदारी शासनाची आहे. ॲफोर्डेबल हाऊसिंग शासन पुरवू शकत नाही. मुंबईमध्ये पूर्वी प्रती चौरस फुटाला 750 ते 800 रुपये खर्च यायचा. आज हा खर्च 1200 रुपयांवर जाऊन पोहोचला आहे. तरी देखील मुंबईमध्ये 25 ते 50 हजार रुपये प्रती चौरस फूट दराने फ्लॅट विकले जात आहेत. मध्यमवर्गीयांना हा दर परवडणारा नाही. भाड्याची घरे उपलब्ध होत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. अनधिकृत बांधकामे मोठया प्रमाणात होतात. लोअर क्वॉलिटीचे सिमेंट वापरले तर इमारती कोसळणारच आहेत, तेथील लोक मरणारच आहेत. त्याची कोणाला पर्वा नाही. महापालिकेच्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जात नाही, भ्रष्टाचारावर अंकुश ठेवला जात नाही, त्यामुळे अशा प्रकारच्या अनधिकृत इमारती उभ्या राहून कालांतराने त्या कोसळणारच आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर 3X.1...

श्रीमती विद्या चव्हाण ......

पावसाळा आता दोन महिन्यावर येऊन ठेपला आहे. पावसाळयात मोठया प्रमाणात इमारती कोसळून जीवित हानी होत असते. त्यामुळे मला शासनाला एकच विनंती करावयाची आहे की, काल झालेल्या घटनांमधून आपण काही तरी शिकले पाहिजे, अनाधिकृत बांधकामाचे जे पेव फुटलेले आहे त्यामध्ये शासकीय अधिकाऱ्यांना तसेच प्रशासनाला जबाबदार धरले गेले पाहिजे. आपण कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना पाचवा वेतन आयोग देतो, सहावा वेतन आयोग देतो,पेन्शन सुध्दा देतो. वन विभागाच्या कोणकोणत्या अधिकाऱ्याच्या कारकिर्दीत कितीचा भ्रष्टाचार झालेला आहे त्या सर्व अधिकाऱ्यांची नावे मी सुध्दा सांगू शकते. त्यामुळे वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर आपण कारवाई कधी करणार आहात ? असा प्रश्न मला विचारावयाचा आहेत. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

धन्यवाद.

**उप सभापती** : या चर्चेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहे. परंतु माननीय मुख्यमंत्री 6.15 वाजता सभागृहात येणार असल्यामुळे मी सभागृहाची बैठक 6.15 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5.51 ते 6.15 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

--------

यानंतर श्री. मंगेश.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**तालिका सभाध्यक्ष** : सभागृहाची बैठक मी 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 06.15 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

----

( नंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

**(सभापती स्थानी माननीय सभापती )**

**सभापती** : सभागृहाची वेळ कामकाज संपे पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, काल ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मुंब्रा विभागामध्ये लकी कंपाऊंडमध्ये इमारत कोसळून अपघात झाल्याची माहिती सर्वांना आहे. या विषयावर जवळ जवळ 14 सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी या चर्चेला सुरूवात केली होती. मी खालच्या सभागृहात उपस्थित राहिल्यामुळे येथील चर्चेला उपस्थित राहू शकलो नसलो तरी माझ्याकडे सर्व सन्माननीय सदस्यांचे मुद्दे आलेले आहेत. ही अत्यंत दुर्दैवी अशी घटना आहे. या घटनेमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर मनुष्यहानी झालेली आहे. आज सकाळी मी आणि माननीय उप मुख्यमंत्री घटनास्थळी गेलो होतो. त्यानंतर आम्ही 1-2 रूग्णालयामध्ये जाऊन जखमी रूग्णांना भेटलो आणि त्यानंतर मग अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर येथे आलो. या दुर्घटनेमध्ये जे मृत पावले आहेत त्यांच्या प्रती मी संवेदना व्यक्त करतो.

सभापती महोदय, ही अतिशय दुर्दैवी घटना आहे. ही घटना कुठल्या कारणामुळे आणि कशामुळे झाली, व त्याबद्दल शासनाने कोणती उपाययोजना केली आहे व पुढे कोणती उपाययोजना केली जाणार आहे हे मी सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, शासन दूरगामी उपाययोजना करणार आहे. या घटने संबंधातील सर्व माहिती समोर आलेली आहे. या घटनेत एकूण 44 लोक मृत्युमुखी पडले असून 53 व्यक्ती जखमी झाल्या आहेत. 17 जणांना रूग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.

सदर घटना घडल्यानंतर सायंकाळी 6.10 वाजता अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले आहे. तसेच, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त, ठाणे पोलीस आयुक्त, ठाणे जिल्हाधिकारी व अन्य अधिकारी 6.30 वाजता घटनास्थळी पोहोचले आहेत. ठाणे महानगरपालिकेच्या लगत असलेल्या मुंबई महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका यांचे अग्निशमन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ ST/ 18:30

श्री.पृथ्वीराज चव्हाण..

दल शोध व मदत कार्यासाठी घटनास्थळी आले आहे. तसेच केंद्र सरकारच्या तळेगाव येथील नॅशनल डिझास्टर फोर्सची 45 जणांची टीम रात्रौ 9.00 वाजता सर्व अत्याधुनिक उपकरणांसह घटनास्थळी आली. सदर टीम अतिसूक्ष्म आवाज ऐकू येईल अशा प्रकारचे उपकरण घेऊन देखील आली आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

त्यांच्या माध्यमातून रात्रभर जीवंत असलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरु आहेत आणि अर्थातच सदरहू काम अतिशय काळजीपूर्वक आणि हळू सुरु आहे. कारण ते जर घाईगर्दीमध्ये केले तर एखाद्या वेळेस जीवंत व्यक्ती मृत्युमुखी पडण्याची शक्यता आहे.

सभापती महोदय, काही लोकांनी टीका केली की, याठिकाणी फार हळूहळू काम सुरु आहे. मला असे वाटते की, तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार काम सुरु आहे आणि तेथे सर्व यंत्रणा व्यवस्थित उभी राहिलेली आहे. या घटनेमध्ये जखमी झालेल्या व्यक्तींवर काळसेकर रुग्णालय, मुंब्रा, सिव्हील हॉस्पिटल आणि छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय ठाणे व सायन हॉस्पिटल, मुंबई येथे उपचार सुरु आहेत.

सभापती महोदय, आतापर्यंत जी माहिती आली आहे त्यानुसार सदर इमारतीचे बांधकाम पूर्णपणे अनधिकृत होते आणि या बांधकामासाठी कोणत्याही प्रकारची आवश्यक ती परवानगी घेतलेली नाही. त्याचबरोबर ही जमीन वन विभागाची आहे किंवा आदिवासी व्यक्तीची आहे आणि त्याचे बेकायदेशीर हस्तांतरण झालेले आहे का? याबद्दल अजूनही निश्चिती झालेली नाही. सर्व्हे नंबर 72 आहे की सर्व्हे नंबर 98 आहे याबद्दल वेगवेगळी मते आहेत. जर 72 सर्व्हे नंबर असेल तर तो वन विभागाचा आहे आणि जर 98 असेल तर तो आदिवासी विभागाचा आहे. हे निश्चित न होण्याचे कारण असे आहे की, तेथे मध्ये तारेचे कपांऊंड आहे ते मलब्याखाली दबलेले आहे. मला असे वाटते की, याबाबतीत संध्याकाळ पर्यंत निश्चिती होईल आणि तो प्लॉट कोणाचा होता हे समजू शकेल. याबाबतीत आताची वस्तुस्थिती आणि गुगलचे नकाशे देखील पाहिलेले आहेत. परंतु मोठ्या प्रमाणात मलबा पडल्यामुळे प्लॉटची जी रेषा आहे त्या बाबतीत निश्चिती झालेली नाही. याबाबतीत संध्याकाळपर्यंत निश्चिती होईल अशी माहिती मिळालेली आहे.

सभापती महोदय, या इमारतीचा बांधकाम धारक अदनान शेख हा होता, याच्या विरुध्द अनधिकृत बांधकाम थांबविण्याकरता नोटीसेस पाठविल्या होत्या आणि मला असे वाटते की, नेहमी प्रमाणे औपचारिक पध्दतीने या नोटीसा पाठविल्या होत्या आणि ते काम थांबविण्यामध्ये यश आले नाही ही वस्तुस्थिती आहे. तसेच ही घटना घडल्यानंतर शीळ, डायघर पोलीस ठाणे येथे श्री.जमीर कुरेशी आणि सलीम शेख, रहाणार कौसा, मुंब्रा यांच्या विरुध्द भारतीय दंड विधानसंहितेच्या अंतर्गत 34, 304, 336, 337, 338 या कलमांखाली गुन्हा नोंदवून तपास सुरु झालेला आहे.तसेच

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

या घटनेनंतर आम्ही चौघे-पाच जण म्हणजे मी, माननीय उप मुख्यमंत्री, गृह मंत्री, जिल्ह्याचे पालक मंत्री आणि ठाणे जिल्ह्यातील राज्यमंत्री असे सर्वजण तेथे गेलो होतो. याठिकाणी अशा प्रकारे सर्व घडलेले आहे. मी या दुर्घटनेतील जखमींची संख्या सांगितली आणि मृत व्यक्तींची संख्या आताच्या माहितीप्रमाणे 44 आहे. तसेच त्याठिकाणी बहुतेक संध्याकाळी ट्युशनचा क्लास सुरु होता आणि या घटनेत कोणी सापडले आहेत काय याबाबत अनिश्चितता आहे. पण मदत कार्य सुरु आहे आणि आपण एवढीच अपेक्षा करु की, त्याठिकाणी यापेक्षा जास्त मृत व्यक्ती सापडणार नाहीत. अजून मिसिंग व्यक्तींची फार मोठ्या प्रमाणात नोंद झालेली नाही. त्यामुळे हा आकडा जास्त वाढणार नाही असे आता तरी वाटते. ही घटना अतिशय दुर्भाग्यपूर्ण आहे. म्हणून याठिकाणी मी दोन-तीन घोषणा करु इच्छितो. त्याच बरोबर मी सभागृहाचा थोडा वेळ घेणार आहे आणि या अनुषंगाने आपण पुढे कशा प्रकारे उपाययोजना करणार आहोत हे सांगणार आहे. कारण याबाबतीत काय करावयास पाहिजे या दृष्टीकोनातून याठिकाणी खूप मुद्दे उपस्थित केले आहेत.

सभापती महोदय, सर्वप्रथम अप्पर मुख्य सचिव या पदाचे ज्येष्ठ अधिकारी यांची एक सदस्य समिती या घटनेची संपूर्ण चौकशी करुन त्वरित त्या बाबतचा अहवाल सादर करतील. त्याचबरोबर येथील महानगरपालिकेचे उपायुक्त जे डेझीग्नेटेड अधिकारी आहेत ते, त्याचबरोबर तेथील सिनिअर पोलीस इन्स्पेक्टर या दोघांनाही त्वरित निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.जर आज संध्याकाळ पर्यंत ही जमीन वन विभागाची आहे असे निश्चित झाले तर वन विभागाचे अधिकारी आर.एफ.ओ यांनाही लगेच निलंबित करण्यात येईल. याचा अर्थ आम्ही एवढेच करुन थांबणार नाही तर चौकशीअंती ज्या-ज्या व्यक्ती गुन्हेगार ठरतील.....मग पाणी कोणी दिले, वीज कोणी दिली, ती कशी दिली आणि मग कोणावर किती जबाबदारी ठरवायची हे सर्व चौकशी झाल्यानंतर निश्चित करुन त्याबाबत निर्णय घेण्यात येईल. त्याचबरोबर या दुर्घटनेमध्ये जे मृत्युमूखी पडलेले आहेत अशा व्यक्तींच्या बाबतीत मी शासनाच्या वतीने शोक व्यक्त करतोच. परंतु या घटनेमध्ये मृत्युमूखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी 2 लाख रुपये आणि गंभीररित्या जखमी झालेल्या व्यक्तींना 50 हजार रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून देण्याची घोषणा करतो.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

जखमींवरील उपचाराचा सर्व खर्च शासनामार्फत करण्यात येईल. या घटनेची वास्तव माहिती मी येथे दिली आहे.

सभापती महोदय, घरांची मागणी प्रचंड प्रमाणात आहे आणि त्या प्रमाणात घरे उपलब्ध नाहीत अशी विसंगती आहे. राज्यातील विविध भागांतून तसेच इतर राज्यांतून अनेक लोक उपजीविकेरिता मुंबई आणि ठाणे परिसरात येतात. आज ठाणे शहराची लोकसंख्या किती झपाट्याने वाढत आहे याची आपणा सर्वांना कल्पना आहे. मुंब्रा परिसरात फार मोठ्या प्रमाणावर अनधिकृत घरे बांधण्यात आली आहेत. ठाणे जिल्हयातील अनधिकृत इमारतींबद्दल काय निर्णय घ्यावयाचा असा प्रश्न आहे. कारण तेथे काही अनियमित आणि अनधिकृत इमारती आहेत. तेव्हा प्रचलित डी.सी.रुल्स प्रमाणे, एमआरटीपी ॲक्ट प्रमाणे काय करता येईल याचा अभ्यास अनेक दिवसांपासून सुरु आहे. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी आणि त्यापूर्वी सन 2005 मध्ये बी.के.अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. सन 2008 मध्ये देखील बी.के.अग्रवाल यांना आणखी एका चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. हे सर्व अहवाल आलेले आहेत. सन 2010 मध्ये मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली हाय पॉवर कमिटी नेमण्यात आली. मी मुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर गृह निर्माण सचिव आणि नगर विकास विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. ब-याच दिवसांपासून हे काम सुरु आहे. हा प्रश्न फार अवघड आहे. हा प्रश्न फक्त ठाण्यापुरता मर्यादित नाही तर पिंपरी-चिंचवड, पुण्याच्या काही भागामध्ये अशाप्रकारे वेगाने होत असलेले नागरिकीकरण पहावयास मिळत आहे. नागपूरमध्ये ले-आऊट संबंधी प्रश्न निर्माण झालेला आहे. नागरी भागाकरिता आणि ग्रामीण भागाकरिता हा प्रश्न निश्चितपणे सोडविला पाहिजे.

सभापती महोदय, नागरी भागातील अनधिकृत बांधकांमाबद्दल अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. त्या समितीने अहवाल दिलेला आहे. विधानसभेच्या माननीय अध्यक्षांनी त्यामध्ये पुढाकार घेतला होता. त्यांच्या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे झाली होती म्हणून ती समिती नेमण्यात आली होती.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यामध्ये जवळपास 1100 इमारती धोकादायक किंवा अतिधोकादायक अवस्थेत आहेत. त्या इमारतींबद्दल निर्णय घेणे आवश्यक आहे. नियमाप्रमाणे कोणत्याही अनधिकृत इमारतींना काही इन्टेंन्सीव्ह एफ.एस.आय. देत नाही. आता पर्यंत ज्या समिती नेमण्यात आल्या होत्या त्या समित्यांनी देखील कोणत्याही प्रकारे इन्सेन्टीव्ह एफ.एस.आय.देणे योग्य होणार नाही असे संगितले होते. सन 2005 मध्ये बी.के.अग्रवाल समितीने असेच सांगितले होते. त्यानंतर 2008 मध्ये देखील तेच सांगितले होते. मुंबईत जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींकरिता दुरुस्ती मंडळ स्थापन करण्यात आलेले आहे त्या धर्तीवर गृहनिर्माण मंडळ स्थापन करावे असा विचार पुढे आला होता. परंतु बी.के.अग्रवाल समितीने अशाप्रकारचे इमारती दुरुस्ती मंडळ स्थापन करु नये अशी शिफारस केली होती.

सभापती महोदय, बी.के.अग्रवाल समितीने दुसऱ्यांदा अहवाल दिला त्यामध्ये क्लस्टर डेव्हलपमेंटचा विचार करावा अशी सूचना केलेली आहे. ही अतिशय महत्वाची सूचना आहे. मुंबईच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये क्लस्टर डेव्हलमेंटची तरतूद आहे. अशा प्रकारची तरतूद ठाणे येथे देखील करावी. मुंबईच्या क्लस्टर डेव्हलपमेंटमध्ये अनधिकृत इमारतींचा आपण समावेश करीत नाही. तेव्हा धोकादायक पण अनधिकृत इमारतींचा क्लस्टर डेव्हलपमेंटमध्ये विचार करायचा किंवा कसे असा मोठा प्रश्न शासनासमोर आहे. क्लस्टर डेव्हलपमेंट करावयाचे असेल तर संक्रमण शिबिरे बांधावे लागतील आणि संक्रमण शिबिरे कुठे व कोणत्या जमिनीवर बांधायची असा देखील प्रश्न आहे. आम्ही आता निर्णय घेण्यापर्यंत आलेलो आहोत.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

आम्ही दोन-तीन निर्णय घेतलेले आहेत. मुंबई महानगरपालिका क्षेत्राप्रमाणेच ठाणे महापालिका क्षेत्रात सुध्दा मोठ्या प्रमाणावर झपाट्याने नागरिकीकरण होत आहे. त्यामुळे मुंबई सारखेच धोरण ठाणे महापालिका क्षेत्रात घ्यावे लागेल. मुंबई शहरात लागू केलेल्या एसआरए योजनेतील दोष दूर करुन ती योजना सर्व महापालिका क्षेत्रात राबविण्याचा निर्णय तत्वत: शासनाने घेतला आहे. या बाबतची नियमावली लवकरात लवकर केली जाईल. या नियमावलीची रुपरेषा ठरविण्यासाठी प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे. त्या समितीचा अहवाल लवकरच प्राप्त होईल. हा पहिला निर्णय आम्ही घेतला आहे.

महोदय, या बरोबरच क्लस्टर डेव्हलपमेंट सुध्दा करावे लागेल. त्यासाठी सबंध महापालिका क्षेत्रात एकच डी.सी. रुल करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने कायदा बदलण्याचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार कायदा बदलण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्या कायद्याचे प्रारुप विधी व न्याय विभागाकडे तपासणी करण्यासाठी पाठविले आहे. कदाचित या अधिवेशनात या बाबतची माहिती देण्यात येईल.

महोदय, एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की, हाऊसिंग स्टॉक मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्यानंतर ज्या ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत त्याच्या जवळपासच लोकांना घरे मिळाली पाहिजेत. वाढते नागरिकीकरण पाहता मेट्रो रेल, मोनो रेल प्रकल्प करुन शहराचा प्रश्न आपण कायमस्वरुपी सोडवू शकतो असे नाही. ठाणे महापालिका क्षेत्रात मेट्रो रेल्वेचा विचार करावाच लागेल. मुंबईत मेट्रो आणि मोनो रेल्वे या वर्षी सुरु होईल. ज्या ठिकाणी उपजीविकेचे साधन उपलब्ध आहे त्याच्या जवळपासच लोकांची राहण्याची व्यवस्था केली पाहिजे. अशा प्रकारे इंटीग्रेटेड इंडस्ट्रीयल एरिया किंवा इंटीग्रेटेड टाऊनशिप या बाबतीत विचार करावा लागेल. या बाबत शासनाने अधिसूचना काढून नव्या पध्दतीने इंटीग्रेटेड टाऊनशिप करण्यासाठी 33 (1) हा नियम केला आहे. या बाबत हरकती व सूचना आलेल्या आहेत. या बाबत लवकरच अंतिम अधिसूचना काढण्यात येईल. या मध्ये 20 टक्के बांधकाम क्षेत्र हे आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी आरक्षित ठेवण्याचा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

केंद्र सरकारची अपेक्षा आहे की, जे मोठे हाऊसिंग प्रकल्प होतील त्यातील 20 टक्के परवडणारी घरे आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांसाठी ठेवली पाहिजेत. काही दिवसांपूर्वी भाडेतत्त्वावर घरे देण्याची योजना केली होती. एमएमआरडीएकडे हे काम सोपविले होते. या माध्यमातून 28 योजनांना मंजुरी दिली होती. त्यातून महानगरपालिका क्षेत्रात 63 हजार घरे निर्माण होतील अशी अपेक्षा होती. या प्रकल्पाच्या सदनिकांचे क्षेत्रफळ 160 स्क्वे.फू. आहे. परंतु आता देशाच्या नवीन हाऊसिंग धोरणानुसार किमान 25 स्क्वे.मी. घराचे क्षेत्रफळ असले पाहिजे. या पुढे या योजनेत बदल करुन भाडे तत्त्वाऐवजी परवडणारी घरे देण्याची नवीन योजना आम्ही आणलेली आहे. पूर्वी 160 स्क्वे.फू. ची जी घरे उपलब्ध करुन देण्यात आलेली होती त्यातील 50 टक्के घरे मुंबईतील गिरणी कामगारांना 160 स्क्वे.फुटाच्या दोन सदनिका एकत्र करुन 320 स्क्वे.फू. चे घर देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

महोदय, बृहन्मुंबई मध्ये 33 (5) नियमावली आहे. या मध्ये म्हाडाच्या योजना आहेत. मी या ठिकाणी घोषित केले होते की, त्या नियमावलीमध्ये बदल करण्यात येईल. अर्थात मुंबईसाठी तो बदल लागू होईल. माझ्या मते तो बदल या आठवड्यात घोषित होईल. अनधिकृत आणि मजबूत असलेली बांधकामे तसेच अनधिकृत आणि धोकादायक असलेली बांधकामे अशा दोन प्रकारची बांधकामे आहेत. अशा प्रकारच्या बांधकामामध्ये अनधिकृत बांधकामामध्ये कम्पाऊंडची कारवाई करुन त्यांना नियमित करता येईल काय या बाबतचा विचार करुन अंतिम निर्णय घेणार आहोत. तसेच अनधिकृत पण धोकादायक इमारतींचे नियमितीकरण करण्याचा निर्णय घेता येणार नाही. अशा इमारतींसाठी ब्राऊनफील टाऊन प्लॅनिंग स्कीम राबवावी लागेल.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

आपण टाऊन प्लानिंग स्कीम मोकळ्या जागेवर राबवितो आणि ते करणे सोपे असते परतु ज्या मोठ्या प्रमाणावर अनधिकृत, अधिकृत किंवा धोकादायक इमारती आहेत त्या ठिकाणी ब्राऊन फील्ड टाऊनशीप स्कीम राबवून नियोजनपूर्ण पध्दतीने पुनर्वास करण्याकरिता योजना आखलेली आहे. इतर राज्यामध्ये अशा प्रकारचे प्रयोग यशस्वी झालेले आहेत. त्याकरिता मुबईमध्ये क्लस्टर डेव्हलपमेंटचा जो 33(9) नियम आहे तशा प्रकारची तरतूद झोपडपट्टीकरिता आणि धोकादायक इमारतींकरिता संपूर्ण महानगर क्षेत्रामध्ये, जे कॉमन डीसी रुल्स असतील त्यामध्ये आणण्याचा निर्णय आम्ही जवळजवळ घेतलेला आहे. त्या करिता समितीने मला अंतिम अहवाल दिलेला आहे. क्लस्टर डेव्हलपमेंटच्या पध्दतीने या सर्व महानगरांमध्ये विकास करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, मी आता या संदर्भात यापेक्षा जास्त बोलणार नाही. कारण विषय थोडा वेगळा आहे. पण मी आपल्याला आश्वस्त करुन इच्छितो. आपण खूप चांगल्या सूचना दिलेल्या आहेत. ठाण्यासारख्या ठिकाणी किंवा महानगर क्षेत्रामध्ये किंवा कल्याण, पिंपरी चिंचवड, नागपूरमध्ये अनियमित घराची किंवा अनधिकृत घरांची समस्या मोठ्या प्रमाणात पुढे आलेली आहे. हा प्रश्न जर कायमस्वरुपी सोडवावयाचा असेल तर आपल्याला मोठ्या प्रमाणात हाऊसिंग स्टॉक वाढवावा लागेल. त्या बाबतीत आम्ही निर्णय घेत आहोत. मोठ्या प्रमाणात नियम बदलून, काही एफएसआयच्या माध्यमातून, काही म्हाडाच्या माध्यमातून विकास करुन, गृहनिर्माण क्षेत्रामध्ये राज्याने अधिक महत्वाची भूमिका घेऊन आपल्याला पुढे जावे लागणार आहे.

सभापती महोदय, मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो की, ठाण्यात आज अत्यंत दुर्भाग्यपूर्ण घटना घडली त्याची सखोल चौकशी करुन जे दोषी असतील तसेच यामध्ये सिस्टिममधील जे दोष असतील, मुंब्राच्या घटनेमध्ये जे दोषी असतील त्याबाबत तर आपण निश्चितपणे कडक शासन करणारच आहोत पण मुंब्रा येथील घटनाच नाही तर अनेक ठिकाणी अशा प्रकारे वेडेवाकडे डेव्हलपमेंट होते त्यामध्ये मोठ्या प्रकाणात गुन्हेगारी प्रवृत्ती आलेली आहे त्यावर कायमस्वरुपी उपाय जोपर्यंत करीत नाही, जोपर्यंत मोठ्या प्रमाणावर हाऊसिंग स्टॉक वाढवत नाही, जोपर्यंत मोठ्या प्रमाणावर असलेले क्लिष्ट नियम सोपे करीत नाही आणि त्यामध्ये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण .......

जोपर्यंत घर होत नाही तोपर्यंत या समस्येला सामोरे जाणे अवघड होणार आहे, असे मला वाटते. शासनाचा तशा प्रकारचा प्रयत्न असणार आहे. म्हणून या घटनेमध्ये कडक शासन करणे, जखमींच्या आणि मृतांच्या कुटुंबीयांना मदत करणे, त्याचबरोबर कायमस्वरुपी उपाययोजना करुन या ज्या अपप्रवृत्ती बळावत चाललेल्या आहेत त्या रोखण्याकरिता शासनाचे प्रयत्न राहतील, एवढे सांगून मी आपली रजा घेतो.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ D/

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण आजचे सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला सारुन आज या विषयावर चर्चा केली. या चर्चेमध्ये दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी बरेच मुद्दे उपस्थित केले. आपण आम्हाला सांगता की, या ठिकाणी उपस्थित असलेले मंत्री, अधिकारी मुद्यांची नोंद घेत आहेत परंतु आम्ही मांडलेल्या मुद्यातील एकाही मुद्याला स्पर्श झालेला नाही, या गोष्टीचे वाईट वाटते. मग आम्ही चर्चा कशाला करावी ? माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत जे ऑब्जेक्टीव्ह उत्तर दिले तेच उत्तर या सभागृहात दिलेले आहे. मग एवढी चर्चा करण्यापेक्षा आम्ही आमचे कामकाज केले असते आणि ते कामकाज संपल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात येऊन एवढे सांगितले असते तरी चालले असते.

या ठिकाणी मी तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, श्री. किरण पावसकर तसेच श्री. मुझफ्फर हुसेन यांनी अनेक स्पेसिफिक मुद्दे मांडले. 150 इमारती अनधिकृत आणि तकलादू आहेत त्या संदर्भात त्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करु असे उत्तर येईल अशी आम्ही अपेक्षा करीत होतो. केवळ डीएमसी नाही तर आताचा वॉर्ड ऑफीसर श्री. आंधळे आणि आधीचे वॉर्ड ऑफीसर ज्यांच्याकडे केरळची तिकिटे सापडली, त्यांच्यावरील कारवाईच्या संदर्भात काही उत्तर येईल असे वाटले होते पण त्याचेही उत्तर आलेले नाही. भिवंडीमध्ये जी अनधिकृत गोदामे आहेत त्या ठिकाणी आग लागेल असा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला. माननीय उप सभापतींनी त्या संदर्भात निर्देश दिले पण त्याबद्दल सुध्दा उल्लेख झाला नाही. आम्ही सर्वांनी मिळून असा मुद्दा उपस्थित केला की, याला आता संघटित गुन्हेगारीचे स्वरुप आलेले आहे. मग महावितरण असेल, वॉर्ड ऑफीसर असतील, पोलीस असतील, यांच्यावर मोक्का लावला पाहिजे अशा प्रकारचा आग्रह धरला. कारण सर्व मिळून हे करीत आहेत. त्या बाबतीत ठोस काही तरी करण्याची गरज आहे. ते सरकारला मान्य आहे की नाही, त्याबाबतीत शासनाचे काय मत आहे, याचे उत्तर या ठिकाणी यावयास पाहिजे होते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.......

माननीय मुख्यमंत्र्यांनी दूरगामी गोष्टी मांडल्या आहेत. अग्रवाल समितीने 2008 साली शासनाला अहवाल सादर केला होता. 2011 सालापासून क्लस्टर डेव्हलपमेंटचा विषय प्रलंबित आहे. हा विषय मी मांडला होता, माजी सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी मांडला होता. या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलेले आहे, त्यांच्याकडे तीन वेळा जाऊन भेटलो आहे. 2011 सालापासून तो रिपोर्ट प्रलंबित आहे. आज 44 लोकांचा मृत्यू झाल्यानंतर सरकारला जाग येते का ? या विषयी कोण उत्तर देणार आहे ?

सरकारला टाऊनशिपची घाई का झाली आहे ? ही घटना घडल्यानंतर काही बिल्डर्सनी एकत्र बसून सरकारने काही घोषणा करु नये अशा प्रकारची चर्चा चालू केली आहे अशी माझी माहिती आहे. टाऊनशिपविषयी सरकारने घाई करु नये, आम्हाला त्याविषयी सरकारला काही सांगावयाचे आहे. आम्हाला 20 टक्के चालणार नाही, 50 टक्के केले पाहिजे. अन्यथा, आम्ही मोठी घरे बांधल्यावर सामान्य माणसांना घरे मिळणार नाहीत. अशा अनेक गोष्टी त्यांना सरकारकडे मांडावयाच्या आहेत. या दु:खद घटनेचा फायदा घेऊन कोणी बिल्डर्स आपले उखळ पांढरे करणार असतील तर सरकारने त्यांना साथ देता कामा नये. अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या भयानक घटनेनंतर सरकारकडून येणार नसतील तर आम्ही कशासाठी चर्चा करावयाची ? आम्ही चर्चा करुन काय मिळविले ?

आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना आपण पुढे ढकलल्या आहेत, नियम 93 वरील निवेदने पुढे ढकलली आहेत. ऊर्जा विषयावरील विरोधी पक्षातर्फे मांडला जाणारा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आम्ही पुढे ढकलला आहे. आज झालेल्या चर्चेचे नोटिंग माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी केले होते. संबंधित अधिकारी बसले होते. मग ते नोटिंग माननीय मुख्यमंत्र्यांना मिळाले नाही का ? माननीय मुख्यमंत्र्यांकडून आमच्या मुद्यांसंबंधी उत्तरे मिळतील या अपेक्षेने आम्ही ही चर्चा अल्पकालीन असतानाही वाढविली. माननीय मुख्यमंत्र्यांचे विधानसभेत उत्तर चालू असल्यामुळे सभागृहाचे कामकाज अर्ध्या तासासाठी स्थगित केले होते. त्यानंतर पुन्हा 15 मिनिटांसाठी स्थगित केले होते. मग या सभागृहाच्या अस्तित्वाला काही अर्थ

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

आहे काय ? सभासदांनी जे मुद्दे मांडले त्याला अर्थ नाही का ? सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी काही मुद्दे मांडले तसेच अन्य सन्माननीय सदस्यांनीही रिलेव्हंट मुद्दे मांडले होते. एकाही मुद्याला माननीय मुख्यमंत्र्यांना स्पर्श केलेला नाही. त्याऐवजी गंभीर घटनेबाबतही जनरल व लिखापोती केलेले स्टेटमेण्ट केले जाणार असेल तर ते ऐकण्यामध्ये आम्हाला रस नाही. आम्ही ठोस मुद्दे मांडले, आकडेवारी दिली, घटना मांडल्या आहेत. सभागृहात बोलत असताना सन्माननीय सदस्य खरे बोलत असतात.

सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी या ठिकाणी बांगला देशमधून सिमेंट येते असे सांगितले होते. त्या सिमेंट कंपन्यांची नावे घेतली होती. त्या कंपन्यांचा माल कोठून येतो, जकात कराची माहिती सांगितली होती. त्या विषयाची चौकशी करु असे काहीही सांगितले नाही. या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची घोषणा करावयास पाहिजे होती. अशा प्रकारची घटना घडली की, एखादी समिती नेमली जाते, तिचा अहवाल वर्षानुवर्षे प्रलंबित असतो. असे न होता येथे जे अधिकारी दोषी आहेत त्यांच्या विरोधात 15 दिवसात शासनामार्फत एफआयआर दाखल करण्यात येईल. इतके तरी मुख्यमंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एखाद्या गंभीर घटनेसंबंधी चर्चा केल्यानंतर त्या चर्चेला शासनाकडून निराशाजनक उत्तर देण्यात आलेले आहे. या संदर्भात आम्ही तावातावाने बोलल्यानंतर त्याचा अर्थ वेगळा निघू शकतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी मूळ घटनेसंबंधीचे उत्तर केवळ 7 मिनिटांमध्ये संपविले आहे. या घटनेसाठी शासनाने एक्सपर्टस्ना बोलविले, छोट्यातील छोटा आवाज ऐकणारी यंत्रणा वापरली. आतापर्यंत ढिगाऱ्याखालील लोकांचा शोध चालू आहे. जखमींना इतकी मदत दिली आहे, मृतांच्या नातेवाईकांना इतकी रक्कम दिली आहे. सर्व ठीक आहे. त्या उत्तराचा शेवट एका उपायुक्तांच्या निलंबनाने केला आहे. त्याच्या पलीकडे आम्ही काही ऐकलेले नाही. त्यानंतरची 15 मिनिटे माननीय मुख्यमंत्र्यांनी ठोस उपाययोजना करण्यासंबंधीचे उत्तर दिले आहे. It was a good attempt to float various housing schemes. गृहनिर्माणाच्या योजना कशा करणार ते सांगितले आहे. क्लस्टर डेव्हलपमेंटचा विषय नियमात बसतो की नाही,

3.....



NTK/ D/ ST/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

त्याबाबत वेगवेगळे अहवाल समोर आलेले आहेत.

माझी अशी सूचना आहे की, जी बेकायदेशीर बांधकामे आहेत ती अधिकृत करावीत आणि म्हाडाच्या ताब्यात घ्यावी किंवा शासनाच्या ताब्यात घ्यावी आणि त्या मालकांना निष्कासित करावे. कारण लोकांच्या जीवनाचा हा प्रश्न आहे. क्लस्टर डेव्हलपमेंटमधून जी घरे उपलब्ध होतील ती सरकारला मिळतील. ज्यांनी बेकायदेशीरपणे बांधकाम करुन लोकांच्या जीवाशी खेळ चालविला आहे त्या सर्व इमारती शासनाने स्वतःच्या ताब्यात घ्याव्या. आज खाजगी मालकीच्या इमारती असल्यामुळे सरकारला ताब्यात घेता येत नाही, त्यामुळे लोकांना मृत्यूच्या सापळ्यात राहावे लागते. ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. अशा घटनांना विभाग प्रमुखांना जबाबदार धरले जाते.

सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी पहिल्या व दुसऱ्या अशा दोन वॉर्ड ऑफिसरचा व्यवस्थित उल्लेख केला होता. त्यांचे तातडीने निलंबन होईल असे आम्हाला वाटले होते. आम्ही त्या महानगरपालिकेच्या आयुक्तांवर कारवाई करण्याची मागणी केलेली नाही, परंतु त्यांची तातडीने बदली करावी असे सांगितले होते. जेणे करुन दोषी अधिकाऱ्यांमध्ये एक संदेश जाईल. त्या अनधिकृत बांधकामाचे फोटो देण्यात आले होते.

यानंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ ST/ पूर्वी श्री.खंदारे... 19:00

श्री.दिवाकर रावते........

तीन महिने आयुक्तांकडे तक्रारी दिल्या जात होत्या. आयुक्त त्या तक्रारी खालच्या अधिकाऱ्यांकडे पाठवित असतील, ते स्वत: जाऊन पाहणी करतील असे आम्ही म्हणत नाही. परंतु आयुक्तांची जबाबदारी होती. आयुक्तांना तातडीने आजच्या आज सक्तीच्या रजेवर पाठवित आहोत, त्यांची बदली करीत आहोत असा निर्णय घेतला असता तर लोकांपर्यंत संदेश पोहोचला असता.

सभापती महोदय, मुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तरामध्ये कोणती घरे बांधणार, किती बांधणार, परवडणारी घरे किती बांधणार, गिरणी कामगारांना घरे देणार आहोत हे जे सांगितले आहे त्याची आवश्यकता नव्हती किंवा आम्हाला ते अपेक्षित नव्हते. त्यांचे उत्तर आम्ही ऐकून घेतले. योजना चांगल्या पध्दतीने लोकांपर्यंत पोहोचविली गेली. परंतु घडलेल्या दुर्घटनेबाबत जे दोषी आहेत त्यांची चौकशी केली जाणार हे ठीक आहे, परंतु जे डोळयासमोर दोषी असल्याचे दिसत आहेत, ज्या दोन प्रभाग अधिकाऱ्यांची माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी नावे सांगितली त्याबाबत काही भाष्य केले नाही. आम्ही आग्रह धरला होता की, आयुक्तांबाबत शासनाने ठोस निर्णय घ्यावा. महापालिकेचे प्रमुख म्हणून त्यांची जबाबदारी आहे. ठाण्यामध्ये ही पहिलीच घटना घडलेली नाही. यापूर्वी साईराज इमारत कोसळली. निष्पाप लोकांना प्राण गमवावे लागल्याची ही चौथी की पाचवी घटना आहे. या संदर्भात ठोस निर्णय घेतला तर बरे होईल. जेणेकरुन सरकारच्या या घटनेकडे बघण्याचा दृष्टीकोन ठामपणे समोर येईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, नियम 97 अन्वयेच्या अल्पकालीन चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्तावाद्वारे ठाण्यातील अनधिकृत इमारत कोसळल्याबाबतचा विषय मांडला होता. अत्यंत गांभीर्याने त्यांनी सदनामध्ये विषय मांडला होता. त्यानंतर अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत सहभाग घेऊन आपले विचार मांडले. विधिमंडळाचे नेते माननीय मुख्यमंत्री यांनी सदनामध्ये तितक्याच गांभीर्याने मांडलेल्या प्रश्नांना उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी सुरुवातीला घटनेची माहिती सभागृहाला दिली. ज्या अपेक्षा सभागृहाने व्यक्त केल्या आहेत, संबंधित जे कोणी अधिकारी असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून उपाययोजना केली पाहिजे या सर्व मुद्यांबाबत त्यांनी सदनाला व्यवस्थित माहिती दिली आहे.त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, जे अधिकारी दोषी आहेत त्यांना निलंबित करण्याची घोषणा केली. वन विभागाचे अधिकारी दोषी सापडले तर त्यांच्यावर कारवाई करु असे सांगितले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे........

क्लस्टर डेव्हलपमेंटच्या संदर्भात कशा पध्दतीने विषय पुढे न्यायचा, अधिकृत आणि अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात निर्णय घेऊ असे स्पष्टपणे सांगितले आहे. मुंबईप्रमाणे ठाणे शहरामध्ये एसआरए योजना करण्याच्या संदर्भात उल्लेख केला आहे. अत्यंत गांभीर्याने सर्व विषयांबाबत उत्तर दिल्यानंतर वेगळ्या प्रकारची मांडणी केली असे सांगण्यात आले. माननीय मुख्यमंत्र्यांनी अत्यंत गांभीर्याने सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन उत्तर दिलेले आहे......(अडथळा).....जे विषय याठिकाणी गांभीर्याने मांडले त्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा गुणगौरव समारंभ सुरु आहे काय?

**सभापती** : आजची चर्चा नियम 97 अन्वये घेण्यात आली होती. माननीय विरोधी पक्षाकडून नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना आली होती ही वस्तुस्थिती आहे. ज्यावेळी एखादा प्रस्ताव चर्चेला येतो त्यावेळी प्रामुख्याने माननीय विरोधी पक्षनेते प्रस्ताव मांडतात. दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य त्या चर्चेमध्ये सहभाग घेतात. त्या चर्चेला शासनाकडून उत्तर आल्यानंतर जर एखादी शंका असेल तर नंतर त्याबाबत आपल्या मनातील भावना ते व्यक्त करतात. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिल्यानंतर त्यांच्या मनातील काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी याबाबत मघाशी आपल्या भावना व्यक्त केल्या.

नंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्यासंदर्भात माननीय श्री. माणिकराव ठाकरे यांनी त्यांचे मत मांडले आहे. माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अपूर्ण उत्तराच्या संदर्भात उल्लेख केला आहे. माननीय श्री. माणिकराव ठाकरे यांनी याच विषयाच्या संदर्भात भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी सन्माननीय सदस्य श्री. आशिष शेलार व सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे यांनाही बोलण्याची संधी देणार असून त्यांनी आपले मुद्दे थोडक्यात मांडण्याची आवश्यकता आहे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, मी ज्या मुद्यांच्या उल्लेख भाषणात केला होता ते मुद्दे मी रिपीट करणार नाही. दूरगामी विचाराचे स्वागत केले पाहिजे असे मला वाटते. परंतु काही स्पेसिफिक मुद्दे आम्ही भाषणामध्ये विचारले होते त्याची माहिती माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिली असती तर बरे झाले असते.

सभापती महोदय,पक्की जी घरे आहेत ती अनाधिकृत आहेत, त्यांना रेग्युलराईज करण्याचा विचार केला जाईल. कच्ची घरे अनाधिकृत आहेत त्यांच्यावर ॲक्शन घेतली जाईल असा उल्लेख माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेला आहे. त्यामुळे या विधानाचा अर्थ आपण ठाणे परिसरात एफएसआय वाढविणार आहात असा होतो त्यामुळे आपण ठाणे परिसरात एफएसआय वाढविणार आहात काय ?

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी क्लस्टर डेव्हलपमेंटचा उल्लेख केलेला आहे. सन 2011 साली ठाणे महानगरपालिकेने क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता परंतु या प्रस्तावाला दोन वर्षे का लागली ? दोन वर्षे लागली नसती तर कालची घटना टळली असती काय ? ज्या दोन इमारती पडल्या त्यासंदर्भात श्री. के.सी. श्रीवास्तव व अग्रवाल साहेबांच्या कमिटीच्या रेकमेंडेशन मधून आपल्याला बीपीएमसी आणि बीएमसी ॲक्टमध्ये बदल करावयाचा होता तो का केला नाही ?

सभापती महोदय, महसूल अनाधिकृत शोध पथके इनॲक्टीव्ह आहेत. ही पथके ॲक्टीव्ह होण्याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या भाषणात काहीही उल्लेख आलेला नाही. त्यामुळे ही पथके कधीपर्यंत ॲक्टीव्ह होणार आहेत ? फॉरेस्टच्या जमिनीवर 13,824 अनाधिकृत इमारती आहेत परंतु त्यासंदर्भातील धोरण स्पष्ट करण्यात आलेले नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

सभापती महोदय,पाकिस्तान आणि बांगलादेश मधून सिमेंट आणले जात आहे. आपल्याकडे 290 रुपयांना सिमेंटची गोणी मिळते परंतु पाकिस्तान आणि बांगलादेश मधील सिमेंट 230 रुपयांना मिळत आहे. नॅशनल बिल्डिंग कोड प्रमाणे हे सिमेंट व्हायबल आणि योग्य नाही. या सिमेंट कंपनी पैकी एका सिमेंट कंपनीचे नाव लकी कंपनी आहे. लकी कंपनी कराची मधील असून ही कंपनी लकी मुहम्मद अली तबा यांची असून या सिमेंटचा डिस्ट्रीब्युटर माहिम मध्ये राहतो. या सिमेंट कंपन्याचे सिमेंट नॅशनल बिल्डिंग कोड प्रमाणे नसल्यामुळे यासंदर्भात चौकशी केली जाणार आहे काय ?

**सभापती** : नियम 97 अन्वये चर्चा झाल्यानंतर ज्यावेळेला माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर दिले जाते त्यानंतर प्रश्नोत्तरे होत नसतात. फक्त सन्माननीय विरोधी पक्ष नेते किंवा अन्य एखाद्या सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली जात असते. त्यामुळे मी आता प्रश्न विचारण्याची परवानगी देणार नाही. परंतु पूर्वी मी दोन सदस्यांचे नाव पुकारले असल्यामुळे त्यांना बोलण्यासाठी एक मिनिटांची संधी देणार आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मुंब्रा येथे इमारत कोसळून गंभीर घटना झाली व त्या घटनेवर आज आपण चर्चा केली. अशा घटना पुढे घडू नये यासाठी सन्माननीय सदस्यांनी सूचना कराव्यात यासाठीच ही चर्चा झालेली आहे. आपल्याकडे जवळपास सर्व ठिकाणी इ-टेंडरींग सिस्टीम झालेली आहे परंतु आपल्याकडे ज्या 7/12 च्या नोंदी दिल्या जातात त्यावर नंतर पेन्सीलने रिमार्क्स मारले जातात. अधिकारी भ्रष्टाचाराच्या मार्गाने किंवा रागाने पेन्सिलचे रिमार्क्स मारीत असतात परंतु पेन्सिलचे हे रिमार्क्स पुढच्या पिढी पर्यंत जात असतात. त्यामुळे यासंदर्भात मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. 7/12 च्या उताऱ्यावरील पेन्सिलचा रिमार्क्स रद्द करण्यात यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, भ्रष्टाचारामधून एसआरए आणि रि-डेव्हलपमेंटची निर्मिती झालेली आहे. एसआरए आणि रि-डेव्हलपमेंटमध्ये आपण सेलसाठी जी बिल्डिंग बांधतो तिची कंडीशन चांगली असते परंतु ज्या ठिकाणी झोपडपट्टीवाल्यांसाठी किंवा रि-डेव्हलपमेंटसाठी बिल्डिंग बांधली जाते त्या

श्री. किरण पावसकर.....

बिल्डिंगचे ऑडीट केले जात नाही त्यामुळे रि-डेव्हलपमेंटसाठी बिल्डींगचे ऑडीट केले जाणार आहे काय ? आज जो प्रकार झालेला आहे तो मुंबईतील एसआरएच्या काही बिल्डिंगच्या संदर्भात होऊ शकतो हे सुध्दा आपण लक्षात घेतले पाहिजे.

सभापती महोदय, माझ्या भाषणात मी अधिकाऱ्यांची नावे व डिटेल माहिती दिलेली आहे. परंतु त्यातील काही अधिकाऱ्यांवर आपण ठोस कारवाई केली नाही तर भविष्यात हे प्रकार थांबणार नाहीत.

यानंतर श्री. मंगेश.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

आपल्याकडील सर्वच अधिकारी वाईट नाहीत. काही अधिकारी चांगलेही काम करीत आहेत, त्यांना शाबासकी पण मिळाली पाहिजे. श्री. थोरबोले, श्री. सचिन जोशी किंवा श्री. नितेश ठाकूर यांची मिळालेली संपत्ती म्हणजे एखाद्या छोट्याशा राज्याचे बजेट होऊ शकेल. आपण त्यांच्यावर ठोस कारवाई केली आणि भ्रष्टाचार थांबविला तरच दर्जेदार व चांगल्या पध्दतीचे बांधकाम होऊ शकेल.

श्री. निरंजन डावखरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय पोटतिडकीने मते मांडली. काल मी सिव्हिल हॉस्पिटल आणि त्या साईटला व्हिजीट केली. तेथे रक्ताच्या थळ्या पडल्या आहेत. ते बघून मन गहिवरले. वॉर्ड ऑफिसर ग्रास रूटला काम करतात. सध्याचे वॉर्ड ऑफिसर श्री. आंधळे हे तेथे 2 महिन्यांपासून काम करीत आहेत, या पूर्वी तेथे श्री. थोरबोले हे अधिकारी काम करीत होते. आपण त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करणार का ? जमिल कुरेशी व बिल्डर यांना जे कलम लावले आहे, त्याप्रमाणे यांच्यावर देखील कारवाई करणार का ? कारण आपण असा एक प्रिसिडंट सेट करणे गरजेचे आहे. जेणकरून या सर्व गोष्टींना आळा बसू शकेल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल मला बोलावयाचे आहे. मी चर्चेचा विषय मांडला त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे सभागृहात उपस्थित नव्हते. आम्ही चर्चा सुरू केली. आमच्या भाषणाच्या वेळी देखील ते उपस्थित नव्हते. ते ज्यावेळी सभागृहात आले, त्यावेळी मी कुठे होतो, ते मी सांगेन. ऐकायची सोय नव्हती, हे देखील मी सांगू शकतो. परंतु, मला ते सांगायचे नाही. विधानपरिषदेत उत्तर देण्यास येण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांना वेळ लागणार होता, त्यामुळे 2-3 सन्माननीय सदस्यांनी बोलावे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले. त्यामुळे तेही थोडे बोलले. आम्हाला या गोष्टीचे राजकारण करायचे नाही. आम्ही त्यासाठी इच्छूकही नाही. तुम्ही आमची भाषणे काढून पहावीत. आम्ही राजकीय बोललेलो नाही. तुम्हाला पॉलिटिकली मुख्यमंत्र्यांना सपोर्ट द्यायचा असेल तर तुम्ही महिला आयोगाचे अध्यक्षपद एकमताने ठरवा, तरच तुम्ही खरोखर त्यांच्या पाठीशी आहात, असे दिसेल. आपण जोपर्यंत तसे करीत नाही .... आम्हाला राजकारण आणण्याची

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..2

श्री. विनोद तावडे ....

गरज नाही. आम्हाला राजकारण करायचे नाही. माझे जे काही प्रश्न आहेत, त्यांची त्यांनी उत्तरे द्यावीत.

**सभापती** : मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, सभागृहात अत्यंत गांभीर्याने चर्चा झाली आहे. त्यामुळे चर्चेचा शेवटही गांभीर्याने करावा.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही जेन्युईनली आमच्या मनातील शंका उपस्थित केल्या. आमच्या शंकांचे इंटेशन सन्माननीय सदस्यांनी चॅलेंज करू नये, एवढीच माझी विनंती आहे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सभागृहात ठाण्याच्या अतिशय दूर्भाग्यपूर्ण घटनेबद्दल चर्चा झाली. त्या घटनेची संपूर्ण अधिकृत माहिती देणे, हे माझे कर्तव्य होते. सुरूवातीला ती माहिती मी दिली. अर्थात आणखी काही नवीन माहिती उपलब्ध झाली तर ती देखील सभागृहाला देण्यात येईल. मघाशी मी सभागृहात नव्हतो, हे मी मान्य करतो. मी सर्व सन्माननीय सदस्यांचे मुद्दे नोंद केले आहेत. सन्माननीय सदस्यांचे बरेच मुद्दे आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांचे मुद्दे स्पष्ट करणे मला शक्य झाले नाही.

सुरूवातीला सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चर्चेच्या भाषणास सुरूवात केली. त्यांनी सांगितले की, सरकार स्वस्तात घरे देत नाही, म्हाडाच्या घरांच्या किंमती जास्त आहेत, घराबाबतची समस्या खूप मोठी आहे, स्वस्त घरांचा पर्याय सरकार देत नसल्यामुळे सामान्य माणसे बळी पडतात, राज्यात 47 टक्के नागरिकरण झाले आहे. सरकार घरे कशा प्रकारे उपलब्ध करून देणार आहे, या संदर्भातील 3-4 बाबींच्या बद्दल मी थोडक्यात धोरणात्मक माहिती सांगितली. मी माझ्या भाषणात सांगितले की, क्लस्टर डेव्हलमेंटचा विचार करीत आहोत, रेंटल हाऊसिंग बदलून परवडणाऱ्या घरांमध्ये रूपांतर करीत आहोत. शासनाचा त्या मागचा उद्देश असा आहे की, हाऊसिंग स्टॉक वाढला पाहिजे. शासनाकडून या संदर्भात अनेक समित्या गठीत झाल्या, हे मी मान्य करतो.

या ठिकाणी श्रीवास्तव समितीचा उल्लेख झाला. श्रीवास्तव समितीने सूचना केली होती की, 30 वर्षांपेक्षा अधिक जुन्या घरांच्या स्ट्रक्चरचे ऑडिट केले पाहिजे. शासनाने ही सूचना मान्य केली. त्या सूचनेची अंमलबजावणी केली पाहिजे, हे देखील मान्य आहे.
मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या मुद्याला वैयक्तिकरित्या उत्तर देऊ शकलो

..3



MSK/ पूर्वी श्री. जुन्नरे 19:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ....

नाही. कारण त्यासाठी फार वेळ लागेल. मी सांगितले आहे की, दोन अधिकाऱ्यांच्या विरूध्द निलंबनाची कारवाई केली आहे. इमारत वन खात्याची असेल तर निलंबनाच्या कारवाईला तिसऱ्या अधिकाऱ्याला देखील सामोरे जावे लागेल. ज्युडिशियल इन्क्वॉयरी कमिटी नेमता आली असती पण त्याला फार वेळ लागतो. ताबडतोब, लवकरात लवकर काही निष्कर्ष निघावा म्हणून एका ज्येष्ठ अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. त्यातून जो कोणी दोषी असेल तो सापडेल. तत्कालीन डीएमसी असेल किंवा त्यापेक्षा उच्च अधिकारी असेल, दोषी अधिकाऱ्यावर कडक कारवाई केली जाईल. आमची अपेक्षा आहे की, या संदर्भातील रिपोर्ट 1 महिन्याच्या आत मिळेल. आम्ही या संदर्भातील रिपोर्ट 1 महिन्याच्या आत देण्याचा प्रयत्न करतो. परंतु, हे आश्वासन आहे, असे कृपा करून समजू नये.

( नंतर श्री. भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण ....

सभापती महोदय, ही गंभीर समस्या आहे. मुंब्रा भागात आपण गेलो तर 80 ते 90 टक्के घरे आपल्याला अशा प्रकारची आढळून येतील. या सर्वांचे पुनर्वसन करायचे असेल तर त्यांना कुठे ठेवायचे, त्यांच्यासाठी ट्रान्झिट कुठे उभारायचा, क्लस्टर योजने अंतर्गत काम करता येईल काय इत्यादी सर्व प्रश्न आपल्या समोर आहेत. हा गंभीर विषय आहे. आपण बऱ्याच समित्या नेमल्या होत्या. त्यावर एकमत होऊ शकलेले नाही म्हणूनच वेळ लागलेला आहे.

मी पाच-सहा धोरणात्मक गोष्टींचा उल्लेख करणार आहे. ठाणे परिसरामध्ये किंवा मुंबई महानगर क्षेत्रामध्ये क्लस्टर योजना आणण्याचा विचार करण्यात येणार आहे. हा नवीन विचार आहे. आपण आता पर्यंत अनधिकृत घरांना कधी संरक्षण देत नव्हतो. ते द्यावे किंवा नाही याचा विचार करावा लागणार आहे. त्यांना संरक्षण देण्याचे ठरले तर किती एफएसआय द्यायचा याचा विचार करावा लागेल. हा अतिशय नवा विचार असणार आहे. यासंबंधी आपल्याला सभागृहामध्ये चर्चेद्वारा विचार करता येईल व त्यात आणखी काही सुधारणा करणे आवश्यक आहे असे वाटले तर ती देखील करता येईल.

केंद्र सरकारने सांगितले आहे की, हौसिंग पॉलिसीमध्ये किमान 20 टक्के परवडणारी घरे आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी बांधावीत. देशात महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे की, त्याने केंद्र शासनाचे 20 टक्के घरांचे धोरण स्वीकारले आहे. यासंबंधात देखील उलटसुलट सूचना करण्यात आल्यामुळे आम्ही लवकरच अधिसूचना निर्गमित करणार आहोत.

मी माझ्या भाषणामध्ये 33 (5) डीसीआर चा उल्लेख केला नाही. म्हाडाच्या घरांच्या पुनर्वसनाचा निर्णय आम्ही मुंबईपुरता घेतला आहे. या आठवड्यामध्ये कदाचित त्यासंबंधातील घोषणा होईल. सदर योजना संपूर्ण महानगर प्रांताला लागू करण्याकरिता उल्लेख केलेला आहे. मी माझ्या वक्तव्यामध्ये माहिती दिल्यानंतर कोणती कारवाई करण्यात येईल हे सांगताना काही धोरणात्मक बाबींना स्पर्श केला आहे.

सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सिमेंटचा उल्लेख केला आहे. यासंबंधी मी निश्चितच माहिती घेतो. मी खालच्या सभागृहामध्ये असल्यामुळे मला निश्चित माहिती मिळू शकलेली नाही. नॅशनल बिल्डींग कोडचे उल्लंघन करणारे कुठलेही बिल्डींग मटेरियल आले असेल तर कडक कारवाई करावी लागेल. आपल्याला स्ट्रक्चरल ऑडिटची यंत्रणा, क्वालिटी ...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

कंट्रोलची यंत्रणा, या सगळ्यामध्ये खूप बळकटीकरण, मजबूतीकरण करावे लागेल, याबाबत दुमत नाही. मला वाटते आपल्याला कुठे तरी सुरूवात करावी लागेल. त्यानुसार मोठ्या प्रमाणावर हौसिंग स्टॉक उपलब्ध होईल.

सभापती महोदय, आणखी एका मुद्याला माझ्याकडून स्पर्श करावयाचे राहिले आहे. तो मुद्दा मी आपल्या अनुमतीने मांडतो. तो मुद्दा म्हणजे अनधिकृत बांधकामाला रोखण्याकरिता आपण काय करणार आहोत. आपण एमआरटीपी कायदा केला असून त्यामध्ये सुधारणा केली आहे. कोणत्याही स्वरूपाचे अनधिकृत बांधकाम असले तरी त्याकरिता कोणाला तरी जबाबदार धरले पाहिजे. नुसते जबाबदार न धरता शिक्षेची तरतूद असली पाहिजे, दंडाची तरतूद असली पाहिजे. तसा प्रकारचा कायदा विधिमंडळाने केलेला आहे. तो कायदा आपण दिल्लीला मान्यतेकरिता पाठविला होता. पण त्यास खूप वेळ लागला. शेवटी तो कायदा मान्य झालेला आहे. आताच्या कायद्याप्रमाणे डेझिग्नेटेड ऑफिसरला जबाबदार धरण्यात येईल. त्याने कामामध्ये गलथानपणा किंवा कसूर केली असेल तर 3 वर्षाची शिक्षा आणि दंडाच्या शिक्षेची तरतूद कायद्यामध्ये केलेली आहे. याची अंमलबजावणी कोणी करायची असा प्रश्न निर्माण होतो म्हणून नवीन कल्पना पुढे आली की, विशेष नागरी पोलीस दल महानगरपालिकांच्या आयुक्तांच्या अधिपत्याखाली दिले पाहिजे. त्यामध्येही चर्चा झाली. विशेष नागरी पोलीस ठाणी असतील, किंवा नागरी पोलीस दल असेल तर त्यासाठी पोलीस विभागाने त्यांचे अधिकारी व कर्मचारी प्रतिनियुक्तीवर पाठवावेत अशा आशयाची देखील चर्चा झाली. आम्ही महापालिकेच्या आयुक्तांना बोलावून चर्चा केली. मुंबई महानगरपालिकेने सांगितले की,आम्हाला 1100 पोलीस शिपाई व 28 अधिकारी लागतील. सगळी चर्चा झाल्यानंतर गृह विभागाने सांगितले की, आम्ही पोलीस द्यायला तयार आहोत मात्र, तीन महिने आगाऊ पोलिसांवर होणाऱ्या खर्चाबद्दलची रक्कम अदा केली पाहिजे. तेथे हे सर्व अडकले आहे. ॲडव्हान्स पेमेंट करायला मुंबई महानगरपालिकेने साफ नकार दिला आहे. विरोधी पक्षाची मुंबई महानगरपालिकेत सत्ता आहे. मला त्यांना विनंती करावयाची आहे की, अशा प्रकारे आपल्याला नागरी पोलीस व्यवस्था करता आली नाही तर कितीही कायदे कडक केले तरी त्याची अंमलबजावणी करता येणार नाही. ...3/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

मुंब्रा सारख्या ठिकाणी 80 ते 90 टक्के अनधिकृत घरे आहेत. ही सर्व घरे एकाच वेळी पाडता येणार नाही. पिंपरी-चिंचवडच्या अधिकाऱ्यांनी खूप चांगले काम केले आहे. त्यांनी मोठ-मोठ्या इमारती पाडल्या.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

इमारती निष्कासित केल्या पाहिजेत हे खरे आहे. पण त्याला पर्याय काय? मग आपल्याला कुठेतरी ट्रान्झिट ॲकॉमोडेशनची व्यवस्था करावी लागेल. म्हणून आता एमएमआरडीएची जी निम्मी घरे आहेत ती आम्ही ट्रान्झिट ॲकॉमोडेशनसाठी देण्याचा विचार करीत आहोत. मला असे वाटते की, याबाबतीत सगळा सारासार विचार करावा लागेल.

सभापती महोदय, याठिकाणी जवळजवळ 14 सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोदजी तावडे यांच्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकरजी, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, जयंत प्र.पाटील, श्री.निरंजन डावखरे, श्री.मुझफ्फर हुसेन, ॲड.आशिष शेलार, सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश बिनसाळे, राम पंडागळे,प्रवीण पोटे, श्रीमती अलका देसाई, सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, माणिकरावजी ठाकरे, श्रीमती विद्याताई चव्हाण इत्यादींनी भाषण केले आहे. या सगळया सन्माननीय सदस्यांनी जे स्पेसिफीक मुद्दे उपस्थित केले आहेत, त्याला मी यथावकाश नक्कीच उत्तर देईन. कारण मी सगळया सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकलेली नाहीत. त्यामुळे आता माझ्याकडे या संबंधातील उत्तरे नाहीत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सिमेंटच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला आहे.त्याला मी उत्तर दिले आहे. मला असे वाटते की, राज्यातील वाढते नागरिकीकरण लक्षात घेता आपल्याला गृहनिर्माणासंबंधी एक धोरण ठरवावे लागेल. आताच आपण नागरिकीरणामध्ये 50 टक्क्याच्या पुढे गेलो आहोत. पूर्वी आपले नागरिकीरणाचे प्रमाण 46 टक्के होते. आजची लोकसंख्या पाहिली तर आपण बहुतेक 50 टक्क्याचा टप्पा पार केलेला आहे हे दिसून येते. आज लोकांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. गेल्या 8-10 वर्षामध्ये आर्थिक सुबत्ता वाढलेली आहे, दरडोई उत्पन्न वाढलेले आहे आणि लोकांमध्ये क्रयशक्ती निर्माण झालेली आहे, त्यांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत आणि त्यामुळे नागरिकीरणाचा वेगही जोरात वाढलेला आहे.त्यासाठी आपल्याला एक व्यापक अशा प्रकारचे धोरण राज्याच्या नागरिकीकरणा करता, वाहतुकींच्या समस्यांकरता तसेच गृहनिर्माणा करता आखावे लागेल हे सांगण्याचा मी थोडा प्रयत्न केला आहे. याबाबतीत आपल्याला अधिक चर्चा करावी लागेल.

सभापती महोदय, यासंबंधातील जी धोरणे आहेत ती बऱ्याच दिवसापासून चर्चेमध्ये आहेत.

. . . .4जे-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

याबाबतीत निर्णय घेणे हे क्लिष्ट असून ते सोपे नाही. त्यामुळे याबाबतीत निर्णय घेण्यास जरी वेळ लागत असला तरी आता एकेक निर्णय या अधिवेशनाच्या कालखंडामध्ये घेण्याचा प्रयत्न केला जाईल. जे अधिनियम किंवा डी.सी.रुल आहेत त्यासंबंधात सभागृहाला अवगत केले जाईल. राज्यातील नागरिकीरणाच्या बाबतीत जी समस्या आहे ती आम्ही अतिशय गंभीरपणे, योग्य पध्दतीने हाताळली नाही तर कदाचित मुंब्र्यासारख्या घटना आणखी घडू शकतील. याबाबतीत शासन गंभीर आहे आणि आपण सर्वांनी मिळून याविषयी धोरण आखून राज्याच्या नागरिकीरणाचा प्रश्न सोडविला पाहिजे अशी मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो. धन्यवाद.

**सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

----

. . . .4 जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>अशासकीय विधेयके</u>

**पृ. शी.** : मालकी हक्कांच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत (सुधारणा) विधेयक.

**L. C. BILL NO. III OF 2013**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA OWNERSHIP FLATS (REGULATION OF THE PROMOTION OF CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER) ACT, 1963.)

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त ): सभापती महोदय, सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 3- महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत ) अधिनियम, 1963 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक-3 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे

-----

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: प्रसवपूर्व निदानतंत्राच्या वापराचे विनियमन करण्याबाबत (सुधारणा) विधेयक.

**L.C.BILL NO IV OF 2013**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGULATION OF USE OF PRE- NATAL DIAGNOSTIC TECHNIQUES ACT, 1988.)

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन 2013 चे वि. प. वि. क्रमांक 4- महाराष्ट्र प्रसवपूर्व निदानतंत्राच्या वापराचे विनियम करण्याबाबत अधिनियम, 1988 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

स**भापती** : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि. प. वि. क्रमांक-4 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) विनियमन (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO VI OF 2013**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYEES OF PRIVATE SCHOOLS (CONDITIONS OF SERVICE) REGULATION ACT, 1977.)

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, सन 2013 चे वि. प. वि. क्रमांक -6 महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, 1977 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक-6 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

------

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार,दिनांक 8 एप्रिल, 2013 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 28 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 8 एप्रिल, 2013 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही